ई/३१४



इतिहासांतील सहली

(खंड २ रा)

ले.- य. न. केळकर

चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणें 2.

श्री. वसंतराव भागवत

२२८
व. भा.

इतिहासातील सहली : खंड २

लेखक
यशवंत नरसिंह केळकर

किंमत ६ रुपये

~~किंमत ४ रुपये~~

चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणें २.

मुद्रक-प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी
चित्रशाळा प्रेस,
५६२ सदाशिव, पुणें २

प्रथमावृत्तीचा हक्क प्रकाशकाकडे

प्रथमावृत्ति १९६४; प्रति १००० (एक हजार)

ई/३९४

प्रास्ताविक

उपलब्ध सर्व माहिती जमेस धरून व नवीन संशोधनाची किती तरी नवी भर घालून हे लेख लिहिले आहेत ते अभ्यासकांना व वाचकांना खास आवडतील असें वाटतें. यांतले कांहीं लेख पूर्वी वसंत व सकाळमध्यें येऊन गेले आहेत.

सहलींचे असे आणखी तीन खंड छापण्याइतकी नवी लेखसामग्री मजजवळ असून प्रकाशक मिळाल्यास ती वाचकांस सादर करण्याची उमेद बाळगतों.

हा दुसरा खंड प्रकाशित करण्याची उत्सुकता व अगत्य चित्रशाळा प्रकाशनाचे श्री. दामूआण्णा जोशी यांनीं दाखविलें, त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच.

‘ पुष्करणी ’ ३३।२४ एरंडवणें
डे. जि. पुणें ४

य. न. केळकर,

* * *

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था

अनुक्रमणिका

विषय		पृष्ठ
१. बाजीरावाच्या बायका	- - -	१
२. छत्रपति व पेशवे यांचे अनौरस वंशज	-	५५
३. हैदरअल्लीचें अद्‌भुत चरित्र	- -	११८
४. दुसऱ्या बाजीरावांचा शुक्रवारवाडा	- -	१८७
५. नावजी बलकवडे एक अज्ञात मराठावीर	-	२०२
६. सप्तर्षि	- - - - -	२१३

* * *

: १ :

बाजीरावाच्या बायका

या निबंधांत दुसऱ्या बाजीरावांच्या बायकांसबंधीं माहिती ग्रथित केली आहे. "बाजीरावांच्या बायका" या शब्दांत त्यांच्या लग्नाच्या बायका, रक्षा, नाटकशाळा, खासे-चाकरीच्या स्त्रिया आणि त्यांचीं प्रीतिपात्रें म्हणून बोभाटा झालेल्या प्रतिष्ठित घरांतील स्त्रिया या सर्वांचाच समावेश होतो. परंतु येथें त्यांच्या लग्नाच्या स्त्रियांचीच तेवढी माहिती सांगावयाची आहे.

आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व शोध-निबंधांचा व ऐतिहासिक साधनांचा अभ्यास करून ही माहिती चिकित्सकपणें संगतवार अशी संकलित केलेली असून शिवाय तींत आम्ही पेशवेदप्तरांत व अन्यत्र केलेल्या संशोधनांतील नव्या माहितीचीहि पुष्कळ भर घातली आहे व विषयाला पूर्णता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

दुसऱ्या बाजीरावांचीं एकूण अकरा लग्नें झालीं! त्यांपैकीं सहा ते पुण्यास पेशवा म्हणून अधिष्ठित असलेल्या काळांतील व बाकीचीं पांच ते ब्रह्मावर्तास इंग्रजांचे कैदी–जहागीरदार म्हणून राहिलेल्या काळांतील आहेत.

बाजीरावांचा जन्म ७ जानेवारी १७७५ रोजीं धार येथें झाला. त्यानंतर १७८३ मध्यें राघोबादादा बारभाईला शरण जाऊन कोपरगांवीं नजरकैदी म्हणून राहावयास कबूल झाले आणि पांच सात महिन्यांत तेथेंच वारले. पुढें अदमासें खर्ड्याच्या स्वारीच्या वेळीं जुन्नरला स्थलान्तर होईपर्यंत राघोबादादांचें सर्वच्या सर्व कुटुंब–म्हणजे आनंदीबाई, दत्तकपुत्र अमृतराव आणि औरसपुत्र बाजीराव व चिमाजी आप्पा–हे कोपरगांवासच राहिले. बाजीरावांचें पहिलें लग्न सबा समानीनांत म्हणजे सन १७८६ सालीं १६ जुलै रोजीं झाल्याची नोंद शकावलींतून तेवढी सांपडते. तत्संबंधीं एकहि तत्कालीन पत्र उपलब्ध नाहीं. राघोबादादा ११ डिसेंबर १७८३ रोजीं वारले. अर्थात् त्या वेळीं बाजीरावांचें वय अवघें ८ वर्षांचें होतें. वास्तविक तत्कालीन रूढीप्रमाणें त्याहि वयांत त्यांचें लग्न होऊन जाणें असंभवनीय नव्हतें. परंतु पेशवाईसाठीं वाद घालून पराजित झालेल्या व कैदी म्हणून ठेवलेल्या दायाद कुटुंबाकडे आस्थेनें कोण लक्ष पुरवणार? म्हणूनहि असेल कदाचित्, बाजीरावांचें लग्न राघोबाच्या मृत्यूनंतर तीन वर्षांनीं करण्यांत आलें.

राघोबादादांच्या आश्रितांत कोणी धोंडभट भागवत पालशेतकर नांवाचे गृहस्थ होते. त्यांचीच मुलगी नवरी म्हणून निवडून लग्न कोपरगांवीं झालें. (पेशवेदप्तर, भाग ४५ मध्यें धोंडभटाचे वंशज नारो मोरेश्वर भागवत यांनीं १७ सप्टेंबर १८४३ रोजीं कंपनी सरकारास जी यादी गुदरली तीवरून अशी हकीकत कळतेः—सवाई माधवरावांनीं धोंडभट भागवतांस बोलावून नेऊन सांगितलें कीं, तुमची कन्या बाजीरावांस द्या. त्याप्रमाणें लग्न शके १७०६ सालीं झालें. मग धोंडभट भागवत व्याही झाले म्हणून नाना फडणि-

सांनीं त्यांस पुण्यास राहण्यासाठीं वाडा देऊन ठेवलें व सालिना ३००० रु. व खेरीज कारकून एक, शिपाई सहा आणि घोडी दोन अशी नेमणूक करून दिली. पुढें बाजीराव पेशवे झाल्यावर त्यांनीं ती वार्षिक नेमणूक वाढवून पांच हजारांची केली व इतर परिवारासाठीं १००० रुपये जास्त केले. आणि ६००० रु. उत्पन्नाचे तीन गांव लावून दिले. पेशवाई गेल्यानंतर लगेच थोड्याच दिवसांत धोंडभटहि वारले. त्यानंतर इंग्रजांनीं धोंडभटजींचा मुलगा रघुनाथ धोंडदेव याजला फक्त वार्षिक १६०० रु. ची नेमणूक तहाहयात ठरवून दिली. पण रघुनाथ धोंडदेवहि त्यानंतर दोन वर्षांनीं वारल्यामुळें ती नेमणूक बंद झाली.) लग्नांत बाजीराव हे अकरा वर्षांचे होते. तेव्हां त्याच्या बायकोचें वय ६–७ वर्षांचेंच असेल. तिचें नांव भागीरथी असें ठेवण्यांत आलें.

पेशवेदप्तर खंडांपैकीं एक खंड " आनंदीबाईच्या दिनचर्या " या नांवाचा स्वतंत्रच आहे. त्यांत १७८६–८७ व ८८ या कालांतील कांहीं कांहीं दिनचर्या ग्रथित केल्या आहेत. त्यावरून बाजीरावांच्या प्रकृतीवर, स्वभावावर, आणि विषयी मनोवृत्तीवर चांगलाच प्रकाश पडतो. पुण्याहून त्यांच्या शिक्षणासाठीं खास शिक्षक म्हणून राघोपंत ठोसर या गुरुजींची नेमणूक झाली होती. तथापि बाजीरावांचा स्वभाव छांदस्, कोणाचे न ऐकणारा असाच होता. आनंदीबाईला त्याबाबत फार हळहळ वाटे. आणि ती त्यांना शिक्षा लागावी म्हणून फार जपे. तथापि बाळाचा जन्मगुणच कांहीं विशेष होता. पुढील उल्लेखांवरून याचा नीट खुलासा होईल:—

" बाजीराव कोणाचें ऐकत नाहींत. लिहिणें–पढणें सोडलें. निरंकुश राजसादृश्य आहे. "

" लिहिणें–पढणें होत नाहीं. मनस्वील वर्तणुकी होतात. "

" काल छ २ साबानी श्रीमंत मातुश्री बाईसाहेब यांची व बाबा-

साहेबांची (बाजीरावाची) कटकट झाली. येथें कोणास भीत नाहींत. बाईस टाकून बोलतात."

" बाबासाहेब अरवली फार करतात. तरी राघोपंत गुरुजीस कोपरगांवीं लौकर रवाना करावें."

आनंदीबाईचे उद्‌गार.... " बाजीराव अर्वाच्यगिरी फार करतात. ऐकत नाहींत. हें काय झालें ? साहेबांची (राघोबाची) दृष्टि पुढें पांचा वर्षी काय होईल हें सांगत होते आणि आणि हे (बाजीराव) कसे आहेत !"

बंदोबस्तास ठेवलेल्या वडीलधाऱ्या कारकुनास छड्या माराव्या, आईनें मना केलें असतां उनाडक्या कराव्या व गंगेंत डुंबण्यास जावें, मेलेले उंदीर सांपडले तर ढलप्या मिळवून त्यांची प्रेतयात्रा काढून त्यांस अग्नि द्यावा. एक ना दोन—अशा सारख्या खोड्या चालत.

तथापि त्यांत विशेष असें कांहीं म्हणतां येणार नाहीं. परंतु बाजीरावांच्या विषयासक्तीचें रोपटें बाळपणापासूनच किती अनावर होतें तें पाहून मात्र उद्वेग वाटेल. श्रीमंत, संस्थानिक किंवा जहागीरदार यांचीं कारटीं बहुधा अशींच निपजतात. कारण सत्ता, संपत्ति आणि कुसंगति यांचा त्रिदोष तेथें हटकून झालेला असतो. या गलिच्छ विषयाचीं तपशीलवार उदाहरणें जे इतिहासाभ्यासी असतील त्यांना वाटेल तितकीं काढून दाखवितां येतील. पण सर्वसामान्य वाचकांनीं " औंधकरांचें आत्मचरित्र " नुसतें चाळावें म्हणजे राजघराण्यांतील पोरांच्या वर्तणुकी कशा असतात याचें यथार्थ ज्ञान त्यांना होईल. असो.

दिनचर्येंतील दोनचार नोंदी दिल्या म्हणजे निराळें कांहीं सांगावयास नको.

" बाजीराव यांस गरमी झाली आहे, बायको थोर नाहीं, हेंच बाधा फार आहे, असें बाई (आनंदीबाई) बोलली."

" दोन महिन्यांमागें बाजीराव रात्रीं भागिर्थीबाई यांस बोलावीत

असत. असें एक, दोन, तीन वेळा जालें. हें बाईस कळलें. त्यावरून बाईनें मनाई केली. त्यास रागाऊन बाजीराव बोलूं लागले कीं, ' असें आहे त्यापक्षीं आम्हांस बायको नको. ती आमचे मातेप्रमाणें आहे ! ' असे एक, दोन, चार वेळां बाईजवळ बोलले. बाईहि रागें भरत. परंतु बाजीराव न ऐकत. त्यांस आज गोष्ट निघाली. त्याजवर बाजीराव बोलले कीं, ' ती तुमची सवत आहे. ' असें बोलतांच बाई रागे भरली आणि मारूं लागली. तोंडांत व लाता अशा मारल्या.बहुत क्रोध आला आणि म्हणाली, "मोठे मोठे हत्ती गेले तेव्हां काय जालें ? (म्हणजे मोठे मोठे हत्तीसारखे लोक गेले त्याऐवजीं हें कुलक्षणी पोर कां गेलें नाहीं ?) "

ही हकीकत १७८८ सालची आहे, हें वाचकांनीं लक्षांत धरावें. म्हणजे बाजीराव या वेळीं अवघे तेरा वर्षांचे होते आणि त्यांची बायको भागिर्थीबाई ही तर अवघी नऊ वर्षांचें केवळ अर्भकच होती. आणि याच वेळीं भागिर्थीबाईस पुढें दसऱ्याचे सुमारास पदर घालण्याची योजना आनंदीबाई करीत होती. जुन्या काळीं मुलगी वयांत आली, तिला रजोदर्शन प्राप्त झालें, म्हणजे तिला पदर घालण्याचा विधि करण्याची वहिवाट होती. याचाच अर्थ असा कीं, यावेळेपर्यंत बिचाऱ्या भागिर्थीबाईला स्त्रीत्वाचें दर्शनहि झालेलें नव्हतें. अशा स्थितींतील बाजीरावाचा व्रात्यपणा पाहून कोणासहि उद्वेगच न येईल तर काय होईल ?

या दांडगाईचाच परिणाम भागिर्थीबाईस भोंवलेला दिसतो, कारण तिच्या आजारासंबंधींच पुष्कळशा नोंदी आढळतात.

लग्न झाल्यानंतर भागिर्थीबाई एक वर्षानें १९ जुलै १७८६ सालीं सासरीं येऊन दाखल झाली. पुढील सालांत २-१०-१७८७ च्या पत्रांत आणखी एक अशी नोंद आहे. " भागिर्थीबाईचे समागमें आजी व धोंडभट भागवत (वडील) यांचे चुलतबंधु वैजनाथभट व येक कारकूनसुद्धां वाड्यांत राहिलीं आहेत. "

या नोंदींत आलेला वैजनाथभट हाच पुढें बाजीरावींत त्यांचा प्रीतिपात्र मुत्सद्दी " मामा भागवत " म्हणून प्रसिद्ध झाला.

बाजीरावांची ही पहिली बायको भागिर्थीबाई १७९३ सालीं वारली, म्हणजे मरणाचे वेळीं तिचें वय अवघें चौदा वर्षांचें होतें.

जुन्या काळीं बायकांच्याबद्दल विशेष आदर, आस्था किंवा प्रेम आजच्या-सारखें खचित नव्हतें. पहिली बायको मेली तर लगेच तिच्या मुतकांतच दुसरी करण्याइतका निर्दयपणा सर्रास दाखविला जात असे. ही प्रौढ वयस्कांची स्थिति; तर बाळपणच्या लग्नाबाबत विचारावयासच नको! सारा कारभार आईबापांच्या किंवा वडीलधाऱ्या माणसांच्या हातीं! आणि ते मुलाची बायको वारली तर जणूं काय त्याची खेळांतली बाहुलीच फुटली असें समजून तत्काळ दुसरी बाहुली म्हणजे नवरी मुलगी त्याला आणून देत.

अशी स्थिति असल्यामुळें बाजीरावांचें दुसरें लग्न तत्काळ उरकून टाकण्यांत आलें. सरदेसायांनीं या लग्नाची तारीख १८ जून १७९३ अशी दिली आहे.

हा दुसरा विवाह कोंकणांतील कोणी धोंडोपंत मंडलिक म्हणून होते, त्यांच्या कन्येशीं झाला. (हे धोंडोपंत म्हणजेच सुप्रसिद्ध रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचे आजोबा.) मंडलिक पेशव्यांचे व्याही झाले, म्हणून त्यांना कांहीं नेमणूकहि करून देण्यांत आली असलीच पाहिजे. ती नक्की काय होती म्हणजे इनाम गांव किती व कोणतें ? व नक्त काय द्यावें यासंबंधीं तपशील फारसा उपलब्ध नाहीं. तथापि पेशवे रोजकीर्दीत तत्संबंधीं आम्हांस पुढील १।२ उल्लेख नवीन उपलब्ध झाले आहेत, ते असेः—

शके १७२५ अर्बा अशर मयातेन छ २७ सवाल.

" २५०० रुपये धोंडोपंत मंडलिक यांची नेमणूक अशर-मयातेनचे अव्वल सालापासून दरसाल २००० रु. ठरली. त्यांपैकीं १५०० रु. नारोबाचे

गुजारतीनें पूर्वी देविले. बाकी इहिद्दे अशर पावेतों फडशाचे २५०० रुपये देविले. ''

दुसरी नोंद अशी—

" सलास मयातेन, माहे सफर. दफाते–धोंडो नारायण मंडालिक यांजकडे इनामती गांव व आगरें व शेतें आहेत. त्याचा सालमजकूरचा हक्क रुसुमाचा वसूल घेतां म्हणोन मशारानिलेनी विदित केलें. तरी वसूल घेतला असेल तो माघारा देणें म्हणोन सनदा हरि बल्लाळ यास. कसबे मुरुड ता॥ पंचनदी येथें आगरसेत आहे येविसी नारो रामचंद्र यास मौजे नाणीज ता॥ हातखांबे निम्मे आहे येविसी. ''

धोंडोपंत मंडलिकांना चार स्त्रिया होत्या. त्यांपैकीं दुसरी गिम्हवणें येथील गोखल्यांकडची मुलगी जी गंगाबाई तिच्या पोटीं झालेली जी दुर्गा नांवाची कन्या, तीच दुसऱ्या बाजीरावांस दिलेली. तो विवाह १८ जून १७९३ रोजीं झाला. सासरचें नांव सरस्वतीबाई असें ठेवण्यांत आलें. या विवाहानंतर धोंडोपंत पुण्यास राहावयास गेले. तेथें त्यांना पालखीची नेमणूक मिळाली. पालखीचें वेतन व नऊ भोयांचा आणि एका मशालीचा खर्च सरकारांतून मिळूं लागला. तो खर्च अंजनवेल ता॥ कचेरींतून खर्च पडत असे. पुण्यास असतां दररोज एक वेळ पालखींत बसून जामातांच्या दर्शनास सरकारवाड्यांत जाण्याचा धोंडोपंतांचा परिपाठ असे.

श्रीयुत सरदेसाई यांनीं आपल्या रियासतींत (पृष्ठ ५४०) सरस्वतीबाईचें नांव "सरस्वती कीं सत्यभामा ? " असा संशय दर्शविला आहे. परंतु तें नांव सत्यभामा नव्हे, सरस्वतीच होते हें रावसाहेब मंडलिकांच्या अधिकृत चरित्रांतील विश्वसनीय टिपणांवरून स्पष्ट होतें.

या सरस्वतीबाईलाहि संसारसुख कांहींच मिळालें नाहीं. म्हणजे तिला कांहीं मूलबाळ झाल्याचा दाखला मिळत नाहीं. लग्न झाल्यानंतर तीहि

अवघ्या चार वर्षांतच मृत्यु पावली. ऐतिहासिक कागदोपत्रीं तिचा स्पष्ट पहिला असा उल्लेख झालेला आहे तो देखील बाजीरावाला पेशवेपदप्राप्ति झाली म्हणूनच केवळ! आणि तसें होणें स्वाभाविकच होय. कारण कैदेंत आडगांवीं असलेल्या बाजीरावांच्या बायकांची हालहवाल पुसण्याची गरज तादृश कोणासच नसणार! हें प्रत्यक्ष खऱ्यांच्याच उदाहरणावरून दाखवितां येईल.

पृष्ठ ५०५४ वर खरेशास्त्री लिहितात—“ बाजीरावसाहेबांचें **पहिलें लग्न** जुन्नर मुक्कामीं पूर्वी प्रतिबंधांत असतांना धोंडोपंत मंडलिक यांच्या कन्येशीं झालें होतें. ती स्त्री, श्रीमंत पुन्हां पुण्यास लष्करांत आल्यावर, पौषमासीं वारली! ” सारांश, दहाव्या खंडाच्या लेखनापर्यंत तरी खऱ्यांना धोंडभट भागवतांच्या मुलीशीं बाजीरावाचें जें लग्न झालें होतें त्याची कांहीं वार्ता नसावी. त्यानंतर पुढला बारावा खंड संपादीत असतां त्यांना बाजीरावांच्या त्या पहिल्या लग्नाची वार्ता कळली. बाजीरावांनीं आपल्या त्या पहिल्या सासुरवाडच्या लोकांवर जो देणग्यांचा वर्षाव केला, तत्संबंधींचें एक पत्र त्यांना उपलब्ध झालें. आणि तेव्हांच त्यांना त्या लग्नाचा पत्ता सुद्धा प्रथम आढळला.

त्या पत्रांतील उतारा असाः— “ वे॥ रा. धोंडभट भागवत **पहिले सासरे** यांचे घरीं विजयादशमीस श्रीमंत रात्रौ फराळास गेले होते. सासूस लुगडें ८०० रुपयांचें व धोंडभट यांचे सुनेस लुगडें ६०० रुपयांचें. भरजरी दोन्ही लुगडीं दिलीं. शिवाय ६००० रुपयांचा कंठा सुनेस दिला. याप्रमाणें मागें कोणी दानशूर जालें नाहीं! धोंडभट यास पुत्र येकच आहे. त्याचें नांव राघोपंत भागवत. गुदस्तां कर्नाळा किल्ल्याची मामलत त्यास सांगितली. सर्व प्रकारें ममता आहे! ”

या पत्रांतील उल्लेखावरील खरेशास्त्र्यांची मार्मिक मल्लिनाथीहि वाचनीय आहे. ते म्हणतात, “ श्वशुरस्य बलं भार्या ” हें सुभाषित या ठिकाणीं गतार्थ

ठरतें. कारण श्रीमंतांची पहिली भार्या म्हणजे धोंडभट भागवतांची कन्या, कधींच मरून गेली होती. तरीसुद्धां या पहिल्या सासुरवाडीवर श्रीमंतांची ' सर्व प्रकारें ' ममता अद्यापि जागृत राहिली. ''

असो. बाजीरावांचें पेशवेपदाकरितां जुन्नराहून पुण्यास आगमन, नंतर नाना आणि बाळोबा पागनीस यांचें द्वैत. नंतर पेशवेपदाऐवजीं बाजीरावांस प्राप्त झालेली कैद आणि चिमाजी आप्पाची पेशवा म्हणून झालेली औट घटकेची कारकीर्द, त्यानंतर पुन्हां नानांच्या महाड कारस्थानाचा झालेला विजय आणि बाजीरावाची शिंद्याच्या लष्करांतून जांब गांवीं झालेली मुक्तता इ. हकीकती अभ्यासकांस परिचितच आहेत. उपर्युक्त जांब गांवास कैदेंत असतांनाच बाजीरावांची बायको सरस्वतीबाई ही ६ जाने. १७९७ रोजीं वारली. तिची उत्तरक्रिया पुढें पुण्याजवळ मुंढवें मुक्कामीं येऊन राहिल्यावर बाजीरावांनीं केली.

मुक्तता झाल्यावर बरेंच दिवस बाजीराव लष्करांतच मुक्काम करून होते. शनिवारवाड्यांत मुहूर्तानें लौकरच यावें आणि कारभार पाहण्यास सुरुवात करावी अशी नानांनीं वारंवार सूचना केली असतांहि त्यांनीं ती अमलांत आणली नाहीं. शनिवारवाड्यांतील मसनदीवर चढण्याआधीं नव्या लग्नाच्या बोहल्यावर चढण्याचीच आतुरता त्यांना अधिक वाटत होती. श्रीमंतांचा हा विचार कळल्यावर नानांनीं कोंकणांतून अनेक ठिकाणांहून मुली दाखविण्यास आणविल्या. परंतु त्याच वेळीं हरिपंत फडके यांचे ज्येष्ठ चिरंजीव चिंतामण हरी ऊर्फ दाजिबा यांची कन्या उपवर होती ती त्यांनीं पेशव्यास दाखविली आणि ती त्यास पसंतहि झाली. आणि मग आपलें हें लग्न शनिवारवाड्यांतच करण्याचा मनोदयहि त्यांनीं नानांस कळविला.

वास्तविक पाहतां हरिपंत फडक्याची नात बाजीरावांनीं पसंत कशी केली, हें एक गूढच वाटतें. कारण हरिपंत फडक्याच्या व बाजीरावाच्या

घराण्यांतील हाडवैर प्रसिद्ध होतें. आणि पुढेंहि बाजीरावीअखेरीपर्यंत या फडके कुटुंबांतील मंडळी म्हणजे हरिपंताचे पुत्र हे बाजीरावाविरुद्ध कारस्थानांत व फितुरांत सामील असत आणि फडक्यांचे सरंजाम जप्त करून बाजीरावांनीं बाबा फडके वगैरेंना डोंगरी किल्ल्यावर कैदेंत टाकलें होतें. म्हणून हरिपंताची नात वधू म्हणून पसंत करण्याच्या पोटीं फडके कुटुंबाचा स्वतःला पाठिंबा मिळवून ठेवण्याचा धोरणी राजकीय डाव त्या वेळीं बाजीरावांच्या मनांत होता कीं काय, हें समजत नाहीं.

बाजीरावसाहेबांचे सासरे चिंतामण हरी ऊर्फ दाजिबा हे हरिपंतांचे ज्येष्ठ चिरंजीव. हे बुद्धीने चलाख, परंतु प्रकृतीनें अगदींच अशक्त, यामुळें शिपाई पेशांत किंवा सरदारींत शिरले नाहींत. मुत्सद्देगिरीच्या कामांत मात्र चांगलेच होतकरू होते व हरिपंतांना त्यांची चांगली मदत होई. नाना फडणिसांचाहि त्याजवर फार लोभ. श्रीमंत सवाई माधवरावांच्या जवळ जी निकटची लोभांतली प्रतिष्ठित मंडळी होती त्यांत दाजिबांचा अग्रमान असे. श्रीमंत अंबारींत बसले असतां खवाशींत बसण्याचा आणि श्रीमंतां-बरोबर चबसर गंजिफा खेळण्याचा त्यांना मान होता. पुणें–अखबारांतील खालील दोन-तीन नोंदींवरून दाजिबांची प्रतिष्ठा व पेशव्याजवळील घसट लक्षांत येईल. १६ मार्च १७९१—“ छ मंगळवारीं धुळवडीचे दिवसीं श्रीमंतांनीं चिखल व मातीच्या डाहारियांत एकमेकास लोटावयाचा खेळ चालविला. दाजिबा फडके यांचें शरीर अशक्त यास्तव त्यांहीं अनमान केला तेव्हां श्रीमंतांनीं त्यांना मुद्दाम बोलाऊन आणून विनोदानें त्यांची फारच शोभा केली. ”

१७९०—“ छ १ रमजान अडीच प्रहर दिवसास द्वितीय भोजन करून चिंतामणराव फडक्यास बोलाऊन आणून अस्तमानपर्यंत सात मजली बंगल्यांत चवसर व गंजिफा खेळून रात्रौ कवालाचें गायन ऐकिलें. ”

यापूर्वीच सन १७८१ च्या सप्टेंबरांत दाजिबा हे "बालाजीपंतासमीप पेशा व ज्वाबसालास योग्य म्हणून त्यांना मोत्याचा चौकडा व पालखी देऊन त्यांची प्रतिष्ठा वाढविण्यांत आली होती."

हे दाजिबा बाजीरावांशीं सोयरीक झाल्यानंतर फार दिवस वांचले नाहींत. १८०२–०३ च्या सुमारास ते वारले असावेंसे वाटतें. बाजीराव साहेबांच्या खासगी जमाखर्चांत एक नोंद अशी आहे.

"छ २० साबान. खासुदगी. बद्दल देणें सदाशिव चिन्तामण फडके स्वारी समागमें वसईस होते. सरंजामास गांव खेडीं नाहींत. सबब घरीं खर्चास बक्षीस रसानगी यादी रुपये २५००० पैकीं पेशजी पावले रु. १९०००, बाकी रुपये ६०००."

ज्या अर्थी हें बक्षीस सदाशिव चिन्तामणास दिलें आहे त्या अर्थी या वेळीं चिन्तामण हरी हा हयात नसावा, असा तर्क होतो. असो.

लग्नापुरतें शनिवारवाड्यांत जाऊन पुन्हां आपण परत लष्करांत राहावयास जाणार असें बाजीराव बोलून दाखवीत असत. तथापि लग्न झाल्यावर स्वारी शनिवारवाड्यांत आली ती मात्र मग तेथेंच राहिली.

या लग्नासंबंधीं वर्णनात्मक दोनचार पत्रें खरे ऐ. ले. संग्रहांत आलीं आहेत. लग्न १६ फेब्रुवारी १७९७ माघ व॥ ६ गुरुवासरीं गोंधळीक झालें. गोंधळीक म्हणजे गोरज मुहूर्तावर. "गुरुवारीं देवकप्रतिष्ठा सकाळीं जाहली. सायंकाळीं विवाह जाहला. उजाडतां साडे होऊन वरात वाडयांत सूर्योदयापूर्वी मोठ्या समारंभानें आली. आज भृगुवासरीं फडके सरकारच्या वाडयांत भोजनास येणार. उद्यां मंदवासरीं श्रीमंत फडक्याचे घरीं भोजनास जाणार." (खरे पृष्ठ ५१००).

लग्नांत मुलीचें नांव 'राधाबाई' ठेवण्यांत आलें. तथापि लौकिकांत

तिला 'ताईसाहेब' म्हणत. राधाबाई फार सुस्वरूप, देखणी होती म्हणतात.

लग्नानंतर तीन वर्षांनीं तिला ऋतुप्राप्ति झाल्याचें सरदेसाई सांगतात. परंतु तें बरोबर दिसत नाहीं. पे. द. भाग ३२ मध्यें १६ नोव्हेंबर १७९८ रोजीं जिऊबाई चाफेकरणीनें बाजीरावास जें पत्र लिहिलेलें उपलब्ध आहे त्यावरून सरदेसायांची माहिती उघडच चूक ठरते.

बाजीरावांनीं राधाबाईस जुन्नर येथें मोठ्या इतमामानें ठेविलें होतें. आनंदीबाईची बहीण म्हणजे बाजीरावांची मावशी जिऊबाई चाफेकरीण यासारख्या वृद्ध स्त्रिया आणि अन्याबा राहतेकरासारखे विश्वासू कारभारी यांच्याकडे तेथली सर्व देखरेख व व्यवस्था असे. राधाबाईसंबंधीं अगदीं बारीकसारीक तपशील लिहिलेली दिनचर्या अन्याबाला रोज पुण्यास बाजीरावांकडे पाठवावी लागे. त्या दिनचर्यांचीं दोन-चार पुडकीं पेशवे दप्तरांत अद्याप अप्रसिद्ध स्थितींत पडून आहेत.

जिऊबाई मावशीनें बाजीरावास लिहिलेलें पत्र असें—

"चिरंजीव रा. रा. बाबा यांसी प्रति जिऊबाई चाफेकर अनेक आसीर्वाद येथील कुशल ता। कार्तिक शु॥ ८ पावेतों मुक्काम जुन्नर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. चि. सौ. राधाबाई यांस पदर घालावयाचे दिवस आहेत. येविसी राघोबास समक्ष सांगितलें आहे. विनंती करील त्याप्रमाणें मुहूर्त पाहून पदर घालण्याचें करावें. दिवस राहिले नाहींत. आपण लक्षप्रकारें यावयाचें करावें, म्हणजे आम्हांस भेट होईल. कळावें. येविसी अन्याबा यांणींहि लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. हे आसीर्वाद"

"पेशवाईची अखेर" या विश्वसनीय शकावलींत असें म्हटलें आहे, "लग्न झाल्यावर राधाबाईला जुन्नरास ठेवली होती. तीस फाल्गुन शु. ८ भौमवारीं रजोदर्शन जाहलें. मग पुण्यास आणून समारंभ केला शके १७२१."

असो. यानंतर १८०२ मध्यें पुण्यावर यशवंतराव होळकराची स्वारी

झाली. हडपसर मुक्कामीं कट्टा संग्राम होऊन शिंद्याच्या फौजेचा निःपात झाला आणि बाजीराव जीव घेऊन कोंकणांत पळून गेले. ते प्रथम महाडास गेले. महाडानजीक रायगडावर सवाई माधवरावांची पत्नी यशोदाबाई हिला त्यांनीं अगोदरच कैद करून तेथें नेऊन ठेवली होती. पुण्याहून तेथें जाण्यास तिनें अतोनात विरोध केला. जीवसुद्धां देऊं पण पुण्यांतून हलणार नाहीं, असा त्रागा तिनें केला होता. पण तिचें कोण ऐकणार ? तिला जबरदस्तीनें तिकडे पाठविण्यांत आलें. मात्र तिच्या खोट्या समाधानाकरितां आणि लौकिक देखाव्याकरितां बाजीरावांनीं आपली बायको राधाबाई आणि चिमाजी आप्पाची बायको—अशा दोघींना यशोदाबाईबरोबर दिलें होतें. होळकराच्या विजयानंतर तो आतां निश्चितच यशोदाबाईला रायगडावरून पुण्यास नेऊन तिच्या मांडीवर अमृतरावाचा मुलगा विनायकराव बापू याला दत्तक देऊन पेशवा करण्याचा प्रयत्न करील ही बाजीरावांस यथार्थ भीति वाटत होती. म्हणून त्यांनीं रायगडच्या चौकी—पहाऱ्यांचा कडेकोट बंदोबस्त करविला आणि अंतस्थें इंग्रजांशीं मदतीचा करार करून रायगडावर हल्ला झाला तर कुमक मिळविण्याची तजवीजहि करून ठेवली.

नंतर रायगडावरून आपल्या स्त्रियांस काढून त्यांनीं स्वतःबरोबर घेतल्या. अपेक्षेप्रमाणें होळकरांच्या फौजा कोंकणांतहि पाठलागास आल्या. तेव्हां ती सर्व मंडळी सुवर्णदुर्गास पळून गेली. पण तेथेंहि होळकरांचे पठाण आलेले पाहतांच बाजीराव चिमाजी आप्पाला घेऊन कसेतरी घाईघाईनें एका इंग्रजी तारवांत बसून वसईस निघून गेले. पण त्या धांदलींत त्यांच्या स्त्रिया मात्र तशाच मागें राहिल्या. होळकरांच्या फौजेनें त्यांना व त्यांच्या दिमतीत ठेवलेल्या बाळाजीपंत पटवर्धन व धुळोजी कुंजीर या पेशव्यांच्या मुत्सद्द्यांना ताब्यांत घेऊन महाडास परत आणलें. मग त्या फौजेनें रायगडाशीं बोलणें लावलें. पण गडकऱ्यांस इंग्रजांनीं मदतीचें आश्वासन दिलें होतें आणि बाणकोटच्या खाडींत इंग्रज आरमार सज्ज केलें होतें. या वेळीं इंग्रजांशीं

लढाई खेळण्याची होळकराची तयारी नव्हती. म्हणून रायगडावरील यशोदाबाईचा हुकुमी एक्का हस्तगत करण्याचा डाव होळकराला नाइलाजानें सोडून द्यावा लागला.

यशोदाबाईला दग्यानें मारून टाकण्याचाहि प्रयत्न झाला. त्रिंबकजी डेंगळ्यानें पुढें गंगाधरशास्त्र्याचा खून करविला. या वेळीं तसा प्रयत्न बाळोजी कुंजरानें करून पाहिला. हा प्रकार १८०२ च्या नोव्हेंबरांत झाला. तत्संबंधीं खरे प.नं. ६४९० पृ. ७५८२ मधील उतारा–" रायगड येथें रा। माधवराव रास्ते होते तेथेंच श्रीमंत येशवदाबाई व नाना फडणीस यांची स्त्री होती. त्यास श्रीमंत बाईसाहेब यास कोणी मारेकरी घातले ! हें समजोन हवलदार व रास्ते एकत्र होऊन बाळोजी कुंजर यांजकडील कारकून किल्ल्यावर होता त्यास कैद करून किल्ल्याचा बंदोबस्त माधवराव रास्ते यांनीं केला, येणेंप्रमाणें बातमी आहे. "

होळकराचा सरदार आबाजी त्रिंबक यानें रायगडाचा वेढा उठविला आणि राधाबाई वगैरे पेशव्यांच्या स्त्रियांना घेऊन तो २० जानेवारी १८०३ रोजीं पुण्यास दाखल झाला. तेथें अमृतरावाचा मुलगा विनायकराव बापू हा लवाजमा घेऊन त्यांना सामोरा गेला. आणि बहुत सन्मानानें त्यांना त्यानें भांबुर्ड्यास अमृतरावाच्या तळावर आणलें. तेथें यशवंतरावाच्या सल्ल्यानुसार बाळाजीपंत पटवर्धनाला पूर्वीप्रमाणेंच बायांच्या दिमतीस ठेवलें. पण धुळोजी कुंजीराला मात्र तत्काळ कैद करण्यांत आलें. आठदहा दिवस भांबवड्यास म्हणजेच भांबुर्ड्यास अमृतरावाजवळ राहिल्यावर राधाबाईची रवानगी शनिवारवाड्यांत करून देण्यांत आली. अमृतराव व यशवंतराव होळकर हे दोघेहि वरचेवर तिजकडे जाऊन समाचार घेत. होळकरांनीं पेशव्यांच्या स्त्रीशीं नोकर या नात्यानें जें अदबीचें वर्तन ठेवलें तें तर त्यांस भूषणावहच होय. चिन्तामणराव आप्पा पटवर्धनांनीं स्वतः स्वानुभूत हकीकतींचा जो एक अत्यंत विश्वसनीय वांका लिहून ठेवला आहे तो मराठी

दप्तर रुमाल २ मध्यें छापलेला आहे. त्यांत यशवंतरावाबद्दल पुढीलप्रमाणें उल्लेख आहे. "सरकारच्या फौजेचा मोड जाहला. त्यावक्तीं पुणें शहर लुटलें जावयाचें, परन्तु होळकर यांणीं मोठ्या शर्तीनें वांचाविलें. श्रीमंतांची पत्नी श्रीमंत सौ. राधाबाई ताईसाहेब ही पुण्यांत होती. त्यांजकडे होळकर येऊन आदब बजावून मी आपला चिरंजीव आहे वगैरे सामोपचारें बोलणें झालें."

यानंतर वसईस इंग्रजांशीं तह करून बाजीराव अकुतोभय होऊन पुण्यास पेशवा म्हणून पुन्हां परत आले. तो कथाभाग प्रसिद्धच आहे.

असो. राधाबाईला कांहीं मूलबाळ झाल्याचा दाखला उपलब्ध नाहीं. ती बिचारी पुढें ७ वर्षांनीं शके १७२८ ज्येष्ठ शु. १ स वारली. (२९ सफर सबामयातेन) पुण्याच्या शनिवारवाड्यांतच तिचें निधन झालें.

राधाबाई बाजीरावांची लाडकी स्त्री होती. तिच्या उत्तरक्रियेकरितां त्यांनीं एक लक्ष तेरा हजार नऊशें सहासष्ट रुपये खर्च केले. सबामयातेन छ ३ रबिलाखरपासून १२ दिवसपर्यंत झालेल्या उत्तरकार्याचे अत्यंत तपशीलवार जमाखर्ची बंद सुमारें १९९ पेशवे दप्तरांत अद्याप शाबूत आहेत.

या वेळीं बाजीरावांचें वय ३१ वर्षांचें होतें. म्हणजे ते ऐन जवानींत होते. त्यांची लोकविलक्षण कामासक्ति लक्षांत घेतली असतां त्यांच्या तिन्ही बायकांना तेच मोवले असावेत. त्या बायका बिचाऱ्या चौदापंधरा वर्षां इतक्याच उमरीच्या असणार! बरें, तत्कालीन रूढीहि प्रौढानें प्रौढ वयस्क मुलीशीं लग्न करावें अशी नव्हती. बारा वर्षांची मुलगी म्हणजे घोडनवरी समजण्यांत येई व तो लोकापवादाचा विषय होई. वर कितीहि तरुण, प्रौढ किंवा वृद्धहि असला तरी त्याला लग्न दहा–बारा वर्षांच्या अर्भकाशींच करावें लागे. याबाबत एक नमुनेदार उदाहरण सांगण्यासारखें आहे व तें दुसरें कोणाचें नसून पेशवाईतील अति प्रसिद्ध सेनापति गोपाळराव पटवर्धन याचेंच आहे. प्रसंग १७६१।६२ सालचा आहे. गोपाळराव या वेळीं तीस-पस्तीस वर्षें वयाचा

तरी होता. तो कोठेंतरी मोहीमशीर होता. त्याची बायको नुकतीच वारली होती व त्याकरितां घरची मंडळी परस्पर मुली पाहात होती. गोपाळरावाला आपल्या नशिबीं ८।९ वर्षांचीच मुलगी येणार हें दिसतच होतें. पण निदान ती मनासारखी सुस्वरूप, सुंदर तरी असावी असें त्यास वाटत होतें. म्हणून त्याच्या आतांपैकीं कोणी पसंत केलेली मुलगी त्यानें नाकारली व तो लग्नास येण्याचें टाळूं लागला. त्या वेळीं गोपाळरावाची आई सत्यभामाबाई हिनें रागानें त्याला जें पत्र लिहिलें तें खऱ्यांच्या ऐ. ले. संग्रहांत २८० नंबराला छापलें आहे. तें असें—

'नवरी वाईट. आम्हांस परिच्छिन्न करणें नाहीं' म्हणून (तुमचें) पत्र आलें. त्यावरून अपूर्व वाटलें! पाटणकर मामांनीं नवरी वाईट आणली म्हणून (तुम्हीं) लिहिलें. त्यास (वाईट) आणावयास गरज काय? कांहीं पैसा तुमचे लग्नांत पाटणकर मिळवीत नाहींत! इतकेंहि असून वाईट असती तर आम्ही काय सर्व वेडी होतों कीं काय? आणि तुम्ही मात्र शहाणपणें लिहितां! दहापांच मुलींत नवरी चांगली आहे! दहापांच हजारांत चांगली ती तुम्ही करणार! तशी कोण मिळणार? एक पुण्यांत मिळणार (पण) तें पुणें दारोदार भटकावयास लागलें. आणि तुम्हीहि तसेच. आम्ही पहिलीं माणसें, १०।५ हजारांत चांगलीं आणावीं इतकी परीक्षा आम्हांस नाहीं. तुम्हांपाशीं कोण परीक्षवंत असेल तर सत्वर पाठवून देणें."

येवढेंच नव्हे तर तिनें असेंहि लिहिलें कीं, आम्हीं मुलगी ठरविली आहे. तें लग्न आधीं करा आणि वाटल्यास मागून तुम्हांला कोण मिळेल तिच्याशीं करा. आणि आश्चर्याची गोष्ट ही, गोपाळरावानें मुकाट्यानें येऊन ठरविलेल्या मुलीशीं लग्न केलें!!

तत्कालीन सामाजिक परिस्थितीचें या उदाहरणांत उत्कृष्ट प्रतिबिंब पडलेलें दिसेल.

अशी तत्कालीन स्थिति असल्यामुळें पुरुषाला आपली शारीरिक भूक अन्य उपायांनीं शमवून घेणें प्राप्तच असे. आणि या अनिवार्य नाइलाजाच्या परिस्थितीमुळेंच "अंगवस्त्र ठेवणें" इत्यादि गोष्टींना तेव्हां फारसें दूषणास्पदहि समजलें जात नसे. त्या काळीं गुलामांची व कुणबिणींची सर्रास कायदेशीर अशी प्रथा रूढ असे. त्या काळीं, व्यभिचाराचा आळ येऊन आरोप सिद्ध झाला म्हणजे त्या स्त्रीला कुणबीण करीत. मग ती गुलाम झाली म्हणजे तिची गुराप्रमाणेंच खरेदीविक्रीहि होई. कुणबिणींची मोजदादहि पागेतल्या घोड्यांच्या जमाखर्चातच करण्यांत येई. असो. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, बाजीरावांस हा कुणबिणींशीं व्यवहार करण्याचा मार्ग उपलब्ध होताच. शिवाय त्यांत ते प्रत्यक्ष राजे असल्यामुळें राजरोसपणें कलावंतिणी, नाटकशाळा किंवा खासेचाकरीच्या स्त्रिया ठेवण्यास त्यास मुभा असे. असें असतांनाहि मृत बायकोला द्यावयाचा पिंड वळण्याचे आधींच नव्या बायकोच्या हातचा घास गिळण्याची आतुरता बाजीरावांनीं दाखविली. ज्येष्ठ शु. प्रतिपदेला राधाबाई वारली. आणि ज्येष्ठ व ॥ दशमीला बाजीरावांनीं आपला चौथा विवाह उरकूनहि टाकला.

मात्र बाजीरावांच्या या धिसाडघाईंत त्यांच्या दृष्टीनेंहि विचार करण्यासारखी एक बाब होती, तीहि विसरतां कामा नये. बाजीराव आतां पेशवे झाले होते आणि म्हणूनच त्या पेशवाईला आपला औरस वारस हवा, अशी तीव्र असोशी त्यांना असणें अगदीं स्वाभाविक होय. बाजीरावांच्या लग्नाचे सारे विक्रम त्या एका कल्पनेपोटींच निर्माण झाले होते. आणि त्यामुळेंच पहिल्या दोन बायका जिवंत असतांहि तिसरी त्यांनीं केल्याचा प्रकार पुढें येणारच आहे.

बाजीरावांचें चौथें लग्न नानाजी रास्ते, वाईकर यांच्या कन्येशीं झालें. लग्नसमारंभ पुण्यांत नाना फडणिसांच्या वाड्यांत झाला. व्याही रास्ते हे

गोखले रास्ते नव्हेत ! त्यांचें मूळ आडनांव फाटक. रास्त्यांच्या पदरीं हें घराणें बरेच दिवस राहिल्यामुळें फाटकांचे रास्ते बनले. ज्याच्या पदरीं किंवा निसबतीस राहावें त्याचेंच आडनांव पुढें स्वतःस स्वीकारावें अशीं शेंकडों उदाहरणें मराठेशाहींत दाखवितां येतात. उदाहरणार्थ घोरपडे, शिंदे, भोसले, धायगुडे, घाडगे, ढमढरे, थोरात, इत्यादि ब्राह्मण आडनांवें हीं त्या त्या मराठा सरदारांच्या पदरीं नोकरीस राहिल्यानेंच रूढ झालीं आहेत. त्यासारखेच ब्राह्मण धन्याच्या पदरीं राहिल्यानेंहि मूळ ब्राह्मण आडनांव बदलून दुसरें ब्राह्मण आडनांव झाल्याचें हें या फाटकांचें उदाहरण होय. ब्राह्मण धन्याचे पदरीं राहिल्यामुळें मराठ्याला ब्राह्मण आडनांव प्राप्त झाल्याचें मात्र कोठें ऐकिवांत नाहीं !

असो. याच ठिकाणीं उपलब्ध साधनांत बाजीरावांच्या या लग्नाच्या सालासंबंधीं जो थोडासा घोटाळा निर्माण झालेला आहे, त्याबद्दल विवेचन आणि खुलासा करणें जरूर आहे. "पेशवाईची अखेर" या अत्यंत विश्वसनीय शकावलींत या लग्नाचें साल शके १७२८ म्ह. सन १८०६–०७ सबामयातेन असें दिलें आहे. पेशवेदप्तर भाग २२ पृष्ठ १४६ वर बाजीरावाच्या खाजगी जमाखर्चांतील या लग्नासंबंधींच्या नोंदी घेतल्या आहेत, तेथेंहि सबामयातेन सालच नमूद आहे. यशवंतराव खरेसंपादित ऐ. ले. सं. खंड १५ मध्यें मात्र या लग्नाचें साल सीतमयातेन असें दिलें आहे. पहिल्या दोन आधारानुसार लग्नाचें इसवी साल १८०६ येतें, तर खऱ्यांच्या आधारानुसार १८०५ येतें. तेव्हां हा घोटाळा कसा ? खऱ्यांनीं छापलेलें पत्र (पृ. ८२७१) ज्येष्ठ व॥ १२ स लिहिलेलें असून त्यावर पैवस्ती "छ १ रबिलाखर सीतमयातेन आषाढ मास" अशी तपशीलवार आहे. मोडक जंत्रीवरून पाहतां त्याचें इसवी साल १८०५ च येतें. तेव्हां मग खरें साल कोणतें ? आमच्या मतें पेशवे रोजकीर्दींत दिलेलें साल व तारीख हीच केव्हांहि अधिक बिनचूक समजली पाहिजे.

खरे यांनीं 'सीतमयातेन' पैवस्तीचीं अनेक पत्रें अनुक्रमानें छापलीं आहेत. आतां या घोटाळ्यामुळें त्यांत उल्लेखिलेल्या घटनांचे काळ इतर साधनांतील काळांच्या मुकाबल्यानें तपासून घेणें आवश्यक होय. कारण कदाचित् त्याहि घटनांचे काळ चुकीचे ठरण्याचा संभव दिसतो. पण तें एक स्वतंत्रच काम असल्यामुळें त्याचा येथें अधिक प्रपंच करीत नाहीं.

आणखीहि दुसरी एक चूक येथेंच निर्देशिली पाहिजे. आपल्या "मराठी रियासत उत्तर विभाग, खंड ३," पृष्ठ ५४० वर सरदेसायांनीं बाजीरावाच्या या लग्नाची तपशीलवार माहिती देतांना "हें लग्न मेणवली येथें नाना फडणिसांच्या वाड्यांत झालें" असें म्हटलें आहे. पण तें सर्वस्वीं चूक आहे. लग्न पुण्यांतील नाना फडणिसांच्या वाड्यांत झालें. तेथेंच फाटक मंडळींना जानोसा दिला होता व त्यांची सर्व व्यवस्था बाजीरावांचा दिवाण सदाशिव माणकेश्वर यानें करविली होती, असें पे. दप्तरांत स्पष्ट उल्लेख आहेत. फाटक वाईचे; नानाच्या वाड्याचा उल्लेख; आणि पेशवा डायऱ्यांच्या अखेरीस छापलेल्या पेशव्यांच्या मुक्कामांच्या याद्यांत या लग्नाच्या काळाच्या आसपास बाजीरावांचा मुक्काम वाईस होता ही गोष्ट—असा हा त्रिदोष सरदेसायांना बाधून त्यांनीं मनानेंच लग्नाचें स्थळ पुण्याहून मेणवलीस नेलें.

वाडसंपादित दु. बाजीरावांच्या रोजनिशीच्या अखेरीस जे मुक्काम नमूद झालेले आहेत त्यांत सीतमयातेन सालांत ६ जून ते १६ जूनपर्यंत बाजीरावांचा मुक्काम वाईस आहे (१८०५). नंतर पुढच्या सबामयातेनांत म्हणजे सन १८०६ मध्यें बाजीरावांचा मुक्काम ५ ते १५ ऑगस्टपर्यंत वाईस आहे. म्हणजे या फाटकांच्या मुलीच्या लग्नाच्या वेळीं त्यांचा वाईस मुक्काम नाहीं.

या लग्नाच्या समारंभाचें वर्णनात्मक पत्र [खरे पत्र नं. ७०६१] आहे, त्यांत असा तपशील सांपडतो."पुंडलीक नाईक रास्ते वाईकर यांचे नातवाची

कन्या आणून तिजला जानवसा नानावाडा दिला. मंगळवारीं ६।। घटकांपूर्वी लग्न जालें. बुधवारीं ६ घटका पहाटेचा गृहप्रवेश थोरल्या वाड्यांत (शनिवार वाड्यांत) केला. नंतर दोन घटकांनीं उभयतां शुक्रवारच्या वाड्यांत गेली. तेथें घटिकाभर राहून बाईसाहेब नानाचे वाड्यांत रात्र कांहीं असतां आली. श्रीमंत प्रातःकाळीं आले. गुरुवारीं सुनमुख जालें. आज ज्येष्ठ व।। द्वादशी सहा घटकापूर्व रात्रीस वरात समारंभें वाड्यांत जाणार. वाडयाभोंवतें चिराखदान, पणत्या वासे मारून ठेविल्या आहेत.''

या लग्नासाठीं खर्च काय व कसा झाला त्याची कांहीं माहिती बाजीरावांच्या खाजगी जमाखर्चातील उल्लेखावरून मिळते. ते उल्लेख असे—

सबामयातेन, माहे रबिलावल (१३ जून १८०६).

१६४१५ रु. आमचे चौथें लग्न जाहालें सबब रमण्यांत शिव्याबद्दल चिंतोपंत देशमुख यांचे गुजारतीनें ४ दिवस सिधेखर्च केला.

छ २५ रबिलावल.

२५७४४ रु. वरील कारणाकारितां रमण्यांत दक्षणा वांटली.

छ २५ रबिलावल.

४८०० रु. कापड वरील कारणाकारितां.

६०० रु. सासऱ्याकडील उपाध्यायास दिले.

छ २५ रबिलावल

३००० रु. नारायणराव गोपाळ फाटक नवे सासरे यास दिले.

छ २९ रबिलावल

३०० रु. आमचे लग्नांत ज्येष्ठ मासीं अत्तरगुलाब खर्च झाला.

छ २९ रमजान.

असो. वाराणशीबाईचे लग्नापूर्वी माहेरचें नांव काय होतें याचा मात्र कोठें आढळ होत नाहीं. बाजीरावांनीं फाटकांशीं ही सोयरिक ठरविली. तो

प्रकार कांहींसा अनपेक्षितच घडला. म्हणजे असें कीं, त्यांनीं पसंतीकरितां अनेक मुली पुण्यास आणवून ठेविल्या होत्या, एवढेंच नव्हे तर त्यांपैकीं एक मुलगी जवळ जवळ त्यांनीं निश्चितहि करून लग्नाची तिथीहि पक्की केली होती. परंतु दरम्यानच्या काळांत ही रास्त्यांची मुलगी त्यांच्या पाहण्यांत आली. आणि तीच त्यांच्या मनांत इतकी भरली कीं, त्यांनीं जुनी निवड रद्द ठरवून हाच विवाह उरकून घेतला. शिवाय आणखीहि एक कारण संभवतें. तें हें कीं, या रास्ते मुलीच्या पत्रिकेवरून आपणाला नजीकच्या काळांत निश्चित पुत्रप्राप्ति आहे असें कोणी तरी त्यांच्या मनांत भरवून दिलें होतें.

रास्ते मुलीची निवड पक्की झाल्यावर अर्थात् इतर नवऱ्या मुलींचें खिल्लार जमविलें होतें, त्याची आपापल्या ठिकाणीं, मुलींच्या आईबापांची संभावना करून रवानगी करण्यांत आली. प्रश्न काय तो एका विशिष्ट मुलीचा उरला. कारण बाजीरावांनीं त्या मुलीशीं लग्नाचें पक्कें केलें होतें व त्या मुलीला नियुक्त वधूसारखी अंगावर दागदागिने घालून ते स्वतःच्या स्वारीबरोबर वागवीत असत! तिच्याशीं वैशाख वद्यांत कोपरगांवीं जाऊन लग्न करण्याचें निश्चित कसें ठरविलें होतें तें पुढील पत्रावरून चांगलें कळून येईल. तें पत्र असें :—

"चैत्र शु॥ ५ स श्रीमंतांनीं सदाशिव माणकेश्वर व जीवनराव सुमंत व देवराव हिंगणे व कृष्णाजी भवानी यास बोलावून आज्ञा केली जे वैशाख वद्यांत कोपरगांवास जाऊन लग्न करावयाचें त्यास ३५००० रु. सरकारांतून घेऊन कोपरगांवीं तीन मंडप, दुमजला चौरस चाळीस खणांप्रमाणें मजबूत तयार करावे. कदाचित् ज्येष्ठ मासाचा पाऊस. तरी मंडपावर खपरेल कौली असावें. याप्रमाणें जलद करावें म्हणोन आज्ञा केली."

शेवटीं बाजीरावांनीं तोड काढली. त्यांनीं दोन्ही मांडवांचा खर्च स्वतःच सरकारांतून करून त्या मुलीचें लग्न आपल्या परिवारांतील एक गणपतराव कृष्ण साठे म्हणून नोकर होता, त्याच्या मुलाशीं लावून दिलें!

असो. वाराणशीबाईचें लग्न झालें तेव्हां ती फार तर ९।१० वर्षांची होती. लग्नानंतर सहाच महिन्यांत तिच्यासंबंधीं उल्लेखण्यासारखी एक विशेष गोष्ट घडली. तिची हकीकत आतां नमूद करावयाची आहे. बाजीरावांनीं इंग्रज डॉक्टराकडून वाराणशीबाईला देवी काढवून घेण्याचा प्रयोग केला. हीच ती विशेष गोष्ट होय. तत्कालीन धर्मभोळ्या लोकसमजुती व लोकाचार पाहतां बाजीरावांनीं हें मोठेंच धाडस केलें, यांत शंका नाहीं.

त्या जुन्या काळीं देवींच्या आजारावर कसलाच हुकमी तोडगा उपलब्ध नव्हता. दरसाल देवींची साथ येई आणि तिला अनेक मुलें बळी पडत. लोक सुचतील ते उपचार व तोडगे करून पाहात. देवी येऊं नयेत किंवा आल्यावर हमखास बऱ्या व्हाव्यात असा निश्चित गुणकारी वैद्यकीय उपाय उपलब्ध नसल्यामुळेंच या देवीच्या आजाराला ' देवपण ' प्राप्त झालें आणि तो दैवी प्रकोप समजून त्या तऱ्हेची धार्मिक उपाययोजना करण्यांत येई. देवींचा उपद्रव लहानपणींच मुख्यतः होतो. खुद्द पेशव्यांच्या कुटुंबापुरतेंच पाहिलें तर त्यांतील बहुतेक सगळ्यांना हा देवीचा आजार येऊन गेलेला होता, असें दिसतें. उदा. पुढील दोन तीन नोंदी पाहा :—

(पे. द. भाग २२, पृष्ठ ९१)

इसन्ने अर्बैन [११–१०–१७४१]

माहे रबिलावल

२॥ रु. छ ४ रोज राजेश्री रघुनाथपंतास व जनार्दनपंतास देवी आल्या आहेत शेख सल्लास मलिदा विद्यमान मातोश्री काशीबाई.

२ रु. छ १६ रोज सैद सादत पीर कसबे पुणें.

माहे सफर

१ रु. छ. २९ रोज श्री देव कुर्कुम्ब राजेश्री सदासिवपंतास देवी आल्या होत्या, सबब विद्यमान भिऊबाई नेत्र दोन.

राजेश्री सदाशिवपंतास देवी आल्या होत्या ते समयीं कंदोरी नवासिली होती, ती केली सबब १ रु. नगरपिरास व २ रु. खुर्दा फकिरास वांटावयास.

नारायणराव पेशव्याला देवी आल्याचा उल्लेख प्रसिद्धच आहे.

(पे. द. भाग ३२, पृष्ठ १२१)

छ २९ जमादिलाखर मुक्काम पुणें.
सौ. दुर्गाबाई यांस देवी निघाल्या सबब
श्री सितळादेवी वास्तव्य चेऊल यास
सौ. पार्वतीबाई यांणी नवस केला तो फेडावयास
रु. १९८ ≡॥ सोनें

खुद्द बाजीरावांची सावत्र आई मथुराबाई म्हणून होती. ती १७८० सालीं सुरतेस देवी येऊनच वारली होती.

वाराणशीबाई लहान मूलच असल्यामुळें तिला देवीचा धोका होताच. अर्थात् आपली बायको विद्रूप होऊं नये किंवा त्या रोगानें गमावूं नये असें बाजीरावांना वाटणेंहि स्वाभाविकच ! पुण्यास व आसपास त्या वेळीं देवींचा आजार मोठ्या जोरांत सुरू होता.

इंग्रज लोक सर्वत्र ज्ञाना-विज्ञानांत आपल्यापेक्षां पुढें होते. यामुळें मुंबईच्या कंपनी सरकारनें युरोपांत नवनिच निघालेल्या जेन्नरसाहेबाच्या गोस्तन देवीची लस टोंचण्याचा उपाय इकडे आणण्याचा प्रयत्न केला. प्रथम कंपनी सरकारकडून इकडील गवळ्यांकडे चौकशी करण्यांत आली कीं, इकडच्या गाईंना देवी येतात कीं नाहींत? पण इकडील गवळ्यांना कांहींच सांगतां येईना. कंपनीचा असा विचार होता कीं, इकडे तशा देवी आलेल्या गाई मिळाल्या तर इकडेच ताजी लस तयार करवून प्रयोग पाहावा. परंतु तें जुळलें नाहीं. तेव्हां त्यांनीं विलायतेंतून भिंगावर लस घालून व दोरे लशींत

भिजवून, जहाजांवरून हिंदुस्थानांत आणले आणि मुलांस देवी काढण्याचा प्रयोग करून पाहिला. परंतु देवी फुगेनात. शोधान्तीं कळलें कीं, येतांना मार्गांत लस नासते, खराब होते किंवा उडून जाते. तेव्हां मुंबईच्या गव्हर्नर डंकन यानें परदेशांत कोठें तयार टिकाऊ लस मिळते का, याची चौकशी चालविली. चौकशींत समजलें कीं रूमच्या मुलखांत तशी लस आलेली आहे. म्हणून मग तेथल्या बादशाहाच्या दरबारीं इंग्लंडचा वकील लॉर्ड येलगी म्हणून होता, त्याला लिहिलें. आणि त्याच्या खटपटीनें शेवटीं लस मिळण्याची व्यवस्था झाली. लस घातलेलीं भिंगें रूमहून २५ मजलींवर बगदाद येथें आलीं. आणि तेथील इंग्रज वकिलानें मग ती मुंबईस रवाना करून दिली. अशा रीतीनें खऱ्या देवीचें आगमन १४ जून १८०२ रोजीं मुंबईस झालें. लगेच पांच मुलांवर तो प्रयोग करविण्यांत आला. ज्या पहिल्या मुलावर हा देवी टोंचण्याचा प्रयोग यशस्वी झाला, त्या मुलाचेंहि नांव इतिहासप्रसिद्ध झालें, तर त्यांत आश्चर्य नाहीं. त्याचें नांव होतें अणा दष्टील !

मुंबईच्या लहानथोरांस देवी काढण्याचा प्रयोग यशस्वी झाल्यावर कंपनी सरकारनें मुंबईच्याच एका ब्राह्मणाला देवी काढविण्याची विद्या शिकवून आणि त्याचे समवेत देवी काढविलेलें एक मूलहि देऊन त्याला ऑक्टोबर १८०२ मध्यें पुण्यास पाठविलें. आणि मग पुण्यास देवी काढण्याचे प्रयोग चालू झाले.

तथापि एक अडचण येऊं लागली. मुंबईहून आणविलेली लस फार काळपर्यंत टिकत नसे. ती कशी सांभाळावी हें जाणणारा कोणी इंग्रज वैद्यहि येथें नव्हता. दोन तीन वर्षें प्रयोग करून इंग्रजांनीं तीहि विद्या हस्तगत केली. डॉ. कोटस् या पूना रेसिडेन्सींतील इंग्रज डॉक्टराचें तें काम ! आणि मग १८०६ सालच्या सप्टेंबरपासून पुण्याचा रेसिडेंट कर्नल क्लोझ याच्या

आदेशानुसार संगमावर दर आठादिवशीं आदितवारीं मुलांस देवी काढूं लागले. तो उपाय इतका लोकप्रिय, निर्धास्त आणि परिणामकारक ठरला कीं, “ शहरांतील ब्राह्मणांची व आवंतर जातींचीं मुलें एऊन दर आठवडा देवी काढून जाऊं लागलीं. ”

संगमावरचें हें वृत्त अर्थात् पेशव्यांच्याहि कानीं गेलें आणि त्यांना मोठीच जिज्ञासा उत्पन्न झाली. रेसिडेंट क्लोझ आणि बाजीराव यांचे वैयक्तिक संबंध फार घरोब्याचे होते. एक दिवस बाजीरावांनीं क्लोझला म्हटलें, “ गाईच्या देवींचा चमत्कार ऐकत आहों, तर खुद्द आमचे स्त्रीस देवी काढवावयाच्या आहेत. याचें कसें काय ? तें सांगावें. ” यावर क्लोझनें बाजीरावांची सर्व तऱ्हेनें खातरजमा केली. म्हणून मग बाजीरावांनींहि २२ डिसेंबर १८०६ रोजीं क्लोझच्या खास देखरेखीखालीं डॉ. कोटस्कडून वाराणशीबाईस देवी काढवून घेतल्या.

देवी उत्तम फुगल्या. त्रास झाला नाहीं. बाजीरावांना अत्यानंद झाला आणि त्यांनीं डॉ. कोटस् याला खूष होऊन २००० रुपये बक्षिसी दिली. तत्संबंधींची बाजीरावांनीं स्वहस्तें खाजगी जमाखर्चांत लिहिलेली नोंद वाचनीय आहे. ती अशीः—“ २००० रुपये इंग्रजांकडील वैद्याकडून घरांत श्री देवी काढविल्या त्या यथास्थित कृपा करोन आरोग्य जाहल्या बा। त्या वैद्यास दिल्हे. छ १ जिल्काद समानमयातेन [३१–१२–१८०७]. ”

“ महाजनो येन गतः स पंथाः ” या न्यायानें मग पुढें पुणें शहरांत आणि भोंवर गांवीं देवी काढून घेण्याचें सत्रच सुरू आलें.

बाजीरावांनीं आणखीहि एक लोकोपयोगी गोष्ट या वेळीं केली. कंपनी सरकारकडे त्यांनीं अशी मागणी केली कीं, यापुढें डॉ. कोटस्ला कायमचेंच पुण्यास ठेवावें. आणि आवंतर सर्व कामें सोडून त्यांनीं ब्राह्मण शूद्रादिक सर्वांसच धर्मार्थ देवी काढाव्या आणि मोफत औषधें द्यावीं. त्यांची ही विनंती

कंपनी सरकारनेंहि मान्य केली. तेव्हां बाजीरावांनीं वेताळ पेठेंतील एक बंगला धर्मार्थ दवाखान्यासाठीं बहाल केला.

बाजीरावांनीं वाराणशीबाईला देवी टोंचवून घेऊन एका देवीचा बंदोबस्त असा केला. पण त्यांच्या दुर्दैवानें दुसऱ्या एका देवीचा कांहीं बंदोबस्त त्यांना करतां आला नाहीं. म्हणजे असें कीं, लग्नानंतर कांहीं दिवसांनीं वाराणशीबाईला फिट्स्‌चा किंवा फेफऱ्याचा किंवा उन्मादवायूचा विकार जडला. आणि तो पुढें कधींहि नाहींसा झाला नाहीं. तत्कालीन अडाणी समजुतीप्रमाणें वाराणशीबाईला कांहीं तरी पिशाच्चबाधा झाली असावी अशा समजांत रूपान्तर झालें. थोडी वैद्यकीय विचाराची बाब आहे. कित्येक मुलींना विवाहाआधीं फिट्स् येण्याचा विकार होतो, पण तो विकार विवाह होऊन त्यांना मूल झाल्यानंतर जातोहि. अशीं पुष्कळ उदाहरणें आढळतात. उलटपक्षीं अडाणी, रानवट, कामासक्त पतींच्या दांडगायांमुळें कित्येक वेळां, कित्येक स्त्रियांना लग्नानंतर हा फिट्स् येण्याचा विकार जडल्याचींहि उदाहरणें आढळतात. वाराणशीबाईला लग्नाआधींच फिट्स् येत होत्या कीं काय, हें कळण्यास उपलब्ध साधनांत गमक नाहीं. तेव्हां तिला हें फिट्स्‌चें दुखणें कसें जडलें असेल? त्याचें मनानेंच कोणीहि अनुमान करावें.

वाराणशीबाईच्या प्रकृतींतील विकृति अशी उघडकीस आल्यामुळें तिच्यापासून अपत्यलाभ होण्याची बाजीरावांची आशा दुरावली. आणि म्हणूनच बहुधा पुढें दोन वर्षांतच त्यांनीं आपला आणखी एक विवाह करवून घेतला. हा त्याचा पांचवा विवाह होय. ही सोयरीक ढमढेऱ्यांशीं झाली.

हें ढमढेरे कुटुंब नानासाहेब पेशव्यांच्या वेळेपासून फडांत कारकून म्हणून होतें. पहिले रामचंद्रपंत ऊर्फ आबा ढमढेरे. त्यांनीं पंधरा वर्षें दप्तरांत चाकरी केल्यानंतर थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दींत त्यांस बढती मिळून दरोबस्त महाल–मुलूख व किल्लेकोट व पागा वगैरे दौलतीचे हिशेब पाहून

चौकशी करण्याचें काम त्याजकडे सांगण्यांत आलें. ते सन सीतसमानीनांत वारल्यावर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव मोरोपंततात्या तेंच काम पाहूं लागले. मोरोपंत तिसैनअखेर मृत्यु पावल्यानंतर त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव पांडुरंगपंत अण्णा ढमढेरे यांजकडे तें काम आलें. पांडुरंगपंतांचे धाकटे बंधु हरिभाऊ हेहि त्याच पे. दप्तरांत कामावर होते. त्याच हरिभाऊंची मुलगी कुसाबाई ही बाजीरावानें केली.

लग्न ज्येष्ठ शु॥ ९ शके १७२९ म्हणजे ३ जून १८०८ रोजीं झालें. [७ रबिलाखर समानमयातेन] लग्नसमारंभ पुण्यांतच टोलेजंग झाला. वधूचें माहेरचें नांव कुसाबाई होतें तें आतां वेणूबाई असें ठेवण्यांत आलें. "पेशवाईची अखेर" या शकावलींत म्हटलें आहे कीं, "पांडुरंगपंत ढमढेरे यांणीं मोठा समारंभ करून, लाखों रुपये खर्च करून श्रीमंतांची मर्जी खूष केली."

असो. अशा रीतीनें बाजीरावांचे सातारकर छत्रपतीप्रमाणें दोन राणीवसे किंवा 'देवड्या' तयार झाल्या. वाराणसीबाईबाबत अपेक्षाभंग झाला आणि उलट पिशाचबाधा घरांत शिरली, या कल्पनेमुळें असो, या रास्ते सासुरवाडीवर बाजीरावांनी तितकीशी मर्जी राहिली नाहीं. त्या सासुरवाडच्या मंडळींचा म्हणण्यासारखा परामर्श त्यांच्याकडून झालेला दिसत नाहीं. एकदां १८०८ च्या २१ ऑक्टोबरला "ती सौ. रास्ते सासूबाई यास २९८ रु. किंमतीचे चोळखण" त्यांनीं दिलें आणि पुढें १८१० सालीं एकदां रास्ते सासूबाईसाठीं ३५०० रु. चा कांपाचा जोड त्यांनीं खरेदी केला. एवढ्याच दोन नोंदी बाजीरावांच्या खाजगी जमाखर्चांत सांपडतात. उलटपक्षीं ढमढेरे सासुरवाडीवर देणग्यांचा नुसता वर्षाव होत होता. वेणूबाई माहेरीं जाई, त्या वेळीं तिच्या चाकरीस माणसें जात; त्यांना २४० रु. दरमहा बाजीरावच देत असे. तत्संबंधींची नोंद अशी—

खमस अशर मयातेन, शके १७३७, जमादिलावल चैत्र—२४० रु. कन्येकडील चाकरीचीं माणसें आहेत त्यांस; गुजारत थोरली बाई ढमढेरे.

छ २९ जमादिलावल.

१८०९ सालीं सख्खी सासू यमुनाबाई ढमढेरी इच्या नांवें अनेक देणग्या आहेत. सासूचे वडील पिंपळखंडीकर बहिरोपंत सहस्रबुद्धे यांनाहि पालखी व अब्दागिरीची नेमणूक करून देण्यांत आली. मुख्य चुलत सासू पांडुरंग-पंतांची बायको सगुणाबाई हिच्या नांवें तर हजारों रुपयांच्या रकमा खर्ची पडल्या आहेत. १८०९ च्या ऑगस्ट महिन्यांतील एक नोंद अशी आहेः—

३००० रु. संध्येचीं वगैरे भांडीं करावयाबद्दल बक्षीस दिले. [अर्थात् रुप्याचीं].

१,००० रु. पांडुरंगपंत अण्णा ढमढेरे

१००० रु. राघोबादादा ढमढेरे

१००० रु. आबा ढमढेरे

[दु. बा. खा. ज. अशरमयातेन, रजब ऊर्फ श्रावण,
शके १७३१. छ ४ रजब १६–८–१८०९]

सासुरवाडच्या कुटुंबांतील मंडळींना पालख्या अफ्तागिरांचे मान तर मामुली म्हणून सहजच दिले गेले. पण एवढेंच नव्हे, पुढें शके १७३२ मध्यें (सन १८१०–११) बाजीरावांनीं विठ्ठलराव आंबीकर वगैरे प्राचीन सरदार होते, त्यांचे सरंजाम जप्त केले आणि ते रघुनाथराव मोरेश्वर व पांडुरंग रामचंद्र या ढमढेरे मंडळींकडे लावून दिले.

ढमढेरे मंडळींशीं त्यांची एवढी दोस्ती झाली होती कीं, ते त्यांना घरचेच जिवलग वाटत. १८०९–१० सालीं राघोपंत ढमढेऱ्याचें लग्न बाजीरावांनीं हौसेनें कोपरगांवीं स्वतःच्या वाड्यांत केलें. “ मुकुन्द जोशी यांची कन्या केली. केशराचा रंग बहुत वगैरे समारंभ सरकारांतून मोठा केला. ”

पुण्यांतला बुधवारवाडा बाजीरावांनीं बांधला. त्या वेळीं आपल्या वाड्यासमोरील भिडे सावकारांचीं अनेक घरें बाजीरावांनीं खरेदी करून पाडून टाकलीं; पण त्यांपैकीं अंताजी बल्लाळ भिडे यांचा वाडा, "पेठ बुधवारचे म्हसोबाजवळ, आग्नेय दिशेचे कांपऱ्याचा नाका, चौरस्त्याचा" तो ५०००० रु. स खरेदी घेऊन बाजीरावांनीं "ती. पांडुरंगपंत अण्णा ढमढेरे व राघो मोरेश्वर ढमढेरे या उभयतांस बक्षीस दिल्हा." इसन्ने अशरमयातेन, जमादिलाखर ऊर्फ आषाढ.

छ ३० जमादिलाखरी बाजीरावांनीं ८६८ रु. किंमतीस ७७ तोळे अत्तर राघोपंत ढमढेऱ्यामार्फत खरेदी केलें.

ढमढेरे मंडळी बाजीरावांशीं किती खेळीमेळीनें वागत अथवा खरें बोलायचें तर बाजीराव त्यांच्याशीं आडपडदा न धरतां ग्राम्य म्हणींतल्याप्रमाणें एकरूप होऊन कसे वागत याचें एकच नमुनेदार उदाहरण सांगितलें म्हणजे पुरें. इ. स. मंडळांतील दाभाड्यांकडील दिनचर्येंत तें आढळून येईल. एका होळीच्या सणांत धुळवडीचे दिवशीं बाजीरावांनीं डोळा घातला. आणि तोच संकेत समजून त्रिंबकजी डेंगळ्यानें सासरे ढमढेऱ्यांचा कासोटा फेडला! वर ज्याचें लग्न बाजीरावांनीं हौसेनें लावून दिलें म्हणून एके ठिकाणीं सांगितलें तो रघुनाथराव ढमढेरे तर बाजीरावांच्या जनानखान्याचा विश्वासू कंचुकीच झाला होता! वाराणशीबाईचा वास्तविक त्याचा कांहीं नातेसंबंध नव्हता. त्याची बहीण वेणूबाई ऊर्फ कुसाबाई, बाजीरावाची नवी राणी. परंतु वाराणशीबाईच्या औषधाची आणि पथ्यापाण्याची सर्व तजवीज रघुनाथ ढमढेरेच करतांना आढळतो.

वाराणशीबाई व कुसाबाई यांना बाजीरावांनीं एकत्र एकाच वाड्यांत ठेवलें होतें कीं त्यांचे पृथक् पृथक् वाडे होते तें कळत नाहीं. तथापि त्यांच्या नेमणुका पृथक् केलेल्या असल्यामुळें त्या निरनिराळ्या वाड्यांत राहात असा-

ल्यात असें अनुमान होतें. शके १७३३मध्यें पुढीलप्रमाणें त्यांच्या नेमणुकींची व्यवस्था होती. "दोन बायकांच्या खर्चाची नेमणूक मक्ता करून दिली. त्यांत भोजनखर्च, शागीर्दपेशा, धर्मादाय, कापड वगैरे खाजगत खर्च कुल सांभाळावें.

[१] सौ. वाराणशी सालीना २०००० रुपये.

[२] सौ. कुसाबाई १६००० रुपये."

वाराणशीबाईची पिशाच्चपीडा दूर व्हावी, तिला आरोग्य लाभावें आणि संतती व्हावी यासाठीं दैवी–मानवी सर्व उपाय बाजीरावांनीं केले. दर अनुष्ठानास १८ ते २० हजार रुपये खर्च करून ८ गायत्री–पुरश्चरणाचीं अनुष्ठानें केलीं. कोणी सांगेल तसा धर्मादाय केला. सत्पुरुष, फकीर पुजले आणि नारायण–नागबळीहि केले. त्यासंबंधांत खालील नोंदी पाहण्यासारख्या आहेत.

१००० रु. नागबळी नारायण ब्राह्मणद्वारा करविले, सबब ज्या ब्राह्मणापासोन करविले त्यास दाक्षिणा.

छ ८ रबिलाखर सीतमयातेन.

१४८२० रु. पिशाच्चपीडा परिहार होण्याचे अनुष्ठानाबद्दल विनायक नाना श्रौती व नारोबा नाना औटी याचे हवालीं केले.

छ ३० जमादिलावल इसन्ने अशरमयातेन.

४३ रु. वानवळे यांचे विद्यमानें जाणता फकीर आला. त्याचे सांगितल्याअन्वयें श्रीकृष्णेंत बाईचे मुक्कामीं ९० घागरी दूध खरेदी करून जनोबा देशपांडे यांचे विद्यमानें सोडलें.

छ ६ जमादिलावल ज्येष्ठ इहिद्दे अशरमयातेन.

"श्रीमंत पुत्रोत्पत्तीस्तव नाशकाजवळ संगम आहे तेथें कांहीं ब्राह्मण करवणें अनुष्ठान करवणार याकरितां नाशकास १५ दिवस मुक्काम आहे."

१००० रु. गुलाम महंमद नाशीककर फकीर जाणता पहिले घरीं [वाराणशीबाईजवळ] जवळ असतो त्यास बक्षीस खर्च.

छ २९ मोहरम अर्बा अशर
मयातेन मोहरम पौष शके १७३५

१००० रु. भिकाजी नाईक निसबत वानवळे यांजकडून भिकनशा फकीर यास पुण्यास आणविलें त्यास पांचमाही बेगमीचे दरमहा १९५ रु. प्रमाणें ९७५रु. व जाजती २५ रु. येकूण भिकाजी नाईक याचे हवालीं केले.

छ ८ रबिलावल अर्बाअशर मयातेन १७३५
[१–३–१८१४]

६७५ रु. अमृतसंजीवनी विद्येचे अनुष्ठानाबद्दल
४०० रु. श्री नृसिंहमंत्राचे ,, ,,

छ १ जमादिलाखर अर्बाअशर मयातेन, ज्येष्ठ (२१–५–१८१४)

२१६ अमृतसंजीवनी विद्येचें अनुष्ठान व श्रीनृसिंह मंत्राचें अनुष्ठान छ १ जमादिलाखर ज्येष्ठ माहे मजकूर पासोन नासिकांतील संन्याशी बाबा यांचे सांगितल्या धोरणानें गणेश भट्ट उपाध्ये व वामनभट उपाध्ये व चिंतोपंत देशमुख व आपाजीपंत आगाशे यांचे विद्यमानें चालतें केलें [पुढें तपशील आहे.]

१ जमादिलाखर
[२१–५–१८१४] अर्बाअशर मयातेन, ज्येष्ठ शके १७३६

१८१६ सालच्या जानेवारींत बाजीराव गुहागरास गेले होते. त्या वेळची एक दिनचर्या आम्हीं छापली आहे. त्यावरून वाराणशीबाईच्या पिशाच्चपीडेच्या परिहारार्थ बाजीरावांनीं तेथला एक देवऋषी हस्तगत केला

होता असें दिसतें. त्याच्या चारी मुलांसहि त्यांनीं स्वतःच्या चाकरींत ठेवून घेतलें.

" उपरान्तिक देवरसीचे चौघे पुत्रास चाकर ठेवून जनोबा देशपांडे यास सांगितलें कीं, यांचे ताबेदारींत असावें. "

लग्नानंतर ४ वर्षांनीं बाजीरावांचा मनोरथ सिद्धीस गेला. म्हणजे त्यास एकदांचें पुत्ररत्नदर्शन घडलें. ज्या गोष्टीच्या प्राप्तीसाठीं ते इतके अधीर झाले होते ती प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या उत्सवास पारावारच राहिला नाहीं. वाराणशीबाई २१ ऑक्टोबर १८१० रोजीं म्हणजे आश्विन शु॥ त्रयोदशीस शुक्रवारवाड्यांत प्रसूत झाली. पुत्रजन्मोत्सवाचें वर्णन शकावलीकारानें असें केलें आहे. " ते दिवसीं शहरांत मोठा उत्छाह. हेलकर्णी यांणीं शुक्रवारचे वाड्याजवळ पाण्याच्या घागरी वोतल्या. तें पाणी वाहून नदीस जाऊन मिळालें! बारावे दिवसीं बारशाचा समारंभ होऊन सर्वांनीं आहेर केले. श्रीमंतांनीं देकार व सिधा वांटला. पुण्यांत हात्तिवर साकर वाटली. नांव वामनराव ठेवलें. "

याच प्रसंगीं बाजीरावांच्या स्वभावावर प्रकाश टाकणारी एक गोष्ट घडली. तिचा उल्लेख करण्यासारखा आहे. " बारशाचे दिवशीं इंग्रज बहाद्दूर यांजकडून पोषाख, जवाहीर वगैरे सरंजाम फार किंमतीचा आला होता, तो येतांच त्यापैकीं जडावाची कंठी व पोषाख हिंमतखान पन्ही यास दिल्ही व पातळें हिरी कलांवातिणीसी दिल्ही! " हिंमतखान पन्ही हा बाजीरावाचें प्रीतिपात्र झालेला एक अफगाण गारदी किंवा सरदार होता. यापूर्वीं अरब जमातदारावर काय तो लोकांचा सारा विश्वास. त्यांच्यासारखे कडवे जीवास जीव देणारे शिपाई दुसरे कोंणी नसतात अशी सार्वत्रिक समजूत. बाजीरावसाहेबांचें सारेंच लोकविलक्षण असावयाचें! अलीकडे हे अफगाण पन्ही लोकच काय ते खरे कडवे असें ठरवून त्यांनीं आपल्या पदरीं या पन्ही

मुसलमानांची जमात बाळगली होती. यापूर्वीच्या काळांत अरब जमातदार मस्तवाल झालले होते व ते बहुतेक सर्व नाना फडणिसांच्या कच्छपीं होते. म्हणूनहि कदाचित् असेल, बाजीरावांनीं या पन्ही अफगाणांचा असा पुरस्कार केला असावा. तें कसेंहि असो, या जमातीचा जो मुख्य पुढारी हिंमतखान पन्ही त्याच्यावर बाजीरावांची प्यार मोहब्बत होती. एका चित्रकाराकडून मुद्दाम या हिंमतखान पन्हीची एक तसबीरहि त्यांनीं काढवून घेतल्याची नोंद बाजीरावांच्या खाजगी जमाखर्चांत सांपडते.

बाजीरावांनीं इंग्रजासारख्या मातब्बराकडून बारशानिमित्त आलेला बहुमोल आहेर असा एकाद्या गारद्याला आणि नायकिणीला येतांक्षणींच वाटून टाकला यांत इंग्रजाविषयीं तुच्छताबुद्धि दाखविण्याचा त्यांचा अभिमानी हेतु होता असें मात्र कोणी समजू नये. तो केवळ त्यांच्या मूर्ख, पोरकट मनोवृत्तीचाच दाखला समजला पाहिजे. तुलनेसाठीं यापूर्वी १७९१ सालीं सवाई माधवरावांच्या कारकीर्दींत घडलेला असा दुसरा एक प्रकार लक्षांत घेण्यासारखा आहे.

सवाई माधवरावांच्या पत्नीस रजोदर्शन प्राप्त झालें तेव्हां तें वर्तमान कोणीं नारोपंत गोडबोले नांवाचा कारकून होता त्यानें प्रथम श्रीमंतांच्या कानावर घातलें. लगेच श्रीमंतांनीं अंगावरचा पोषाख होता तोच त्या नारोपंतास बक्षीस दिला. अशा रीतीनें राजानें अंगावरचा पोषाख कोणास बक्षीस दिला तर त्याचा तो मोठ्यांतला मोठा बहुमान समजण्यांत येई. अशा बाक्षिसाच्या पोषाखाला "उताराचीं वस्त्रें" म्हणत. असो. पुढें काय झालें ? त्या कारकुनानें त्या उताराच्या पोषाखापैकीं ५०० रु. किंमतीचा बहुमोल पैठणी दुपट्टा होता, तो आपल्या एका लाडक्या कलावंतणीस देऊन टाकला. ही बातमी गुप्त थोडीच राहणार ? तिला वाचा फुटतांच ती श्रीमंतांच्या कानांपर्यंत गेली. त्यांना अतिशय राग आला आणि त्यांनीं लगेच

नानांच्या कानीं ती गोष्ट घालून त्या कारकुनाचें पारिपत्य केलें आणि त्यास बेअब्रू करून घालवून दिलें !

बाजीरावांच्या पुत्रजन्मोत्साहाबद्दल त्यांच्या खाजगी जमाखर्चांत पुढील नोंदी सांपडतात.

१०० रु. पुत्रजन्मानिमित्त खैरात (२१–१०–१८१०).

२१८६ रु. पुत्रजन्म व षष्ठीपूजन वगैरेनिमित्त खर्च

(२२ रमजान इहिद्देअशर मयातेन)

३६३ रु. चि. वामनराव अण्णा यांचे बारशानिमित्त

छ ५ सवाल.

२१७७ रु. चि. वामनराव याचे बारशानिमित्त खर्च केला.

(३–११–१८१०).

बाजीरावांच्या दुर्दैवानें या त्यांच्या पुत्राला आयुष्य लाभलें नाहीं. उपजल्यापासूनच त्याची प्रकृति बिघडलेली होती आणि बाजीरावांना इतर औषधोपचारांबरोबर दैवी अनुष्ठानांचाहि खर्च पडतच होता. ११ फेब्रुवारी १८११ ची ही नोंद पाहा.

—“ १६०५ रु. माघ वद्य १ पावेतों

चि. रा. वामनराव अण्णा याचे प्रकृतीस

आरोग्यार्थ अनुष्ठानास दाक्षिणा दिल्ही. ”

हा मुलगा पुढें लौकरच शुक्रवार वाड्यांत चैत्र शु. तृतीयेस वारला. तेव्हां तो अवघा ५ महिने २० दिवसांचा होता.

वाराणशीबाईला पुत्र झाला त्याची ही दशा ! दुसरी कुसाबाई ढमढेरे. तिलाहि अद्याप मूल होत नाहीं किंवा तसा संभवहि दिसत नाहीं. मग अर्थात् एकच मार्ग उरला. आणि तो म्हणजे पुन्हां आणखी एक लग्न करून घेणें हा होय ! व तो थोड्याच दिवसांत त्यांनीं अमलांतहि आणला. बाजीराव

साताऱ्यास छत्रपतीच्या दर्शनास गेले होते. त्याच वेळीं बाजीरावांच्या पदरचे बळवंतराव पेंडसे नांवाचे एक ब्राह्मण शिलेदार होते त्यांच्या मुलीशीं त्यांनीं विवाह केला. हा विवाह मार्गशीर्ष वद्य ९ इंदुवासरीं छ २२ जिल्कादी अवशीचे ७ घटका रात्रीस सातारा येथें झाला. मुलीचें नांव सरस्वती असें ठेवण्यांत आलें. हें त्यांचें सहावें लग्न !

म्हणजे आतां बाजीरावांच्या तीन देवट्या किंवा तीन राणीवसे झाले. या तिघां राण्यांपैकीं वाराणशीबाई आणि सरस्वतीबाई या दोघी तेवढ्या पुढें बरेच वर्षेपर्यंत जगल्या. मधली ढमढेऱ्यांकडील कुसाबाई ऊर्फ वेणूबाई ही १२ नोव्हेंबर १८१६ रोजीं म्हणजे पेशवाईच्या प्रलयाआधीं दीड दोनच वर्षे वारली. तिलाहि मुलगा झाला होता. परंतु तो दुश्चिन्हासारखाच, कारण त्याला जन्मतःच सर्व दांत आलेले होते !

"श्रीमंतांची स्त्री कुसाबाई गरोदर होती. ती प्रसूत व्हावयास माहुलीस पाठविली. तेथें भाद्रपद वद्य ४ छ १७ सवाली आवशीचे १० घटका रात्रीस बाळंत झाली. त्यास उपजत दंत होते. तो मुलगा ११ वे दिवशीं भाद्रपद वद्य १४ छ २७ सवाली अस्तमानीं मृत्यु पावला. पुढें कार्तिक वद्य ७ छ २० मोहरमी मध्यरात्रीस माहुलीचे मुक्कामीं कुसाबाईहि मृत्यु पावली."

श्री. यशवंत खुशाल देशपांडे यांनीं 'इंडिया हाऊस' मधून नकला करून आणलेल्या बाजीरावांच्या ३८ खाजगी कौटुंबिक पत्रांचा परिचय मंडळाच्या ऐ. सं. खं. १ मध्यें करून दिला आहे. हीं पत्रें अर्स्किन साहेब यांनीं इतिहाससंशोधनाच्या नादानें हिंदुस्थानांत असतां विकत घेऊन पुढें ब्रिटिश म्युझियमला संग्रहार्थ दिलीं. देशपांड्यांनीं पत्रें साग्र छापलेलीं नाहींत फक्त कांहीं त्रोटक उतारे दिले आहेत. त्या पत्रांत वेणूबाई हिनें स्वतः बाजीरावास लिहिलेलीं दोनचार पत्रें आहेत. तीं पत्रें Love Letters

च्या धर्तींचीं असतील अशी कल्पना होणें स्वाभाविक आहे. परंतु तसें फारसें नाहीं. बायकोनें नवऱ्यास लिहिलेलीं पत्रें इतकाच त्यांतील रोमान्स! उंदा.

१ सेवेसी सौ. वेणूनें करद्वय जोडून चरणारविंदीं मस्तक ठेवून नमस्कार. फाल्गुन शु॥ १५ मंदवार सुखरूप असो. विशेष महाराजांकारणें शिमग्याचे सणाच्या गाठ्या सुमार दोन तुकया मगर याजबरोबर पाठविल्या आहेत. यदर्थीं श्लोक—

करुनि अति विचित्रा शर्करेची सुमाला ।
चतुर गुणसमुद्रा धाडिली आपुल्याला ॥
सकल जन मुखीं हे बोलती नांव गाठी ।
करिं धरुनि दयाळा घालिजे माळ कंठीं ॥१॥

सेवेशी श्रुत होय सौ. सरस्वतीस गाठी पाठविली आहे. घ्यावयाची आज्ञा व्हावी. ती॥ राजश्री भाऊंनीं मजला श्री काशीहून पत्र पाठविलें तें मी पाहून सेवेसी पाठविलें आहे.

२. सौ. वेणूनें ...—चैत्र व॥ ११ भौमवार सुखरूप असो. महाराजांनीं कृपा करून फाल्गुन व॥ १२ चें आज्ञापत्र पाठविलें त्यांत आज्ञा भेट लवकर होईल. हीं अक्षरें पाहोन चित्तास हर्ष जाहला. महाराजांचे चरणाचा वियोग त्या विरहेंकरून मन च्यातकन्याये क्षुधित जाहले यदर्थीं श्लोक—

बहुत दिवस जाले स्वारिला नाथराया ।
विरहपदर ज्वाला मी शकेना वराया ॥
निशिदिनिं मन माझें वेधिलें प्राण—मित्रें ।
सदनिं कधिं सख्यातें मी विलोकीन नेत्रें ॥ १ ॥

सेवेशी श्रुत होय ही विज्ञापना.

३. वरीलप्रमाणेंच सौ. वेणूचें पत्र–फाल्गुन व॥ ८ इंदुवासरे.

मी आपुल्या निशिदिनीं जवळी असावें ।
हें इच्छितें दृढ सख्या स्वमनीं असावें ॥
मी एकलीच सदनीं शयनीं वसावें ।
हे योग प्राप्त मजला कधिंही नसावे ॥ १ ॥

सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

४. वरीलप्रमाणेंच सौ. वेणूचें पत्र—फाल्गुन व ॥ १२ भृगुवार. महाराजांचे चरणकमलाचें दर्शन लवकर व्हावें हा निदिध्यास रात्रंदिवस लागला आहे. यदर्थी श्लोक—

आतां प्राणसख्या वियोग अपुला माते न साहे कदा ।
स्वामीचा मुखचंद्रमा मज पडो दृष्टीस कीं एकदां ॥
न्यावें शीघ्र म्हणोन पत्र लिहिलें जोडोनिया हस्तकीं ।
द्यावें दर्शन आपुलें मग मनीं होईन मी स्वस्थ कीं ॥ १ ॥

सेवेशी श्रुत होय.

या पत्रांत आलेले श्लोक स्वतः वेणूबाईनें रचलेले नाहींत. जुन्या काळीं कोणास काय कसे मायने लिहावेत वगैरेसंबंधीं जशीं बाडें तयार करीत त्याचप्रमाणें निरनिराळ्या नात्यांच्या लोकांनीं एकमेकांस पत्रें कशीं लिहावींत, सणासमारंभाचे वेळीं काय लिहावें, यासंबंधीं श्लोकहि रचून ठेवलेले असत व त्यांचाच पत्रलेखक यथाप्रसंग उपयोग करीत.

वरील पत्रांतच दर ठिकाणीं 'यदर्थी श्लोक' असें म्हटलें आहे. त्यावरून सर्व खुलासा होतोच. कै. श्री. चिं. ग. कर्वे यांनीं इतिहासमंडळ त्रैमासिकांत याबाबत एक छोटासा लेखहि लिहिलेला आहे.

'इंडिया ऑफिस' मधील वरील पत्रांच्या पुडक्यावर जी परिचय-वजा नोट बहुधा आर्स्किनसाहेबांनींचें चिकटविलेली आहे, तींत असें म्हटलें आहे कीं, "बाजीरावांची गेरमर्जी झाल्यामुळें पांडुरंगपंत अण्णा ढमढेरे यांना सक्तीनें काशीवास पत्करावा लागला होता." दाक्षिणेंतील सरदारांच्या कैफियती व यादीमधील हकीकतींत ढमढेऱ्यांच्या काशीयात्रेबद्दल विस्तृत उल्लेख असला तरी ती काशीयात्रा बाजीरावांच्या रोषामुळें त्यांना पत्करावी लागली होती असा मात्र कोठेंहि उल्लेख नाहीं. रेसिडेन्सी कॉरस्पॉडन्समध्यें पुण्याच्या रेसिडेंटानें गव्हर्नर जनरलला २४ नोव्हेंबर १८११ रोजीं पत्र लिहून पेशव्याच्या सासऱ्याला यात्रेचें आणि तेथील यात्रेवरील कर माफ करण्याविषयींचे दस्तक द्यावे अशी शिफारस केली आहे. परंतु त्यांत यात्रेचें कारण दिलेलें नाहीं.

पण पांडुरंगपंतास काशीयात्रा करणें भाग पडलें. त्याच्यां मुळाशीं कांहीं कौटुंबिक नाजुक भानगडी होत्या, असाच लोकप्रवाद आहे. बाजीरावांसारख्या लहरी, नादान मनुष्याच्या रागाला आणि लोभाला शाश्वति कोठली ! त्यांनीं ज्यांना स्वतःच्या हातानें वारेमाप इनामें करून दिलीं तीं लहर फिरतांच त्यांजकडून बेलाशक परत हिसकावून घेतल्याचीं शेंकडों उदाहरणें बाजीरावींत सांपडतात. यासंबंधांत विंचूरकर घराण्याच्या अत्यंत विश्वसनीय अशा इतिहासांत अण्णा ढमढेऱ्यांच्या संबंधीं पुढील मजकूर आलेला आहे, तो मोठा उद्बोधक वाटेल.

"अण्णासाहेब ढमढेरे यांशींहि विठ्ठलराव(विंचूरकर) यांचा बहुत स्नेह होता. एके समयीं अण्णासाहेब यांजवर बाजीराव साहेबांची इतराजी झाल्यानें ढमढेरे यांचीं सर्व उत्पन्नें जप्त झालीं. त्या संकटसमयीं विठ्ठलराव यांनीं कितीएक वर्षेपर्यंत ढमढेरे यांचे पदरचे मंडळीचा व त्यांचे प्रपंचाचा सर्व प्रकारें गुजारा चालविला. पुढें अण्णासाहेबांचे चिरंजीव आबासाहेब ढमढेरे यांस विठ्ठलराव

यांनीं आपले आश्रित समजून आपले खाजगी जहागिरींतून निरंतर चालणारी अशी एक नेमणूक करून दिली आहे. पूर्वी ढमढेरे हे विंचुरकरांस आपले मालिकाप्रमाणें मान देत होते व हा क्रम अद्यापिहि चालू असून पूर्ववत्प्रमाणें ढमढेरे यांचे वंशजांबरोबर विंचूरकर घराण्याचा स्नेहसंबंध आहे."

असो. पुन्हां पूर्वपदावर येऊं. वेणूबाई वारल्यामुळें शेवटीं राहतां राहिल्या दोनच स्त्रिया. एक थोरली वाराणशीबाई आणि दुसरी सर्वांत धाकटी ती सरस्वतीबाई. या दोघीहि पेशवाई खलास होऊन बाजीरावांची ब्रह्मावर्तास रवानगी झाली तेव्हां तिकडे त्यांचेबरोबर गेल्या. त्यांच्या मृत्यूंचीं सालें मात्र कोठें नमूद नाहींत. फक्त वाराणशीबाई सरस्वतीबाईच्या आधीं मृत्यु पावली असावी. दोघींनाहि अहेव मरण आलें. त्यांच्या मृत्यूनंतर पुष्कळ वर्षांनीं बाजीराव १८५१ सालीं वारले.

आतां यापुढें माहितीच्या सुसंगततेसाठीं वाराणशीबाई व सरस्वतीबाई यांच्या हकीकती पृथक् पृथक् सांगणें सोईचें असल्यामुळें तसें करतों.

वाराणशीबाईला पिशाच्चबाधा असली तरी ती आपली ज्येष्ठ पत्नी आणि तिलाच पहिला पुत्रहि झालेला. त्यामुळें तिजविषयीं बाजीरावांच्या मनांत कांहीं सुप्त प्रेम आणि आदरहि वसत असावा असें मानावयास पुष्कळ जागा आहे; कारण तसें नसतें तर तिच्या आरोग्यासाठीं त्यांनीं जीव तोडून इतकी उपचारांची पराकाष्ठा खास केली नसती. बाजीरावांनीं नवा बुधवारचा वाडा बांधला. त्याच्यांत वाराणशीबाईकारितां तिच्या आवडीनुसार खास तजविजी करण्यांत आल्या होत्या. उदा. ५ नोव्हेंबर १८१३ ची एक नोंद अशी आहे. (अर्बाअशर मयातेन, शके १७३५ जिल्काद कार्तिक).

"८५०० रु. बुधवारचे वाडयांत दाक्षिणेकडे स्वयंपाकघर वगैरे **पहिलें घरांतील मर्जीप्रमाणें** काम चुन्यांत भिन्तीसुद्धां वगैरे चांगलें

नामी उत्तम करावयाकरितां चैत्रअखेर तयारीची मुदत धरून चिमणाजी नारायण यांचे हवालीं केलें.

छ ११ जिल्काद ”

वाराणशीबाईला खाजगत कुलखर्चासाठीं दरसाल २०००० रु. चा मक्ता करून देण्यांत आलेला होताच. परंतु त्याशिवाय तिला द. म. ५००० रु. नेमणूक होती, असें १८१२ सालच्या नोंदीवरून दिसतें.

“ ५००० रु. सौ. पहिले घरीं माहे गुदस्ता वैशाख मासचे.

छ २३ जमादिलाखर ”

बिचाऱ्या वाराणशीबाईची प्रकृतीची तक्रार आणि पिशाच्चबाधा मात्र नाहींशा झाल्या नाहींत. १८१३ सालीं पुन्हां एकदां बाजीरावांनीं अनुष्ठानादिकांचें सत्र केलें आणि एकच नाहीं तर ६ नागबळी व ६ नारायणबळीहि गणेशभट उपाध्याचे विद्यमानें करविल्या व त्यासाठीं ३००० रु. खर्च केले.

इतक्या सायासांना अखेर पुन्हां एकदां फळहि आलें. पण तेंहि निरुपयोगीच ठरलें, कारण १८१६ अखेर वाराणशीबाई प्रसूत होऊन तिला अपत्य झालें; पण दुर्दैवानें ती कन्याच होती ! तत्संबंधींचें पत्र असें—

२०–९–१८१६

“ श्रीमंत महाराज राजमान्य राजश्री बाबासाहेब भावोजी स्वामीचे सेवेसी विनंती शेवक रघुनाथ मोरेश्वर देवधर त्रिकाल चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना ता. भाद्रपद वद्य १४ भृगुवार पावेतों महाराजांचे कृपावलोकने करून वर्तमान यथास्थित असे विशेष चिरंजीव सौ. वाराणशीबाईनीं काल रात्रीचें अमलांत पथ्य घेतलें. आज प्रातःकाळीं सहावे घटकेस न्हाणास आरंभ केला. दहावे घटकेस न्हाण जाहालें. नंतर दोन प्रहरीं पथ्य घेतलें. वेदमूर्ति राजेश्री नाना वैद्य प्रकृति पाहात असतात. प्रातःकाळीं व सायंकाळीं औषध चाललें आहे. काल रात्रीं बापु डांग्या व

गंगी इचें गाणें खोलीबाहेर जाहालें. मध्यरात्रीनंतर निद्रा जाहाली. सौ. वाराणशीबाईची व चिरंजीव मुलीची प्रकृती बरी आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

(ऐ. सं. सा. खंड १. दुसऱ्या बाजीरावाचा कौटुंबिक पत्रसंग्रह.पत्र क्र. २७)

जिऊबाई चाफेकरणीनें बाजीरावांस काशीहून जें एक पत्र लिहिलें आहे, त्यावरून या मुलीची नक्की जन्मतीथ कळते. त्यांत असें म्हटलें आहे कीं, "हल्लीं भाद्रपद शु॥ ७ चें पत्र आलें. त्यांत सौ. वाराणशीबाई आषाढ वद्य अमावास्येस प्रसूत होऊन कन्या जाली. नांव 'कृष्णाबाई' ठेवलें म्हणून मजकूर आहे तो कलला."

ही कृष्णाबाई सुद्धां लौकरच मृत झाली असली पाहिजे कारण तिचा पुढें कोठेंहि उल्लेख येत नाहीं.

यानंतर एक-दोन वर्षांत इंग्रजांशीं अखेरचा सामना करण्याची बाजीरावांची तयारी झाली. तेव्हां त्यांनीं वाराणशीबाईस, रायगडचा पक्का बंदोबस्त करून, तेथें राहण्यास पाठविली. शकावलीकार म्हणतो, "श्रीमंतास किल्ले इंग्रजी सरकारांतून माघारे दिल्यावर जवाहीर व पैका वगैरे चीजवस्तु सिंहगड–रायगड किल्ल्यास रवाना केली व वाड्यांतील देव व थोरली स्त्री वाराणशीबाई रायगडास पाठविली. धाकटी स्त्री सरस्वतीबाई व आप्पासाहेब यांची स्त्री दोघी उभयतां जवळच राहिल्या." पूर्वी होळकरांच्या स्वारीचे वेळीं इंग्रज पेशव्यांचे मित्र होते. पण आतां मात्र तेच शत्रु झालेले होते. पूर्वी रायगडनजीकच्या बाणकोट बंदरांतून व तेथील किल्ल्यांतून इंग्रजांनीं बाजीरावास मदत केली. उलटपक्षीं आतां तेंच बाणकोट बाजीरावांना शत्रूचा शेजार म्हणून धोक्याचें वाटत होतें आणि म्हणून शक्य तर बाणकोट स्वारी करून उध्वस्त करून टाकावें अशीहि तजवीज बाजीरावांना करावी लागली. त्यासंबंधांत रेसिडेन्सी रेकॉर्ड्समधील पुढील पत्र चांगला प्रकाश पाडतें.

१

बाणकोटचा इंग्रज रेसिडेंट पेली याचें १४–११–१८१७ चें पत्र

" आज निश्चित बातमी समजली कीं येथून २० मैलांवर महाडास वाराणशीबाई १५०० स्वार व पायदळ यांसह येऊन पोंचणार व तेथून रायगडावर जाणार. तिच्या बरोबरच्या फौजेला बाईस पोंचविण्याचें काम उरकतांच दासगांव जाऊन लुटावें आणि बाणकोटावर हल्ला करावा असा हुकूम आहे. "

—पण पुढें प्रत्यक्ष युद्धांत दर ठिकाणीं पेशव्याचा मोड झाला. त्याला पुणें सोडून जावें लागलें. त्याचे सरदार व भाऊ चिमाजीआप्पा हे सुद्धां त्यास सोडून निराळे झाले. आणि इकडे पेशव्याचा सर्व मुलूख आणि किल्ले-कोट इंग्रजांनीं कबजांत घेतले. अर्थात् वाराणशीबाईहि रायगड हस्तगत होतांच इंग्रजास हस्तगत झाली. त्यासंबंधीं २४ मे १८१८ रोजीं शिर-वळच्या मुक्कामावरून एल्फिन्स्टन्नें ग. ज. स जें पत्र लिहिलें त्यांत असा तपशील आहे.

२

एल्फिन्स्टन्चें ग. ज. स पत्र मुक्काम शिरवळ येथून

२४ मे १८१८ चें

(रेसिडेन्सी कॉरस्पॉन्डन्स व्हॉ. १३ लेखांक १३६.)

" चिमाजी आप्पा फुलशहरास येऊन पोंचला. .त्याच सुमारास वारा-णशीबाई पुण्यांत येऊन दाखल झाली. तिला रायगडास ठेवण्यांत आलें होतें. आपला वेढा रायगडास बसला तेव्हां मी तिला कौल पाठविला कीं, तुम्हांस सर्व चीजवस्त आणि नोकरपेशासुद्धां सुखरूप काढून देतों, परंतु हा कौल गडकऱ्यानें मानला नाहीं. कौल देऊन पाठविलेल्या निशाणावरच

अस्त्रांनीं गोळ्या चालविल्या. किल्ला जिंकल्यावर कर्नल प्रोथरनें वाराणशी-बाईस बदरका देऊन पुण्यास रवाना केलें व तेथें तिला पेशव्यांच्या एका राजवाड्यांत ठेवण्यांत आलें. मीं स्वतः तिची भेट घेतली व तिचें सांत्वन केलें. बाईनें इच्छा प्रदर्शित केली कीं, "मी कांहीं दिवस पुण्यांतच राहतें व नंतर माहेरीं वाईस जाईन म्हणतें." तिच्या इच्छेप्रमाणें १० दिवसांनंतर आम्ही तिला चकती देऊन तिची वाईस रवानगी केली."

वाईस कांहीं दिवस राहिल्यावर कांहीं महिन्यांनीं पुण्यास येऊन मग ती ब्रह्मावर्तास बाजीरावाकडे रवाना झाली. वाराणशीबाईची मनःस्थिति युद्धाच्या सर्वनाशामुळें किती अनुकंपनीय झाली असेल तें कोणालाहि सहज अनुमानितां येईल. या सगळ्या क्षोभाचा परिणाम तिच्या आधींच हलक्या व अधू झालेल्या मेंदूवर विशेषच झाला आणि तिच्या फिट्सचा जोर फारच बळावला. पुण्यांत तिच्या या दुखण्यानें एकदां फारच जोर केला आणि त्या वेळीं ती उन्मादाच्या भरांत वाटेल तें बडबडूं लागली. त्यासंबंधीं २५ऑक्टोबर १८१८ रोजीं नगरकरांनीं लिहिलेलें एक पत्र पे. द. त छापलें आहे. हें नगरकर कुटुंब दुसऱ्या बाजीरावाशीं घरच्यासारखे आप्त म्हणून वागणारें होतें. वाराणशीबाईच्या दिमतीस त्यांनीं या वेळीं असावें हें सहजच होतें. पत्र असें :—

" विज्ञापना. येथील कुशल ता। आश्विन व॥ ११ पावेतों क्षेम असो. विशेष वद्य ८ मध्यरात्रौ मुख्याचें अंगास आलें आणि वाखा जाला. नंतर भोंवतालचे जागे होऊन अंगास आलें होतें त्यास विचारूं लागले कीं, "तूं कोण आहेस ? येथें यावयाचें प्रयोजन काय ?" त्यावरून ते बोलते होऊन म्हणों लागले कीं, "मी गंगाधर शास्त्री आहें. मला निरार्थ मारलें. आतां मी सूड घेईन." इतकें बोलोन अंगांतील वारे निघोन गेल्यावर सावध झाली. हीं अक्षरें लिहावयासी मनास संकोच वाटला. दुसरे कोणी अंगास येऊन त्यांचें नांव सांगितलें असेल. यांतील काय असेल तें असो."

इंग्रज सेनापतींनीं वाराणशीबाईबद्दल फार कौतुकाचे उद्गार काढले ते नमूद आहेत. तिची दरबारी चालचलणूक, सभ्यता आणि समजूतदारपणा यांविषयीं त्यांनीं गौरवास्पद उद्गार काढले आहेत.

आतां प्रत्यक्ष पेशवीण म्हणून वावरलेली बाजीरावांची सर्वांत कनिष्ठ सहावी स्त्री सरस्वतीबाई तिची हकीकत पाहूं. ही बळवंतराव निळकंठ पेंडशांची मुलगी. हे बळवंतराव गरिबीमुळें कोंकणांतून आपले तीन मुलगे व एक मुलगी बरोबर घेऊन हैद्राबादकडील बीड आंबाडे या गांवीं राहण्यास आले. नंतर ते पेशव्याच्या सैन्यांत शिलेदारी पेशानें शिरले. त्यांना एकूण चार मुलगे. थोरला अमृतराव, दुसरा निळकंठ, तिसरा गणेश व चौथा चिन्तामणी. यांपैकीं निळकंठ व चिंतामणी यांविषयीं कागदोपत्रीं कांहींच उल्लेख येत नाहींत. अमृतराव व गणेश यांचे मात्र येतात. सरस्वतीबाईचें लग्न झाल्यानंतर हे तिचे दोघे भाऊ बाजीरावांच्या खाजगीकडे नोकर म्हणून दाखल झाले.

बळवंतराव पेंडशांची मुलगी बाजीरावांच्या दृष्टीस कोणी घातली तें कळत नाहीं. परंतु ज्या अर्थीं बाजीरावांनीं ती पसंत केली त्या अर्थीं ती फार सुस्वरूप असावीसें वाटतें.

लग्न १८१२ सालीं बाजीराव साताऱ्यास राजदर्शनासाठीं गेले, त्या वेळीं उरकून घेण्यांत आलें. मात्र लग्न साताऱ्यास न होतां, माहुली येथें झालें. वास्तविक लग्न पुण्यासच व्हावयाचें, परंतु तें माहुलीस आडवळणी ठिकाणीं कां उरकण्यांत आलें? त्याचें एक गमक बाजीरावांची एल्फिन्स्टन्शीं १८११ च्या नोव्हेंबरांत जी मुलाखत झाली, तींत सांपडतें. एल्फिन्स्टननें आपल्या ग. ज. ला पाठविलेल्या रिपोर्टांत पुढीलप्रमाणें लिहिलें आहेः—

"यापूर्वी पेशव्यानें आपण स्वतःच्या लग्नासाठीं साताऱ्यास जाणार आहोंत असें मला सांगितलें होतें व त्यासाठींच तो आतां निघणार होता.

राजधानीपासून दूर हा लग्नसमारंभ आपण कां करणार आहोंत, याचा खुलासा करतांना बाजीराव म्हणाला, “ सध्यां आमच्या बंधुराजाशीं आमचा पूर्ण बेबनाव झालेला आहे. यामुळें पुण्यास समारंभ झाला आणि तो हजर न राहिला तर लौकिक एक प्रकारचा होणार म्हणून माहुलीचें ठिकाण योजलें.”

असो. लग्न मार्गशीर्ष व॥ ९ इंदुवासर शके १७३३ (३१-१२-१८१२) आवशीचें ७ घटका रात्रीस माहुली येथें झालें.

साध्या शिलेदाराचें कुटुंब पेशव्याची सासुरवाड झाली. तेव्हां त्या कुटुंबाची आर्थिक व इतर बडेजावी वाढवून देणें बाजीरावांचें कर्तव्यच होतें. तथापि मूळचें कुटुंब अगदीं सामान्य, त्याला मूळची खानदानी किंवा श्रीमंती नाहीं. रास्ते किंवा फडके अशासारखे कांहीं ते सावकाराचें किंवा सरदाराचें घराणें नव्हे. म्हणून बाजीरावांनीं त्यांची सुस्थिति करून दिली तरी ती सामान्यच होती असें म्हणावें लागतें. या दृष्टीनें शके १७३५ सालची बाजीरावांच्या खाजगी जमाखर्चांतील ही मनोरंजक नोंद वाचनीय आहे.

“ ४०० रु. त॥ सुंदराबाई पेंडसे [बाजीरावांची सासू] यांणीं आपले सुनासुद्धां आपले घरांतील स्वयंपाकासुद्धां कोणतेंहि काम श्रमाचें करूं नये. कोणी ब्राह्मण बायका-पुरुष ठेवून प्रपंचाचीं कामें करावींत. असा करार. त्याप्रमाणें दुसाला २५ महिन्यांचे बेगमीचे द. म. १६ रु. प्रमाणें देवविले.

छ १, रबिलावल ” [अर्बाअशर मयातेन]

या नोंदीवरून आणखी एक माहिती कळते ती ही कीं, शके १७३५ सालीं सासरे बळवंतराव पेंडसे कांहीं जिवंत नव्हते, कारण सुंदराबाईच्या पाठीमागें ‘ सौ. ’ हें उपपद लावलेलें नाहीं.

१८१३ सालीं बाजीरावांनीं “दुसऱ्या वाड्याच्या” म्हणजे कुसाबाईच्या व तिसऱ्या म्ह. सरस्वतीबाईच्या नोकरपेशांची नेमणूक करून दिली. त्यावरून

कुसाबाईच्या दिमतीस २८ इसम होते. त्यांना द. म. २७६ रु. मिळत व सरस्वतीबाईच्या दिमतीस १३ आसामी होते त्यांना द. म. एकूण ८५ रुपये मिळत.

पेंडसे कुटुंबावर देणग्या—बक्षिसांचाहि फारसा वर्षाव झालेला आढळत नाहीं. फक्त दोनदांच काय त्या मिळाल्या.

अर्बाअशर मयातेन ज्येष्ठ जमादिलाखर मध्यें १५०० रु. आणि रमजान महिन्यांत ८०० रु. अमृतराव पेंडसे यांना बक्षीस दिल्याच्या दोन नोंदी आढळतात.

सरस्वतीबाई ही सगळ्या बायकांत नवी व तरुण म्हणून नेहमीं बाजीरावांसंनिध शुक्रवार वाड्यांतच राहिली. लग्नानंतर सुमारें १॥–१॥। वर्षांनीं तिला रजोदर्शन झालें. या वेळीं रेसिडेंट एल्फिन्स्टननें २०,००० रुपयांची तिला आहेर केला. त्यानें १९ डिसेंबर १८१३ रोजीं त्या आहेराच्या मंजुरीसाठीं जें पत्र ग. जनरलला लिहिलें त्यांत असें म्हटलें आहे कीं "बाजीरावांच्या स्त्रियेस नुकतेंच कांहीं दिवसांपूर्वीं रजोदर्शन झालें. तन्निमित्त होणाऱ्या समारंभासाठीं त्यांनीं मला निमंत्रण केलें आहे. अशा प्रसंगीं जाऊन रेसिडेंटानें आहेर करण्याचा जुना दप्तरी दाखला असल्यामुळें सरकारी मंजुरीची वाट न पाहतांच मला २०,००० रु. पर्यंत किंमतीचा आहेर करावा लागणार आहे." प्रत्यक्षांत तो २०,१०० रु. चा होता. त्याचा तपशील—

जरीकांठी दुपट्टा व पागोटें मिळून	१२०० रु. किंमत
किनखाप	३०० रु.
सोनेरी बुट्ट्याचे दोन खण	२०० रु.
शिरपेच व जिगा	२६०० रु.
हिरेमाणकें बसविलेला कांकणजोड	६४०० रु.
तसबी म्हणजे मोत्याची माळ	३२०० रु.
पेशव्याच्या तिन्ही स्त्रियांसाठीं तीन	

साड्या व तीन चोळ्या	१७०० रु.
तिघींसाठीं तीन हिऱ्यामोत्यांचे दागिने	४५०० रु.

सरस्वतीबाईला कांहीं गूलबाळ झाल्याचा दाखला पेशवे रोजकीर्दीत उपलब्ध झालेला नाहीं. शिवाय अन्य शकावल्यांतहि तशी कांहीं नोंद सांपडत नाहीं. यामुळें " पेंडसे कुलवृत्तान्त " पृष्ठ ५३ वरील टीपेंत, " सरस्वतीबाईस एक मुलगी झाली होती, पण ती लहानपणींच वारली " अशी जी माहिती दिली आहे, ती चूक असावीसें वाटत होतें. परंतु सरदेसाई रियासत, उत्तर विभाग ३ पृष्ठ ४६० वरील एल्फिन्स्टन्च्या रिपोर्टांत जी हकीकत आली आहे तीवरून ती गोष्ट सत्य ठरते. गंगाधरशास्त्र्यांच्या खुनानंतर एल्फिन्स्टन्नें बाजीरावांना पेचांत धरून त्यांना जाब विचारण्याचें ठरविलें. त्यासाठीं त्यानें त्याची मुलाखत घ्यावी म्हणून सारखा लकडा लाविला. अखेर ३ ऑगस्ट १८१६ रोजीं त्यानें बाजीरावांना निक्षून कळविलें, " आजच्या आज तुमची भेट पाहिजे. " बाजीरावानें जबाब पाठविला, " आज प्रकृति बरोबर नसल्यानें भेट होणार नाहीं. " दुसरे दिवशीं पुनः एल्फिस्टन्नें तसाच निरोप पाठविला. त्यावर बाजीरावांनीं कळविलें, " आजच उपजलेली आमची मुलगी गमावल्यानें तीन दिवस अशौच आहे. " तें ऐकून एल्फिस्टन्नें पेशव्यांच्या नांवानें पत्र लिहून तें सदाशिव माणकेश्वराकडे धाडलें. पण माणकेश्वरानें कळविलें कीं, आमच्यानें कांहीं या स्थितींत हें पत्र बाजीरावांस देवबणार नाहीं. तेव्हां एल्फिस्टननें चिडून आपल्या मुन्शीजवळ तें पत्र देऊन बाजीरावांकडे पाठविलें; पण त्या मुन्शीचीहि भेट बाजीरावांनीं घेतली नाहीं.

असो. यावरून सरस्वतीबाईच्या मुलीचा जन्ममृत्युकाळ २ ऑगस्ट १८१६ असा ठरतो.

यानंतर थोड्याच दिवसांत इंग्रजांविरुद्ध उठावाची पेशव्यांनी तयारी

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था

झाली आणि खडकीस युद्धाचें तोंड लागलें. पेशव्यांचा पराभव झाला. आणि तेथून पुढें सात आठ महिनेपर्यंत बाजीरावांना इंग्रजांचा शह चुकवीत एखाद्या पारध चाललेल्या श्वापदाप्रमाणें देशोधडीं पळत राहावें लागलें. त्याचें अत्यंत भावनापूर्ण करुण चित्र प्रभाकर शाहिराच्या पवाड्यांत उतरलें आहे. तर उलट भावेसंपादित मराठा दप्तर, रुमाल २ मध्यें चिटणिसांनीं लिहिलेल्या छत्रपतींच्या दिनचर्येंत त्या पळाचा गद्यांत अगदीं तपशीलवार असा 'ग्रॅफिक अकौंट' सापडतो. सरस्वतीबाईंपुरता तो मजकूर असा :

"ते समयीं लगट फारच झाली. बाजीराव यांणीं आपल्यां बायकोस छिटाचा अंगरखा व पायजमा घालून डोईस रुमाल बांधविला होता. तिजला व ढमढेरे वगैरे यांच्या दोनचार बायका यांस घोड्यावर घालोन जवळच चालविल्या असत. ज्या बाजूनें इंग्रजांकडील तुरुक जवळ दिसेल तो मार्ग सोडोन डावे-उजवे पळतां वाट नाहीं. नांगरटी व वोढे व करडीचीं शेतें, भडोला भारी. यामुळें घोडी व माणसें फार हैराण होत."

प्रभाकराचें हें वर्णन पाहा—

"रात्रंदिस श्रीमंत न घेतां उसंत पुढें पळती ।
यमस्वरूप पलटणें एकदांच मागें खळबळती ।
धडाक्यानें तोफांच्या वृक्ष आणि पर्वत हादळती ।
त्यांत संधि साधून एकएकि दुरून कोसळती ।
भणाण झालें सैन्य सोडिली कितिकांनीं सोबत ।
कितिक इमानी बरोबर झुकले घर टाकुनि चुंबत ।
कितिक मुकामीं अन्न मिळेना गेलि साहेबनौबत ।
कोठें डेरे दांडे कोठें उंट तट्टे राहिलीं ।
कोठें सहज होऊन झटपट रक्तें वाहिली ।
कोठें श्रीमंत बाईसाहेब सडी पाहिलीं ।

बहूत कोमावलि पाहावेना दृष्टिनें उभयाला ।
हरहर नारायणा, असें कसें केलें सखयाला ।।
माघ शुद्ध पौर्णिमेस बापुसाहेब रणीं भिडले ।
जखम करूनि जर्नेलास भिडतां जन म्हणाति पडलें ।
गोविंदराव घोरपड्याचे दोन हात भले झडले ।
आनंदराव बाबर ढिगामधीं खूप जाऊन गढले ।
मानाजी शिंदे मागें फिरतना डोंई देउन अडले ।
छत्रपति महाराज तळावर समस्त सापडले ।
घाबरले श्रीमंत सुचेना मन गेलें वेधुनि ।
बाईसाहेबांना तशीच घोड्यावर पाठिस बांधुनि ।
नेलें काढुनि अमृतराव बळवंत ज्येष्ठ बंधुनि ।
दहा प्रहर पुरे पंतप्रधान श्रम पावले ।
नाहिं स्नानशयन, नाहिं स्वस्थपणें जेवले ।
आले आले ऐकतां उठपळ राव धावले ।
गर्भगळित जाहले लागले शुष्क दिसायाला ।
बाईसाहेबांना फुरसत न पडे बसून न्हायाला ।।

पण हे दोन्ही पुरावे त्या मानानें दुय्यमच होत. बऱ्याच वर्षांपूर्वी मंडळाच्या ऐ. सं. सा. खंड २ मध्यें कान्हूरच्या नगरकर दप्तरांत आम्हांस उपलब्ध झालेलीं महत्त्वाचीं ४२ पत्रें "दुसऱ्या बाजीरावाची शेवटची धडपड" या मथळ्याखालीं आम्हीं छापलीं आहेत. त्यांतील पुरावा अव्वल दर्जाचा होय. कारण तीं पत्रें बाजीरावांच्या पळांत त्यांच्या संनिध असणाऱ्या नगरकरांनीं रोजच्या रोज त्यांच्या तळावरून लिहिलेलीं आहेत. त्यांत पुढील उल्लेख आहेत.

१४–११–१८१७ चें पत्र :

(खडकीच्या लढाईच्या सुमाराचें)

" यानंतर फुलगांवाकडे जातां संगमापुढें श्री खंडोबाचें देवालय आहे. तेथें रात्रौ इंग्रजाकडील छबिना येऊन उभा राहिला होता. त्या माथ्यावर तोफ आणोन ठेवली होती म्हणून बातमी आली. परंतु तोफ आली नाहीं. दिघी व लोहोगांव आणिक भोंवतालें गांव आहेत ते दरोबस्त लुटून टाकिले व धानोरी जाळली ती येथून दिसत होती. महांकाली तोफ आणून लागू करावी असा बेत होऊन तोफ आणविली आहे. श्रीमंत रा. आप्पासो आले ते रात्रौ खटल्यासुद्धां डेऱ्यांतच होते. निद्रा कलंद्रींतच जाली. आज त्याजकडील डेरे उजवे बाजूस जाले. स्नानसंध्या खाशाची इकडे जाली. भोजन मात्र तिकडे जालें. श्रीमंत सौ. सरस्वतीबाई काल रात्रौ अस्पर्श जाली म्हणोन त्यांचे जाण्याचा बेत सासवडास जाला होता. बरोबर मी व अमृतराव पेंडसे यांनीं जावें म्हणोन आज्ञा जाली होती. परंतु तूर्त जाण्याचा बेत राहिला. राजेश्री अमृतराव व गणपतराव पेंडसे यांस प्रथम दिवसापासून आज्ञा जाली आहे कीं सरस्वतीबाईजवळ असावें. याजकरितां त्यांचे विद्यमानचे १०० स्वार व शंभर पायदळ ठेवावयास त्यास आज्ञा जाली. "

१२ मार्च १८१८ चें पत्र

(अष्टीच्या संग्रामानंतरच्या पळाचें).

" श्री. सौ. सरस्वतीबाई यांस अमृतराव पेंडसे यांणीं घोड्यावर घेऊन निघाले. समागमें गणपतराव, मी व दहापांच आसामी बारगीर याप्रमाणें वाटेनिराळे उजवे बाजूस निघोन गेलों. आमचें व तुरपाचें अंतर आपलें पुण्यांतील वाड्यापासोन घाणेकराचे घराइतकें होतें. ईश्वरे ते समयीं कृपा केली. त्या घाईत बाईस वमन जालें व ढाळ जाले. ऊन मनस्वी. बहुत वाखा जाला. त्यासमयीं एक अफ्तागिऱ्या भेटला. मुलुख मोगलाई गाXXX ळून जावयाचें नाहीं. आड रानांतून चार कोस गेलों तों इतक्यांत गोखल्याकडील हजार स्वार भेटले. मग मजलीस चार घटका रात्रीचे सुमारास जाऊन

पोहोंचलो. तों सखुबाई ढमढेरी व गंगाबाई राजमाचकर घोड्यावरून पडली. नंतर अक्कलकोटकर यांचे स्वारांनीं पाठीशीं बांधून आणिली. गंगाबाईची घोडी पळोन गेली. त्यावर तिचा खाजगत ८००० चा विषय होता व श्रीमंत राजेश्री निळकंठराव बाबा यांचें जवाहीर ५०००० चें होतें ते गेले व घोडी गेली याप्रमाणें वर्तमान जालें. ”

असो. सरस्वतीबाईसंबंधींचा हाच शेवटचा अधिकृत उल्लेख ! त्यानंतर ब्रह्मावर्त येथील तिच्या चरित्राबद्दल तसा कांहीं अधिकृत दाखला उपलब्ध होत नाहीं. नाहीं म्हणावयास वरसईकर गोडसे भटजींनीं त्यांना तिच्या संबंधीं ऐकावयास मिळालेली माहिती आपल्या प्रवासवृत्तांत ग्रथित केली आहे. तीवरून ही सरस्वतीबाई आपल्या चारित्र्यानें आपल्या व्यसनी व रंगेल पतीलाहि तेजानें धाकांत ठेवणारी असावी असें दिसतें. ५७ च्या बंडाच्या धुमाळींत इंग्रजांनीं सूड घेण्याकरितां ब्रह्मावर्त क्षेत्राचा संपूर्ण विध्वंस करून टाकला. त्याचा तपशील सांगत असतांना भटजी मजकुरांनीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे.

‘ ब्रह्मावर्त क्षेत्र श्रीमंतांची निवासभूमि असल्यामुळें गोरे शिपाई हजारों मनुष्यांचे बळीनें व द्रव्यसंतर्पणानें शांत झाले नाहींत. त्यांनीं श्रीमंतांचा अनेक वर्षांच्या संपत्तीनें भरलेला वाडा लुटून त्यास शेवटीं अग्नि लावून दिला. शहरचे तट व दरवाजे पाडून टाकले. राममंदिर सुरेख होतें. तें पाडून मूर्तिसुद्धां ठेवल्या नाहींत. बागांच्या भिंती पाडून उध्वस्त करून टाकल्या. श्रीमंत बाजीरावसाहेबांनीं ‘ सरस्वतेश्वर’सांबाचें देवालय लाखो रुपये खर्च करून संगमरवरी दगडांचें गंगातीरीं बांधलें होतें. त्याचें कारण असें होतें कीं, त्यांची सरस्वतीबाई म्हणून एक अति प्रिय पत्नी होती. ती रूपानें व गुणानें लोकोत्तर असून मोठे मनाची, दानशूर, हंसतमुख होती. ती इतकी तेजस्वी होती व न्यायी होती कीं, एखादा गैरचालीचा पुरुष अगर स्त्री तिचे दृष्टीस पडल्यास त्यास ती एकदम वाड्याबाहेर हाकून देई व महाराजहि

कांहीं बोलत नसत. जेव्हां जेव्हां स्वारी महाराजांपर्यंत जात असे तेव्हां तेव्हां महाराजांनीं मोठ्या भीतीनें आपले जवळील माणसें असतील तीं दूर करावीं. तिनें एखादी गोष्ट सांगितल्यास ते ताबडतोब करीत. अशी त्यांची प्रियपत्नी नवज्वरानें कैलासवासी झाल्यावर महाराजांस अति दुःख झालें. तिचे मरणकाळीं २५।३० हजार रु. धर्म केला व गंगातीरीं उत्तम जागा पाहून व चंदनकाष्ठांनीं कापुरानें तिचा देह दग्ध केला व मर्तिकासंबंधानें दीड लक्ष रुपये दानधर्म केला. ज्या जागेवर दहन केलें, तेथें मोठें टोलेजंग देवालय बांधून आंत गर्भागार व सभामंडप पांढरे संगमरवरी दगडांनीं बहुत खर्च करून बांधलें व आंत श्रीसांबाची प्रतिष्ठा करवून "सरस्वतेश्वर" असें नांव ठेविलें. गोरे शिपायांनीं तें देवालय पाडून शिवलिंग काढून टाकून संगमरवरी दगडहि नेले. तेथें देवळाचा मागमूसहि ठेविला नाहीं."

ब्रह्मावर्तास बाजीरावांचे कारभारी म्हणून असलेले सालकाढे यांनीं बाजीरावांच्या समक्ष पाहिलेल्या गोष्टी आठवणीच्या रूपानें सांगितल्या. त्या नाशिकचे कोणी वृद्ध शिक्षक गोपाळ बाळकृष्ण वैद्य यांनीं साक्षेपानें लिहून ठेविल्या. त्या पुढें कै. वि. कों. ओक यास मिळाल्या. त्या मंडळाच्या त्रैमासिकांत छापल्या आहेत. (वर्ष १८, अंक ४) त्यांत म्हटलें आहे कीं, "सरस्वतीबाईचें श्राद्ध बाजीराव करीत त्या वेळीं ५ ब्राह्मण सांगून प्रत्येकास १२०० रु. देत. बाजीरावांनीं सरस्वतीबाईची "एकोत्तिष्ठता" केली, तिचे ३२ ग्रास घ्यावे लागतात. ते घेणारास ३२ लाख रुपये दिले. घेणारा ब्राह्मण गोमंतकाकडील होता. तो पैसा त्याचे घरीं पावता केला."

पेशवीण म्हणून पदवी लाभलेल्या बाजीरावांच्या बायकांची हकीकत येथें संपली. ब्रह्मावर्तास गेल्यावरहि बाजीरावांनीं अनेक लग्नें केलीं. परंतु त्याबाबत तपशीलवार माहिती फारशी मिळत नाहीं. बाजीराव पुण्याहून ब्रह्मावर्तास रवानगी झाल्यानंतर तीनच वर्षांत म्हणजे १८२२ सालीं ते पुन्हां नवरदेव

होऊं पाहातच होते. तत्संबंधीं पे. दप्तरांतील हा उल्लेख पाहा :

[पे. द. भाग ४१, पत्र नंबर २६४]

बाजीराव लग्न करणार तें कोणाच्या मुलीबरोबर याची माहिती कंपनी सरकारनें मागविली असतां इकडील अधिकाऱ्यांनीं जें उत्तर पाठविलें तें हें पत्र होय.

" ब्रह्मावर्तास बाजीराव साहेब लग्न करणार त्यास कन्या गणपतराव यांची योजिलेली आहे. ते कोण, कोठें राहणार, शोध घ्यावा म्हणोन साहेब यांचा हुकूम जाहाला होता. त्याचा शोध घेतांना गणपतराव भागवत × × दप्तरदार, सुभा खानदेश हल्लीं नाशिकांत आहेत. यांची कन्या देणेंचा निष्कर्ष आहे. म्हणून हरिभाऊ देशमुख यांस पत्र आलें आहे. म्हणोन साहेबास विनंति करावी. "

हे हरिभाऊ देशमुख म्हणजेच सुप्रसिद्ध लोकहितवादी देशमुखांचे वडील. पुण्यांतील बाजीरावांच्या इस्टेटीची व्यवस्था पाहण्याचें काम त्यांचेकडे होतें.

आमच्या संग्रहीं पुण्याच्या भावे सरदारांच्या दप्तरांतील ब्रह्मावर्तांचा बराच पत्रव्यवहार आहे. या भावे कुटुंबांतील मंडळी पुण्याहून बाजीरावांबरोबर ब्रह्मावर्तास गेली. त्या पत्रांतून बाजीरावांच्या दोनतीन लग्नांचे उल्लेख सांपडतात. परंतु तारखा ठरविण्यास कांहींच गमकें नाहींत.

राजवाडे व पारसनीस यांनीं जमविलेल्या हकीकतीवरून सरदेसायांनीं बाजीरावांच्या ब्रह्मावर्त येथें झालेल्या पांच लग्नांची जंत्री दिली आहे, ती अशी :—

सातवी बायको : " सत्यभामा " मुखरीकर अभ्यंकरांची कन्या.

आठवी बायको : " गंगाबाई " बळवंतराव आठवले, पाडळीकर यांची कन्या. हिला दोन मुली झाल्या. थोरली " योगाबाई " हिचा जन्म

शके १७६५. हिचें लग्न शके १७७७ त म्हणजे सन १८५५ त बापु-साहेब कुरुंदवाडकरांशीं झालें. ही योगाबाई ब्रह्मावर्त येथें शके १७८० मध्यें वारली. दुसरी मुलगी कुसुमाबाई ऊर्फ बयाबाई. जन्म १६ जाने. १८४७. तिची माहिती सुप्रसिद्ध आहे.

नववी बायको : मैनाबाई गोखल्यांकडील.

दहावी बयाको : सईबाई रिसबुडांकडील. तिचा मृत्यु नेपाळांत १८१६ सालीं झाला.

शेवटची अकरावी बायको चितळ्यांकडील. तिचें नांव उपलब्ध नाहीं.

बाजीरावांनीं संततिप्राप्त्यर्थ लग्नांची ही अशी एकादष्णी घातली तरीहि त्याना पुत्रसुख लाभलें नाहीं. तेव्हां जणूं कांहीं आपल्या दुर्दैवावर सूड घ्यावा म्हणून त्यानी एकच नव्हे तर तीन मुलगे आणि तीन मुलीहि एकदमच दत्तक घेतल्या !! पुत्रांपैकीं नानासाहेब बंडवाले सुप्रसिद्धच आहेत.

* * *

: २ :

छत्रपति व पेशवे
यांचे
अनौरस वंशज

उपस्त्रिया, रक्षा, खासेचाकरीच्या स्त्रिया किंवा नाटकशाळा बाळगणें हें राजे लोकांचें जणूं काय, एक कर्तव्यच ठरून गेल्यासारखें असतें. राजपद आणि तदनुषंगिक सर्व सत्ता आणि ऐश्वर्य भोगीत असतां भोगस्त्रिया तेवढ्या न बाळगलेले राजे अपवादानेंच सांपडावयाचे. छत्रपतींच्या कुळाकडे पाहिलें तरी तेंच दिसून येईल. शिवाजी महाराजांचे वडील शहाजी महाराज यांपासून १८४७ सालीं छत्रपतिपद गमावणारे अखेरचे शहाजीमहाराज सातारकर येथपर्यन्तच्या राजपुरुषांचा आढावा घेतला तर सर्वांची एकच तऱ्हा ! त्याचा तपशील असा—

शहाजी महाराजांच्या लग्नाच्या स्त्रियांखेरीज त्यांच्या नाटकशाळा किंवा उपस्त्रिया बऱ्याच होत्या. त्यांपैकीं नरसाबाई व आणखी एकीचा उल्लेख 'राधामाधवविलासचंपूंत'' झालेला आहे (पृष्ठ ७९). या नरसाबाईला

संतूजी किंवा संताजी नामक पुत्र होता, आणि दुसऱ्या उपस्त्रीचा कोयाजी नांवाचा पुत्र होता.

कोयाजीची विस्तृत माहिती—" राधामाधवविलासचंपूंत ", आलेली आहे. हा कोयाजीराजा नृत्य, गायन, संस्कृत प्राकृत चांगलें जाणणारा असून घोड्यावर बसणें, भाला-बरची खेळणें, कुस्ती-कवायत करणें, इत्यादि कलांतहि तो निपुण होता. कोयाजीनें संस्कृत-प्राकृताचा अभ्यास विश्वनाथ ज्योतिष्याजवळ केला. मल्लविद्या तो नरषट्कसा नांवाच्या प्रख्यात जेठीपाशीं शिकत होता. काव्य, नाटक, आख्यायिका, इतिहास, संगीत, नाना देशभाषा इत्यादींच्या परिज्ञानांत कोयाजीनें फार कौशल्य संपादिलें होतें. जयराम कवीचे शहाजीच्या दरबारीं तेथल्या प्राकृत कवींशीं जे सवाल-जबाब झाले त्या सवाल-जबाबांत जीं बारा भाषांत प्राकृत पद्यें कवीनें रचिलीं, तीं त्रिमल्ल व वेंकट या तत्कालीन प्रख्यात गायकांनीं कोयाजीला गाऊन दाखविल्याचा उल्लेख आहे.

या कोयाजी राजाला नायकीण नांवाची एक मुलगी होती. तिला गायन-नर्तनाची तालीम कांहीं कवीश्वर देत असत.

मराठी दप्तर रुमाल १ मध्यें छापलेल्या सुप्रसिद्ध " शेडगांवकर बखरी"त सुरवातीस उल्लेखिलेल्या शहाजी महाराजांच्या संताजी नामक अनौरस पुत्रा-संबंधीं बरीच तपशीलवार हकीकत मिळते ती अशी— शिवाजी महा-राजांनीं कर्नाटकांत स्वारी नेऊन व्यंकोजीशीं सामना करण्याचा प्रयत्न केला तेव्हां महाराजांच्या धोरणाविषयीं व्यंकोजीच्या मनांत वसवसा (संशय) निर्माण झाल्यामुळें व्यंकोजी पळून गेला, " तेव्हां राजे यांचे लोकांचे छबिन्यांत (फिरत्या पहाऱ्याच्या घोडेस्वारांच्या टोळ्या) व्यंकोजीचे लोक सांपडले. त्यास धरोन आणिलें. मात्र, शिक्षा न करतां उलट सन्मान करून व्यंकोजीकडे परत पाठविलें. याच वेळीं शहाजी महाराजांच्या नाटकशाळेचा

लेक संताजी भोसला कुंवर हा मोठा शूर पराक्रमी दर्शनास आला. तेव्हां त्यास कर्नाटकांत हजार घोड्यांनिशीं दौलत मनसब दिली व महाल मोकासे त्याचे निसबतीस देऊन त्यास कर्नाटक प्रान्तीं फौजेनिशीं ठेवला."

संताजी आणि कोयाजी यांचेखेरीज आणखीहि शहाजी महाराजांच्या बऱ्याच अनौरस पुत्रांचा उल्लेख बखरींतून सांपडतो. ते पुत्र अनुक्रमें भिवाजी, प्रतापर्जा, रायभानजी कुंवर व हिरोजी हे होत. 'शेडगांवकर बखरींत' पृष्ठ ८७ वर म्हटलें आहे, "तेव्हां व्यंकोजी राजे महाराज छत्रपति यांचे भेटीस कावेरीतीरीं आले आणि व्यंकोजी राजे महाराज यांचे पदरचे कारकून काकाजीपंत पिंगळे व कोन्हेर महादेव व जगन्नाथ वेंकाजी व शहाजी महाराजांचे नाटकशाळेचे पुत्र भिवाजी, प्रतापजी व रायेभानजी कुंवर भोसले त्रिवर्ग बंधु याहीं शिवाजी महाराज यांस मुजरे केले."

यानन्तर व्यंकोजीची व शिवाजीची प्रत्यक्षच एक मोठी लढाई झाली. तींत व्यंकोजीचा पूर्ण पराभव झाला. कितीएक नामांकित लोक पाडाव आले. त्यांत भिऊजी भोसला व प्रतापजी भोसला हेहि होते.

याच 'शेडगांवकर बखरींत' महाराजांनीं मृत्युसमयीं ज्या अष्टप्रधानादि सरकारकुनांशीं व विश्वासांतील सरदार व मुत्सद्द्यांशीं खलबत केल्याची हकीकत दिली आहे, त्यांत हिरोजी फर्जंद कुंवर असें एक नांव आहे. हा हिरोजी फर्जंद कुंवर कोणाचा लेकवळा? शहाजी महाराजांचा असला पाहिजे. शिवाजी महाराजांबरोबर आग्रयाचे भेटीचे वेळीं विश्वासू म्हणून तो गेला होता.

९१ कलमी बखरींत बकाजी किंवा बाकाजी फर्जंद याचा उल्लेख आहे. या बकाजी फर्जंदाला हंबीरराव मोहिते सेनापति यांची कारभारी दिली. तसेंच नागोजी व बहिर्जी फर्जंद यांचेहि उल्लेख आहेत. मिर्झा राजा जयसिंगाच्या

भेटीस पुरंदरहून शिवाजी महाराज गेले त्या वेळीं त्यांनी आपल्या बरोबरच्या विश्वासू लोकांत नागोजी व बहिर्जी फर्जंद यांस नेलें होतें.

चिटणीसकृत 'संभाजी चरित्रांत' हिरोजी फर्जंद, येसाजी फर्जंद आणि सोमाजी फर्जंद या तिघांचे उल्लेख आले आहेत. तसेच पुढें एके ठिकाणीं खंडूजी किंवा कोंडाजी फर्जंद याचाहि एक उल्लेख आला आहे. यापैकीं हिरोजी फर्जंदाची हकीकत अशी–हा हिरोजी फर्जंद लेकवळा घरचाच म्हणून पन्हाळा येथें संभाजीजवळ शिवाजीनें कारभाऱ्यासारखा ठेवला होता. राजारामाला राज्यावर बसविण्याचें कारस्थान होऊन गुतपत्रें पन्हाळ्यास गेलीं. त्या कटांत हा होता. पुढें कट फुटून संभाजीचाच वरचष्मा झाला व त्यानें पन्हाळा स्वतःच्या ताब्यांत घेऊन फितुऱ्यांचीं कठोर पारिपत्यें केलीं, त्या वेळीं हा हिरोजी फर्जंद कांहीं कारखाना, जवाहिर वगैरे घेऊन पळून चिपळूणाकडे गेला. पुढें संभाजीनें तेथूनहि त्यास धरून आणून खजिना घेऊन त्याचें पारिपत्य केलें व त्यास कैदेंत ठेवलें. अखेर संभाजीला राज्याभिषेक झाल्यानंतर बऱ्याच दिवसांनीं पुन्हां एकदां फितुरीनिमित्त देहान्तशासनाचीं उग्र पारिपत्यें संभाजीनें सांगितलीं. त्या वेळीं बाळाजी आवजी, त्याचा पुत्र आवजी बल्लाळ, बंधु शामजी, अण्णाजीपंत सचिव यांस ठार मारविलें. त्याच वेळीं हिरोजी फर्जंदासहि ठार करविलें.

संभाजीनें रायगडावर येऊन बंदोबस्त केला त्या वेळीं येसाजी फर्जंद व सोमाजी फर्जंद यांसच किल्ल्यावरील चौकीपहारा खबरदारीचें काम सांगितलें.

कोण्डाजी फर्जंदानें 'शिद्दयांचा जंजिरा घेऊन देतो' म्हणून संभाजीस सांगून कारस्थान केलें. परंतु तें शिद्दयाला कळून त्यानें (खंडोजी) कोंडाजी फर्जंदाचें डोचकें मारलें.

कुंवर व फर्जंद हे लेकवळ्यांतच जमा धरण्याची प्रथा असल्यामुळें त्यांची तपशीलवार नोंद येथें केली आहे. फर्जंद आणि कुंवर यांच्यांत वास्तविक

कांहीं भेद आहे कीं काय ? त्याचा अद्याप कोठें निस्संदिग्ध खुलासा सांपडलेला नाहीं. कोणी म्हणतात, (फर्जंद म्हणजे मानलेले पुत्र.) पण तसें म्हणावें तर अक्कलकोटकर भोसले (फत्तेसिंग) याला चुकूनहि कोठें फर्जंद हें उपपद लावलेलें आढळत नाहीं.

आतां शिवाजी महाराज. महाराजांना एक नव्हे तर आठ स्त्रिया होत्या, हें आतां सर्वमान्य आहे. परंतु त्यांच्या उपस्त्रिया किंवा नाटकशाळा कोणीच नव्हत्या असेंहि गृहीत धरण्याचाच सर्वसामान्य कल असतो. महाराजांच्या बऱ्याच बखरी आहेत. त्या बहुतेकांत महाराजांच्या नाटकशाळादिकांचा किंवा त्यांच्या अनौरस पुत्रांचा म्हणजे कुंवर, फर्जंद किंवा लेकवळे यांचा चुकूनहि उल्लेख येत नाहीं.

कल्याणच्या मुसलमान सुभेदाराची सून पकडून आणून नजर केल्यानंतर महाराजांनीं त्याबाबत आबाजी सोनदेवाचा धिक्कार केला आणि त्या मुसलमान युवतीचें अपूर्व सौंदर्य पाहून "आमच्या आईसाहेब सुंदर असत्या तर मीहि असाच सुंदर झालों असतों," असे उदात्त रासिकतेचे व महानुभावित्वाचे उद्गार काढले आणि त्या यवनीस चोळीबांगडी देऊन सन्मानानें परत तिच्या घरीं पाठविलें अशी हकीगतहि बखरींत नमूद आहे. ९१ कलमी बखरींत कोणा शकुजी गायकवाड नांवाच्या सरदारानें परद्वारावर नजर ठेविली, याकारितां महाराजांनीं त्याचे डोळे काढविले—अशीहि हकीगत आली आहे. सारांश, महाराज उपस्त्रिया किंवा नाटकशाळा यांच्या शोकापासून सर्वस्वी आलिप्त होते असा निष्कर्ष सामान्यतः निघतो. तथापि, रामदास स्वामींच्या एका बखरींत महाराजांच्या दोन उपस्त्रियांचा उल्लेख असून त्यांचीं नांवेंहि तेथें नमूद केलेलीं आहेत. ज्या विषयाच्या संशोधनार्थ हा शोधनिबंध तयार केला आहे, त्याच्या परिपूर्तीसाठीं तरी त्या बखरींतील उतारा नोंदणें व तत्संबंधीं थोडी चर्चा करणें क्रमप्राप्त आहे.

" श्रींचे चारित्रास पांचवे प्रकरणास प्रारंभ. चतुर्थ प्रकरणाचे अन्तीं श्रीपंढरीस जाऊन, श्रींचें दर्शन करून, श्रीकृष्णातीरीं आल्यानंतर कोणे येके दिवशीं रायगडीं छत्रपती असतां महाराज निद्रास्थानीं त्रिवर्ग राण्या-ज्येष्ठ पत्नी सईबाई साहेब, दुसरी सोयराबाई साहेब तिसरी सगुणाबाई साहेब व उपस्त्रिया लावेरसीं लग्न लाविलेल्या मनोहर व मनसंतोष असे पांचजणें बसले आहेत; गोमान्तकी आंबे आले होते. त्याचे कापे करून त्रिवर्ग राण्यांनीं व उभयतांनीं ताटें भरून पुढें ठेविलीं. महाराजांनीं चित्तांत आणोन बोलिले कीं, हे आंबे बहुत चांगले आहेत. या समयीं स्वामी समर्थ असते तरी समर्पण करून नन्तर प्रसाद घेतो " इत्यादि इत्यादि...

या मजकुराचा आधार घेऊन कै. सर जदुनाथानीं केलेल्या विधानाला खोडून काढताना देवासचे कै. ओक यांनीं अशी माल्लिनाथी केली होती कीं, " महाराजांनीं तत्कालीन कांहीं राष्ट्रीय आपत्तींमुळें या बालिका निराश्रित झालेल्या असतील व तशाच कांहीं अपरिहार्य कारणांमुळें महाराजांस त्यांच्याशीं विवाहसंबंध करण्याचा प्रसंग आला असेल. परंतु अशा निराश्रित मुलींचा देखील महाराजांनीं विवाहविधीवांचून अंगीकार केला नाहीं, ही गोष्ट विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. तीवरून महाराजांची शिस्त व शास्त्रविधिपालनाविषयीं आस्था आणि प्रवृत्ति हीं दिसून येतात. या बालिका लावेरसी म्हणजे निराश्रित होत्या, यामुळें साहजिकच त्यांच्या कुलशीलाविषयीं नक्की माहिती मिळणें केव्हांहि शक्य नव्हतें. चरित्रकारासहि त्यांना मुख्य राण्यांपासून निराळें दाखविण्यास हेंच कारण झालें आणि त्यासाठीं त्यानें, ' उपस्त्रिया ' हा शब्द योजिला. "

कृष्णानें यवनांच्या किंवा शत्रूच्या बंदिशाळेंत असलेल्या हजारों स्त्रियांना बंधमुक्त करून त्यांच्यावर आलेला कलंक, त्यांच्याशीं लग्नें लावून धुवून काढला

आणि मोठीच सामाजिक सुधारणा मोठ्या मनोधैर्यानें घडवून आणली आणि तोच कृष्णाच्या १६१०८ स्त्रियांचा खरा उलगडा होय, असें के. माटे मास्तर प्रतिपादीत असत. त्याच धर्तीचें ओकांचें हें वरील विवेचन आहे.

वास्तविक " कटारेशीं " या मूळ मोडी शब्दांचें चुकीचें 'लविरसी' असें वाचन केल्यामुळें के. ओकांना वरील समर्थनात्मक पांडित्य करावें लागलें आहे.

कट्यारीशीं लग्न लावण्याची प्रथा पूर्वापार आहे. त्याप्रमाणें महाराजांनीं 'मनोहर' व 'मनसंतोष' या दोघां नाटकशाळांशीं लग्नें लावलीं, असाच खरा प्रकार दिसतो. राजांच्या नाटकशाळांचीं नांवें काढून पाहिल्यास तीं मनोहर व मनसंतोषप्रमाणेंच पुष्कळ वेळां काव्यमय असतात, हें सहज दाखवून देतां येईल. अशा कोणा नाटकशाळांशीं राजा लग्न लावतो, तेव्हां त्याचा हेतु त्या नाटकशाळा इतर नाटकशाळांपेक्षां आपल्या अधिक लाडक्या आहेत व त्यांना आपण कांहीं खास उच्च दर्जा देत आहों, असें दाखविण्याचाच असतो.

के. ओकांनीं आपल्या विवेचनांत " उपस्त्री ही कांहीं रूढ शास्त्रविधीनें लग्न लावूनच केलेली असते, म्हणून ती नाटकशाळा नव्हे. तिचा दर्जा नाटकशाळेहून मोठा " असें दाखविलें आहे. आम्हांसहि तें मान्य आहे. तथापि उपस्त्री करावयाची ती नाटकशाळेप्रमाणें केवळ विषयसेवनाच्या हेतूकरितांच, ही गोष्ट शिल्लकच उरते. याला खुद्द शिवाजी महाराजांच्याच शब्दांचा आधार आहे. उदा. –संभाजी हा मनांत भरेल त्या प्रजाजन स्त्रीवर बलात्कार करूं लागला, असा उन्मार्गगामी बनला. तेव्हां महाराजांनीं त्याला जो हितोपदेश केला तो 'चिटणीस-बखरींत' सविस्तर दिला आहे. तो उतारा असाः—

" ते समयीं एकान्तीं बसवून महाराज, संभाजीराजे यास म्हणाले, 'तुम्ही

सद्वश. तुम्हांसाठीं राज्य किती संपादिले ? याचे अधिकारी तुम्ही. सर्व प्रजा हें तुमचें कुटुंब. लेकराचे ठायीं योजावें. राजे लोक तुम्ही. शतावधि स्त्रियांशीं लग्न केलें असतां अथवा शक्तिनुसार शतावधि उपस्त्रिया नाटकशाळा ठेवून केलें असतां युक्त आहे. परंतु अविचारें अगम्य-गमन करणें व परस्त्री बलात्कार हे दोन्ही यशक्षयास कारण ! ''

या उताऱ्यावरून उपस्त्री आणि नाटकशाळा यांत मोठासा फरक नाहीं, हें स्पष्ट होईल. पुराणकाळीं कधीं रामाचें एकपत्नीव्रत असलें तरी तें बहुधा पुराणांतच राहिलें. त्यानन्तरच्या काळांत राजांनीं लग्नाच्या अनेक बायकांबरोबर उपस्त्रिया किंवा नाटकशाळा बाळगणें हें सर्वस्वीं शिष्टसंमत मानलें जात होतें. अलीकडे एकपत्नीव्रताचा जो वडेजाव केला जातो त्याचें मूळ ब्रिटिशांच्या अनुकरणांत आहे. इंग्रज लोकांत राजाला एका वेळीं लग्नाची अशी एकच बायको असावयाची, अशी प्रथा आहे व तोच आदर्श मानून आपण त्या दृष्टिकोनांतून आपल्या ऐतिहासिक पुरुषांची नीतिमत्ता अजमावूं लागलों त्याचाच हा परिणाम होय. हीच आधुनिक दृष्टि लावून पाहिली तर शिवाजी महाराजांना पूर्ण विषयलंपट ठरविणेंहि एखाद्यास कठीण नाहीं. उदा. ९१ कलमी बखरींतील पुढील उतारा पाहा—

"याउपर दक्षणेस सिवापानाईक बिदनूरकर पालेगार त्यास पत्र लिहिलें जे आम्हांस नालबंदी वर्षास देत जाणें, वकील आम्हांकडे पाठविणें. तें राज्य पुरातन जबरदस्त उत्तर पाठविलें जे, 'बल होईल तर नालबंदी घेणें.' हें उत्तर येतांच राजे स्वामींनीं मुहूर्त पाहून रायगडाहून मोहिमेस चालिले. जातेसमयीं पालखी सिद्ध करून स्वार जाले. तेसमयीं राजाराम यांच्या मातुश्रीस ऋतु प्राप्त झाला. हें खबर महालांतून आली. परतून जातां नये. तेव्हां समागमें पालखी सांगातें स्त्रीची घेतली. किल्ले मालवण सिंधुदुर्गपावेतों पालखी स्त्रीची होती. ऋतु देऊन माघारीं रवाना रायेगडास केली. तोच गर्भ राहिला. राजाराम याचा जन्म झाला."

आधुनिक दृष्टि स्वीकारली तर महाराजांना विषयलंपटच म्हणावें लागेल; परंतु वास्तविक तसा प्रकार नाहीं. त्या जुन्या काळीं स्त्रीला ऋतु प्राप्त झाल्या-बरोबर तिला भोग देऊन ऋतुशान्ति करणें हें पवित्र धार्मिक कर्तव्य असेंच समजलें जात असे. आणि म्हणून महाराजांनीं त्या वेळीं केलें तें कर्तव्यपरि-पालनासाठींच होतें. असो.

एकंदरींत निष्कर्ष असा कीं, तत्कालीन राजे लोकांच्या रिवाजाप्रमाणें शिवाजी महाराजांच्याहि एकदोन उपस्त्रिया होत्या. त्या तशा होत्या असें सिद्ध झाल्यानें महाराजांच्या चारित्र्यास कांहीं उणेपणा येतो, असें कोणी समजण्याचें कारण नाहीं.

नंतर त्यांचे उत्पाती चिरंजीव संभाजी महाराज. त्यांचा इतिहास प्रसिद्धच आहे. ते अत्यंत दुर्वर्तनी होते. मनांत भरलेल्या कोणाहि प्रजाजन स्त्रीचा ते बलात्कारानें अपहार कसा करीत, यासंबंधीं रायगडच्या परिसरांत लोककथा आजहि प्रचलित आहेत. Bee कवींच्या 'कमला' काव्याची नायिका 'थोरातांची कमला' ही देखील त्या तशा प्रचलित दंतकथेपैकींच एक स्त्री होय.

चिटणीसकृत बखरींत त्यांच्या अनाचाराचा प्रत्यक्ष एक प्रसंगहि दिला आहे. तो असाः—

संभाजी राजांचें वागणें महाराजांचे मर्जीनुरूप पडेना. बहुता रीतीनें बोध करून, बतबंध करून युवराज्याभिषेक करावेसें मनांत आणलें, परंतु संभाजी महाराजांची मर्जी एकप्रकारची ! कोण्हे एके दिवशीं हळदकुंकू समारंभ, शीतलागौरीयास सर्व सुवासिनी स्त्रिया राजवाड्यांत येणार. त्यांत कोण्ही रूपवान स्त्री आली. तिजला महालांत नेऊन बलात्कार अविचार जाला. हे वृत्त महाराजांसहि समजलें. तेसमयीं बहूत तिरस्कार येऊन बोलले जे, "राज्याचे अधिकारी हे. अगम्यागमन श्रेष्ठ वर्णाचे ठायीं जालें. सर्व प्रजा हें राजाचें

कुटुंब, आप्तसमान हे पुत्र झाले तरी काय करावयाचे ? यांचा त्याग करीन. शिक्षा करीन. '' ऐसें आग्रहे करून बोलले.

अशा उद्दाम विषयी तामसी संभाजीच्या मग नाटकशाळा किंवा रक्षा असतील हें निराळें सांगावयासच नको. त्यांच्या लेकवळ्यांचा किंवा खर्ची संततीचा तपशीलवार आराखडा अद्याप उपलब्ध नाहीं. परंतु 'मदनसिंग' नांवाच्या त्यांच्या एका रक्षापुत्राचें नांव इतिहासांत नमूद आहे.

हा मदनसिंग चांगलाच कर्तबगार व शूर निपजला. शाहू महाराज हे संभाजी राजांचे औरसपुत्र आणि हा मदनसिंग अनौरस पुत्र; परंतु नात्यानें अर्थात् ते दोघे भाऊभाऊच होते. मदनसिंग हा कदाचित् फार रूपसुंदर देखणा असेल आणि म्हणूनच त्याचें नांव मदनसिंग असें ठेवण्यांत आलें असण्याचा संभव आहे. मोंगलानीं रायगड काबीज केल्यावर येसूबाई, शाहू आणि संभाजीच्या इतर नाटकशाळा कैद करून नेल्या. त्यांतच हा मदनसिंग होता. श्री. सरदेसाई सांगतात कीं, 'मदनसिंग व शाहू सख्ख्या भावासारखे वागत. बादशाही आखबारांत मदनसिंगाचा वारंवार उल्लेख येतो. सन १७०९ च्या उन्हाळ्यांत दिल्लीस परत जातेवेळीं बहादूरशहानें नगरांतून शाहूस पोशाख पाठविला आणि मदनसिंगास आपल्याबरोबर उत्तरेंत नेलें. शाहूचें बस्तान बादशहाशीं यथायोग्य राखण्याचें काम त्यानेंच पुष्कळसें केलें. शंकराजी मल्हाराचे व सैयदाचें कारस्थानहि त्यानेंच जमविलें. येसूबाई-बरोबरच तो परत दक्षिणेंत आला. आणि नंतर इकडेच राहिला.'

तारीख ७ जुलै १७३० रोजीं मदनसिंग बाबाचे घरीं त्याच्या बायकोस सणगे दिल्याची नोंद पे. द. भाग. २२ लेखांक ४७ यांत आली आहे.

हा मदनसिंग १० जून १७५५ रोजीं वारला. त्यासंबंधीं पेशव्याला माहिती देणारें एक पत्र अलीकडे सरकारनें प्रसिद्ध केलेल्या "एक्सपॅन्शन ऑफ दी मराठा एम्पायर" या साधनग्रंथांत प्रसिद्ध झालें आहे, तें असें :—

॥ श्री ॥

राजश्री पन्त प्रधान स्वामी गोसावी यासी सकल गुणालंकरण अ. ल. आलंकृत राजमान्य श्रे ॥ रूपसिंग भोसले रामराम विनन्ती उपरी. तीर्थरूप राजश्री मदनसिंगबावा ज्येष्ठ शुध प्रतिपदा भोमवारी कैलासवासी जाले. आपणांस कलावे म्हणून लेखन केलें असें. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

(पत्र नं. १८२)

(पान नं. १७९)

पत्रलेखक मदनसिंगाचा तीर्थरूप म्हणून उल्लेख करतो त्यावरून तो त्याचा पुत्र दिसतो.

मदनसिंगाला १७४९ च्या जानेवारींत गेवराई प्र॥ बीड येथील मोकासा दिल्याची नोंद उपलब्ध आहे.

या मदनसिंगास सभासिंग नांवाचा आणखी एक पुत्र होता व तोहि मोठा शूर असून पदरीं पागा बाळगून होता. एकदां या सभासिंगाच्या पागेवर पेशव्यांचा सरदार आवजी कवडे यानें कांहीं वैमनस्यामुळें छापा घातला व त्यास लुटलें. तेव्हां शाहूमहाराजांना किती संताप आला तें पुढील अस्सल पत्रावरून चांगलें कळून येईल. पत्र बहुधा साताऱ्याहून पुरंदऱ्यांनीं पेशव्यास लिहिलेलें आहे.

॥ श्री ॥

पुरवणी राजश्री राऊ व ता॥ राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. राजश्री आवजी कवडे याणी राजश्री मदनसिंगबावा याचे पुत्र राजश्री सभासिंग भोसले जमावानसी त्या प्रांते होते त्यास लुटून घोडीं वस्तभात्र नेलीं. हे वर्तमान म॥रनिलेनी राजश्री स्वामीस लेहून पाठविले. त्यावरून राजश्री स्वामीनी बहुतसा विस्मय केला कीं आमच्या पुतण्यास लुटन्यास

प्रयोजन काये ? हे वर्तमान तीर्थरूप राजश्री तात्यास विदित आहे. त्यास आवजी कवडे याजकडे राजपत्र व हुजरे पाठविले. आम्हाजवळी एक जासूद व पत्र मागितले ते आम्हीं लेहून दिल्हे आणि जासूद दिल्हा. राजश्री स्वामींनीं हुजरेयास जबानी सांगितलें कीं, आवजी कवडे यास राजपत्र नेवून देणें. हुकूमाप्रमाणें घोडीं वस्तभाव सोडिली तर बरें नाहीं तर उठोन येणें. आम्हास कलल तैसीं घोडीं वस्तभाव आवजी कवाडियापासून घेऊन. यैसे रागें भरोन भाषण केलें. स्वामीस वर्तमान कलावे याकारितां लिहिलें असे. स्वामींनीं राजश्री आवजी कवडे यांजकडे पत्र मुजरद जासुदासमागमें पाठवून रा. सभासिंग भोसले याची घोडी कलवस्तभाव देणें म्हणून स्वामींनीं त्यास बरे खोलून लेहून देणें.

(पे. द. भाग १७, पृ. ८०, पत्र नं. १०३)

शिवाजी महाराजांचे कनिष्ठ पुत्र आणि संभाजी महाराजांचे बंधू राजाराम महाराज यांच्याहि पुष्कळ उपस्त्रिया होत्या. त्यांपैकीं सगुणाबाईंचा पुत्र राजा कर्ण हा प्रसिद्ध आहे. चिटणीसकृत बखरींत म्हटलें आहे.

"यानंतर चंदीस गेलियावरी तेथें नाटकशाळा सगुणाबाई इजला पुत्र बहुत चांगला जाला. तो बहुत चांगला, सुरतपाक जाला. त्याजवर महाराजांची बहुत प्रीती जाली. त्याचें नांव राजा कर्ण ऐसे ठेऊन त्याजला इतमाम ५००० फौजेचा सरंजाम सरदारी ऐसे करून त्याचा कारभार दिवाणगिरी निलो बल्लाळ चिटणीस यास दिली" (राजाराम चरित्र बखर पृष्ठ ३६–३७)

या राजा कर्णाची बहीण परगणे वाईचे देशमुख सूर्याजी पिसाळ यांनीं आपल्या पुत्रास करवून घेतली. म्हणून राजारामानें वाईच्या देशमुखीचें निम्में वतन थोडासा अन्यायच करून सूर्याजी पिसाळाला बहाल केलें! तो अन्यायच होता, कारण पुढें १७०४ सालीं परशुराम त्रिंबक प्रतिनिधीकडे दत्ताजी केशव पिसाळ देशमुखांनीं वतनाचा वाद नेला. तेव्हां सूर्याजी पिसाळाचें

वतन रद्द करून सारे देशमुखीचें वतन, मानपान, शिक्का—नांगर व वडील-पण पूर्वापरप्रमाणें दत्ताजीकडे कायम केले व सूर्याजी पिसाळानें राजारामा-कडून चंदीचे मुक्कामीं करवून घेतलेली व नंतर स्वदेशीं आल्यावर, तत्संबंधीं सरकारकुनांचीं घेतलेलीं सर्व पत्रें रद्द केलीं.

राजपुरुषांचे अनौरस पुत्र त्यांचे लाडके असले तरी त्यांना समाजांत प्रतिष्ठा नसे, व खानदान लोक अशा कडू संततीशीं सोयरीक करण्यास नाखूष असत. तथापि सत्तेच्या व पैशाच्या बळावर सत्ताधीश लोक आपला हेतु सफल करवून घेण्याची आटापीट करीतच. यासंबंधींचें एक प्रसिद्ध उदाहरण चंद्रसेन जाधवाचें आहे. त्यांत मौज एवढीच कीं जी गोष्ट राजारामानें स्वतः आग्रहानें केली तीच त्याचाच पुत्र कोल्हापुरचा संभाजी छत्रपती यानें निग्रहानें नाकारली. त्याचा प्रकार असा :—

शाहूमहाराजांचें व कोल्हापूरकर संभाजीचें द्वैत पडलें, त्या वेळीं संभाजी निजामाला सामील झाला. निजामाच्या पदरीं चंद्रसेन जाधव गेला होता तोहि त्या कूटांत मिळाला. त्या वेळीं चंद्रसेन जाधवानें कोल्हापूरकर संभाजीला असा आग्रह चालविला कीं, माझ्या नाटकशाळेचा पुत्र आहे, तो मला फार प्रिय आहे. त्याचें लग्न मला करून देणें आहे—करितां त्याला तुम्ही ताटांत घेऊन गोतपत करावी. म्हणजे कुळवान मराठे लोकांत त्याची सोयरीक करून देतां येईल. पण ही गोष्ट संभाजी छत्रपतीनें दरवेळीं झिडकारली. शेवटीं चंद्र-सेनानें संभाजीला दमहि देऊन पाहिला कीं, "तुम्हाला शाहूच्या दौलतीतला निम्मा वाटा मिळावा म्हणून आम्ही राजकारण करवून निजामाशीं तुमची दोस्ती केली. हें तुम्ही विसरलां. हें आमचें न ऐकल्यास तुमच्या राजकारणांतून आम्ही व निजाम बाहेर पडून तुम्हांस जख देतो." पण तरीहि संभाजीनें ऐकलें नाहीं !

या संबंधांत उत्तर पेशवाईतील सर्जेराव घाडग्याचें उदाहरणहि लक्षांत

ठेवण्यासारखें आहे. घाडग्याचें कूळ अतिपुरातन खानदान. परंतु त्यानें दौलतराव शिंद्याच्या दिवाणगिरीच्या लोभानें आपली मुलगी त्यास दिली. खुद्द कोल्हापूरकर छत्रपतींसहि ही गोष्ट पसंत नव्हती. व त्यांनीं बायजाबाईला सामानगडाकडे कांहीं दिवस पळवूनहि नेली होती. कारण हलक्या कुळीशीं घाडगे कुळीचा शरीरसंबंध व्हावा असें त्यांस वाटत नव्हतें.

यानंतरचे सुप्रसिद्ध शाहूमहाराज. त्यांचा ऐषआराम, ख्यालीखुशाली आणि बायकांचा शौक सुप्रसिद्धच आहे. मोगली बादशाही पद्धतीवर गोषे किंवा जनानखाने ठेवून, स्वतंत्र अधिकारी नेमून, त्यांचीं खातीं निर्माण करण्याचा पायंडा त्यांनींच पाडला. मोंगल बादशाहांच्या जनानखान्यावरचे अधिकारी सगळे खोजे म्हणजे खच्ची केलेले ठेवीत. हेतु अर्थातच स्पष्ट आहे! मराठशाहींतील राजांच्या किंवा सरदारांच्या जनानखान्यांत असे खच्ची केलेले खोजेच नियमानें ठेवीत होतेसें मात्र वाटत नाहीं. नाहीं म्हणावयास शाहूच्या जनानखान्याचा सर्वाधिकारी बसवंतराव म्हणून होता, तो तेवढा खोजा होता. परंतु तो मूळचा खोजा कांहीं नव्हे. मग तो खोजा म्हणजे खच्ची केलेला कंचुकी कसा झाला? त्याची हकिगत मोठी चमत्कारिक आहे. शेडगांवकर बखरींत ती आली आहे. ती अशीः—

मोगलांच्या कैदेंत असतां बादशहानें शाहूचें लग्न केलें त्या वेळीं शाहूच्या सासऱ्याकडून विरूबाई ही दासी आंदण म्हणून त्याला मिळाली होती. शाहूची लग्नाची बायको तत्कालीन सामाजिक परिस्थितीप्रमाणें लहान अर्भकच होती. अर्थात् विरूबाई शाहूला विषयसेवनासाठीं भोगस्त्री म्हणून उपयुक्त ठरली. पहिलें चुंबन—पहिलें अपत्य— पहिलें फूल. पहिला बार सारांश, जें कांहीं पहिलें असेल त्याची गोडी किंवा अपूर्वाई कांहीं विशेषच असते म्हणून म्हणा, विरूबाईवर शाहूची नितान्त प्रीति जडली. इतकी कीं, ती रक्षा असतां वडील राणीहूनहि अधिक मान तो तिला देई.

ही विरूबाई जातीची वाणीण होती व बसवंतराव कासुर्डे हाहि जातीचा वंशवाणी (वैश्यवाणी) होता. आणि यामुळें ' जातीअभिमान येकमेकांचा वागवीत होती व येकमेकांस बहीण-भाऊ असें म्हणत होती. '

सन १७१४ सालचा पुढील प्रसंग आहे. विरूबाईनें शाहू महाराजांस अर्ज केला कीं, ' मी समुद्रस्नानास जाऊन येतें. ' त्यावर त्यांनीं अर्थातच " उत्तम " असें म्हटलें, आणि लगेच बसवंतराव कासुर्डे यास समक्ष आज्ञा केली कीं, " मर्जीबरोबर तुम्हांस चाकरीस नेमलें आहे. " विरूबाई गुहागरास समुद्रस्नानास जाऊन येणार होती. बसवंतराव कासुर्डे यास विरूबाईला संभाळून आणण्याचें जोखीम फारच अवघड वाटलें. अहो-रात्र तिच्या संनिध राहून डोळ्यांत तेल घालून तिला जपलें पाहिजे. आपणास तिच्याशेजारींच निजावें लागेल. कर्तव्य म्हणून तें केलेंच पाहिजे. पण त्याचा अनर्थ करून कोणी महाराजांस काय समजावतील कोणास ठाऊक ! आपल्यावर एखादी बलाय येईल. आपली हुरमत कशी वाचेल ? असा त्याला मोठा हृद्रोग उत्पन्न झाला. शेवटीं—" स्वामीआज्ञा प्रमाण मानून मग बसवंत-राव यांणीं आपले हातानें...चाकूनें उतरोन एका डब्यांत घालून शाहू महा-राज छत्रपती यास येऊन अर्ज केला कीं मी सरकारचाकरीवर जाणार. माझी जिनस आपले जामदारखान्यांत ठेवावी. मी कामगिरी करून आल्यावर माझी वस्त मजला द्यावी. नंतर शाहुमहाराज छत्रपति यांणीं विरूबाईची व बसवंतराव कासुरडे यांची रवानगी करून दिल्वी. त्याजबरोबर लोक, लोकपाळ व हत्ती व घोडे, फरासखाना वगैरे सरंजाम देऊन रवानगी करून दिल्ही. नंतर जेथें मुकामास (येत तेथें) विरूबाई व बसवंतराव हे येका पलंगावर निजत होते. तेव्हां मजल दरमजल गोहागरास दाखल जाहाले. तेथें समुद्रस्नान करून दान-धर्म उदंड ब्राह्मणास केला. नंतर माघारे मुकाम क्षेत्र चिपळुण तेथें परशरामाचें दर्शन करून व भार्गवरामबावा महान साधु याचें दर्शन घेऊन विरूबाई बहुत

संतोष जाहाली. तेथें द्रव्य उदंड ब्राह्मणांस दान दक्षणा खर्च केले. मग तेथून निघोन परत चालली. दररोज मुकामी उभयता यका पलंगावर निजत होती. असीया रीतीनें सातारा येथें दाखल जाहाली. तो शाहुमहाराज छत्रपति यास समागमे लोक गेले होते त्याणी येकांती जाहाला मजकूर उभयेताची खबर दिल्ही. त्याजवरून महाराज यास सौंषय येऊन उगेच राहिले. तो दुसरे दिवशीं बसवंतराव कासुरडे राज्यदर्शणास आले आणि शाहुमहाराज छत्रपती यास अर्ज केला कीं, मी जामदारखान्यांत डबा ठेवावयास दिल्हा तो स्वामींनीं समक्ष पाहून घ्यावा. मग जामदारखान्यांतून डबा आणून त्या डब्यांत पाहातात तों...वाळून लाकडासारखें असें सर्व मंडळींनीं पाहिलें. तेव्हां महाराज छत्रपती यांचा संषय दूर जाहाला आणि मनांत आणिलें कीं हा इमानी चाकर! बसवंतराव आपा कासुरडे, खोज्या होण्याचें कारण हेंच! त्या दिवसापासून खाशा महालाकडे खोजे यास दरख देऊन त्याची नेमणूक केली.''

बसवंतराव कासुरड्यासारखा अद्वितीय कंचुकी त्याच्यासारखा तोच तेवढा झाला असावा. बाकी शाहूचे इतर कंचुकी तसेच सोवळे राहिले असतील असें शक्य नाहीं. राजांच्या बंदोबस्तानें ठेवलेल्या गोषांतील राणीवशांत किंवा झनान्यांत जितकीं अनैतिक कूटकारस्थानें खेळविलीं जातात तितकीं प्रत्यक्ष राजदरबारांतील कारभान्यांच्या खलबतखान्यांतहि खेळविलीं जात नसतील! कादंबरीकारांना तर गोषांतील सुंदर स्त्रियांचा विषय हा आपल्या कादंबऱ्या रहस्यमय करण्यासाठीं किती पसंत वाटतो तें पुराणकाळापासूनच्या गोष्टी–कथांपासून तों अद्ययावतच्या कादंबऱ्यापर्यंत अनुभवास येतें. आणि जनान्यांत तसलीं कारस्थानें खेळण्यास मोठीच सवड असते. मुख्य कारण हें कीं, मनुष्य-प्राणी हा पशुपक्ष्यांपेक्षां जास्त बुद्धिमान आणि तेवढ्याच प्रमाणांत जास्त हरामखोर असतो! म्हणजे असें कीं, पशुपक्ष्यांच्या कळपांत एकेका कळपाचा

नायक ठरला म्हणजे मग दुसरा त्या त्या जातीचा कोणी नर त्या नायकाच्या माद्यांच्या चुकूनहि वाटेस जात नाहीं. कोंबड्यांच्या कळपांत तर हें हरघडी हमेशा पाहातां येतें. पशुपक्षी हे एखादा संकेत एकदां ठरला म्हणजे मग तो विश्वासानें पाळतात. तसेंच, ते पशुपक्षी निसर्गाचीं नियंत्रणें बिनबोभाट मान्य करीत असतात. त्यांचा मानसिक पिंड हा मनुष्याच्या मानसिक पिंडाच्या मानानें अपरिपक्व असतो आणि त्यामुळें त्यांच्या विषयादि विकारांचें प्रकटन त्यांच्या शरीरधर्मानुसार होत असतें व म्हणूनच तें संयमित असतें. मदाचा, वाफेचा, माजाचा, कलुलीचा विशिष्ट काळ संपल्यानंतर ते ते पशुपक्षी पुन्हा अगदीं निरुपद्रवी होऊन वागतात. याउलट मानवप्राणी असतो. त्याच्या शरीराला निसर्गबंधनें असतात व तीं निसर्गानुरूप ठराविक कालांतरानें उचळतात व मावळतातहि; परंतु त्याच्या मानसिक शक्ति तीव्र असल्यामुळेंच तो निसर्गाला गुंडाळून ठेवतो आणि म्हणूनच जगांतील साऱ्या स्त्री–विषयक भानगडी निर्माण होतात.

प्रस्तुत शाहुमहाराजांच्या जनानखान्याबाबत तसलाच एक विचित्र अनुभव नमूद आहे. म्हणजे असें कीं, ज्याला विश्वासानें शाहुमहाराजांनीं आपल्या नाटकशाळेच्या रखवालीस नेमलें त्यानेंच, " तळें राखील तो पाणी चाखील " असा किंवा 'कुंपणानेंच शेत खावें' असा कटु अनुभव आणून दिला. त्याचा प्रकार असा—जुन्नर प्रान्तीं चांदक व मुंडलें या दोन गांवीं भिलारे पाटलांची फार पुरातन वस्ती. त्या घराण्यांतील अनेक लोक मोठे कर्तबगार व शूर निपजले. सुप्रसिद्ध वसई मोहिमेंत तर शेवटच्या एका हल्ल्यांत बाजी भिलारे व त्याचे पांच भाऊ ठार झाल्याचें उदाहरण इतिहासवाचकांस स्मरत असेलच. या घराण्यांतील अनेक लोक शिपाईपेशानें शाहूमहाराजांच्या पदरीं होते. यापैकीं संताजी व चंद्रोजी म्हणून दोघे भाऊ शाहूचे फार आवडते होते. संताजीला कळंब गांव संमत हवेलीचा

मुकासा दिलेला होता तर चंद्रोजीस चांदकचा वसूल दिला जाई. शाहुमहाराजांची " यमना " या नांवाची एक गुप्त रक्षा होती. शाहुमहाराजांचे प्रकट जनानखान्यांप्रमाणें अनेक गुप्त जनानेहि असत! तशी साक्ष चिटसीसांनींहि दिली आहे. उदा. " याप्रमाणें ५–६ वर्षें उदासवृत्ती जाली. नंतर नाटकशाला वगैरे जनाना राखणें. बहुत गुप्तरूपें मर्यादेनें. त्यांत लखमोजी व बसंवतराव खोजे म्हणून दोघे त्याजवर विश्वास "

यमना नायकिणीस गुप्तरूपें ठेवली होती व तिच्या रखवालीस वरील भावांपैकीं चंद्रोजीस ठेवण्यांत आलें होतें. पण योग असा कीं, त्या चंद्रोजीचें व यमनाचें सूत जमलें आणि चंद्रोजीनें खाशाच्या प्रीतिपात्राशीं समागम करण्याचा अतिक्रम केला! त्याचा पुढें बोभाटा झाला आणि फत्तेसिंग भोसले याचेबरोबर चंद्रोजी स्वारीस जात असतां बालेघाटीं रात्रीं डेऱ्यांत मारेकऱ्यांनीं त्यास मारला!! अशा भानगडी बहुधा सर्वच राजांच्या जनान्यांत घडत. पेशवाईत राघोबादादांच्या एका नाटकशाळेबाबत घडलेला असलाच एक प्रकार खऱ्यांच्या ऐतिहासिक ले. सं. त आलेला आहे. असो.

शाहुमहाराजांनीं बादशाही धर्तीवर जनानखान्याचें एक स्वतंत्र खातेंच बनविलें होतें. त्यांनीं निरनिराळ्या प्रान्तांतील अंमलदारांकडून सुंदर, जातवान पोरी मागविल्याचीं पुष्कळ पत्रें उपलब्ध आहेत. खंडोजी माणकरावाकडे अशा पोरीबाबत मागणी झाली तेव्हां त्यानें शोध करून कळविलें कीं, " कुणबी माणूस. काळे रीस. देखणें नव्हे. पाहातां वीट येतो. शिवाय द्यावयास कोणी कबूल होत नाहीं. "

अखेरच्या दिवसांत शाहुमहाराज पुत्र नाहीं म्हणून ते फार उदास झाले होते. सकवारबाई कजाग, आवडती राणी सगुणाबाई ती सदा आजारी, विरूबाई

आधींच वारलेली, यामुळें ते घरीं न राहतां शिकारींतच वेळ घालवीत आणि बाकीचा वेळ नाटक-शाळांच्या करमणुकींत कंठीत. त्यांनीं मराठ्यांच्या सुस्वरूप मुली पाहून, विकत घेऊन त्यांचा एक मोठाच नाटकशाळांचा कारखाना बनविला होता. त्यांत मोगलाई पद्धतीवर चौकीदार व खोजे नेमलेले असत. गुणीजनांचाहि शाहुमहाराजांना शौक असे. त्यांनीं आपली मानीव मुलगी गजराबाई हिच्या लग्नाचा टोलेजंग समारंभ केला त्या वेळीं दहा दहा वीस वीस हजार रुपये देऊन गुणीजन आणविले होते.

शाहुमहाराजांच्या रक्षापुत्रांनीं मात्र म्हणण्यासारखी कोंठलीच कामगिरी केलेली दिसत नाहीं. त्यांना दोन औरस पुत्र झाले होते. परंतु ते अल्पवयांतच दोन-तीन वर्षांचे होऊन वारले. औरस मुली देखील दोन होत्या. गजराबाई व राजसबाई. परंतु त्या वारशाच्या दृष्टीनें फुकटच होत्या. त्यांची अनौरस संतती हीच काय ती त्यांची प्रजा. ती पुष्कळच असावी. तथापि ऐतिहासिक कागदपत्रांत नमूद झालेल्या व्यक्ती म्हणजे दोन मुलगे—कुसाजी व येसाजी. आणि तीन मुली— लक्ष्मीबाई, गुणवंताबाई आणि संतुबाई. शाहुमहाराजांच्या या दोन अनौरस पुत्रांना—येसाजी व कुसाजीला—त्यांनीं शिरोळचा सुभा व निम्मे कर्नाटकचे महाल दिले होते. शाहुदप्तरांत त्या दोघांना दिलेल्या मुलुखासंबंधीं कांहीं नोंदी सांपडतात, त्या अशा :—

(१) सरंजाम पेशजीपासून रा. कुसाजी व येसाजी भोसले यांजकडे आहे. त्याप्रमाणें करार आहे, त्यांचे तर्फेनें रा. तुकोजी गुजर फौजेनसी पाठविले आहेत. तुम्ही यासी रुजुवात वर्तोन स्वामिकार्य करीत जाणें. मुकासबाबेचा वसूल याकडे देणें.

पालेगार व पाली (!)

पाली

१ गुडगुटे लिंगसजया.

१ चंदनकेर वासुदेव नाईक.

१ आबाजी सोमणा.

१ गदवार १ पा।। तेरेकिरे.

सिताराम नाईक.

पालेगार

१ पा।। कनकगिरी १ पा।। अनेगोंदी १ पा।। हरपनहली

१ पा।। गुडीकोटे १ पा।।रायदुर्ग १ पा।। चित्रदुर्ग

१ पा।। बल्लारी १ पा।। ह्चीमलयाची १ पा।। पावगड

१ पा।। रत्नागिरी १ चिकबाळापूर. =१२.

(२) [२९–८–१७२६]

राजमंडळ

माहे मोहरम सु।। सबा (अशरीन) तेरीख १२ रोज भाद्रपद शु।। त्रयोदसी इंदुवार.

कित्तापत्रें देशमुख व देशपांडिये माहालानिहाये यांस जे.

रा. कुसाजी व येसाजी भोसले यास प्रा।। मजकुरी मुकासे आहेत तेथें प्रा।। सालमजकुरी करार केले आहेत. तरी तुम्ही यासी रुजू होऊन प्रा।। मजकूरचे मुकासबाबेचा ऐवज वसूल देणें. पत्रे.

१ महालनिहाये प्रा।। पनाला.

१ प्रा।। मिरज

१ प्रा।। मलकापूर

१ प्रा।। तारले

१ प्रा।। कोलापूर

१ प्रा।। आजिरे

६ छ १४ रोजी सिके जाले.

१७३८ सालीं शाहुमहाराज स्वत: स्वारीस बाहेर निघाले होते. उंब्रजेवर तळ ठोकून आपल्या सरदाराकरवी ते तेथून स्वाऱ्या शिकाऱ्या करीत. त्याच वेळीं मिरजेच्या किल्ल्याला वेढा देण्यांत आला होता. त्या वेढ्यांत कुसाजी भोसल्यानें जातीनें पराक्रम केल्याची एकुलती एक नोंद सापडते ती अशी :—

राजमंडळ १९-१०-१७३८

माहे रजब सुरू तिसा तारीख छ. १६ रोज मु।। जेजुरी.

रा. नारोराममंत्री यास जाब.

" जाब. मिरजेचा शाहारकोट घेऊन मुख्य कोटास मोर्चे चालविले होते परंतु सर्वांचे विचारे गुंतोन राहोन सार्थक नाहीं म्हणून मोर्चे कादिले म्हणून. तर तुम्ही जे कराल ते विचारेच्च कराल. कुसाजी भोसला याणी अंगेजणी बरी केली म्हणऊन लिहिलेंवरून संतोष जाहाला वगैरे वगैरे. "

शाहुमहाराजांचे हे दोन्ही पुत्र पूर्णपणें व्यसनाधीन असत. कुसाजीच्या लग्नाचा एक उल्लेख पे. द. भा. ९ मध्यें आला आहे तो असा :—

॥ श्री ॥

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी विनंती उपरि राजश्री कुसाजी भोसले याचें लग्न राजश्री स्वामी करितातो. आजीपासून चौथे दिवशी लग्नाचा निश्चये केला आहे. त्यास आहेर वरकड सरकारांतून कारितील. स्वामीचे निसबतीनें आहेर जाला पाहिजे. तरी सनगे पाठवून दिल्हीं पाहिजे. त्याप्रमाणें आहेर करून विदित झालें पाहिजे. (पत्र नं. ५५)

येसाजी भोसल्याच्या गैरवर्तनाबद्दल पे. द. भा. ८ मध्यें पुढीलप्रमाणें वर्णनात्मक असें पेशव्यांस लिहिलेलें पत्र सांपडते, तें असें :—

॥ श्री ॥

पु॥ तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनन्ती. येसाजी भोसले यास आणावयास लखमोजी व लिंगोजी राजश्रींनीं पाठविले होते. दादा येत नव्हतेच. हमेश तीन्ही भस्या सडक चुवत असतात. (?) तथापि यांनीं बहुत प्रयत्नें करून आणले. दादाचा व प्रातिनिधीचा कलहे आहेच. याजकरितां येसूदादांनीं से पन्नास राऊत शंभर प्यादा हत्तीवर निशाण या प्रकारें प्रतिनिधीच्या घरावरून वाकडी वाट दाटून करून सदरेस आले. राजश्रीचे दर्शना जाहाले. येसूदादाचा तमासा सदरेस बहुत होत असतो. कांहीं ताळ नाहीं. इतकेहि राजश्री सोसतात. काय आहे भगवान जाणें. असो. उगेच वर्तमान हेहि सेवेसी लिहिलें आहे हें विज्ञापना.

(पत्र नं. ४७) (पे. द. ८ शाहु खाजगी)

शाहुमहाराजांची विरूबाई नांवाची नाटकशाळा होती हें वर उल्लेखिलें आहेच. त्याचप्रमाणें त्यांच्या आणखीहि दोन इतिहासप्रसिद्ध अशा रक्षा होत्या. पैकीं एक, लक्ष्मीबाई आणि दुसरी धाकली सखू, शाहुमहाराजांबरोबर सकवारबाई व नाटकशाळा लक्ष्मीबाई या दोघींनीं अग्निप्रवेश केला. असेंच तिसरे दिवशीं धाकली सखूहि सती गेली [इतिहाससंग्रह पे. दप्तरांतील सनदापत्रांतील माहिती पान २.]

शाहुमहाराजांच्या नन्तरचे छत्रपति हे पेशव्यांचे जवळ जवळ बंदिवानच झाले. म्हणूनच त्यांच्या पुढच्या दोन-तीन पिढ्यांतील पुरुषांच्या हकिगतीला फारसें महत्त्व नाहीं, तथापि या विषयापुरती त्यांचीहि माहिती नमूद करूं.

शाहुमहाराजांनन्तर रामराजे छत्रपति झाले. ते गादीवर आले तेव्हांच तीस वर्षांचे होते. आणि त्यांचें तेव्हांपर्यंतचें आयुष्य हें सर्व अज्ञातवासांत

सामान्य मराठ्यांसारखेंच गेलें. त्यामुळें श्रीमंती ढंगांचा परिचय त्यांना फारसा नसावा. त्यांनीं पुष्कळच वर्षें पुढें राज्य केलें. त्यांचीं २।३ लग्नेंहि झालीं. तथापि त्यांच्या कोणी नाटकशाळादिक असल्याचा उल्लेख चिटणीसकृत चरित्र-बखरींत आढळत नाहीं.

रामराजानंतर दुसरे शाहुमहाराज गादीवर आले. त्यांच्या २।४ चाकरीच्या बायका व २।४ लेकवळे होते, असा उल्लेख सांपडतो. परंतु नांवांचा किंवा इतर तपशील आढळत नाहीं.

(या दुसऱ्या) शाहुमहाराजांच्यानंतर छत्रपती झाले ते म्हणजे सुप्रसिद्ध प्रतापसिंह व त्यांचे बंधू शहाजी महाराज. लग्नाच्या बायकांखेरीज प्रताप-सिंहाच्या खासेचाकरीच्या स्त्रिया बऱ्याच होत्या. अशा स्त्रियांचा ' मर्जी ' असा उल्लेख करण्याची वहिवाट दिसते. उदा. " अमीनाबाई मर्जी खर्चें यास मेहेजत बांधून दिली. खर्च रु. ४०००० " अशा कांहीं कांहीं नोंदी सांपडतात. एक नोंद विठू भोसला डाळिंबीचा यास १००० रु. दिल्याची आढळते. त्यावरून कदाचित् हा त्यांच्या डाळिंबी नांवाच्या रक्षेचा पुत्र असावा.

" मर्जी " म्हणजे दासी. हा अर्थ स्पष्ट करणारी हकिगत मागें (पहिल्या) शाहुमहाराजांची रक्षा विरूबाई हिच्या समुद्रस्नानाविषयींच्या उल्लेखांत आली आहे.

शहाजीमहाराजांच्या एका रक्षेचा उल्लेख सांपडतो तो असा :—" भागा-बाई मर्जी खर्चें इजला जडजवाहिराचे दागिने व कापड वगैरे हरजिन्नस एक लाख रुपयाची जिनगी बक्षीस दिल्ही. "

असो. येथवर छत्रपतींच्या उपस्त्रियांची व त्यांच्या अनौरस वंशजांची माहिती एकत्र केली. आतां नांवानें नसले तरी कर्तृत्वानें जे छत्रपतीच बनले,

त्या पेशवे वंशांतील पुरुषांसंबंधीं याविषयीं काय माहिती उपलब्ध होते, ती पाहूं.

आद्यपेशवे बाळाजी विश्वनाथ ऊर्फ थोरले नाना यांना लग्नाची एकच स्त्री राधाबाई नांवाची होती. आणि तिच्याच पोटीं "रत्नदीप झळझळीत केवळ कुळांत पाजळले" असे बाजीरावसाहेब आणि चिमाजी अप्पासाहेब हे पुत्र झाले हें सर्वश्रुत आहे. तथापि बाळाजी विश्वनाथांच्या कांहीं नाटकशाळा किंवा खासेचाकरीच्या स्त्रियाहि असाव्यात, ही गोष्ट मात्र बहुंशी अज्ञातच होती. पण अलीकडे उपलब्ध झालेल्या साधनांत तिला पुरावा सांपडतो. त्यांच्या नाटकशाळेचें नांवगांव काय होतें, तें सांपडत नाहीं. परंतु तिच्यापासून झालेल्या पुत्राचें नांव सांपडतें. त्याचें नांव भिकाजी शिंदे असें होतें. 'भिकाजी" हें त्याचें स्वतःचें नांव आणि साऱ्या अनौरस लेकवळ्यांचें "शिंदे" असें एकच आडनांव असतें, म्हणून त्याला 'भिकाजी शिंदे' नांव लागलें. असल्या खर्ची किंवा कडू संततीस पुष्कळ वेळां तिच्या आईचें आडनांव असेल, तेंच जोडलें जातें. परंतु सर्वसामान्यतः 'शिंदे' हेंच त्यांचें आडनांव !

एक गोष्ट मात्र लक्ष्यांत ठेवली पाहिजे कीं, जुन्या काळीं असल्या अनौरस लेकवळ्यांना तुच्छ समजून त्यांना वाऱ्यावर सोडून देण्यांत येत नसे, तर उलट घरच्या कुटुंबीयांतच त्यांची गणना करून आपल्या ऐपतीप्रमाणें त्यांचा यथायोग्य परामर्श घेतला जाई. सामान्य सधन कुटुंबांतूनहि ही प्रथा होती, तर राजेलोकांच्या घरांतून असल्या संततीचा परामर्श किती चांगल्या तऱ्हेनें घेतला जात असेल, तें सांगणें नको ! यापूर्वीं सभासिंग, राजा कर्ण आणि येसाजी व कुसाजी यांची दिलेली हकिगत वाचकांच्या लक्ष्यांत असेलच.

असो. बाळाजी विश्वनाथाचा हा अनौरस पुत्र भिकाजी शिंदे, बापाप्रमाणेंच शूर व पराक्रमी निपजला. थोरल्या बाजीरावांच्या अनेक स्वाऱ्या–

शिकाऱ्यांत तो जातीनें हजर असे. त्याच्याकडे एका खास पागेचेंहि आधिपत्य होतें.

१० डिसेंबर १७२९ सालची पेशवे रोजकीर्दीतील ही नोंद पाहा.

" छ २० जमादिलाखर.

१ घोडा सिंगा–कुमैत ब॥ नजर फत्तेसिंग राजा हरगड येथील भेटीचा देणें. पागा दिम्मत ' **भिकाजी शिंदे** ' याजकडे दिल्हा.

या नोंदीचा अर्थ असा कीं, हरगड येथील फत्तेसिंग नामक राजाकडून बाजीरावाला नजर म्हणून घोडे आले. त्यापैकीं एक कुमैत जातीचा सिंगा घोडा बाजीरावानें भिकाजी शिंद्याला बक्षीस दिला.

(पे. द. भाग २२, पृ. २१).

भिकाजीनें ग्वाल्हेर येथून भावाला म्हणजे बाजीराव पेशव्याला लिहिलेलें एक पत्रहि उपलब्ध आहे, तें असें :—

" श्रीमंत तीर्थस्वरूप राजश्री पन्तप्रधान स्वामीचे शेवेसी.

अपत्ये भिकाजी सिंदे दंडवत विनंती. येथील वर्तमान ता॥ छ १५ रमजान मु॥ लष्कर किल्ले ग्वाल्हेर यथास्थित असे विशेष स्वामीचे आज्ञापत्र छ ८ साबानीचें आलें. पावोन बहुत समाधान झालें. आमचें वर्तमान तर आज्ञेप्रमाणें सेवा करून सुखरूप आहों. वरकड इकडील वृत्त रा॥ बाजी भिमराव यांणीं शेवेसी लिहिलें आहे. त्यांवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विनंती " (पे. द. भाग ३०, पृष्ठ १२३, प. नं. १५५)

लेकवळा असल्यामुळें भिकाजी नमस्काराऐवजीं दंडवत असें लिहितो. त्याची आई मराठा जातीची असावीसें दिसतें.

बाळाजी विश्वनाथांनीं स्वतःच्या कारकीर्दीतच मौजे हिंगणगांव हा कमाल-बेरीज रुपये १५३९॥ आकाराचा भिकाजीच्या पागेच्या सरंजामासाठीं लावून

दिलेला होता. पुढील इतर पेशव्यांनींहि तो तसाच निर्वेध चालविला. १८०३ च्या पुण्यावरील होळकराच्या स्वारीनंतर दु. बाजीरावानें मात्र तो जप्त केला. अव्वल इंग्रजींतील कंपनी सरकारचा अधिकारी लिहितो :—

" शिंदे मजकूर हे सरकारचे लेकवळे. सबब त्यास दिला होता. त्यांत मोकासा अम्मल वगैरे कांहीं एक नव्हतें. हल्लीं वहिवाट सरकारांत चालली आहे. "

या भिकाजी शिंद्याचा वंशजांचा तपास लागल्यास बरें होईल.

थोरल्या बाजीरावांचा मस्तानीवंश सुप्रसिद्ध आहे. बाजीराव–मस्तानी यांच्या मस्त प्रणयकाव्यानें रसग्रहण स्वतंत्र लेखांतच करण्याच्या योग्यतेचें आहे. आज येथें रुक्ष इतिहाससंशोधन पद्धति अवलंबून काय काय नवीन माहिती मिळते, ती मिळवून, एकत्र करून टांचावयाची आहे. बाजीरावाच्या मृत्यूनंतर मस्तानीहि थोड्याच दिवसांत वारली. शनिवारवाड्यांतच ईशान्य टोकास बाजीरावानें स्वतंत्र " मस्तानी महाल " बांधून दिला होता. तिकडे तटास स्वतंत्र दरवाजा केला होता व त्यास 'मस्तानी दरवाजा' म्हणत. बाजीरावानें मस्तानीच्या कुटुंबासाठीं पाबळ व लोणी हीं दोन गावें इनाम करून दिलीं होती. तेथें त्यांचा स्वतंत्र वाडाहि होता, वगैरे गोष्टी सर्वांस परिचित आहेत. असें गृहीत धरून मस्तानीच्या वंशाची हकिगत नव्या माहितीची भर घालून देतों.

बाजीरावसाहेबांचा व मस्तानीचा सहवास सात-आठ वर्षांचाच काय तो झाला. तिच्यासाठीं शनिवारवाड्यांत जें विलासगृह त्यांनीं बांधून दिलें होतें तें म्हणजे मुख्य वाड्यांतील प्रासादाच्या प्रकारांतील एक छोटासा उप–प्रासादच होता. एवढा जगद्विख्यात शनिवारवाडा, परंतु त्याच्या बांधणीचें प्रत्यक्ष चित्र सोडाच पण स्थूल कल्पना देणारें शब्दचित्रहि कोठें उपलब्ध नाहीं. परंतु

सुदैवाची गोष्ट ही कीं, या मस्तानी–महालाचें तसें किंचित् शब्दचित्र उपलब्ध आहे, तें असें —

" थोरले समशेरबहाद्दर यांची मातुश्री तिजनिमित्त स्वतंत्र हवेली, क्रीडास्थान केलें, संसारकृत्याचें नवें. चौकटी हवेली. चहूंकडे चार कोनांस चार खोल्या. चारी बाजूंस चार दालनें–तीन तीन खणांचीं. याप्रमाणेंच दुसरा मजला. तिसरा (मजला) गच्ची. मधील चौक खुला. मधल्या चौकाचे खालीं जमिनींत उष्णकालाकरिता तहखाना [तळघर]. वरील काम दालनांतील होतें, तसाच (तो तहखाना) होता. चारी दालनांतून दोन दोन खिडक्या हवेकरितां होत्या." म्हणजे ही हवेली चौरस चौकोनी दुमजली असून तिसऱ्या मजल्यावर सर्व गच्ची होती. चार कोनांस बुरुजाप्रमाणें चार खोल्या व त्यामधील चारी बाजूंस तीन तीन खणांचीं प्रशस्त अशीं चार दालनें होतीं. दोन्ही मजल्यांवर अशी एकच तऱ्हेची रचना होती. जुन्या वाड्यांच्या पद्धतीप्रमाणें मध्यें चौक होता. चौकाखालीं उन्हाळ्यांत आराम करण्याकरितां तहखाना करविला होता. तहखान्यांत हवा खेळावी म्हणून पहिल्या मजल्यावरील चारी दालनांतून प्रत्येकीं दोन दोन खिडक्या किंवा झरोके राखलेले होते.

बाजीरावसाहेब व मस्तानी या अपरूप युग्माचे पोटीं १७३४ मध्यें पुत्र झाला. तोच समशेरबहाद्दर ! तो आपल्या आईबापांप्रमाणेंच राजबिंडा आणि पराक्रमी निपजला आणि स्वतःचें समशेरबहाद्दर हें नांव त्यानें सार्थ केलें. समशेरबहाद्दराचें हिंदु नांव कृष्णसिंग असें ठेवण्यांत आलें होतें. समशेरबहाद्दराला माता–पित्याचें सौख्य मात्र फारच थोडें लाभलें. बाजीराव साहेब १७४० सालीं नर्मदातटाकीं वारले आणि मस्तानीहि लगेच पाठोपाठ वारली, सती गेली किंवा आत्मघातानें मेली. समशेरबहाद्दर तेव्हां

अवघा सहा वर्षांचा होता. पोरक्या झालेल्या समशेरबहाद्दराचा प्रतिपाळ नानासाहेब पेशव्यानें सख्ख्या भावाप्रमाणें मोठ्या प्रेमानें केला. त्यानें त्याच्या शिक्षणाची सोय स्वतःच्या कुटुंबांतच केली व पेशव्यांच्या घरच्या आखाड्यांतच तो आवश्यक ती कारकुनी विद्या म्हणजे माहाली मुलकी कामकाज आणि क्षात्रविद्या शिकून तरबेज झाला. सरदेसाई लिहितात:—

" पेशव्यांच्या घरांतील इतर मुलांबरोबर त्याचें शिक्षण होऊन मराठी भाषा व मोडी अक्षर त्यास सुंदर येऊं लागलें. सदाशिवराव भाऊच्या हाताखालीं वागून तो हुषार बनला. "

समशेरबहाद्दर लहान असतांनाच नानासाहेबांनीं त्याला स्वतंत्र सरदारी दिली. मात्र, ती व्यवस्थित चालण्यासाठीं महादाजी गोविंद काकिर्डे याला त्याचा कारभारी म्हणून नेमून दिलें. काकिर्ड्यांनीं दहा वर्षेपर्यंत कारभार उत्तम सांभाळून समशेरबहाद्दराला प्रवीण केलें आणि मग सोळा सतराव्या वर्षांपासून समशेरबहाद्दर आपल्या सरदारीचा कारभार स्वतः जातीनें साहेबीनें पाहूं लागला.

तत्कालीन वहिवाटीप्रमाणें चौदापंधरा वय झाल्यावर नानासाहेबांनीं समशेरबहाद्दराचें लग्न करून दिलें. बाजीरावसाहेब हे समशेरबहाद्दराची मुंज करावी म्हणत होते. परंतु ब्रह्मवृंदांनीं आक्षेप घेतला आणि त्यामुळें इतर कुटुंबीयहि त्या बेतास अनुकूल झाले नाहींत अशी एक दंतकथा आहे. खरी असो वा नसो, परंतु समशेरबहाद्दराचे लग्नाचे वेळीं तरी हिंदूंतच त्याची सोयरीक जमवितां आली तर बरें, असें नानासाहेब पेशव्यास कदाचित् वाटत असावें. म्हणून तसा यत्नहि झाला, पण तें जुळलें नाहीं. तेव्हां त्यांनीं निदान शेवटीं अशाच एका घराण्याशीं सोयरीक जमविली कीं, ज्याची एक शाखा हिंदूची व दुसरी शाखा मुसलमानाची होती ! ही सोयरीक पेठ संस्थानचा राजा किंवा संस्थानिक ' लक्षधीर दलपतराज ' याच्याशीं झाली.

हें पेठकर घराणें मूळचें हिंदु. त्याचें आडनांव पवार. सोळाव्या शतकांत या घराण्याचा पहिला अर्जक पुरुष जावजी पवार नांवाचा होता. त्याच्या ताब्यांत बागलाणांतील पेठ तालुका होता. या जावजीनें पुढें आपलें पवार उपनाम सोडून दळवी अशी संज्ञा स्वीकारली. दळवी म्हणजे दळपती किंवा सेनापति. या जावजी दळव्याचा नातु कृष्णाजी दळवी मोठा शूर व पुंड होता. त्यानें बागलाणाच्या राजाचें स्वामित्व झुगारून दिलें व तो स्वतंत्र राजासारखा राहूं लागला. इ. स. १६३६ त औरंगजेबानें स्वारी करून समस्त बागलाण मोंगल छत्राखालीं आणलें. वर सांगितलेल्या या दळव्याचा एक वंशज लक्षधीर औरंगजेबाविरुद्ध बंड करून उठला. तें बंड औरंगजेबानें मोडलें, व लक्षधीराला त्याच्या सर्व कुटुंबकबिल्यासह कैद करून दिल्लीस रवाना केलें. तेथें त्यांना मृत्यूची शिक्षा सुनावण्यांत आली. पण एक दैवयोग असा कीं, बादशहाची लडकी त्याच वेळीं अत्यवस्थ झाली होती. कोणाहि वैद्याचा गुण पडेना. परंतु लक्षधीराचा भाऊ राम दळवी म्हणून होता. त्याला कांहीं जडीबुट्टी अवगत होती. त्यानें तिला दवा देऊन बरें केलें. त्याचा परिणाम हा झाला कीं औरंगजेबानें या कुटुंबास मृत्यूच्या शिक्षेंतून मोकळें केलें, मात्र अट ही घातली कीं, त्या सर्वांनीं मुसलमान धर्म स्वीकारला पाहिजे. तेव्हां हे लोक नाइलाजानें मुसलमान झाले. राम दळव्याचें नांव अब्दुल रहीम व लक्षधीरचें अब्दुल मोमीन असें ठेवण्यांत आलें. यानंतर औरंगजेबानें त्या सर्वांची मुक्तता करून पेठ संस्थान साहनक म्हणून यांना बहाल केलें. मौज मात्र ही कीं, रामदळवी तिकडे मुसलमान झाला तरी त्याची बायको व दोन लहान मुलें हीं दाक्षिणेंतच राहिल्यामुळें हिंदूच राहिलीं होतीं. दक्षिणेंत आल्यावर लक्षधीरला राखेपासून चिमणाजी व नानू मियाँ असे दोन मुलगे झाले. नंतर लक्षधीर व राम दळवी यांनीं आपल्या मृत्यूनंतर संस्थानचे दोन भाग करून एक मुसलमान संततीस व दुसरा हिंदु संततीस मिळावा अशी व्यवस्था केली.

नानासाहेबांनीं अशा या घराण्याशीं समशेरबहाद्दराची सोयरीक जुळविली. या घराण्याचा धर्म नांवाला मुसलमान असला तरी राहणी वगैरे हिंदु पद्धतीचीच होती. या घराण्याच्या हिंदु राहिलेल्या शाखेचे मानाजी फाकडे यासारख्या प्रसिद्ध मराठे कुटुंबांशीं सोईरसंबंध झालेले आहेत.

हें लग्न १७४९ सालीं झालें. ही सोयरीक हेरण्यांत पिलाजी जाधवरावांचें मोठेंच साहाय्य झालें. पेठच्या बाजूचा सर्व वसूल करण्याचा कारभार १७२४ सालापासून पिलाजी जाधवाकडे होता व म्हणून त्याला पेठकरांच्या मूळ हिंदु कुळीबद्दल खडान् खडा माहिती होती. रीतीप्रमाणें पेशव्यांनीं मुलीकरितां पेठकरांकडे मागणी घातली व नंतर लग्न १४ जानेवारी १७४९ रोजीं झालें. मुलीचें नांव लालकुंवर होतें.

लग्न झालें. परंतु पुढें लौकरच समशेरबहाद्दराची ही पत्नी वारली. म्हणून त्याचें दुसरें लग्न करून देण्यांत आलें. ती सोयरीक मात्र एका अस्सल मुसलमान घराण्याशींच झाली. निंबगिरीकर गुलाम मोहिद्दिनखान याची मुलगी हिच्याशीं हें लग्न १८ ऑक्टोबर १७५३ रोजीं झालें. १४ जुलै १९५४ ची पेशवे दप्तरांतील नोंद अशी—

"गुलाम मोहिद्दीन खान—समशेरबहाद्दराचे सासरे यांस रुबरू वस्त्रें दिलीं. सनगे आंख २३१॥= "

या पुढील सालांतील एका नोंदींत समशेरबहाद्दराला दसऱ्यानिमित्त कापड ४०० आंख दिलें आहे. त्यांत लक्ष्यांत घेण्याची बाब एवढीच कीं, त्या कापडांत धोतरजोडेहि समाविष्ट आहेत. सारांश, समशेरबहाद्दराचा पोषाख, पेहराव पेशवे कुटुंबीयांसारखाच असावा.

समशेरबहाद्दरानें पेशव्यांच्या आज्ञेनुसार कोंकण, राजपुताना, हिंदुस्थान इ. स्वाऱ्यांतून चांगलीच कामगिरी केली. १७५२ सालीं श्रीमंत पेशवे व सलाबतजंग यांची लढाई झाली, त्यांत एक वेळ समशेरबहाद्दराचा घोडा

तोफेच्या गोळ्यामुळें उडून गेला; पण तो मात्र ईश्वरेच्छेनें बचावला. (एक्स्पॅन्शन ऑफ दी मराठा पॉवर पत्र नं. १५५). निजामावरील एका स्वारींत मोहीमशीर असतां लष्करांतच त्याचा मुलगा अलिबहाद्दर याचा जन्म झाला. पुण्याहून दोन मजली गेल्यावर हा प्रकार घडला. तेव्हां बायकोमुलास तेथेंच सोडून तो तसाच पुढें स्वारीस निघून चालता झाला.

भाऊसाहेब पेशव्यांनीं पानपतच्या स्वारीस जातांना समशेरबहाद्दराला मुद्दाम बरोबर घेतलें होतें. समशेरबहाद्दराबरोबर त्याची बायकोहि होती. पुढें पानपतास बेरंग दिसूं लागल्यावर त्यानें आपल्या स्त्रीस झाशीस लावून दिलें. तेथून ती पुण्याकडे निघाली. मागाहून पानपतांत सर्वत्र खपले. समशेरबहाद्दर जखमी होऊन भरतपुरास परत आला, पण तेथेंच तो वारला. तें वर्तमान नानासाहेबांस समजल्यावर त्यांनीं मेहरबाईस पुत्रासमवेत बापाकडे पोहोचती केली. तिचा शोक काय वर्णावा ? बहुतच उदास होती. नानासाहेबांनीं " सरदारी तुझ्या मुलाकडे तशीच चालवितों, तूं आमचेकडे ये." म्हणून बहुत रीतीनें सांगून पाठविलें. परंतु तिनें तें मानलें नाहीं. पुढें चार-पांच महिन्यांनीं नानासाहेब पेशवेदेखील वारले. त्यानंतर कांहीं दिवसांनीं मेहेरबाई पुण्यास आली, आणि पुढील पेशव्यांनींहि पूर्वीप्रमाणेच तिची सर्व व्यवस्था लावून दिली.

आतां येथेंच समशेरबहाद्दराच्या " कृष्णसिंग " या नांवाबद्दल थोडी चर्चा करूं. सरदेसाई सांगतात कीं, कृष्णसिंग हें समशेरबहाद्दराच्या मुलाचें म्हणजे अलिबहाद्दराचें नांव होय. परंतु तें चूक आहे. उदाहरणार्थः— पे. द. भा. ४५, पृ. ८८ वरील पे. रो. की. तील उताऱ्यांत एक नोंद अशी आहेः—" छ ३ रबिलावल सबा आर्बेन [४ मार्च १७४७] कृष्णसिंग समशेरबहाद्दर यास हजामतीस." सरदेसाई सांगतात कीं, " कृष्णसिंग हें अलिबहाद्दराचें म्हणजे समशेरबहाद्दराच्या मुलाचें नांव होतें. पण सरदेसाईंच

सांगतात कीं, समशेरबहाद्दराचा जन्म १७३४ सालीं झाला. अर्थात् ४७सालीं तो अवघा १३ वर्षांचा असणार. तेराव्या वर्षी समशेरबहाद्दराला मुलगा झाला होता व तो मुलगा हजामत करवण्याइतका मोठा होता, हें उघडच हास्यास्पद व अशक्य आहे म्हणून निष्कर्ष असाच काढावा लागतो कीं, समशेरबहाद्दराचेंच मराठी टोपण नांव कृष्णसिंग असें असलें पाहिजे.

पे. रो. की. त खमस खमसेन छ ११ सवाल म्हणजे १–८–१७५४ ची एक दुसरी नोंद सांपडते तीहि या बाबतींत विचार करण्यास लायक आहे, ती अशी :—

"कृष्णसिंग समशेरबहाद्दर यास परवानगी रूबरू, तर्फे अंतोजी माणका खिजमतगार, तीर खपरा सुमार एक"

या नोंदीचा चालू भाषेंत सरळ अर्थ असा कीं, कृष्णसिंग समशेरबहाद्दरास तिरंदाजीकरितां एक खपरा तीर पाहिजे होता. म्हणून नानासाहेब पेशव्यानें अंतोजी माणका खिजमतगाराला समक्ष तोंडी हुकूम देऊन एक तीर कृष्णसिंग समशेरबहाद्दराला देवविला.

ही नोंद १७५४ सालची आहे. कृष्णसिंग म्हणजे अलिबहाद्दर म्हणावा तर अलिबहाद्दराचा जन्म १७५८ सालीं झाला. असें सरदेसाईच म्हणतात! म्हणजे ५४ सालीं तो उपजलाहि नव्हता. अर्थात् वरील नोंदीतील कृष्णसिंग म्हणजे समशेरबहाद्दरच असें धरल्यावांचून गत्यंतर नाहीं.

समशेरबहाद्दर पानपतास लढत असतां जखमांनीं घायाळ होऊन वारला. त्या वेळीं त्याचें वय अवघे २६–२७ वर्षांचें होतें. पानपतास पराजय होऊन पळ सुरू झाला. त्या वेळीं नामांकित म्हणविणारे सरदारहि रण न लढतांच पळून जाऊं लागले. परंतु समशेरबहाद्दर जखमांनीं घायाळ होऊन बेशुद्ध पडेपर्यंत लढत होता. त्याचा यथार्थ गौरव सटवा रामा शाहिरानें पवाड्यांत पुढीलप्रमाणें गायिला आहे.

"होळकर भले झुंजार पळ काढिला लौकरी । जेव्हां गिलच्याचा मार सुटला ठाव देईना त्याला धरतरी । सोनजी भापकर, मानाजी पायगुडे रणांत राहिल्या रणभेरी । मोठेमोठे सरदार जवळ पडला जनकोजी शिंदा यशवंतराव धारकरी । राव दमाजी निघून चालले असे गळाले क्षत्रीं । समशेरबहाद्दर रणीं थकले, कर्त्याची गत आहे न्यारी ! "

यांतील "रणीं थकले" याचा मूळ शुद्ध पाठ "रणीं ठकले" असाच असला पाहिजे. 'थकणें' म्हणजेच 'ठकणें.' "ठकणें" याचा अर्थ नष्ट होणें. उदा.—

"या हल्लेस माझी २५ घोडीं ठकलीं, तर सरदारींच बसावयाचा प्रसंग."

दुसऱ्या एका पवाड्यांत म्हटलें आहेः—"समशेरबहाद्दर रणशूर रणगाढा । रणीं वाजे चौघडा ।। हटकुन गिलचे हाणितो धडा धडा । ढाल तरवार जमदाढा । ज्यानें रणीं अडविला तीस घोडा । सन्मुख दावी मुखडा ।। रावबाजीचा पुत्र जसा हिरा । येती जखमांच्या लहरा ।। "

समशेरबहाद्दराची लग्नाची बायको मेहरबाई किंवा मेहरमबाई. तिचाच पुत्र अलिबहाद्दर. लग्नाखेरीज समशेरबहाद्दराला रामबाई व फुलबाई नांवाच्या दोन रक्षा किंवा उपस्त्रियाहि होत्या.

समशेरबहाद्दराच्या मृत्युसमयीं अलिबहाद्दार अवघा तीन वर्षांचा होता. त्याचें लालनपालन त्याच्या सरादारीच्या इतमामानुसार पेशव्यांनीं फारच अगत्यानें केलें.

१७६६ सालीं वयाच्या ८ व्या–९ व्या वर्षीं अलिबहाद्दराकडून त्याच्या आईनें पेशव्यास लिहविलेलें पुढील पत्र वाचनीय आहे.

॥ श्री ॥

१६-११-१७६६

वडिलांचे सेवेसी अपत्ये अलिबहाद्दर विज्ञापना. येथील क्षेम ता॥ छ ११ माहे सफर मु॥ पुणें आशीर्वादे करोन सुखरूप असो विशेष. बहुत दिवस जाले. वाडिलाकडून आशीर्वादपत्र आलें नाहीं. सदैव पत्रें पाठवून लेकराचा सांभाळ करीत असिलें पाहिजे. वडिलाशिवाय कोण करणार आहे ? लिहिणें सिकवावयासी पन्तोजी पाहिजे. त्यास वडलाचे वेळेचा येमाजीपन्त आहे. त्यास तैनातीस सालीना नक्त रु. ५०० व कापड आंख १०० येणें-प्रमाणें आहे. वाडिलांनीं करार करून देविला पाहिजे. खाशी घोडी बसावयाची होती ती मेली. दुसरी खाशी घोडी नाहीं. त्यास वाडिलांनीं खासी घोडी चांगली गरीब देविली पाहिजे. सेवेसी रंगोपंत कारकून पाठविले आहेत. हे सर्व कामकाजाविषयीं विनंती करतील.

(पे. द. भा. ३, प. नं. ३५).

समशेरबहाद्दराच्या कुटुंबाकडे पेशवे किती आस्थेनें लक्ष पुरवीत असत तें थोरल्या माधवरावांनीं पुण्यास नाना फडणविसास स्वारींतून लिहिलेल्या एका पत्रावरून चांगलें लक्षांत येईल. या वेळीं अलिबहाद्दर ८ वर्षांचा होता. पत्र १२ डिसेंबर १७६६ सालचें आहे. माधवराव लिहितातः—

अलिबहाद्दर यांजकडील गाडीचा बैल येक मेला. त्यास मुबदला बैल येक तोफखान्यापैकीं पाहून देणें. ५ उंटें त्याचीं लष्करांत आलीं होतीं. तीं माघारीं पाठविलीं असेत. वाटेची बेगमी येथून केली असे. वरकड त्याजकडील किरकोळ कामकाज असेल तें तुम्ही मनास आणून करून देत जाणें.”

(पे. द. भा. ३२, प. नं. ३६).

थोरले माधवराव थेऊरास वारले. रमाबाईसाहेब सती गेल्या. त्या वेळचें

पुढील अत्यंत विश्वसनीय अशा वाक्यांतील वर्णन पेशव्यांच्या या घराण्या-बद्दलच्या जिव्हाळ्याचें द्योतक आहे. " मग सतीस नमस्कार करून परशुराम-पंत भाऊ घोड्यावर बसून फौजेंत उभे राहिले. वामनराव बाबा नारायणराव साहेब याजवळ उभे राहिले. त्यासमयीं श्री. कै. पंतप्रधान बाजीरावसाहेब यांचे लेकबळे जिन्नतमकान समशेरबहाद्दर यांचे चिरंजीव अलिबहाद्दर यांणीं खुरनिशा करून उभे राहिले त्यास (रमाबाईसाहेबांनीं) सांगितलें, तूं आमचा, परंतु अन्य जातींत उत्पन्न जाहलास इतकेंच! तुझें ज्याप्रमाणें वडिलांनीं चालविलें त्याप्रमाणें नारायणराव चालवितील. तुम्हीं एकनिष्ठ वर्तणूक करून सुखरूप रहावें यांत तुमचें कल्याण आहे. "

(मराठी दप्तर, रुमाल २, पृष्ठ ९७).

पेशव्यांची या घराण्याविषयींची आत्मीयता आणि जिव्हाळा नाना फडण-वीस पूर्णपणें जाणून होते. आणि पुढें ते पेशवाईचे मुख्य कारभारी झाले, तेव्हांहि त्यांनीं या कुटुंबास धन्याचें कुटुंब समजूनच त्याची व्यवस्था लावली. एवढेंच नव्हे तर अलिबहाद्दरास उत्तम शिकवून तरबेज करून पेशव्यांचा जरीपटका देऊन त्यांनीं त्याला उत्तर हिंदुस्थानांत स्वारीस पाठविलें. अलि-बहाद्दरानेंहि पूर्वीं आपल्या आजानें मिळविलेला बुंदेलखंड प्रांत पुन्हां जिंकून घेऊन तेथें आपलें स्वतंत्र संस्थान निर्माण केलें.

नाना फडणवीस अलिबहाद्दरास धन्याच्या नात्यानेंच कसे वागवीत यासंबंधीं एका पत्रांत उल्लेख आला आहे तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

१७९० सालीं अलिबहाद्दरानें हिंदुस्थानांतून नाना फडणविसासाठीं कांहीं नजर पाठविली होती व ती स्वीकारलीच पाहिजे, असा फार आग्रहहि चालविला होता. परंतु नानांनीं तें नाकारलें. त्यासंबंधांत अलिबहाद्दरास कळवितांना त्याचा पुण्याचा कारकून गोरे लिहितो :—

" नाना फडणीसाकरितां हिऱ्याची पोंची व दागिने पाठविले होते. परंतु

ते म्हणाले, 'तुम्ही श्रीमंताप्रमाणें आम्ही म्हणतों, तेव्हां हें घेणें ठीक नाहीं. परत घेऊन जावें. फारच आग्रह असला तर फक्त पोची तेवढी ठेवा. दागिने घेऊन जा.'"

उत्तरेंत महादजी शिंद्याशीं अलिबहाद्दराचें वैमनस्य आल्यानंतर नाना फडणिसांनींच पुण्याहून वेळोवेळीं सल्लामसलत देऊन त्यास निभाऊन नेलें. अलिबहाद्दर शिपाई गडी आणि राज्यकारभारांत अननुभवी. यामुळें भावनेच्या भरांत तो कित्येक वेळीं वाटेल तशा बहाल्या-बडतर्फ्या करी. पण नाना त्याची चूक निस्पृहपणें त्याच्या निदर्शनांस आणून देत. उदा. १७९२ च्या ऑक्टोबरांत कोणा नूतन राघोपंत गोखले नांवाच्या इसमाच्या कांहीं कामगिरीवर खूष होऊन अलिबहाद्दरानें त्यास 'पालखी देण्याविषयीं आज्ञा जाली पाहिजे' म्हणोन लिहिलें तेव्हां नानांनीं अलिबहाद्दराची कानउघाडणी करून लिहिलें, "राघोपन्त यास पालखी देण्याविसी काय समजोन लिहिलें हें कळत नाहीं. तीस चाळीस वर्षे सेवा सरकारकामें मोठीं करतात, तेव्हां पालखीची योग्यता ! हें सरकारची चाल तुम्हांस ठाऊक नसेल याकरितां तुम्हीं लिहिलें असें वाटतें ! तरी त्यास पालखी देऊं नये."

अलिबहाद्दराचें पहिलें लग्न केव्हां झालें त्याचें साल सांपडत नाहीं. पण त्याच्या बायकोचें नांव बादशहाबेगम होतें, येवढें आढळतें. ती लहानपणींच वारली. पुढें अलिबहाद्दरानें तीन लग्नें केलीं. त्या बायकांचीं नांवें अनुक्रमें- दुल्हनबेगम, बक्षीबेगम व रहिमतबिबी—अशीं होतीं.

दुल्हनबेगमच्या पोटीं समशेरबहाद्दर व बक्षिबेगमच्या पोटीं झुल्पिकार-अली असे दोन औरस मुलगे अलिबहाद्दरास झाले.

समान सितैन छ. ४ सफर [१-७-१७६७] ची पे. द. तील एक नोंद अशी आहेः—

खर्च पोता २० रुपये दि॥ पागा हुजूर अलिबहाद्दर याची स्त्री औरंगा-

ब्रादेस माहेरास जाते. त्याबरोबर घोडीं जातात. त्यास वीस रोजा बेगमीस अजमासे." या वेळीं आलिबहाद्दर ९वर्षांचा होता. अर्थात् ही नोंद त्याच्या पहिल्या बायकोसंबंधींच असणार.

आलिबहाद्दराच्या एका मुलीचें लग्न इहिद्देसमानीनांत म्हणजे १७८०–८१ सालीं झालें. त्याबाबत पेशवे रोजकीर्दीत छ. ५ रबिलाखरची नोंद अशी आहे:—

"चि. अलिबहाद्दर याचे मुलीचे लग्नाबद्दल जावयास चौरंग."

अलिबहाद्दराचा मुलगा समशेरबहाद्दर याची सुंता माघ वद्य ३ इहिद्देसितैन छ १७ रबिलाखरीं झाली. अशी नोंद भारतवर्ष पंतप्रधान शकावलींत पृ. ८१ वर आली आहे. परंतु ती अत्यंत अशुद्ध छापली आहे. इहिद्देतिसैन-ऐवजीं तेथें इहिद्देसितैन म्हटलें आहे व जमादिलाखर पाहिजे तेथें रबिलाखर म्हटलें आहे. इहिद्देतिसैन १७ जमादिलाखर म्हणजे २१ फेब्रुवारी १७९१ रोजीं सुंता झाली.

पे. द. त नोंद सांपडते ती अशी:—

"अलिबहाद्दराचा मुलगा समशेरबहाद्दर याची सुंता झाली. त्याबद्दल त्यास ५००० रु. दिले. तसेंच एक हत्ती दिला व हत्तीच्या खर्चास दरमहा २०० रु. नेमणूक करून दिली. (पे. द. सनदापत्रांतील माहिती. पृ.१५८)

पुणें अखबार भाग ३ मध्यें सुंता समारंभाचें पुढील मनोरंजक वर्णन आलें आहे:—

"१७-२-१७९१ छ. २ रोज रविवारीं मागील सहा घटका दिवस राहतां मदारूल माहाम (नाना फडणीस) आपले घरींहून निघोन आलिबहाद्दर याचे वाड्यांत गेले. कारण कीं, श्रीमंत (पेशवे) तेथें आहेर करावयाचा संकेत जाला होता. तेव्हां श्रीमंतहि तेथें आले. बहाद्दर याचे चिरंजीवास आहेर केला. बितपसील:—

१ वस्त्रें बादली पोशाक मै किनखाब वगैरे. १ कंठी मोत्याची, १ सिरपेच. रात्रौ अलिबहाद्दर याचे येथील शर्गस्त (मिरवणूक) निघाली होती. श्रीमंतांणीं बहाद्दरमजकुराचे घरीं शादीचे खर्चाकरितां रोख ५००० रु. व साहित्य सरंजाम मिळून १२–१५ सहस्रापर्यंत दिल्हे. समशेरबहाद्दर याच्या सुंता रोज मजकुरी १३ घटका दिवसा जाल्या. सबब १० बार तोफेचे जाले."

समशेरबहाद्दराला 'दादासाहेब' म्हणत. त्याचा बिसमिल्ला १७९० च्या फेब्रुवारींत झाला. मुसलमानांत मुलाच्या अगर मुलीच्या पांचव्या वर्षी घोड्यावरून मिरवणूक काढून मशिदींत नेऊन कुराणाचे कलमें पढवितात; त्यास बिसमिल्ला म्हणतात.

"श्रीमंत राजेश्री दादासाहेबांचें बिसमिल्ला पाबळास आज छ. ७ जमादिलाखरीं इंदुवारीं होणार. सरंजाम तेथें गेला. मिठाई पाऊणशें रुपयांची पेढे लाडू वगैरे मिळून व पोशाख जरी छडीदारी येक व पैठणी येक येणेंप्रमाणें जिन्नस ऐसे येथून रवाना केले आहेत" (म. द. रु. ३)

१६–२–१७९० च्या पत्रांत आणखी थोडा तपशील सांपडतो तो असा:—

"श्रीमंत महाराज (मेहरमबाई अलिबहाद्दराची आई) पाबळास गेली. दादासाहेब (समशेरबहाद्दर) नगरास सैद ईसास याचे दर्शनास गेले होते. ते कालच पाबळास दाखल जाले. छ. ७ जमादिलाखरीं बिसमिल्ला होणार. फाल्गुन व॥ ५ होऊन पुन्हां पुण्यास सर्वांचा यावयाचा मजकूर आहे."

असो. समशेरबहाद्दराचें लग्न समान तिसेन ७ रज्जबी १७९७-९८ सालीं झालें. अर्थात् सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर–दुसऱ्या बाजीरावींत. त्या वेळीं माधवरावांची बायको यशोदाबाई समशेरबहाद्दराच्या घरीं रीतीप्रमाणें

मेजवानीस गेली होती. तेथें तिला पुढीलप्रमाणें पोशाखाची नजर आली.

सनगे
१५० पातळ जरी एक
५ चोळखण एक
२७५ शाल फर्द २ दर ८७॥ प्रमाणें रुपये.

३३०

(दु. ब्रा. पे. रोजनिशी वाड, पृ. २४)

मराठी दप्तर रुमाल तीनमध्यें अलिबहाद्दरासंबंधीं पत्रव्यवहार १७८६-१८०४ पावेतोंचा छापलेला आहे. त्यांत कांहीं कांहीं पत्रांतून अलिबहाद्दराची कौटुंबिक माहिती आली आहे. पेशव्यांचे व त्याच्या कुटुंबाचे संबंध, त्याचा मानमरातब, अलिबहाद्दर कुटुंबाची ब्राह्मणी किंवा मराठशाही वागणूक व धर्म मुसलमान असला तरी कुटुंबांत रूढ झालेल्या हिंदु चाली आणि धार्मिक समजुती वा गैरसमजुती यांचे मनोरंजक उल्लेख सांपडतात. १७८८ सालीं श्रीमंत गोपिकाबाई वारल्याचें वृत्त आलें तेव्हां अलिबहाद्दराची आई मुद्दाम पुण्यास समाचारासाठीं आली. १७८९ च्या जानेवारी–फेब्रुवारींत ही मेहरमबाई फार आजारी झाली होती. ती अलिबहाद्दरास लिहितेः—

"दुखण्यास बहुत विपत्य पाहिलें. दोन महिने स्नान व सूर्यदर्शन नाहीं. असे क्लेश जन्मांत पाहिले नव्हते."

१७८९ च्या सप्टेंबरमधील पत्रांतील हकिगतः—

"काल दसऱ्याचे दिवशीं श्रीमन्त रा. रावसाहेबांचे दर्शनास दादासाहेब (समशेरबहाद्दर) गेले होते. मुजरा करून पाव घटका बसले. श्रीमन्त नानासहि सलाम जाला. ताजीम घेऊन जवळ बसविलें. श्रीमन्त नानास

अगोदर घोड्याविसी विनन्ती केली होती. त्यावरून दादासाहेबास लहान घोडा चांगला चालणार पाहून द्यावा म्हणोन आज्ञा पाग्यावर छ. ७ माहेरमीं जाली. त्यावरून काल घोडी खासी येक करडी गुलतरंग–अगोदर श्रीमंत बसत होते ती दिल्ही आहे. श्रीमंत महाराजांची (मेहरमबाईची) प्रकृति हल्लीं बरी आहे व श्रीमंत सौ. बेगमसाहेब व दादासाहेब व प्यारी साहेब व सौ. रहिमतबिबी आदिकरून सर्व सुखरूप आहेत."

शनिवारवाड्यांतील मस्तानी महालाची कांहीं दुरुस्ती केल्याचीहि नोंद एका पत्रांत आहे, ती अशी:—

"श्रीमंत हरिपन्त तात्यांची स्वारी नित्य वाड्यांत (शनिवारवाड्यांतील अलिबहाद्दराच्या घरीं) येत असते. पेशजी बागाच्या भिंती नव्या घालावयाविसी अलिबहाद्दरांनीं कळविलें होतें. विहीर बांधण्याचाहि उपक्रम केला होता. आरसेमहालापुढें सायवान होतें तें मोडून नवें दमन जोतें उंच देऊन उंची कामाची व काम आरसेमहालाप्रमाणेंच येक मजला तयार जालेवर गच्ची केली. नवे दमनापुढें कोटाचे बाजूसी दक्षण–उत्तर चालिलें. तीन खण चांगलेच केले त्यांत दोन खणांचा 'हुजरा केला. पुढें दोन खणांची पडवी करून पाण्यांत पवावयाचें पडवीसी मिलाविली. फरस संगी चांगला केला व आरसेमहालामागील फरसहि संगी चांगला केला. सुपारीचें झाड कोटाजवळील मात्र एक कादावें लागलें. तें काढून दोहो हारींत जाग्यांत लाविलें. तें जगलें. झाडून काम खासगीवाल्याकडूनच श्रीमंत नानांचे आज्ञेनें जालें. बागांत पन्हेरी आज्ञेप्रमाणें लाविली आहे. आरसेमहालावर कौलार व विहिरीपासून सेतखान्यापर्यंत भिंतीवरून पडवी नवी केली.

१७८९ नोव्हेंबर.

"श्रीमंत रमाबाईसाहेब (सवाई माधवरावांची बायको) यांचें वोटमरण कार्तिक शुद्ध तृतीया बुधवारीं जालें. श्रीमंत दादासाहेब (समशेरबहाद्दर)

आहेर घेऊन गेले होते. श्रीमंत सौ. बेगमासाहेबास (समशेरबहाद्दराची बायको) बोलविलें होतें. वोटीचा सरंजाम आपले येथून नेला होता. तेथून मानाचीं लुगडीं चोळ्या यथापद्धत दिल्ह्या."

८ नोव्हेंबर १७८९ चें पत्र.

अलिबहाद्दरास.

"श्रीमंत मातुश्री माहाराज वारंवार गोष्टी काढितात कीं, मुल्कागिरीस गेले. मागे संवसार आहे. मुलेंमाणसें आहेत. त्यास कधीं कधीं वस्तभाव पाठवावयाची आस्थाच नाहीं. मी कशी तरी आई आहे. मजकडे कांहीं पा। तर मी त्याचे लेकरास देणार नाहीं कीं काय हें कांहींच रीत नाहीं. मी तर कांहीं यांणीं मिळऊन मला द्यावें याची आस्थाच करीत नाहीं. परंतु त्यांचे गांवींच हें नाहीं. अशा गोष्टी कधीं कधीं निघतात आणि स्वारी देसीं आली असतां हें बोलणें तसेंच राहील. यास्तव एक दोन वेल इतका खर्च होतो तसे कांहीं वडिलास देवधर्म करावयास म्हणोन ऐवज थोडाबहुत व कांहीं लेकरास एक दोन पत्रीं सौ।। बयाबाईची मूल धाकटी आहे तीस आसीर्वाद व कांहीं वस्त जे युक्तीस येईल ते अथवा पत्रीं समाचार याप्रमाणें जाल्यांत बहुत उत्तम आहे. श्रीमन्तास अथवा श्रीमंत राजश्री नानास याउपरी आपण शालजोडी घेतल्यास हशा लाहान बुटीदार पसंत आहे. झाडाच्या आल्या त्या परभाऱ्या खर्चास आल्या व हत्ती थोर निर्झोल अंबारीचे उपयोगी असा खरेदी केल्यासहि मर्जीस श्रीमंत नानाचे येईल. तोफा बरोबर मोठा आणिल्यास सरकार उपयोगी पडेल. लहानेवर फार रिझना (र) नाहीं बहुत उमदा दाहा पाच तसबिरा मि (ळ) ल्या तर श्रीमंत राजश्री नानाची मर्जी बहुत आहे कीं, आणिक आम्हांस कांहीं नलगे. तसबिरा मिळाल्यास तपास करून मिळऊन पा। म्हणजे आम्हास सर्व पावले. सेवेसी श्रुत व्हावें. बहुत काय लिहूं. कृपा केली पाहिजे हे विज्ञापना."

१७९० च्या जानेवारींतील पत्रः—

" श्रीमंत दादासाहेबांची प्रकृति हल्लीं चांगली आहे. डाक्तर वैद्याचे औषधाचा गुण आला. श्रीमंत राजश्री रावसाहेबांची स्वारी घोडी फेरावयास व हरणें धरून आणावयास एक–दोन दिवसांआड जात असत्ये. हल्लीं हरणें धरून आणावयाचा इष्क फार आहे. "

१७९० फेब्रुवारी :—मेहरमबाई ऑलिबहाद्दास लिहिते :—

" चि. प्यारीसो यांचे सोयरीकीची योजना असो द्यावी. ब्राह्मणांतील वस्ती. बहुत थोर जाली. उपहास करतील, यास्तव मुख्य काळजी सोयरिकीविसी. "

१७९० फेब्रुवारींतील पत्र :—

या पत्रांत एक बातमी आहे ती अशी :—

" छ. २५ जमादिलाखरी मॅलेटनें श्रीमंतास मेजवानी केली. तेथून परततांना त्यानें १००० रु. श्रीमंतांवरून ओवाळून टाकले. श्रीमंतांचे शागीर्द पेशा लोकजजवळ बरोबर होते. तेहि रुपये गोळा करूं लागले. १०।१५ कदम श्रीमंत एकटे चालले. खिजमतगार वगैरे रुपये जमिनीवरून घ्यावयास गुंतले. त्यावरून त्या मंडळींवर बहुत रोष श्रीमंतांचा आहे त्यांचीं पारिपत्यें होणार आहेत. "

१७९० जुलैचें पत्र :—

...कुराणविशी लिहिलें कीं, तक्ती पाठविली त्याप्रमाणें मिळत नाहीं. त्यास तक्तीपेक्षां बोट दोन बोटें थोरली असल्यास चिंता नाहीं. मुख्य अक्षर मात्र थोर असावें. येथें कुराणें आलीं ही दुखण्यामुळें नीट पाहण्यांत आली नाहीं. चिरंजीव राजश्री दादासो यांस ज्वर येतो. सवा महिना जाहाला. प्रस्तुत आठ दिवस कमी येतो. लवकरच आठ-चार दिवसांत बरे होतील.

...तोद्याजवळ घोड्यांची पडवी होती ती (व) आरसे महालासमूरची मोडकळीस आल्या होत्या. सा॥ सरकारांतून परवानगी घेऊन सलग पडवी जोते घालून कोटापासून जांबलीपावेतों येकच बांधिली व मुदपाकचा सोपाहि झुकला होता तोहि बांधून घेतला. चौसौपीचा डोल सांधून बांधला. खाला तोंदा पडवीचे पोटांत आला.

१७९० सप्टें. चें पत्र. (गोऱ्याचें अलिबहाद्दरास)

" तुम्ही पाठविलेल्या तसबिरा आरसेमहालांतच होत्या. फक्त चार-पांच जणांनाच त्याची माहिती होती. नाना फडणीसांकरितां तसबिरा होत्या. त्या त्यास नेऊन दिल्या. पुढें नानास कसें काय कळलें कोणास ठाऊक ? एक दिवस ते म्हणाले, 'लष्करांतून तसबिरा आल्या, त्यांतील चांगल्या निवडून ठेऊन वाईट तेवढ्या आम्हांकडे पाठविल्या. आमची बातमी पक्की आहे.' तेव्हां शेवटीं मेहरमबाईच्या सल्ल्या प्रा॥ सगळाच तसबिरीचा मोरक्का नाना फडणवीसांस दाखविला. नानांनीं त्यांतील तीस तसबिरी पसंत केल्या व सांगितलें कीं, पहिल्या तीस तुम्हीं पाठविल्या त्या घेऊन जाव्या."

१७९० च्या सप्टेंबरचें पत्र (गोऱ्याचें आलिबहाद्दरास)

" यंदा दसऱ्यास शिलंगणास श्रीमंतांचे स्वारीबरोबर दादासाहेबांची स्वारी अंबारींत गेली होती."

१७९१ सप्टें.

श्रीमंत सौ. रहिमतबिबी (अलिबहाद्दराची रक्षा) यांणीं मोहरमांत विटालसे कुणबिणीस कामें सांगितलीं. सिवली. त्यावरून वाडिलांनीं (मेहरमबाईनें) निषेध केला कीं, आमचे येथें हें आचरण नसतां हें काय ? अशा रीतीनें सांगितलें असतां, समजोन बिबींनीं उगेच राहून रीतीनें चालावें, तें न करतां जिद्द बहुत घालूं लागली, 'मलाच मना करतां.

वरकड सारी सिवतात. त्यास मना करीत नाहींत ! ' ऐसें मूर्खपणाचें बोलणें बोलों लागली. एक रोज माझे समक्ष याप्रोच बोलणें होऊन बहोत वादों लागले तेव्हां मी बिबी त्यास उठोन दाबिलें कीं, 'तुम्ही दुसरे कामास जा. समजोन बोलत नाहीं.' याकारितां तेव्हां उठोन गेली. नंतर खुलाबाईचे समक्ष याप्रो होऊं लागलें. तेव्हां यांनीं उठोन लाविलें. तेव्हां उठोन भिंतीपलीकडे जाऊन भाद्रपद अमावास्येचे दिवशीं मोठ्यानें रडों लागली. तेव्हां वडलांनीं सांगितलें कीं, 'आज अवसेचें रडतेस ! कामास येणार नाहीं. उगीच राहा. नाहीं तर उठल्यावर येऊन तोंडांत मारीन. ' त्याचें उत्तर पांचसात वेळ बिबीनें केलें कीं, ' या कशी येतां ती मारा. ' तेव्हां उठोन जाऊन दोनचार तमाचे व लहानसें लाकूड सांपडलें तें येक दोन मारिलें. "

अलिबहाद्दर पुण्याहून महादजी शिंद्याच्या मदतीकारितां म्हणून उत्तरेंत गेला तो तिकडेच दिग्विजय करून बुंदेलखंडान्तें राज्य स्थापून राहिला. कलिंजरच्या वेढ्याच्या लढाईत तो जखमी झाला. त्या लढाईत तो मेला असें सरदेसायांनीं लिहिलें आहे तें चूक आहे. परन्तु त्याची प्रकृति तेव्हांपासून फारच बिघडली. म्हणून त्यानें १९ जून १८०१ रोजीं पुण्यास दुसऱ्या बाजीरावास पत्र लिहून ' मातोश्रीस, कुटुंबास व चिरंजीवास भेटीस येण्यास आज्ञा द्यावी ' असें अजीजीनें प्रार्थिलें. तो लिहितो :--

" मु॥ नाजिक किल्ले कलंजर आहे. प्रकृतीचा अर्थ सविस्तर पेशजीच्या पत्रीं अर्ज लिहिलाच आहे. त्यास सांप्रत शरीरी कांहींच सामर्थ्य राहिलें नाहीं. तरी साहेबी मेहेरबान होऊन मातोश्रीस, कुटुंबास व चिरंजीवास भेटीस येण्याची परवानगी जाहली पाहिजे. येथें येऊन भेटी झाल्यानंतर ज्यास आज्ञा होईल तो सेवेसी येऊन हजर होईल. "

बाजीरावानें हें पत्र आल्यावर निळकंठराव रामचंद्र पागे या प्रभु गृहस्थास (शेणवी ?) हिंदुस्थानांत रवाना करावयाचें ठरविलें. त्यानें तिकडे जाऊन

अलिबहाद्दराच्या जहागिरीचा बंदोबस्त करावयाचा होता. वास्तविक तिकडचा जुना माहीतगार हवा होता. परंतु प्राचीनापैकीं बाजीरावानें कोणीच उरूं दिलें नव्हतें. नवीन मंडळींपैकीं सारेच गृहस्थ किंवा हुजरे! या निळकंठराव पाग्याची तयारी होईपर्यंतच बिचाऱ्या अलिबहाद्दराचा तिकडे काल झाला. तो २३ रबिलाखरीं म्हणजेच २१–८–१८०२ रोजीं मृत्यु पावल्याचें नक्की वर्तमान आलें. (भा. व. शकावलींत अलिबहाद्दराचा मृत्यु श्रावण शु॥ ११ जमादिलावल सलास मयातेन असा दिला आहे.)

पाग्यापाठोपाठ समशेरबहाद्दरास बुंदेलखंडांत पाठविण्याचा बाजीरावाचा बेत होता. परंतु तें जुळलें नाहीं. कारण पुढें पुण्यावरील होळकराच्या स्वारीचें संकट उभें राहिलें.

अलिबहाद्दराच्या मृत्यूबद्दल दुखवटा घालण्याचा समारंभ चिमाजी आप्पासो पेशव्यांचेकडून १ ऑक्टो. १८०२ रोजीं उरकण्यांत आला. समशेरबहाद्दरास त्यांनीं ११८० आखांचें गोलदार सणंग दिलें. पुढें बाजीराव यशवंतराव होळकराच्या भीतीनें महाडास सर्व कुटुंब कबिले घेऊन पळाले. त्यांत समशेरबहाद्दर होता. महाडाहून श्रीमंत एकटेच वसईकडे गलबतांतून निघून गेले. त्या वेळीं त्यांनीं ज्याला जो मार्ग सुचेल तो त्यानें सुधारावा म्हणून बरोबरच्या मंडळीस सांगितलें. तेव्हां समशेरबहाद्दर ४ डिसें. १८०२ च्या सुमारास पुण्यास परत आला. यानंतर पुढें श्रीमंतांनीं वसईचा तह इंग्रजांशीं केला. त्यांत त्यांनीं बुंदेलखंड इंग्रजांना देऊन टाकलें!

बुंदेलखंडांत अलिबहाद्दराच्या मृत्यूनंतर बेबंदशाही माजली. अलिबहाद्दराजवळ बांद्यास असलेल्या त्याच्या मुलास नबाबी देण्याचें कारस्थान शिजून अमलांत आलें होतें. ज्येष्ठ पुत्र जो समशेरबहाद्दर त्याचा हक्क उडाविला गेला! वास्तविक पेशव्यांनीं या कामीं मदत करावयाची पण त्यांनीं मुद्दलांतच बुंदेलखंड इंग्रजांना देऊन टाकलें होतें यामुळें समशेरबहाद्दर पेशव्यास न विचारतां आपलें राज्य परत मिळविण्यासाठीं हिंदुस्थानांत

निघून गेला. बाजीरावानें त्याला न जाण्याविषयीं आज्ञा केली, परंतु ती त्यानें मानली नाहीं म्हणून पेशव्यांनीं अलिबहाद्दराचा सारा सरंजाम जप्त करून तो आपला प्रीतिपात्र सदाशिव माणकेश्वर यास बहाल केला. ही गोष्ट १८०३ च्या जुलैंत घडली.

समशेरबहाद्दर तिकडे गेला खरा, परंतु तिकडे राजा हिंमतबहाद्दर गोसावी बेदिल झाला व त्यानें इंग्रजांकडे सूत्र लाऊन तिकडून पलटणें आणून समशेरबहाद्दराशीं लढाई केली व बुंदेलखंडांतून त्यास हुसकावण्याचा उद्योग केला. शेवटीं नाइलाज होऊन समशेरबहाद्दराला इंग्रजांना शरण जावें लागलें व वार्षिक ४ लाखांचा तनखा घेऊन त्याला इंग्रजांचा जहागीरदार बनावें लागलें.

यापूर्वींच १८०४ सालीं मेहरमबाई व अलिबहाद्दराचा धाकटा पुत्र फत्तेबहाद्दर हीं दोघें तिकडे गेलीं होतीं. तीं पुण्यास परत आलीं. त्यांस झांशीहून पुण्यास बंदोबस्तानें रवाना करून देण्याविषयीं सनद बाजीरावानें ५ रबिलाखर खमसमयातेनची पेशवे रोजकीर्दींत बार आहे.

समशेरबहाद्दर वारल्यावर त्याचा सावत्र भाऊ झुल्फिकारअली बांद्याचा नबाब झाला. पण तोहि लौकरच वारला, व त्याचा मुलगा आलिबहाद्दर नांवाचा होता, तो गादीवर आला. त्याच्याच कारकीर्दींत सत्तावन्नचें बंड झालें. बांदें खालसा होऊन फक्त ३६००० रु. ची नेमणूक करून देऊन इंग्रजांनीं त्याला इंदुरास नेऊन ठेवलें. हा आलिबहाद्दर १८७३ सालीं वारला.

थोरला अलिबहाद्दर हा नाना फडणिसांचा पक्षपाती. तेव्हां त्याच्याबद्दल दुसऱ्या बाजीरावास मनांतून प्रेम नव्हतेंच! पुढें अलिबहाद्दराचा मुलगा समशेरबहाद्दर आपली अवज्ञा करतो असा दंश धरून त्याची बुंदेलखंडांतील जहागीर इंग्रजास देऊन टाकली आणि अखेर १८१२ सालीं तर त्यांनीं

"अलिबहाद्दर यांचा राहण्याचा वाडा शनवारचे थोरले वाड्यांत ईशान्येचे कोपऱ्यास:बुरजाजवळ:होता त्यांत.अलिबहाद्दरांची मातोश्री व स्त्री राहात होती, त्यांस वाड्यांतून काढोन दुसरे जागा ठेवोन, वाडा दरोबस्त खणून माती, मलमा वगैरे झाडून बाहेर टाकिलें आणि जाग्यावर झाडें लावलीं ! !"

(शके १७३३ इसन्ने अशर मयातेन)

येथवर थोरल्या बाजीरावांच्या अनौरस वंशजांची माहिती संपूर्ण केली. आतां बाजीराव साहेबांचे बंधु चिमाजीआप्पा. ते नाटकशाळादिकांच्या भानगडीपासून सर्वथा अलिप्त होते आणि नाटकशाळा बाळगणें हा मोठासा नैतिक गुन्हा न समजल्या जाणाऱ्या त्या काळांत त्यांनीं केवळ एकपत्नीव्रतानें राहावें हें त्यांस केव्हांहि भूषणास्पदच होय. त्या काळांत जेव्हां जेव्हां अशीं तुरळक प्रशंसनीय उदाहरणें आढळत, तेव्हां तेव्हां तत्कालीन लोकांनींहि त्यांचा आदरपूर्वक निर्देश केलेला आढळतो. असो. चिमाजी-आप्पांच्या बाबत जें तेंच त्यांच्या कुरुक्षेत्रास कुडी वाहून चिरंजीव झालेल्या सदाशिवराव भाऊंबद्दल ! त्यांच्याहि कोणी नाटकशाळा अस-ल्याचा किंवा त्यांना कांहीं अनौरस संतति असल्याचा स्पष्ट उल्लेख सांपडत नाहीं.

तथापि पुरंदरे दप्तर २ मध्यें भाऊसाहेब व नाना पुरंदरे यांच्यांत झालेला खाजगी वैयक्तिक पत्रव्यवहार कांहीं आला आहे. त्यांतील उल्लेख पाहतां भाऊसाहेब पेशवेहि अगदीं शुद्ध नसावेत असा तर्क करण्यास जागा सांपडते व तिचा शेजवलकरांनीं आपल्या पानिपत ग्रंथांत उपयोग देखील करून घेतलेला आहे !

आतां बाजीरावसाहेबांच्या पुत्रांसंबंधीं. त्यांना एकूण तीन पुत्र. एक बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे. दुसरे जनार्दन बाजीराव आणि

तिसरे रघुनाथराव ऊर्फ राघोबादादा. यांपैकीं जनार्दन बाजीराव अल्पवयांतच वारले. बाकी दोघांची अनौरस संतति, बरीच होती. नानासाहेब पेशव्यांची कारकीर्द म्हणजे पेशवाईच्या भाग्याचा कळसच होता. नानासाहेबानें जितके पराक्रम केले तितकेच विलासहि भोगले. त्याच्या वैभवाचें वर्णन मराठी शाहीर शिवराम पिंपळगांवकर यानें थोडक्यांत पण चटकदार असें केलें आहे तेवढें वाचलें कीं पुरें.

" धन्य भगवाना नेलास मोतीदाणा ।
दःखननचा बादशाह साहेब नाना ॥ ध्रु० ॥
दिवाणखाना रंगमहाल खुषबोची मौज ।
तऱ्हेतऱ्हेचे पक्षी नानाची रीझ ।
काय गेंडिया सांबर आणिक सावज ।
भलेभले पटाइत वाघ गर्ज ।
खंदे रायाची जोडी विराळागत काज ।
नाना पेशवे नांव तयाला साज ।
उघड्या ताटीं मुलूख करतो राज्य ।
गरिबाची करित होता बुज ।
कुल पालख्या तमामी केल्या पुन्हां ।
त्यांनीं पूल बांधिले नावा केल्या मना ॥
अघटित बुद्ध, त्याचे पवाडे ।
खास हौशिचे राखिले घोडे ।
तुरंगीं टाकिले पायांत तोडे ।
बारा हज्जार घोडा पुण्यांत कडकडीत ।
याशिवाय झमकती पागा नाहीं गणित ।
हत्ती घोड्याचे केले रथ ।
आणिक जिनसाना नाहीं गणित ॥

नानासारखा समर्थ गेला पुतळा ।
सावलीच्या सुखें गोधनें गोळा ॥
त्या पिकल्या वृक्षाच्या खालीं पक्ष्यांचा मेळा ।
त्याच्या गुणवती केशरी नाटकशाळा ॥

वगैरे वगैरे.

नानासाहेब पेशव्यांच्या रसिकतेबद्दल व मर्मज्ञतेबद्दल आणि त्यांनीं निर्माण केलेल्या अनेक कारखान्यांबद्दल लिहावयाचें तर विषयांतर होईल. म्हणून तें न करतां फक्त आपल्या प्रकृत विषयापुरतेंच पाहूं. वर दिलेल्या पोवाड्यांत त्यांच्या गुणवती आणि केशरी या नाटकशाळांचा उल्लेख स्पष्टच आहे. तथापि एवढ्या दोनच नाटकशाळा नव्हत्या आणिक कितीतरी होत्या; परंतु ज्यांच्या संततीचीं इतिहासानें दखल घेतली तेवढ्यापुरतेंच आपणास कर्तव्य आहे.

असे लेकवळे तीन. कृष्णसिंग, हैबतसिंग आणि लक्ष्मणसिंग. हे तिघे सख्खे भाऊ. येसू नांवाची नानासो पेशव्यांची अत्यन्त आवडती रक्षा होती तिचे हे मुलगे. ही येसू अत्यंत रूपवती होती. एवढेंच नव्हे तर ती उत्कृष्ट गाणारीणहि होती. आणि म्हणूनच तिनें नानासाहेबांना वेड लावलें होतें. पानपतानंतर त्यांची वृत्ति चिडखोर, संतापी व कांहींशी भ्रमिष्ट देखील बनली. क्षणाक्षणाला मोठ्या लोकांच्या अब्रू जाऊं लागल्या. परंतु तशाहि स्थितींत त्यांचा विश्वास दिसे तो फक्त या येसूवर! बायको, आप्त दुसरी कोणी नसली तरी चालेल, परंतु ही जवळ हवी. याला अस्सल पत्राचा नवा पुरावाहि उपलब्ध झाला आहे. तें पत्र असेः—

पत्र १७६१ च्या मे–जून महिन्यांतील असून ते बच्च्याजी विश्वनाथ खांडेकरानें लिहिलेलें आहे. हा श्रीमंत नानासाहेबांच्या जवळचा निकटचा एक विश्वासू कारकून होता. तो लिहितो–

"सेवेसी बच्च्याजी विश्वनाथ विज्ञापना. मी पुण्याहून व आशेरीहून साहेबाचे प्रकृतीचें वर्तमान आपणांस लिहिलें. तें परस्परें साहेबांकडेच गेलें. फोडून वाचून पाहून येशीजवळ दिल्हें. मजजवळ दिल्हें नाहीं ! हल्लीं प्रकृत ×× क्षीण आहे. क्षीणतेच योगेकडून कानीरडेपण फार आहे. उपाय नाहीं. जें ईश्वराचें चित्तास येईल तें खरें ! आजपावेतों हकीमजीच वोखद देत होता. हल्लीं गंगा विष्णु देत आहे. त्याचेंहि टाकणार ! मागती बाबाचे घेणार. वोखदानें काय करावें ? पथ्य तिळमात्र खावयाचें वगैरे नाहीं ! सर्व ईश्वराधीन आहे. मी फार काय लिहूं ?"

थोरल्या बाजीरावांचे मस्तानीपासून झालेले पुत्र जसे रूपसुंदर तसेच नानासाहेबांचेहि हे लेकवळे होते. शाहिरांनीं सुद्धां त्याची दखल घेतलेली आहे. प्रभाकर शाहीर म्हणतो, "श्रीमंतांचें प्रतिबिंब अलिबहाद्दर समशेर-बहाद्दर । कुशाबा हैबतसिंग सजले काय रूप सुंदर ।"

या तीन मुलांपैकीं ज्येष्ठ तो कुशाबा किंवा कृष्णसिंग. समशेरबहाद्दराचें जें नांव कृष्णसिंग तेंच यालाहि ठेवण्यांत आलें होतें.

पेशवाई गेल्यानंतर हैबतसिंगाच्या नातवानें कंपनी सरकारकडे जी अर्जी गुदरली त्यांत हैबतसिंग ज्येष्ठ पुत्र असें म्हटलें आहे. परंतु तें बरोबर वाटत नाहीं. कारण २०-२-१७६३ ची सलाससितैनमधली पेशवेरोजकीर्दीतील एक नोंद अशी आहे :—

"छ ६ साबान देणें. खाशा चाकरीच्या बायकांच्या मुलांस पाडव्याचे पोशाख. परवानगी मातुश्रीबाई [गोपिकाबाई] रसानगी व तर्फे रामचंद्र नारायण गोरे आंख.

१४०।। येशीचें मूल आसामी २. कुशाबा व बावा

६९ गोंद्या कमळीचा

६९।।। स्वरूपाचा लक्ष्मण"

वरील नोंदींत कुशाबाचें नांव आधीं घातलें आहे त्या अर्थी तो वडील दिसतो.

तथापि या नोंदींत येसूचा तिसरा मुलगा जो लक्ष्मणसिंग त्याचें नांव नाहीं. उलट जो एक लक्ष्मण आला आहे तो स्वरूपाचा मुलगा म्हटलें आहे, तेव्हां हा गोंधळ काय आहे तो नक्की उलगडत नाहीं.

या हैबतसिंगाचे नातू खंडेराव गणपतराव यांनीं शके १७५४ च्या आषाढ महिन्यांत दाखल केलेली अर्जीच जशीच्या तशी देतों.

यादी खंडेराव आणि गणपतराव, हैबतसिंग जहागीरदार यांचे नातू सुरू सलासीन मयातेन व अलफ.

" आमचे आजे हैबतसिंग वैशाख व. ३० वारले. हैबतसिंग हे नानासाहेब पेशवे पुण्याचे गादीचे अधिकारी, यांचे चिरंजीव. त्यांचे धाकटे बंधु कृष्णसिंग व लक्ष्मणसिंग. पैकीं कृष्णसिंग पेशजी वारले, सबब मे. अल्पिस्टनसाहेब यांणीं त्यांचे चिरंजीव कोंडिरामसिंग त्याजकडे व लक्ष्मणसिंग व आमचे आजे हैबतसिंग खुद्द या त्रिवर्गाकडे जहागिरीचें गांव चालविले आहेत त्यास लक्ष्मणसिंग सालगुदस्तां भाद्रपदमासीं वारले. त्यास चिरंजीव दोन आहेत, व आम्ही हैबतसिंग यांचे नातू उभयेता आहों. याजकरितां जें गांव आमचे आम्हांकडे अल्पिस्टनबहादुर यांणीं चालविलें तें आंसाहेबी चालवावें. गांव सुमोर ७० वर्षे चालत आहेत. मिती आषाढ शु. शके १७५४ मु॥ पुणें

या अर्जीनुसार या घराण्याचा वंशवेल तयार होतो तो असाः—



लक्ष्मणसिंगाच्या कुटुंबाचे बेगमीस मौजे राजुरी परगणें जामखेड हा गांव दिलेला होता तो १८३२ सालीं कंपनीसरकारनें काढून घेतला व त्यास तहाहयात ५० रुपयांचें पेन्शन ठरवून दिलें. या तिघांसहि प्रत्येकी एकेक गांव दिलेला असावा असें वर उद्धृत केलेल्या खंडेराव व गणपतराव यांच्या अर्जावरून दिसतें. पण तीं गांवें कोणतीं ? त्याचा पत्ता अद्याप लागलेला नाहीं.

२ मार्च १७६७ ते ३१ मार्च १७६७ या काळांतील खर्चाची एक नोंद पे. द. भाग ३९ मध्यें पृष्ठ १७१ ते १७८ पर्यंत छापली आहे, ती अशीः—

" राजमंडळ रोजकीर्द स्वारी पंतप्रधान सुरु सबा सितैन खर्च जामदारखान्यांपैकीं स्वारी मातुश्री इ॥ छ १ सवाल ता॥ छ ३० मिनहु.

छ ३० रोज.

खासे चाकरीच्या बाइकांचीं मुलें बनसिंग हैबतराव यास मोइनपैकीं वर्षप्रतिपदेस द्यावें तें गु॥ रामचंद्र नारायण गोरे सनगे एकूण आंख.

१९९। बनसिंग

२००।- हैबतराव "

या नोंदींत बनसिंग आला आहे तोच बनसीसिंग म्हणजे कृष्णसिंग ऊर्फ कुशाबा असावा. हैबतसिंगाचा तो थोरला भाऊ.

नानासाहेबांचे हे तीन्ही पुत्र शूर लढवय्ये होते व त्या प्रत्येकाकडे एकेक पागा दिलेली होती. १७९७ सालीं दुसरा बाजीराव गादीवर आला त्या वेळीं झालेल्या पेशव्यांच्या ५२ पागांच्या मोजदादींत या तिघांच्याहि पागांचा उल्लेख सांपडतो. या लेकवळ्यांवरहि समशेरबहाद्दराच्या घराण्याप्रमाणेंच पेशव्यांचें किती प्रेम होतें तें पूर्वी रमाबाईच्या सतीप्रसंगीं जो उतारा उद्धृत केला त्यांतील हकीकतीवरून दिसून येईल. लक्ष्मणसिंगाबद्दल १७७५ सालचें एक पत्र आहे, तें असें:—

" ॥ श्री ॥

पो छ ११ रा॥वल

खमस सबैन वैशाख

रा. जनार्दन आपाजी गोसावी यासी सु॥ खमस सबैन मया व अलफ– खरगसिंग याचें घर पुण्यांत काळ्या वावरांत आहे तें लक्ष्मणसिंग यास देविलें असे. तरी तें घर याचें स्वाधीन करणें जाणिजे. छ ८ रबिलावल.

कुशाबा ऊर्फ कृष्णसिंग याच्यासंबंधीं एक नोंद अशी सापडते.

पेशवे रोजकीर्द १८-२-१८००

स्वारी पंतप्रधान सुरू मयातेन माहे रमजान शके १७२१ छ २३ रम-जान दफाते पत्र "कृष्णसिंग, येसू खासे चाकरीची बायको इचा लेक यांणीं कसबे शिवापूर येथून जोरी व बाजरी खंडी तीन पुण्यास आणतील त्यास जकात न घेणें."

यशवन्तराव होळकराची पुण्यावर स्वारी होऊन हडपसरच्या लढाईत पेशव्याचा पराजय होऊन तो कोकणांत पळून गेला. त्याबरोबर हे तिघे पागेहि होते. परंतु "सर्वांस माघारें जावे म्हणोन आज्ञा जाली (पेशव्यांची). कृष्ण-सिंग व लक्ष्मणसिंग पुण्यास शनवारवाड्यांत आले. पथकीं लोक बहुतकरून शहरांत आले" (खरे लेखांक ६४७०, पृ. ७५६२)

हैबतसिंग व कृष्णसिंग यांचा होळकरानें पैशाकारितां फार छळ केला. "सर्व होळकरांचे कबजांत आहे. कृष्णसिंग व हैबतसिंग सरकारचे लेकवळे यांस सरकारवाड्यांतून होळकर यांणीं बेअब्रू करून धरून नेलें. त्यावरून अमृतराव साहेबांची होळकरावर मर्जी बहुत खप्पा आहे" (खरे लेखांक ६५३७, पृष्ठ ७६२८).

येथपर्यंत नानासाहेबांच्या अनौरस वंशाची हकीकत सांगितली. नानासाहे-बांचे बंधु सुप्रसिद्ध राघोबादादा. तेहि अतिशय विलासी होते. प्रथम प्रथम

त्यांचे नाटकशाळादिकांचें वेड प्रमाणांत होतें. परंतु पुढें गोहदच्या स्वारी-पासून तें अनावर झालें असे आनंदीबाईचेच उद्‌गार आहेत.

नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीतच दादासाहेबांनीं गृहकलहाला सुरुवात करून राज्याची वांटणी मागण्याचा उपक्रम सुरू केला होता. म्हणून त्यांना कांहीं जहागीरहि तोडून देण्यांत आली होती. अर्थात् त्यांच्या नाटकशाळादि-कांचें किंवा अनौरस संततीसंबंधींचे उल्लेख त्यांच्या खाजगी जमाखर्चांतून सांपडावयाचे. दादासाहेब हे पेशव्यांतर्फे कोठें स्वारीशिकारीस जात तेव्हां त्या स्वारीचे जमाखर्च " स्वारी राजश्री दादासाहेब " या मथळ्याखालीं पे. दप्तरांत सांपडतात. अर्थात् अशा स्वाऱ्यांतहि नाटकशाळांचा लवाजमा दादासाहेबांबरोबर असेच. त्यांचें जनानखान्याचें स्वतंत्र खातेंच असून त्याची व्यवस्था कोणा गुलाबराव ख्वोज्याकडे नेमलेली होती.

दादासाहेबांच्या नाटकशाळांसंबंधीं मिळते ती माहिती अशी—

" अर्बा सबैन—मनुबाई परदेशीण व सुंदराबाई

या दादासाहेबांच्या खास उपस्त्रिया दिसतात. पुण्यांत त्यांना स्वतंत्र घरें होतीं व सर्व खर्च सरकारांतून चाले.

तिस्सा सितैन—दादासाहेबांची नाटकशाळा कृष्णा, तिच्या आईस एक नथ दिली. ६ मोत्यें दाणे व १ माणिक मोती = ७ जडाव दागिना नग १.

दादासाहेबांच्या दुसऱ्या कांहीं कलावंतिणींचीं नावें व त्यांच्या मासिक नेमणुका पुढीलप्रमाणें आढळतात—

" गहिना १५ रुपये, उमेदा ६ रु. यमनी, हेमन्तीची आई ३० रु., वसंतीची आई ४० रु., केशरी चपलेची आई ४५ रु., रत्नरूप केसरीची आई ७ रु., स्वरूप चंद्रसेनेची आई ७ रु., शाभीची आई ७ रु. "

नानासाहेबांच्या व थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दींतील रोजकीर्दीत

ज्या नाटकशाळांचा किंवा खासेचाकरीच्या स्त्रियांचा उल्लेख झालेला आहे, किंवा त्या नाटकशाळांच्या संततीचे जे निर्देश आलेले आहेत ते सर्व नानासाहेबांच्या वंशांतील अनौरस कुटुंबियांचे समजावे. पुढें २५–३० वर्षांनीं दुसरे बाजीराव पेशवे म्हणून पुण्यांत आले, तेव्हांपासूनच्या जमाखर्चांत मात्र नानासाहेबांच्या व बाजीरावसाहेबांच्या लेकवळ्यांची गल्लत झाली आहे व नांवांचीहि पुनरुक्ति झालेली असल्यामुळें कोणाचा कोण हें शोधून काढणें फार कठीण आहे !

नानासाहेबांना पुत्र तीन. विश्वासराव, नारायणराव, माधवराव. पैकीं पहिले दोघे अल्पवयांतच ठार झाले. म्हणून या प्रकरणीं त्यांची वास्तपुस्त करण्याचें कारणच नाहीं. राहतां राहिले थोरले माधवराव. पण ते चिमाजी आप्पांची पवित्र परंपरा चालविणारे निपजले. माधवरावांना असल्या स्वैर करमणुकीचा संपूर्ण तिटकारा कसा होता तें बजाबा पुरंदऱ्यानें आपल्या मुलास लिहिलेल्या मार्गदर्शक अशा एका खाजगी पत्रांतील उल्लेखावरून चांगलें समजून येईल. बजाबा आपल्या मुलास लिहितो–" नाचरंग, गाणें, कथा, सलावणी, नाचवणें या गोष्टी अगदीं करूं नयेत. किंवा कोणी केल्या तर तिकडे जाऊं नये. कारण, रायास (माधवराव) बिलकुल आवडत नाहीं. "

आतां राहतां राहिले सवाई माधवराव. तेहि अल्पवयांतच वारले. त्यांच्या ज्या दिनचर्या बाळपणींच्या उपलब्ध आहेत त्या पाहतां, तेहि पुढें, या बाबीपुरते सुवृत्त निघाले असते, असें वाटत नाहीं. शिवाय ते मेंदूनेंहि कांहीं अधू असावेत. आणि तें स्वाभाविकच होय. नारायणरावांचा खून शनवारवाड्यांत झाला तो भीषण प्रसंग गंगाबाईच्या समक्ष घडला होता. त्या वेळीं ती गरोदर होती. अर्थात् तिच्या मनाला मोठाच धक्का बसला आणि तोच परिणाम तिच्या गर्भांत असलेल्या मुलावर झाला असणें अगदीं स्वाभाविक होय आणि यामुळें सवाई माधवरावाचा स्वभाव तऱ्हेवाईक, संतापी व कुढा बनला असावा. असो.

सवाई माधवरावांच्या नाटकशाळादिकासंबंधीं प्रभाकराच्या पोवाड्यांत पुढील उल्लेख आहे :—

सातशें दासी गुणी नाटकशाळा किती।
पाहातांच प्रभु, कांहीं ओंवाळुनि टाकिती
त्या आतां येजित अन्नास दैन्य भाकिती।
चौदाशें घरगुलाम मुकले ह्या निजपायाला।
चाकर तर लक्षानुलक्ष लागतिल फिरायला ॥

आतां शेवटीं उरला तो आनंदवल्लीचा विषारी तुरा दुसरा बाजीराव. त्याच्या विलासकांडाला कांहीं अटकच नव्हती. त्याचें वर्णन स्वतंत्रपणेंच करावें लागेल. आपणास येथें फक्त त्यांच्या उपस्त्रिया व त्यांची संतती यापुरतेंच पाहावयाचें आहे. म्हणून तेवढ्या नोंदींचीच दखल घेऊं.

"इहिद्देमयातेन—हेमंत नाटकशाळा इला द. म. वेतन ५० रुपये मैना द. म. ४५."

खसमअशर मयातेन—

२०० रु. मैनी कसबीण

३०० रु. लक्ष्मीपरभीण (परभीण नायकिणीचा वाडा शुक्रवार वाड्या-जवळ होता म्हणून यशवंत राजाराम गुप्त्यांनीं पुणें नगर-संशोधन वृत्तांत एके ठिकाणीं उल्लेख केला आहे, तीच ही काय ?) "

शके १७३८—दुसऱ्या एका रमी पराभिणीचा उल्लेख आहे.

इहितदेअशर मयातेन रमजान छ. १.

खासेचाकरीच्या स्त्रिया अनुक्रमें रमा माळीण, गंगी कसबीण, कृष्णी शूद्री, भागीरथी शूद्री, आणि आवडी शूद्री यांचे उल्लेख आहेत.

१७ मार्च १८०० या दिवशीं (फाल्गुन व॥ ७ शके १७२१) खासे

V. P. Bhagwat

चाकरीच्या कांहीं नायकांस खर्चास दिल्याबद्दल नोंदी आहेत. पण त्या सर्वच बाजीरावाच्या, असें वाटत नाहीं. पेशव्यांच्या घरांत या वेळीं नानासाहेबांच्या वेळेपासूनच्या सान्या रक्षांचा एकत्र जथाच जमला असला पाहिजे. यासंबंधांत खऱ्यांच्या ऐ. ले. सं. तील अस्सल पत्रांत एक गमतीदार हकीकत आली आहे, ती सांगण्यासारखी आहे.

बाजीरावसाहेब कमालीचे संशयी आणि द्वेषी. त्यांना कुणाचा संशय येऊं नये असें झालेंच नाहीं. नाना फडणीस, फडके, रास्ते, पटवर्धन मंडळी किंवा जुने सर्व सरदार यांबद्दल त्यांना अविश्वास वाटला तर नवल नाहीं. परंतु सख्खा धाकटा भाऊ चिमाजी आप्पा व थोरला दत्तक भाऊ अमृतराव यांबद्दलहि ते संशयग्रस्त झालेले असत.

" एकास नख लागल्या
दुःख होई त्रिवर्ग भावास "

असें प्रभाकर शाहिरानें दादासाहेबांच्या पुत्राविषयीं जें म्हटलें आहे तें, ते तिघे एकत्र बंदिवासांत होते, तेवढया काळापुरतेंच खरें होतें. पेशवेपदप्राप्तीचा प्रसंग आला तेव्हांपासून गाडें फिरलें. अमृतराव कारस्थानी होता. तो स्वतःला नाहीं तर आपला पुत्र विनायकराव बापू याला पेशवेपद मिळविण्यासाठीं माझी मुंडी मुरगाळील असें बाजीरावाला वाटे. होळकराच्या स्वारींत तसें प्रत्यक्ष जवळ जवळ घडूनहि आलें. चिमाजी आप्पाच्या बाबत तर त्याला यशोदाबाईच्या मांडीवर प्रत्यक्ष दत्तक देऊन कांहीं काळ पेशवाहि केलें गेलें होतें. गादीवर आल्यावर बाजीरावानें तें दत्तविधान रद्द करविलें तरी त्याच्या पोटांत चिमाजी आप्पाबद्दल जी भीति बसली ती कायमचीच. चिमाजी आप्पा वयांत आल्यावर दोघां भावांचा इतका बेबनाव झाला कीं विचारतां सोय नाहीं व बाजीरावाला इंग्रजांना मध्यस्थीस घालून चिमाजी आप्पासाठीं स्वतंत्र नेमणूक करून द्यावी लागली. याच काळांत एकदां चिमाजी आप्पानें

नानासाहेबांचा पक्ष केला. पण् त्याला बाजीराव गेला नाहीं असा प्रसंग घडला. याचा अर्थ असा कीं चिमाजी आप्पा हा दत्तक गेल्यामुळें आपण नानासाहेबांच्याच वंशाचे आहोंत असें समजत होता आणि यामुळेंच बाजीरावाला यशोदाबाईसंबधींहि कायमची धास्ती जडली होती. छत्रपतीला कडक कैदेंत स्वतःच्या हातांत ठेवणें त्याला जितकें आवश्यक तितकेंच यशोदाबाईलाहि कैदेंत ठेवणें आवश्यक होतें आणि त्यासाठींच त्यानें तिची रायगडावर सक्तीनें रवानगी केली. त्या वेळीं तिला तिचें नशीब कळल्यामुळें ती कांहीं केल्या तेथें जाण्यास तयार होईना. बरें, ती तर गतपेशव्याची स्त्री. तिच्या-अंगाला हात लावण्याचें धाडस कोणास होणार ? मागें परशुरामभाऊंनीं चिमाजी आप्पास थेऊराहून उचलून पालखींत घालून सक्तीनें पुण्यास आणिलें. त्या वेळीं परशुरामभाऊंच्या हुकुमानुसार ज्यानें बाल चिमाजी आप्पास पालखींत चढविलें त्याचे नाक कान कापून मार देऊन, पुढें बाजीरावानें सर्व शहरांतून त्याची धिंड काढविली होती. सारांशः— यशोदाबाईच्या अंगाला हात लावण्यास कोण धजणार ? तेव्हां अखेर तें नाजूक काम बाजीरावसाहेबांनीं त्या वेळीं वाड्यांत नानासाहेब पेशव्यांच्या आतां जख्ख म्हाताऱ्या झालेल्या ज्या नाटकशाळा होत्या, त्यांजकरवीं जबरदस्ती करवून उरकलें ! व तें ठीकच होतें. कारण या नाटकशाळा म्हणजे यशोदाबाईच्या आजेसासवाच लागत नव्हत्या काय ?

असो १७ मार्च १८०३ ची ही एक नोंद पाहण्यासारखी आहे :—

" पेशवे रोजकीर्द. मयातैन व अलफ छ. २० सवाल. फाल्गुनव ॥ ७ इंदुवासर शके १७२१ बद्दल देणें.

२४२ रु. खासे चाकरीच्या बाईका यांस गोंधळाबाबत व सुना वगैरे यांस बाळंतपणाबद्दल मिळोन रुपये.

२० रु. गोंधळाबाबत. सन समान तिसैनाप्रमाणें

साल मजकूरचे येक सालाआड पावतात ते यादी रुपये.

१० फुलाबाईस

१० येसूबाईस

—

२०

२२२ बाळंतपणाबद्दल पेशजीचे शिरस्तेप्रमाणें यादीस रुपये. ८० हैबतसिंग, फुला खासे चाकरीची बाइको इचा लेक याची स्त्री हल्लीं कोनीं निघाली सबब मागील दाखल्याप्रमाणें रुपये.

१११ कृष्णसिंग, येसू खासेचाकरीची बाइको इचा लेक याची स्त्री व ल्येक यांस

रुपये ८०. स्त्री हल्लीं कोनीं निघाली सबब.

३१ गंगा ल्येक. हल्लीं दुसरेयानें बालंत झाली सबब बालंतपणाबद्दल खर्चास; पेशजी सीत सितैनांत पावले आहेत त्याप्रो सालमजकुरी रुपये.

३१ सोना, खासे चाकरीची बाइकोची लेक भागीर्थी हल्लीं कोनीं सा॥ रु.

बाजीरावाच्या रक्षा अनेक होत्या व त्याचे इतर स्त्रियांशींहि अनंत अनाचार चालत. यामुळें त्याच्या लेकवळ्यांचें मोठें शिन्दी–बनच तयार झालें असलें पाहिजे खास. तथापि त्यांचा पत्तामुद्धा कांहीं लागत नाहीं. नाहीं म्हणावयास कागदोपत्रीं व जाहीर रीतीनें बाजीरावाचे आपण पुत्र आहों असें म्हणणारें एक घराणें आढळतें. हा वंश म्हणजे राधाबाई नामक स्त्रीचा. ही राधाबाई कोणा एका लाला परदेशाची मुलगी होती. तिच्याशीं कस्यारीबरोबर

श्रीमंतांनीं लग्न केलें. शके १७३६. सन १८०४–०५. " तिजला पुत्र झाले आहेत. ते बाजीराव साहेब यांचें नांव सांगतात. " अशी नोंद "पेशवाईची अखेर" या शकावलींत पृष्ठ १३३ वर आली आहे. या राधाबाईसंबंधींची बाजीरावाच्या खासगी रोजकीर्दीतील नोंद अशी:—

> " १२०० रु. राधा चाकरीची बायको इला. भाद्रपद मास अंगिरा संवत्सर ता।। श्रावण मास श्रीमुख-संवत्सरपावेतों बेगमीचे दरमहा १०० रु. प्रमाणें. "

खडकीची लढाई होऊन सर्वत्र पळापळ झाली त्या आधीं ही राधाबाई आपला वित्तविषय घेऊन सिंहगडास आश्रयाला गेली होती. पण पुढें सिंहगड इंग्रजांनीं जिंकला व लुटालूट केली, त्यांत हिचें सर्वस्व गेलें. पुढें हिच्या मुलानें बाजीरावाशीं असलेलें आपलें नातें सांगून आर्थिक स्वास्थ्य करून मिळण्याबद्दल कंपनी सरकाराकडे याचना केली. तें पत्र एका पेशवेदप्तर खंडांत छापलेलें आहे.

बाळाजी विश्वनाथाचे लेकवळे भिकाजी शिंदे यांच्या वंशजांविषयीं शोध होणें आवश्यक आहे, असें आम्हीं म्हटलें आहे. सुदैवानें त्या घराण्याचा शोध लागण्यासारखी कांहीं हकीकत भा. इ. सं. मंडळाच्या ऐ. सं. सा. खंड ५ मध्यें आढळली. श्रीयुत कृष्णाजीपंत पुरंदरे यांनीं ' सासवडच्या एका शिन्दे घराण्याची अपूर्व अशी माहिती ' कांहीं कागदपत्रांनिशीं छापली आहे. तीवरून पाहतां सासवडचें तें शिंदे घराणें हेंच या भिकाजी शिंद्याचें घराणें असावें, असा संशय वाटतो. बाळाजी विश्वनाथ सासवडासच राहत होते व तेथेंच त्यांची समाधीहि आहे. बाळाजी विश्वनाथाबरोबर उदयास आलेले त्यांचे पिढीजाद स्नेही घराणें पुरंदऱ्यांचें ! तेहि सासवडासच होते. पेशव्यांचे दिवाण हे पुरंदरे ! अर्थात् बाळाजी विश्वनाथाच्या या लेकवळे घराण्याचे

कारभारीपणहि पुरंदऱ्यांनींच केलें! अंबाजीपंत पुरंदऱ्यांच्या चुलत भावाचा मुलगा खंडो गोमाजी पुरंदरे याला या शिंदे घराण्याचा मुजुमदार म्हणून नेमून दिलें होतें. अंबाजीपंत पुरंदऱ्याप्रमाणेंच त्यांच्या या चुलत घराण्यानें बाळाजी विश्वनाथाच्या बरोबर औरंगजेबी धामधुमींत महत्त्वाच्या कामगिऱ्या केल्या होत्या.

संशोधक कृष्णाजीपंत पुरंदऱ्यांनीं या सासवडकर शिंदे घराण्याची जी वंशावळ दिली आहे ती भिकाजी शिंद्यांपासूनच सुरू होते. फक्त भिकाजीस राणोजी नांवाचा वडील भाऊ होता असें दिसतें. वंशावळ अशी—



कृष्णाजीपंत पुरंदरे लिहितातः—

" सासवडास भैरोबाजवळ दक्षिणेस एक भेंडयांचें आवार आहे. त्यास लोक शिंद्याचा वाडा म्हणतात. हल्लीं तो वाडा जवळजवळ पडीक असून तो कोणाहि शिंद्याच्या ताब्यांत नाहीं. हें शिंदे घराणें पेशव्यांचे पागे होते व पेशव्यांनीं त्यास सरंजामी सरदार करून त्यास स्वतःतर्फेचे फडणीस मुजूमदार व कारभारीहि नेमून दिले होते. "

आम्ही पूर्वी भिकाजी शिंद्याला मौजे हिंगणगांव स

विश्वनाथानें लावून दिल्याचें सांगितलें आहेच. हें हिंगणगांव म्हणजे बाळाजी विश्वनाथाला थोरातानें कोंडून घातलें होतें, तेंच होय. पुढें बाळाजी विश्वनाथानें हिंगणगांवची गढी खणून जमीनदोस्त करून थोराताचें पारिपत्य केलें. तेंच हिंगणगांव त्यानें आपला अनौरस पुत्र हा भिकाजी शिंदे यास सरंजामांत लावून दिलें. भिकाजी शिंदे हा तल्वारबहाद्दर असून थोरल्या बाजीरावाबरोबर त्यानें अनेक स्वाऱ्याशिकाऱ्या केल्या. त्याचाच पुत्र तुकोजी शिंदे हा पानपतास भाऊसाहेबाजवळ एकनिष्ठपणें लढून खस्त झाला. पानपतच्या पोवाड्यांत त्याचा असा गौरव केला आहेः—

" सोनजी भापकर, मानाजी पायगुडे रणीं टाकिले घोडे,
तुकोजी शिंदे पडले पायापुढें जैसे अग्नीचे हुडे "

भाऊसाहेबांच्या बखरींत तुकोजीच्या एकनिष्ठतेची व शौर्याची पुढीलप्रमाणें हकीकत सांगितली आहेः—

" उपरांतिक चार घटिकांपर्यंत भाऊसाहेबांनीं हुजुरातीनिशीं मारामार केली; परंतु डावे बाजूनें हातच सोडिले ! आभाळ फुटतें तेथें ठिगळ कोठवर लावावें ? मग भाऊसाहेब घोड्यावरून पायउतारा जाहाले. भाऊसो यांचे तोंडास ' हाणा हाणा ' हेंच करीत असतां खरस आली. जातीनिसीं मोठा हिया करून बहुतच झुंजले तें कोठवर लिहावें ? सरकारचे मुछदी तमाम मातबर कुल एकीकडे पळून गेले. ते समयीं सोनजी भापकर यासी भाऊसाहेब बोलिले कीं, " सोनजीबाबा ! या समयीं निघावयाचें नव्हतें. तुमचा भरंवसा बहुतच धरिला होता. " तेव्हां सोनजीबाबा बोलिला कीं, " लोक पळतात त्यांस माघारे फिरवितो. साहेबास टाकून आम्हीं कोठें जावें ! " असें बोलून लोक फिरावयासी गेले !! तिकडेच गेले. तेव्हां तुकोजी सिंदे म्हणों लागले कीं, " महाराज, क्षत्रधर्माची शर्थ जाहाली. याउपरी निघाल तर उत्तम आहे. " तेव्हां भाऊसोनीं उत्तर केलें कीं, " तुकोबा! आतां कोणीकडे

जावें ! काय तोंड नानासाहेब यांस दाखवावें ? रावसाहेबांची गत काय जाहाली ती पाहावी आणि इभ्रामखान गाडदी यास इमान दिलें तें काय ?" असें ऐकोन मागतीं तुकोजी सिंदे यांनीं उत्तर केलें कीं " भाऊसाहेब ! तुम्ही वांचलां तरी आवघ्यांचा सूड घ्याल. नाहीं तरी तुमचे मागें आवघ्याच गोष्टी आटपल्या. " असें ऐकून मागतीं भाऊसो बोलिले कीं, " पुण्यांत नानासाहेबांस तोंड काय म्हणोन दाखवावें ? विश्वासराव याची गत असी. त्यापेक्षां निघावयाची गोष्ट घडणार नाहीं. रणाचे ठायीं ईश्वरसत्तेनें जें घडणार असेल तें घडो, परंतु कदापि नामोहरम व्हावयाचें नाहीं. " असें म्हणतांच तुकोजीबाबा यांणीं घोड्यावरून उडी टाकिली आणि जातीनिसीं हत्यार केलें. तेथें मोठीं मर्दुमी करून मराठी धर्माची शर्थ करून खस्त केली. तों अकस्मात गोळी लागोन ठार जाहाला ! "

: २ :

हैदरअल्लीचें अद्भुत चरित्र

उत्तरपेशवाईच्या राजकारणांत संबंध येणाऱ्या व्यक्तींत हैदरअल्ली ही एक असामान्य अशी व्यक्ति होऊन गेली. सामान्य स्थितींत असतां आपल्या अलौकिक कर्तबगारीनें त्यानें म्हैसूरचें राज्यपद आक्रमिलें व स्वतःच्या घराण्याची राजपरंपरा निर्माण केली. मराठ्यांना व इंग्रजांना दोघांनाहि तो असह्य शल्यासारखा होऊन बसला होता, ह्यांतच त्याच्या असामान्य व्यक्तित्वाची व अलौकिक कर्तबगारीची कसोटी लागली आहे. परदेशस्थ युरोपियनांनींहि ज्यांचें कर्तृत्व पाहून दिपावें आणि ज्यांचे चरित्रग्रंथ लिहिण्यास उद्युक्त व्हावें अशा ज्या अत्यंत थोड्या, हाताच्या बोटांवर मोजाव्या इतक्याच थोड्या व्यक्ति आहेत, त्यांत शिवाजी महाराज, नाना फडणीस आणि हैदरअल्ली यांचाच तेवढा समावेश होतो ! परकीय युरोपियन लोकांनीं लिहिलेली शिवाजी महाराजांचीं सहा चरित्रें आहेत व तीं डॉ. सेन यांनीं Foreign Biogra-

phies of Shivaji या नांवानें ग्रंथरूपानें प्रसिद्ध केलीं आहेत. ग्रँट डफ, एल्फिन्स्टन यांनीं केलेली नानांची प्रशस्ति प्रसिद्धच आहे. पण जनरल ब्रिग्ज व मॅकडोनाल्ड यांनीं तर मुद्दाम साधनें जमवून नाना फडणिसांचें इंग्रजी चरित्र लिहून ठेवलें, तेंहि प्रसिद्ध आहे. हैदरअल्लीचें असेंच एक अप्रतिम चरित्र त्याच्या एका फ्रेंच सेनापतीनें हैदराच्या हयातींतच लिहिलें आहे. तेंहि अत्यंत विश्वसनीय व हैदराचें असामान्यत्व यथातथ्य प्रकट करणारें असें आहे. हैदराची खरी योग्यता मराठी इतिहाससंशोधकांपैकीं कै. खरेशास्त्री यांनींच मराठी वाचकांना प्रथम पटवून दिली. त्यांनीं तर अनेक बाबतींत हैदराची शिवाजी महाराजांशीं तुलना केलेली आहे. अशा या व्यक्तीचें अद्भुत चरित्रचित्र त्याच्या फ्रेंच जनरलनें लिहिलेल्या चरित्राधारें येथें रेखाटीत आहों, तें अगदीं नवीन वाटण्यासारखेंच आहे.

हैदरला 'हैदरशहा' किंवा 'हैदरअल्लीखान' अशीं नांवें आहेत. आज नक्की त्याची उमर किती वर्षांची आहे हें सांगणें कठीण आहे. तथापि त्याला अगदीं लहानपणापासून ज्यांनीं पाहिला अशा वृद्ध लोकांच्या सांगण्यावरून त्याचें वय ५४ किंवा ५६ असावें. त्याची उंची पांच फूट सहा इंच आहे. चांगला आडव्या अंगाचा आहे. तथापि फार चपळ आहे. कष्टाचें त्याला कांहींच वाटत नाहीं. पायानें चालण्याचें असो किंवा घोड्यावरून मजली मारण्याचें असो, तो बिलकूल थकत नाहीं. नेहमीं उन्हातान्हांत फिरण्याची त्याला संवय असल्यामुळें त्याचा वर्ण गौर राहिलेला नाहीं. राकट, काळासावळा झाला आहे. हैदरचे नाकडोळे रेखीव किंवा सुंदर नाहींत. नाक तर लहानच आहे व खालचा ओंठ बाबर म्हणजे बराच जाड दिसतो. मुसलमान म्हणजे बहुधा त्याला दाढी आणि मिशा असावयाच्याच, पण हैदरनें दोघांनाहि रजा दिलेली आहे. हिंदुस्थानांतील लोकांच्या नेहमींच्या रिवाजा-प्रमाणें तो स्वच्छ पांढरा अंगरखा आणि पांढरें पागोटें वापरतो. मात्र अंग-

रखा पागोटें भारी उंची मलमलीचे असतें एवढेंच. या देशी राजांचे अंगरखे इतके लांबलचक पायघोळ असतात कीं ते जमिनीवर लोळतात. ते तसे लोळूं-नयेत म्हणून ते उचलून धरण्याकरितां हुजरे असतात !

लष्करांत असला म्हणज मात्र हैदराचा एक निराळा लष्करी गणवेष आहे. तो तो वापरतो. हा गणवेष त्यानेंच आपल्या सरदारांसाठीं स्वत: निवडून काढला आहे. पांढऱ्या साटिनीचा जाकिटासारखा हा तुस्त अंगरखा असतो. त्यावर नक्षीचीं फुलें काढलेलीं असतात व त्याला पिवळे बंद आणि गोंडे असतात. पायांतले बूटहि पिवळ्या मखमलीचे असतात. हैदर या लष्करी गणवेषांत असला म्हणजे तो कमरेला पांढरा शेला गुंडाळतो. लष्करांत असतां त्याचें पागोटें किंवा मंदिल तांबडें किंवा गुलाबी असतें. पायीं चालत असतां सोन्याच्या मुठीची छडी तो हातांत वागवतो आणि घोड्यावर असतो तेव्हां त्याच्या कमरेला एक रत्नजडित तरवार लटकत असते. हैदराला हिरेमाणकांचा किंवा दागदागिन्यांचा बिलकूल शौक नाहीं. त्याच्या गळ्यांत कधींहि साधी मोत्याचीसुद्धां माळ दिसावयाची नाहीं किंवा पोहची-सारखा कसलाहि अलंकार त्याच्या हातावर दिसावयाचा नाहीं. शेंपन्नास हातांचें जंगी पागोटें तो घालतो, पण वरून तें पागोटें सपाट दिसतें. त्याचे जोडे फार मोठे असतात व बोटाकडे ते निमुळते होऊन विंचवाच्या नांगीसारखे मागें वळलेले असतात.

हैदरचा चेहरा सुंदर देखणा नाहीं म्हणून वर सांगितलेंच आहे. परंतु त्याच्या चेहऱ्याकडे पाहतांच ह्याचा स्वभाव उमदा, मनमोकळा असावा, अशीच कोणाचीहि भावना होते. आपले मनोविकार दाबून ठेवणारा, कपटी दरबारी मुखवटा त्याचा नाहीं. मायाममता, रागलोभ त्याच्या चेहऱ्यावर तत्काळ प्रतिबिंबित झाल्याशिवाय राहत नाहींत. संभाषणाची कला त्याला फारच चांगली साध्य आहे. वाटेल तो विषय असेना, तो त्यांत

अस्खलितपणें संभाषण करूं शकतो. शिवाय त्याच्या संभाषणांत एरवीं इतर राजे लोकांच्या बोलण्यांत जी उसनी ऐट किंवा दरबारी साफसफाई असते तशी बिलकूल सांपडावयाची नाहीं. अगदीं अनोळखी परक्या इसमाशीं बोलणें करावयाचें असतें त्या वेळीं सुरुवातीस हैदर मोजून मापूनच बोलतो. परंतु थोडी जानपछान होतांच तो आपल्या रंगांत येतो आणि मग त्याच्या चर्चेला अविषय असा कोठलाच राहत नाहीं. राजे लोक म्हणजे काय मोजून-मापून तोलून तोंडांतून शब्द काढावयाचे, पण हैदरजवळ तसलें कांहीं नाहीं. तो स्वतःच प्रश्न विचारून माहिती विचारील किंवा लोकांना ती स्वत: सांगेल. एखादें पत्र आलें असलें तर 'वाच' असें म्हणून तें ऐकून घेईल किंवा 'असें असें या पत्राचें उत्तर लिही' म्हणून लगेच त्या उत्तराचा मसुदा सांगावयास लागेल. नाचतमाशांत तो इतरांसारखा आवर्जून जाऊन बसेल. एवढेंच नव्हे तर, सामान्य प्रेक्षकाच्या कुतूहलानें त्यांतील प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याची जिज्ञासा तो दाखवील. कदाचित् या वेळीं त्याच्या डोक्यांत कांहीं मोठ्या महत्वाच्या राजकारणाची जुळवाजुळवहि सुरू असेल. परंतु पाहणाराला वाटेल कीं हैदर समोरच्या नाचगाण्यांत किंवा तमाशांत तल्लीनच झाला आहे.

रयत असो वा कोणी परमुलुखांतला परका असो, त्याला हैदरची भेट केव्हांहि मिळूं शकते. इतर राजेरजवाड्यांप्रमाणें येथें परवानग्या, रसानग्या किंवा वशिलेबाजी लागत नाहीं. परक्या लोकांना तर त्याच्या रयतेपेक्षांहि त्याचें दर्शन सुलभ असतें म्हणाना! मग त्याचा दर्जा कितीहि लहान सामान्य असो. त्यानें राजवाड्याच्या चौकीवर जे कोणी चोपदार किंवा छडीदार असतात त्यांना नुसतें आपलें काम सांगावें, म्हणजे झालें. लगेच त्याची वर्दी लागून त्याला बोलावणें येते. फक्त फकिरांना मात्र हैदर आपल्या जवळ येऊं न देण्याची दक्षता बाळगतो. हिंदुस्थानांतील इतर राजेरजवाड्यांचे दरबारांत या फकिरांचें केवढें प्रस्थ असतें! ते त्यांचे किती देव्हारे माजवितात!

फकीर म्हटला म्हणजे त्यानें कोणत्याहि क्षणीं बेलाशक राजाकडे जावें, त्याला कधीं रात्रता बंद नसावयाचा. कित्येक वेळां तर अशा अवेळीं आलेल्या फकिराला आपल्या पानाशेजारीं पान मांडून त्याला जेवावयास बसविण्यांत येतें. पंक्तींत पहिल्या पानाचा मान त्यांना देण्यांत येतो. मग ते फकीर महिना-महिन्यांत आंघोळ न केलेले आणि कपड्यांत उवा झालेले अमंगळ कां असेनात! हैदरजवळ फकिरांची डाळ शिजत नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं तो त्यांना धर्म करीत नाहीं किंवा त्यांचा समाचार घेत नाहीं; परंतु तो त्यांना नसतें महत्त्व देत नाहीं, इतकेंच. एरवीं कोणी फकीर आला असतां तो त्याला पीरजाद्याकडे पाठवून देतो व पीरजाद्यामार्फत त्या फकिराला कपडालत्ता, भिक्षा, देणगी काय मिळावयाचें असतें तें मिळतें.

आपल्या मुत्सद्द्यांशीं कांहीं खलबत करावयाचें असेल तर, किंवा नाचतमाशा, गाणेंबजावणें यांची बैठक असेल तरच हैदर जागतो, नाहीं तर मध्यरात्र होतांच तो निद्रा घेण्यास जातो. त्याला झोप फार थोडी पुरते. सूर्योदयाबरोबर उठून पुन्हा तो उद्योगास लागतो. सकाळचें पहिलें काम म्हणजे रात्रीच्या चौक्यांचें आणि पलंगपहाऱ्यांचे नाईक असतील ते येऊन मुजरा करतात व रात्रीचा रिपोर्ट देतात. मग त्यांच्याजवळच आपल्या दिवाणाला किंवा मानकऱ्यांना जे काय हुकूम किंवा निरोप सांगणें असेल तें तो सांगतो. नंतर जासूद व हरकारे ठिकठिकाणच्या बातम्या, पत्रें किंवा निरोप घेऊन आलेले असतात ते आंत येऊन हैदरच्या पायांशीं थैल्या, पत्रें, लखोटे सादर करतात व मुखजबानीनें काय सांगावयाचें असेल तेंहि निवेदन करतात. येथून पुढें दिवसभर कामाचा रगाडा सुरू असतो. उसंत किंवा फुरसत बिलकुल सांपडत नाहीं. नाहीं म्हणावयास श्मश्रु, चंपी, हमामखान्यांतील स्नान वगैरेंचा हैदरला विशेष शौक आहे आणि त्या कार्यांत मात्र कमींत कमी त्याचे दोन किंवा तीन तास तरी सहज मोडतात. पण त्यांतीलहि पुष्कळसा

वेळ त्याचे न्हावीच खातात. हैदरच्या दाढींतले पिकलेले केस चिमट्यानें उपटून काढणें हीहि त्यांतली एक महत्त्वाची बाब असते !

तथापि हेंहि सांगितलें पाहिजे कीं, ही हैदराची चैन फक्त राजधानींतील राजवाडयांत मुक्काम पडेल तेव्हां. पण तो लष्करांत किंवा मोहिमेवर असला म्हणजे या शौकाची त्याला आठवणसुद्धां होत नाहीं.

साधारणतः सकाळीं नऊ वाजल्यावर हैदर आंतरगृहांतून बाहेर पडतो आणि हुजूर कचेरींत कामासाठीं जाऊन बसतो. तेथें अनेक खात्यांचे चिटणीस आपापले कागद घेऊन वाट पाहात बसलेलेच असतात. आलेलें सर्व टपाल आधीं स्वतः वाचून स्वतःबरोबरच आणलेलें असतें. त्यांतून ज्याचीं त्यास पत्रें तो देतो व तोंडानें शेरेदोरेहि सांगतो. लगेच चिटणिसाचे कारकून ते उतरून घेतात. एवढें होत आहे तों हैदरचे राजकुमार, निकटचे नातलग आणि प्रेमांतले व विश्वासांतले सरदार असतील ते मुजऱ्यास येतात. नंतर त्यासमवेत हैदर 'छोटी हजेरी' किंवा फराळ करतो. ते उरकल्यावर फुरसत असली तर तो राजवाडयाच्या गच्चींत जाऊन उभा राहतो. त्याच्या पीलखान्याचा आणि पागेचा तेथें मुजरा व्हावयाचा असतो. हत्ती अर्धवर्तुळाकार उभे राहून आपला मुजरा करतात. हत्ती-घोडयांची पाहणी झाल्यावर शिकारखान्यांतले शिकारी चित्तेहि नजरगुजारीसाठीं तेथें आणले जातात. या चित्त्यांच्या पाठीवर हिरव्या मखमलीच्या जमिनीपर्यंत पोचणाऱ्या झुली घातलेल्या असतात आणि डोक्यावर भरजरी कापडाची शिरी किंवा टापणी ठेवलेली असते. ही टापणी अशाकरितां कीं चित्त्यानें कांहीं चलबिचल दाखविली तर ती लगेच त्याच्या डोळ्यांवर ओढता यावी. हे चित्ते तसे पूर्ण माणसाळलेले व शिकविलेले असतात. हैदर स्वतः आपल्या हातानें त्यांना घास देतो तेव्हां तेहि आपला पंजा पुढें करून तो स्वीकारतात. या चित्त्यांना रोजीं मुद्दाम बाजारांतून गर्दीच्या ठिकाणीं, त्यांना संवय व्हावी

म्हणून फिरवून आणण्याची वहिवाट आहे. चित्ते असे माणसाळतात, परंतु वाघ मात्र माणसाळत नाहीं. हैदरजवळ एक नामांकित जंगी पटाईत ढाण्या वाघ आहे. परंतु त्याला अशा रीतीनें माणसाळाविण्याचे त्याचे सर्व प्रयत्न आतांपर्यंत फुकट गेलेले आहेत.

इतके सगळे विधि उरकले म्हणजे हैदर मुख्य दरबार–कचेरींत जाऊन बसतो. तो लष्करांत असेल त्या वेळीं ही कचेरी एखाद्या डेऱ्यांत किंवा राहुटींत होते. या वेळीं राजपुत्र किंवा निकटचे नातलग त्याच्या डाव्या उजव्या अंगास हजर असण्याची शिस्त आहे. या कचेरींत परवानगी नसलेल्या लोकांनाहि शुक्केदारामार्फत आपलें विनंतिपत्र देऊन प्रवेश मिळवितां येतो. शुक्का म्हणजे पत्र आणि शुक्केदाराचें कामच हें कीं हातांत येईल तें पत्र हैदरला वाचून दाखवावयाचें. इतर देशी राजांच्या रियासतींत अशी सामान्यतः पद्धत असते कीं, दाद मागणाऱ्यानें अर्जद्वारें राजास भेटून मग त्याला आपलें गाऱ्हाणें सांगावें. परंतु राजा रस्त्यांत जात-येत असतांना सहसा त्याला अडवूं नये. फारच महत्त्वाचें निकडीचें काम असेल तर निराळें. परंतु हैदरचा खाक्या तसा नाहीं. तो म्हणतो, " मी उभा असेन तेथें न्यायकचेरी उभीच आहे व अन्यायाची दाद तत्क्षणीं लागलीच पाहिजे. " यासंबंधींचें एक नमुनेदार उदाहरण मुद्दाम सांगण्यासारखें आहे तें सांगतों. १७६७ सालांतील गोष्ट. त्या वेळीं हैदरचा मुक्काम कोईमतुरास पडला होता. एक दिवस सायंकाळीं त्याची स्वारी हवा खाण्यासाठीं सहलीला बाहेर पडली. इतक्यांत वाटेंतच एक म्हातारी आडवी आली. व "दाद दाद" असें ओरडत तिनें साष्टांग दंडवत घातले. हैदरनें तत्काळ आपला रथ उभा केला आणि त्या म्हातारीला जवळ बोलावून घेतलें. "काय तुझी फिर्याद?" असें विचारतांच म्हातारी रडूं लागली. ती म्हणाली, " महाराज, माझी म्हातारीची काठी, माझी एकुलती एक लाडकी मुलगी, तुमच्या आगा महंमद

सरदारानें पळवून नेली आहे, याचा न्याय करा." हैदर म्हणाला, " असें कसें होईल ? आगा महंमद येथून रवाना झाल्याला तर एक महिना झाला आणि हा एक महिना तूं तरी स्वस्थ कशी बसलीस ?" त्यावर ती म्हातारी म्हणाली, " मी कितीतरी अर्ज हैदरशहाच्या हातीं आपणांस देण्याकरितां दिले. पण दादच लागेना. मग काय करूं ? " हा हैदरशहा, हैदराचा मातबर सरदार, तो स्वारीच्या आघाडीस होताच. त्यानें येऊन हैदरास म्हटलें, " परवरदिगर ! ही थेरडी शुद्ध कुंटीण असून ती त्या पोरीवर धंदा करीत असते. हिचें कुभांड मनावर घेऊं नये." पण हैदरनें तें ऐकलें नाहीं. लगेच त्या बाईस घेऊन तो परत आपल्या मुक्कामास आला. सर्व दरबारी लोकांची उत्कंठा शिगेस पोचली. आगा महंमदसारखा हैदरच्या गळ्यांतील प्रत्यक्ष ताईत असणारा सरदार, गुन्हेगार ! त्याचें पारिपत्य कसें होणार, हेंच ज्याला त्याला कुतूहल. आगा महंमदाच्या वतीनें रदबदली करण्याची एकाहि दरबाऱ्याला हिंमत होत नव्हती. अखेरीस खुद्द हैदरच्या पुत्रानें तें काम पत्करलें. पण तेंहि कसें तर हैदरच्या मुख्य कवायती कंपूचा जो फ्रेंच अंमलदार होता त्याच्यामार्फत हैदरला विनंति करून !

पण त्या अंमलदाराचीहि विनंति हैदरनें मान्य केली नाहीं. तो म्हणाला, " राजाकडे दाद मागत असतां प्रजाजनाला अडथळा करणें यासारखा भयंकर गुन्हा मी दुसरा कोणताच मानीत नाहीं. गरीब निर्बळ जनतेला, न्याय मिळवून देणें हेंच थोरांचें, बलिष्ठांचें कर्तव्य असलें पाहिजे. देवाखालोखाल गरीबगुरीबांना राजाखेरीज दुसरा कोणता त्राता असणार ! आणि जो राजा आपल्या प्रजेला होणारा जुलूम डोळे झाकून पारिपत्याशिवाय दृष्टिआड करतो, त्या राजाविरुद्ध लोकांनीं बंडें केलीं तर त्यांत काय आश्चर्य ? " असें म्हणून लष्कराच्या भर परेडींत प्रथम हैदरशहाला सर्वांसमक्ष दोनशें कोरडे मारण्याचा हुकूम त्यानें सांगितला आणि आपल्या खास हबशीपागेच्या अधिकाऱ्याला

हुकूम दिला कीं, " पागा घेऊन आगा महंमद जेथें असेल तेथें जा. जर ती मुलगी तुम्हांस तेथें सापडली तर तिला या म्हातारीकडे पोचती करा आणि आगा महंमदची गर्दन छाटून त्याचें मुंडकें मला पाहण्यासाठीं इकडे पाठवून द्या ! " हुकुमाप्रमाणें दोन्ही गोष्टींची अंमलबजावणी झाली तेव्हांच हैदर शांत झाला.

आगा महंमद साठ वर्षांचा कदीम विश्वासू मातबर अधिकारी. हैदरशहाच्या आधीं पंचवीस वर्षेपर्यंत त्यानें हैदरच्या दादखात्याचें काम केलेलें आणि त्यासाठीं हैदरनें त्यावर खूष होऊन त्याला मोठी थोरली जहागीर दिली होती. परंतु त्याचा शेवट असा व्हावयाचा होता ! इतक्या म्हातारपणीं त्या म्हातारीच्या पोरीच्या सौंदर्यानें तो खुळावला. वास्तविक ती म्हातारी वेश्येचाच धंदा करणारी होती. आगा महंमदनें ती पोर तिजकडें विकत मागितली होती. परंतु म्हातारीचें जीवन तिच्यावर असल्यामुळें ती त्यास विकीना, म्हणून आगा महंमदनें तिला पळवून नेलें होतें. परंतु स्त्रीला तिचे इच्छेविरुद्ध पळवून नेणें किंवा तिच्यावर जुलूम करणें हा कुराणांत महा भयंकर अपराध सांगितलेला आहे व म्हणूनच हैदरनें आगा महंमदचें इतकें कठोर पारिपत्य केलें. !

हैदरच्या दरबारकचेरीसंबंधीं सांगतांना त्याच्या न्यायनिष्ठुरतेसंबंधानें आठवली ती गोष्ट सांगितली. आतां पुन्हा त्या कचेरीचा धागा जोडतों. या दरबारकचेरींत निरनिराळ्या खात्यांचे तीस-चाळीस चिटणीस आपापले कारकून घेऊन सारखे लिहीत बसलेले असतात. जासुदांचा आणि हरकाऱ्यांचा हैदरचा तडाका मोठा विलक्षण आहे. क्षणाक्षणाला ठिकठिकाणांहून बातम्या किंवा जाबजबाब घेऊन जासूद येत असतात. जासूद आला म्हणजे ललकारणी होते आणि मग तो जासूद आपल्या थैल्या हैदरच्या पायाशीं नेऊन ठेवतो. हैदरनजीक त्याचा एक चिटणीस खुरमांडी घालून तयारच

असतो. तो तीं पत्रें वाचून दाखवितो कीं लगेंच काय उत्तर असेल तें हैदर सांगतो. आणि मग तीं मूळ पत्रें दिवाण कचेरींत दाखल होण्यासाठीं जातात. हैदरकडून जाणाऱ्या पत्रावर हैदर स्वतः आपला शिक्कामोर्तब करतो. ज्यावर तो स्वतः सही करतो अशीं पत्रें मुख्य चिटणीसांकडे रवाना करण्यासाठीं दिलीं जातात. फार महत्त्वाचें किंवा खाजगी पत्र असेल त्यावर हैदर आपल्या बोटांतील अंगठीनें मोहोर करतो, एवढेंच नव्हे तर तीं स्वतःच्या हातानें हरकाऱ्यांच्या हवालीं करतो. पत्राबरोबर दुसरा एक खुला कागद जोडलेला असतो. त्यावर पत्राच्या रवानगीची वेळ व अखेर तें पत्र मुक्कामास पोंचेल ती वेळ नमूद करावयाची असते. नव्या हत्ती-घोड्यांची किंवा तोफा जरबांची खरेदीहि याच दरबार-कचेरीच्या वेळीं होत असते.

हा झाला कचेरीचा दरबार. खुला दरबार म्हणून जो असतो तो निराळा. तो सायंकाळीं भरतो. त्याला सर्व लहानमोठे सरदारदरकदार आणि हैदरच्या दरबारीं असलेले परदरबारचे वकील किंवा त्यांचे मुतालिक हजर असतात.

सायंकाळीं हैदर आपल्या शिपायांची कवायत पाहतो. त्यानंतर अंधार झाला कीं शेंकडों मशालजी आपापल्या मशाली पेटवून राजवाड्यांतील रोषणाईसाठीं येतात. पण आधीं आपल्या मशाली हातांत धरून मोठ्या शिस्तींत ते हैदरला मुजरा करून आपल्या कामास जातात. खाशा हैदरच्या दालनांतून शेंकडों हजारों उंची विलोरी झुंबरें आणि हंडया असतात. त्यांतून दिवे लावणें हें मोठें कौशल्याचें व जबाबदारीचें काम आहे. हंडया-झुंबरांप्रमाणेंच कोठें कोठें मोठमोठे कांचेचे कंदील ठेवलेले असतात. हैदरच्या राजवाडयांतील सर्व दालनांतून उंची इराणी गालिचे अंथरलेले असतात. सतरंज्यांवर सर्वत्र मलमलीचा सफेद सरपोस चढविलेला असतो. हैदरला शुभ्र पांढऱ्या रंगाचीच फार आवड दिसते. उंची वेलबुट्ट्या काढलेले मख-

मली कोच, लोड, तक्के, तिवाशा यांवरहि सफेद अभ्रे चढविण्याचा हुकूम असतो.

बहुधा रोज रात्रीं राजवाड्यांत तमाशा होतोच होतो. तो आठ वाजल्यापासून मध्यरात्रीपर्यंत चालतो. मग त्यांतच गायन किंवा नुसते नाचहि असतात. नाच चालू असतांना अरबसबेगी म्हणून अधिकारी असतात ते, सरकारी पाहुण्याजवळ हजर राहून मोठ्या अदबीनें तमाशांत चाललेला कथाभाग किंवा त्यांतल्या मौजा समजावून देतात. तसेंच पाहुण्यांना शरबत, मिठाई किंवा फळफळावळहि लागल्यास पुरवितात. व्यक्तिशः हैदरला तमाशांची रुचि वाटत नाहीं. तमाशा चालू असतां तो आपल्या कारभाऱ्यांशीं राजकारणी बातचीत करीत असतो. तमाशा किंवा मैफल संपली म्हणजे मोठमोठ्या हाऱ्यांतून फुलांचे गजरे किंवा गुच्छ आणले जातात. त्यांतले कांहीं गुच्छ हैदर स्वतःच्या हातानें आपल्या पाहुण्यांस देतो. नंतर मग त्या परड्या तमासगीर लोकांत व प्रेक्षकांत फिरविण्यांत येतात. प्रत्येकानें त्यांतलें एकेक फूल उचलून जागेवरूनच हैदरला अदबीनें अभिवादन करावयाचें असतें. कोणाचा विशेष सन्मान करावयाचा असतां हैदर जाईच्या फुलांचा तुरा आपल्या हातानें त्याच्या पागोट्यांत किंवा मंदिलांत खोवतो. हा अर्थातच सर्वोच्च सन्मान समजण्यांत येतो. युरोपियन लोकांबद्दल व विशेषतः फ्रेंचांविषयीं हैदरची भक्ति प्रसिद्ध आहे. त्यांना हें पारितोषिक वारंवार मिळत असतें. ज्याचा हैदरकडून असा सन्मान होतो, त्याच्या घरीं दुसरे दिवशीं सर्व दरबारी लोकांनीं जाऊन त्याच्या सद्भाग्याचें अभिनंदन करण्याची पद्धति इकडे रूढ आहे.

लढाईत फत्ते झाली असली किंवा दुसरी कांहीं तशीच महत्त्वाची घटना घडली असली तर दरबारच्या आश्रित शाहिरांना बोलावून त्यावर रचलेला पोवाडा ऐकण्याचा कार्यक्रम मुद्दाम दरबार भरवून करण्यांत येतो. हा शाहीर

दरवाजापासूनच हैदरची बिरुदावली ललकारत येतो. शाहिराच्या ललकारीबरोबरच दरबारांतील सर्व प्रेक्षक गप्प होतात. दरबारांत चालू असलेला नाचहि थांबतो. शाहीर हैदराच्या पुढ्यांत त्याच्या नियुक्त जाग्यावर बसतो आणि आपला पवाडा गाऊन दाखवूं लागतो. पवाडा हा अर्थातच राजाच्या स्तुतिपर असावयाचा. तोंडावर होणारी आत्मस्तुति ऐकणें शिष्टमान्य समजलें जात नाहीं. सबब पवाडा सुरू असतां त्याकडे आपलें लक्षच नाहीं असें भासवीत हैदर आपल्या दिवाणाशीं हलकें हलकें संभाषण करीत राहतो. उलटपक्षीं राजाच्या स्तुतीचा पोवाडा, तेव्हां तो अगदीं लक्ष देऊन ऐकण्याचा देखावा सर्व दरबारी लोकांनीं करणें भागच असतें. तेव्हां ते अगदीं तन्मय झाल्यासारखे पवाडा ऐकत बसतात. असल्या पवाड्यांतून राजाच्या उल्लेखानंतर त्याच्या सरदारांची, सेनापतीची आणि त्याच्या आवडत्या चाकरांचीहि नामावळी असावयाचीच ! अगदीं क्षुल्लक लोकांचाहि पवाड्यांत सन्मान झालेला असला म्हणजे साहाजिकच दुसऱ्या दिवशीं त्यांच्यावर गमतीनें विडंबन-काव्यैंहि प्रसृत होत असतात. आणि मग क्वचित् उंदराला मारतांना गणपतीलाहि काठी लागावी त्याप्रमाणें खऱ्या सन्माननीय व्यक्तींनाहि टवाळीची झळ लागते. मूळ पोवाडयापासून निर्माण झालेलीं हीं विडंबन-काव्यैंहि मोठीं खुमासदार असतात यांत शंका नाहीं. परंतु हें सर्व शाहिरी वाङ्मय छापून शाश्वत करण्याची हिंदुस्थानांत कांहीं सोय नसल्यामुळें तें थोडयाच दिवसांत विस्मृत होऊन नष्ट होऊन जातें.

आज घटकेस हैदरच्या दरबारासारखा भाग्यशाली दरबार हिंदुस्थानांत कोठेंहि नसेल. त्याच्या पदरच्या कलावंत ताफ्याइतकी समृद्धि अन्य राजांजवळ बिलकुल सांपडावयाची नाहीं. या कलावंत कंचन्यांना इकडे **बेदरी** अशी संज्ञा आहे. बेगापूर प्रांत म्हणजे या कलावंतांची खाणच. तो प्रांत हैदराच्याच ताब्यांत असल्यामुळें या बेगापुरी कलावंतांच्या लागतील तेवढ्या

खुपसुरत व नाचकाम-प्रवीण पोरी, हैदर आपल्या कलावंत-खात्यांत भरती करूं शकतो. हैदरच्या दरबारगायकांत सार्‍या कलावंत स्त्रियाच आहेत. कलावंतखात्याची मुख्य अधिकारी स्त्री असते तिच्याकडे खातें भरण्याचें काम असतें. चारचार, पांचपांच वर्षांच्या देखण्या मुली आणून पुढें पांच-सात वर्षें त्यांस गाण्या-नाचण्याचें खास शिक्षण देण्यांत येतें. सर्व तऱ्हेचा आदा त्यांस शिकविण्यांत येतो. दहाव्या किंवा अकराव्या वर्षांपासून त्यांना बाहेर नाचण्यासाठीं काढतात. अत्यंत नाजूक गोंडस अवयव, हरणासारखे काळेभोर डोळे, मोहक भुवया, बारीक जिवणी, शुभ्र दंतपंक्ति, सायीवर फुंकर घातल्याप्रमाणें गालाला पडलेली मनोज्ञ खळी, जमिनीपर्यंत पोचणारा त्यांचा काळाभोर कचपाश, अशा या रूपवती जेव्हां आदा करूं लागतील, तेव्हां त्या प्रेक्षकांना वेड लावल्याशिवाय कशा राहतील ! या देशांत पालीसारख्या पांढर्‍या फटफटीत वर्णाला सौंदर्य समजत नाहींत. त्यांना पीत केतकीवर्ण फार पसंत वाटतो. फ्रेंच बायका ज्याप्रमाणें तोंडाला सौंदर्यप्रसाधनांनीं रंगवितात तशीच यांच्याकडेहि पद्धति आहे. या स्त्रिया अगदीं तलम पातळ असा पेहराव वापरतात व त्यांतून त्यांनीं परिधान केलेले अलंकार अंधारांत काजवे चमकावे तसेच चमकतांना दिसतात. आपाद-मस्तक उंची दागिन्यांनीं नटलेल्या त्या अगदीं फुलांनीं भरलेल्या लतेसारख्या आकर्षक दिसतात. त्यांच्या नाकांत हिर्‍याची चमकी किंवा मोरणी घातलेली असते, यामुळें तर मोहकतेंत अपूर्व अशी भर पडलीशी वाटते.

या कलावंतांच्या तमाशांचीं कथानकें अर्थातच काय असतील तें सांगणें नकोच. आपल्या सुंदर बायकोला डोळ्यांत तेल घालून जपणाऱ्या नवऱ्याची बायकोच पळवून नेण्याचें कारस्थान, आईला फसवून प्रियकराकडे पळून निघून जाण्याचा कट, असले चौररताचे वैषयिक पराक्रमच त्यांत असतात. तथापि तमाशांतील आपल्या भूमिका या पोरी इतक्या सहज व हुबेहूब वठवितात,

कीं सांगतां पुरवत नाहीं. त्यांतलीं त्यांचीं गाणीं किंवा लावण्या फार मधुर वाटतात. तथापि या गायक किंवा नटीकंचन्यांपेक्षां नृत्य करणाऱ्या कंच-न्यांचा नंबर केव्हांहि वरच लावावा लागेल. पॅरिसमधील नामांकित नर्तकी काय नाचतील असें अद्भुत नृत्य यांचें आहे! त्या नाचत असतां शरीरांतील प्रत्येक स्नायू लवलव हलतांना स्पष्ट दिसून येईल. हात काय, डोळे काय, पाय काय,प्रत्येक हालचाल अशी नाजूक, आकर्षक आणि कलात्मक असते कीं, त्यानें प्रेक्षक घायाळ झालाच पाहिजे. दिसतांना त्या फुलासारख्या हलक्या दिसतात. परतु नृत्य करतांना त्यांना पाहिलें म्हणजेच त्यांच्या मांड्या किती कमावलेल्या चिवट असल्या पाहिजेत याचा उमज पडतो. हैदराच्या कलावंत खात्यांतील सर्व कंचन्या सतरा वर्षांआंतील असतात. सतरावें वर्ष लागलें कीं, त्यांना खात्यांतून कमी करण्यांत येतें. मग या पोरी गांवोगांव फिरून आपला धंदा चालवितात किंवा कोठल्याना कोठल्या देवळांत देवदासी किंवा मुरळी म्हणून राहतात.

हैदराचे हे कलावंत ताफे प्रसंगविशेषीं निरनिराळ्या सरदारांनाहि भाड्यानें देण्यांत येतात. त्या वेळीं प्रत्येक पोरीसाठीं शंभर रुपयेप्रमाणें दर ठरलेला आहे ! एकेका ताफ्यांत वीस वीस जणी असतात. त्यांच्या साजिंद्या बज-वैय्यांचा खर्च मात्र ताफ्यानेंच स्वतः सोसावयाचा असतो. नाच-तमाशा झाल्यावर समजा त्या सरदाराला किंवा त्यांच्या मित्रांना त्या पोरींबरोबर रात्र करमण्याची इच्छा झाली तर पुन्हां प्रत्येक पोरीमागें कलावंत खात्याची मुख्याधिकारी स्त्री असेल तिला शंभर शंभर रुपये मिळतात. शिवाय दुसरे दिवशीं त्या पोरींना परत पाठवितांना एखादा दागिना बक्षीस म्हणून बहाल करावा लागतो.

हैदराचा जन्म १७१७ सालीं देवनहळ्ळी येथें झाला. हें खेडें बंगलूर जिल्ह्यांतील कोलार आणि होसकोट्टे यांच्या दरम्यान आहे. हैदरअलीच्या

बापाचें नांव नादीमसाहेब. तो एक मोठा सरदार असून त्याच्या हाताखालीं दहा हजार फौज म्हणजे घोडदळ होतें. सदरहू देवनहळ्ळीचें ठाणें त्याला दक्षिणचा सुभा निजाम उल्मुल्क यानें जहागिरींत बहाल केलें होतें. हैदर अस्सल कुरेशीवंशी म्हणवितो. म्हणजे अर्थातच तो साक्षात् महंमदाचाहि वंशज ठरतो. त्याच्या वंशाचे पूर्वज मक्का सोडून हिंदुस्थानांत प्रथम केव्हां आले हें कळण्यास कांहींच साधन नाहीं. तथापि ही गोष्ट सर्वमान्य आहे कीं, ते पूर्वज इकडे दक्षिणेंत कोहिर जिल्ह्यांत येऊन स्थायिक झाले. हा कोहिरचा प्रदेश हैदराबाद आणि गुलबुर्गा यांच्या दरम्यान होता. हैदराच्या या पूर्वजांना तेथें फारच मान असून त्या प्रदेशांतील न्यायाधिशीचें म्हणजे काजीपणाचें काम त्याकडे असे.

निजाम उल्मुल्क मरण पावल्यावर नादीमसाहेब आपल्या दोन मुलग्यांना घेऊन देवनहळ्ळीला जाऊन राहिला. थोरल्या मुलाचें नांव इस्माईलसाहेब व धाकट्याचें हैदर. दोघांच्या वयांत मात्र बरेंच अंतर होतें. देवनहळ्ळीस आल्यानंतर नादीमसाहेबानें म्हैसूरदरबारीं सूत्र लाविलें व त्यांच्या नोकरींत तो शिरला. तो अतिशय शूर व कर्तबगार असल्यामुळें अगदीं थोड्याच दिवसांत तो म्हैसूर दरबारचा सरसेनापति बनला. त्या सरकारचें मराठ्यांशीं एक मोठें युद्ध झालें, त्यांत त्यानें पराक्रम करून विजयश्री मिळ-वून दिल्यामुळें म्हैसूरच्या राजानें खूष होऊन बंगलूरचा सुप्रसिद्ध किल्ला व त्याभोंवतालचा मुलूख नादीमसाहेबाला बक्षीस देऊन टाकला. पण त्याचाच परिणाम पुढें असा झाला कीं, नादीमसाहेब हा एक स्वतंत्र राजाच होऊन बसला.

१७५० सालीं नासरजंगानें तंजावरकडील चोलमंडलावर म्हणजेच कारो-मांडेल किनाऱ्याकडे स्वारी केली.त्या वेळीं नादीमसाहेबाला नासरजंगाची कुमक करणें भागच पडलें. कारण देवनहळ्ळीची जहागिर तो दक्षिणच्या मोगल

सुभेदाराकडूनच खात होता. तेव्हां नादीमसाहेबानें ५० शिलेदार व २०० पायदळ देऊन हैदरला त्याचा सेनापति करून रवाना केलें. या वेळीं हैदर ३४ वर्षांचा होता. परंतु एव्हांपर्यंत त्यानें घराबाहेर पडून प्रत्यक्ष स्वारी-शिकारी अशी कधींच केली नव्हती म्हणून त्याच्या जोडीस इब्राहीमसाहेब नांवाच्या त्याच्या मामाला त्याचा दिवाण किंवा सल्लागार मुत्सद्दी करून देण्यांत आलें होतें.

नासरजंगाचा एका लढाईत अंत झाला. तींत हैदर हजर होता. तेव्हां फ्रेंच कवायती शिपायांचें शौर्य त्याच्या नजरेस पडलें. तें पाहून तो अगदीं थक्क होऊन गेला व तेव्हांपासून फ्रेंचांविषयीं त्याला परमादर वाटूं लागला. त्या लढाईत फ्रेंच शिपाई अवघे ८०० आणि त्यांच्या दिमतीस देशी पायदळ सारें ४००० असें असतां फ्रेंचांनीं मोंगलांच्या ३ लक्ष लष्करावर बेजरब हल्ला चढविण्यांत जी शर्थ केली ती कोणासहि तोंडांत बोट घालावयास लावील अशीच होती! पुढें नासरजंगाच्या मृत्यूनंतर त्याच्या जागीं आलेल्या मुजफरजंगाबरोबर हैदर पॉन्डेचरीपर्यंत गेलाच होता. तेव्हां ते फ्रेंच शहर, तेथील चालचलणूक व लष्करी शिस्त, तेथले किल्लेकोटांचें विशिष्ट रीतीचें बांधकाम पाहून त्याच्या मनांत निर्माण झालेला फ्रेंचाविषयींचा आणि त्यांचा गव्हर्नर डुप्ले याविषयींचा आदर द्विगुणितच नव्हे, शतगुणित होऊन गेला. पुढील सालीं म्हणजे सन १७५१ मध्यें मुजफरजंग गोवळकोंडयास परतला. दरम्यान इकडे हैदराचा बाप नादीमसाहेब वारला होता म्हणून हैदर हा, त्याचा थोरला भाऊ म्हैसुरास होता, तिकडे निघून गेला. हैदरनें इस्माईलसाहेबाला फ्रेंचांच्या बहादुरीचीं सारीं वर्णनें ऐकविलीं. तेव्हां त्यालाहि मोठी जिज्ञासा उत्पन्न होऊन त्यानें गोबर (Guebre) नांवाच्या एका इराणी इसमास तोफा व बंदुका खरेदी करण्यासाठीं रवाना केलें. त्याचा हेतु फ्रेंचांकडून स्वतःच्या सैन्यांत कवायती कंपू शिकवून तयार

करण्याचें होतें. गोवरनें मुंबईस दोन हजार बंदुका व सहा तोफा तेथील गव्हर्नराकडून खरेदी केल्या. तसेंच तीस निरनिराळ्या देशांतील खलाशीहि त्यानें तोफखान्यांतील गोलंदाजीच्या कामासाठीं नोकर म्हणून बरोबर नेले. नंतर थोड्याच दिवसांत इस्माईलसाहेबानें आपला कवायती कंपू तयार केला. हिंदुस्थानांत युरोपियन पद्धतीवर कवायती कंपू करणारा हाच पहिला राजा किंवा सरदार होय यांत शंका नाहीं. या कवायती कंपूपुढें देशी बिनकवायती लष्करांची वारंवार त्रेधातिरपीट उडूं लागली आणि अर्थातच त्याचा परिणाम हा झाला कीं, इस्माईलसाहेब म्हैसूरच्या राजाच्या नाकांतील बालच बनून गेला.

या वेळीं म्हैसुरास राजा होता, तो नाममात्रच असून सर्व सत्ता त्याचा प्रतिनिधि म्हणजे 'नंदराजा' म्हणून होता, त्याच्या हातीं केंद्रित झालेली होती. हा नंदराजा म्हणजे राजाचा सख्खा भाऊच होता. या नंदराजानें कारोमांडल मुलुखावर स्वारी करण्याचें ठरविलें. तेव्हां हैदर त्या सैन्यांतील घोडदळाचा सेनापति म्हणून गेला. या स्वारीस म्हैसूरकर व इंग्रज एक असून त्यांना फ्रेंच व चंदासाहेब यांविरुद्ध लढावें लागलें. त्यांनीं चंदासाहेबाचा पराभव करून त्यास कैद केलें. श्रीरंगाचें देवालय जिंकलें. पण या विजयानंतर नंदराजाचें इंग्रजांशींच वितुष्ट आलें म्हणून त्यानें फ्रेंचांशीं स्नेह जोडला. आणि त्या दोघांनीं मिळून त्रिचनापल्लीला वेढा घातला. नंदराजाशीं हातमिळमी करण्यासाठीं पॉन्डेचरीहून फ्रेंच निघाले. तेव्हां वाटेंतच त्यांना मराठ्यांच्या फौजेनें अडविलें. कारण मराठे व इंग्रज हे दोस्त झाले होते. मराठ्यांचें घोडदळ फ्रेंचांच्या सैन्याला गानिमी काव्यानें हैराण करूं लागलें. तेव्हां फ्रेंचांनीं म्हैसूरला पत्र पाठवून जलदीनें कुमक मागविली. तेव्हां तें काम हैदराकडे आलें. १८०० घोडे स्वारांची फौज त्याच्याबरोबर होती. हैदराची ही फौज कुमकेस गेली नसती तर मराठ्यांच्या फौजेनें फ्रेंच कवायती कंपूंना

छाप्यांमागून छापे घालून व आसपासचा मुलूख वैराण करून उपाशी मारलें असतें. (पुढें टिपूवरील श्रीरंगपट्टणच्या मोहिमेंत लॉर्ड कार्नवालिसची सुटका जशी परशुरामभाऊ पटवर्धनांच्या सैन्यानें केली आणि प्राणनाश टाळल्याबद्दल त्याचेकडून दुवा मिळविला तसाच हा प्रसंग होता.) एव्हांपासून हैदरनाइकाचें नांव फ्रेंचांच्या तोंडीं झालें. तें त्याचें नांव उच्चारसौकर्यार्थ 'ॲंडरनेक' असें उच्चारूं लागले. 'ॲंडरनेक' हा ' हैदरनाइक ' या नांवाचा फ्रेंच अपभ्रंश होय ! यापूर्वी फ्रेंच काय, इंग्रज काय किंवा इतर युरोपीय राष्ट्रांचे लोक काय यांना समुद्रकिनारपट्टीच्या आंतील आंतरभागांतील कांहींएक माहिती नसे. उर्दू किंवा पार्शियन जाणणारा एकहि माणूस पॉंडिचरींत सांपडला नसता. त्यांना मलबारांतील लोकांना दुभाषे म्हणून ठेवून घेऊन त्यामार्फत सर्व कांहीं समजावून घ्यावें लागे. या मलबारी लोकांना थोडेंसें पोर्तुगीज समजत असें इतकेंच. मलबारी भाषा इतकी दरिद्री कीं तींत प्रत्येक निरनिराळ्या वस्तूला निरनिराळा शब्द असावा तसें कांहींच नाहीं. दोअर किंवा दैवर हा शब्द मिस्टर किंवा सर दोघांनाहि ते लावणार. गव्हर्नर, सेनापति यांना पेरीदोअर एवढा एकच शब्द. याच न्यायानें प्याद्यांचा साधा नाइक असो किंवा सर्व फौजेचा मुख्य सेनापति असो किंवा खुद्द राजा असो ह्यांच्या गांठी त्याला एकच ' नाइक ' ही पदवी लागते. (नाइक हे नायक या शब्दाचें अपभ्रष्ट रूप होय.) तंजावरच्या राजालाहि ' ते तंजावर नाइक ' असें म्हणतात. आणि उलट सार्जंट नारायणाला किंवा कार्पोरल शास्त्रीलाहि तें 'नारायणनाइक' आणि 'शास्त्रीनाइक' असें म्हणतात. पाश्चात्य लोकांत हैदर हा एक साधा कार्पोरल होता अशी जी गैरसमजूत रूढ झालेली आहे ती या नाइक शब्दामुळें. वास्तविक हैदराची खरी पदवी 'हैदरसाहेब ' अशी रूढ आहे. साहेब हा शब्द मिस्टरशीं समानार्थी होय. कालान्तरानें हैदराची प्रख्याति होत गेली तसतशी मोगली रिवाजाप्रमाणें त्याच्या

नांवाचीहि लांबी वाढली आणि आज घटकेस तर तो 'हैदरअलीखान बहाद्दूर' किंवा ' बहादुरशहा ' या नांवानें सर्वत्र प्रख्यात आहे.

पूर्वी सांगितल्याप्रमाणें मराठ्यांचा प्रतिकार मोडून हैदरनें फ्रेंच सैन्याशीं हातमिळवणी केल्यावर फ्रेंच तळाच्या उजव्या हातास नजीकच त्यानें आपला तळ ठोकला. त्याबद्दल फ्रेंचांनीं फार तक्रार केली. परंतु हैदर ऐकेना. त्यानें फ्रेंच सेनापतीला सांगून पाठविलें कीं, "तुमच्यावर नजर ठेवण्यासाठीं म्हणून कांहीं मी तुमच्याजवळ तळ ठोकून बसलेलों नाहीं. उलट तुम्हा फ्रेंचापासून लढवाईपणाची खरी विद्या किंवा कसब शिकून घ्यावें यासाठीं मी इतका नजीक उतरलों आहे. आणि खरोखरीच फ्रेंच सैन्यांतील शिस्त, कवायत यांचें तो एखाद्या विद्यार्थ्यासारखें अवलोकन करी आणि स्वतःच्या सैन्यांत त्याची नक्कल उठवी. हैदरच्या सैन्यांत सुरू झालेल्या कवायती पाहून फ्रेंच सैन्यांतील अधिकाऱ्यांना व शिपायांना तो प्रथम प्रथम एक हसण्याचा विषय झाला होता. परंतु पुढें मात्र जेव्हां हैदर फ्रेंच सैन्यांतले निवडक शिपाई आणि गोलंदाज भारी पगार देऊन स्वतःच्या सैन्यांत भरती करूं लागला तेव्हां त्यांना त्याचें वैषम्य वाटूं लागलें. परंतु हैदरला दुखावण्याचीहि त्यांना सोय नव्हती. कारण त्यांना या वेळीं हैदरच्या सैन्याची मदत घेणें जरूर होतें. हैदरच्या पदरचा विख्यात फ्रेंच सरदार सिडर स्टेनेट हा याच वेळीं प्रथम हैदरच्या नोकरींत शिरला. फ्रेंच शिपायांना फोडून आपल्या नोकरींत घ्यावयाचें पण लगेच त्यांना तेथून म्हैसुरास आपल्या भावाकडे पाठवून द्यावयाचे असा क्रम हैदरनें धरला.

१७५५ सालीं नंदराजा परत म्हैसुरास निघून गेला. पण हैदर मात्र गेला नाहीं. त्यानें डुप्लीशीं एक अंतस्थ तह किंवा करार केला होता. त्याअन्वयें त्रिचनापल्ली काबीज होईपर्यंत ६००० फौजेनिशीं हैदरनें फ्रेंचाबरोबर राहावें असें ठरलें होतें. पुढें डुप्लेच्या जागीं गॉडहेन अधिकारी झाला व

त्यानें इंग्रजांशीं शस्त्रसंधि करून त्रिचनापल्लीचा वेढा उठविण्याचा हुकूम दिला. तेव्हां मग हैदरासहि तेथून उठावें लागलें. पण त्याचा दैवयोग असा कीं याच सुमारास त्याचा ज्येष्ठ बंधु इस्माइलसाहेब वारल्याचें वृत्त आलें आणि त्याला मूलबाळ नसल्यामुळें हैदरच त्याचा वारस म्हणून त्याला सरदारी मिळाली. सारांश, हैदर आतां खराखुरा बलिष्ठ असा एक राजाच झाला. अनेक किल्लेकोट, विपुल सुपीक मुलूख आणि १५००० हजार कवायती पायदळ व ३००० घोडेस्वारांची फौज व पायदळांत २०० युरोपियन शिपाई, असें हैदरचें वैभव झालें !

वस्तुतः हैदर हा स्वतंत्र राजासारखाच झालेला असला तरी लौकिकांत तो म्हैसूरच्या राजाचा नोकर आणि ताबेदार होता व त्याच्यावर त्या राजाचा पूर्ण विश्वास असल्यामुळें हैदरला लौकरच म्हैसूरच्या सर्व सैन्याचे सेनापतिपदहि प्राप्त झालें.

म्हैसूरचे राजे हे जातीनें ब्राह्मण. परंतु राजाच्या कर्तव्यापेक्षां मठाभिक्षुकासारखी जपतपाची आणि कर्मकांडाची उठाठेवच त्यांनीं फार आरंभिली. बाहेर लोकांत वावरले तर विटाळ होईल म्हणून असो किंवा आपण ब्राह्मण तेव्हां इतरेजनासारखे बाहेर पडणें आपल्या उच्च वर्णाला शोभण्यासारखें नाहीं अशा मूर्ख कल्पनेमुळें असो, म्हैसूरचे हे राजे राजवाड्याबाहेर प्रजेला कपिलाषष्ठीच्या योगावरच दिसत ! वर्षांतून फक्त दोन वेळ ते प्रजेच्या नजरेस पडत आणि तेंहि दसरा किंवा तशा कांहीं धार्मिक उत्सवादिकांचे वेळीं. धार्मिक कर्मकांडाचा असा अतिरेक झाल्यामुळें साहजिकच राज्यकारभार पाहण्यासाठीं त्यांना आपला कोणी प्रतिनिधि निर्माण करावा लागला. या प्रतिनिधीला 'देव्या' अशी संज्ञा किंवा पदवी होती. या ठिकाणीं पेशव्यांची आठवण झाल्याखेरीज राहणार नाहीं. पेशवेहि ब्राह्मणच होते. थोडेबहुत कर्मिष्ठहि होते. परंतु राजे झाल्यावर त्यांनीं धर्मकर्माच्या आन्हिकाला रजा दिली आणि

राजधर्मच आचरिला. त्या जुन्या काळीं धर्माचारांचें स्तोम मोठेंच होतें व सर्वसामान्य ब्राह्मण धर्माचार कसोशीनें पाळीत. सामान्य ब्राह्मणाला सुतक आलें तर तो दहा दिवस अशौच्यांत बसे. पण पेशवे तसे कधीं बसले नाहींत. त्यांनीं आपल्या जवळच्या नातलगांपैकीं एका शाखेला पेशव्यांचीं सारीं सुतकें सांभाळण्याचें काम सांगितलें आणि त्यासाठीं त्यांना छोटीशी जहागीर देऊन ते मोकळे झाले झाले. पुण्यांतील राजमाचीकर घराण्याला मिळालेली जहागीर या कामाकरितां मिळाली असें सांगतात.

असो, राजा कर्मकांडाला स्वकर्तव्य समजूं लागला तेव्हां त्यानें प्रतिनिधि म्हणून नेमलेल्या माणसालाच राज्याधिकार प्राप्त व्हावा हें ओघानेंच आलें. या म्हैसूरच्या राजांनीं हें देव्याचें काम एखाद्या निकटच्या नातलगाकडेच सोपविलेलें असे. परंतु आतां तें बदललें. या वेळीं जो देव्या होता त्याचा पिता कोणी खंडेराव नांवाचा कारस्थानी पुरुष होता. यानें देव्याला अशी भर दिली कीं, तुम्हीच आता नंदराजाला हाकून देऊन राज्यपद बळकावा ! ती मसलत देव्याला पटून त्यानें नंदराजाला हाकलून दिलें. मग देव्याचा राजा बनल्यावर खंडेराव त्याचा मुख्य प्रधान किंवा दिवाण होणें हें ओघानें आलेंच. खंडेराव फार कर्तबगार, धूर्त आणि कारस्थानी होता. हैदरचें व त्याचें बरें नव्हतें, परंतु हैदरच्या हातीं सर्व सैन्याधिकार असल्यामुळें त्याला त्याचें कांहींच वाकडें करतां आलें नाहीं. परंतु त्याचें शल्य त्याच्या मनांतून गेलें नाहीं. हैदरचा काटा उपटून काढावा म्हणून या खंडेरावानें म्हैसूरच्या राजाचे शत्रु जे मराठे त्यांच्याकडे बोलणें लावून एक गुप्त तह केला. त्या तहान्वयें मराठ्यांनीं अचानक पावसाळ्यांतच म्हैसुरावर स्वारी करावी असें ठरलें. कारण पावसाळ्यांत मुलुखगिरी संपून सैन्याला रजा देण्यांत येत असते.

ठरल्याप्रमाणें मराठ्यांची धाड म्हैसूरवर आली. त्यांचें लष्कर फारच प्रचंड असल्यामुळें हैदरला माघार घेऊन खुद्द श्रीरंगपट्टण राजधानींतच येऊन

आश्रय घेणें भाग पडलें. श्रीरंगपट्टण हें जवळ जवळ एक बेटच असल्यासारखें आहे. कावेरीस पूर आल्यानंतर बेटांत शिरण्यास कोठेंहि उतार राहत नाहीं. फक्त श्रीरंगपट्टणचा पूल किंवा साकू आहे त्यावरून जातां आलें तरच आंत प्रवेश होऊं शकतो. एरव्हीं इतर वेळीं खंडेरावानें हैदरला श्रीरंगपट्टणांत त्याच्या सैन्यासह कधींच येऊं दिलें नसतें. परंतु या वेळीं हैदरला त्याच्या सैन्यासह गारद करण्याचेंच कारस्थान शिजलें असल्यामुळें खंडेरावानेंच श्रीरंगपट्टणच्या बेटांत उतरण्यास हैदरास भर दिली. त्याप्रमाणें हैदर बेटांत गेला व अगदीं पलीकडच्या टोकास जाऊन उतरला. तेवढ्यांत पाठीवर मराठे आलेच. त्यांनीं हैदर बेटांत शिरला असें पाहून सर्व बाजूंनीं वेढा बसविला व प्रत्येक उताराच्या ठिकाणीं चौक्यांचा पक्का बंदोबस्त केला.

हैदराला खंडेरावाच्या दगलबाजीची कांहींच वार्ता नव्हती. त्याला वाटलें कीं, श्रीरंगपट्टणांत अन्नधान्याचीं वाटेल तेवढीं कोठारें असतील. त्यावर आपल्या सैन्याची गुजराण होऊं शकेल. परंतु त्याचा भ्रम थोड्याच वेळानें नाहींसा झाला. कारण मराठ्यांचें सैन्य येतांच श्रीरंगपट्टणाच्या वेशी बंद करून घेण्यांत आल्या. तेव्हां तो उमजला कीं आपणांस शहरांतून तोफा मारून नाहींतर अन्नाविणें कायल करून मारण्याचाच खंडेरावाचा कावा आहे. पुढें खंडेरावाकडून हैदराला निरोपच गेला कीं, तूं म्हैसूरच्या राजाला शरण जाऊन हस्तगत होशील तरच तुला जीवदान मिळेल ! हैदरानें पाहिलें कीं आतां मस्ती करून इलाज नाहीं. नरमाई धरून मुक्तता होते कां तें पाहावें. म्हणून त्यानें खंडेरावाकडे मुत्सद्दी पाठविले. परंतु तें सर्व निष्फळ ठरलें. तेव्हां अखेर जिवावर उदार होऊन धाडसानें आपली कोंडी फोडण्याच्या विचारास हैदर लागला. त्या दिवशीं सायंकाळ झाल्यावर त्यानें आपल्या सैन्यांतील सरदारांना आपल्या राहुटींत बोलावून घेतलें आणि म्हणाला, " अशाहि पेंचांत तुम्ही माझ्याशीं इतके एकनिष्ठ राहिलां आहांत हा तुमचा थोरपणा होय.

तथापि माझ्यासाठीं तुम्हां शूर लोकांचे प्राण जावेत हें मला मान्य नाहीं. उद्यां दिवस उजाडल्यावर तुम्ही खंडेरावाशीं बोलणीं करून वाटेल त्या अटीवर आपापली सुटका करून घ्या. मी काय करावयाचें तें माझ्यापुरतें आज रात्रीं ठरवीन." असें सांगून हैदरानें सैन्यांतील सर्व शिपायांना सहा सहा महिन्यांचा पगार आणि बक्षिसी वांटून टाकली ! ! नंतर आपल्या प्रमुख सरदारांना तो अखेरचें कडकडून भेटला व म्हणाला, " जगलों वांचलों तर दुसरीकडे कोठें तरी तुमची आमची भेट. "

यानंतर मध्यरात्र झाल्यावर हैदरानें आपल्या पूर्ण विश्वासाचे असे निवडक शूर तीस मर्दाने बरोबर घेतले. प्रत्येकाजवळ जडजवाहीर संभाळण्यास दिलें आणि त्यांना घेऊन पचंग बांधून हैदरानें भर पुरांत उड्या घातल्या. हें दोन्ही दृष्टींनीं जिवावरचें धाडस होतें. पुरांत बुडून तरी मरावें नाहीं तर मराठ्यांच्या तरी हातीं लागावें. परंतु हे दोन्ही धोके टळून ते सर्व लोक नदीपार झाले व तसेंच अंधारांत पुढें वाट चालूं लागले. ते अखेर ९० मैलांवर बंगलोर आहे तेथें येऊन पोहोंचल्यावर थांबले ! !

बंगलोरचा किल्ला त्याचा चुलता इब्राहिम अलिखान याच्या ताब्यांत होता. हैदरानें चुलत्यास एका मित्राकरवीं निरोप पाठविला कीं, बंगलोरचा किल्ला मीच तुमच्या हवालीं केला होता. परंतु आज या हैदराजवळ एकहि किल्लाकलीचा, खजिना किंवा शिपाईप्यादा राहिलेला नाहीं. त्याच्याजवळ जीवनमरणाचे सोबती असलेले फक्त तीस जवान उरले आहेत. माझी स्थिति ही अशी आहे. तेव्हां काय सल्ला सांगतां तो सांगा. आश्वासनपूर्वक वचन दिलेंत तर बंगलोरांत येईन, नाहीं तर दुसरीकडे कोठें थारा धरीन. हैदराच्या या निरोपानें त्याच्या चुलत्याला गहिंवरून आलें. वास्तविक अशा स्थितींत किल्ला बळकावून बसण्यास त्याला नामी संधीच होती. परंतु तो विचार त्याच्या मनासहि शिवला नाहीं. लगेच तो एकटाच घोड्यावर बसला

आणि त्या निरोप्या मित्राबरोबर संकेतस्थलीं जाऊन हैदरास भेटला. त्यानें कडकडून हैदरास मिठी मारली आणि सांत्वन केलें, "बेटा धीर सो गंभीर. तुझें काय गेलें आहे? कांहींच नाहीं. माझी ही सारी दौलत तुझीच आहे. तूंच मला दिलीस. आतां पुन्हां ती तुलाच अर्पण आहे. या दौलतीच्या जोरावर आपण आणखी वाटेल तेवढीं आभाळें खालीं ओढूं."

अशा रीतीनें बंगलोरचा किल्ला ताब्यांत आल्यावर हैदरानें पुढील बनाव कसकसा बनवावयाचा याची चालना सुरू केली. तोंच थोड्याच काळांत त्याचा मेव्हणा मीर मखदूम अलिखान आपलें घोडदळ घेऊन त्याला येऊन मिळाला. हा मखदूम अलिखान श्रीरंगपट्टणच्या वेढ्यांत अडकला होता. हैदराच्या सल्ल्याप्रमाणें त्याचें खंडेरावाशीं बोलणेंहि लागलें होतें. परंतु दरम्यान अकस्मात् कावेरीचा पूर ओसरला. त्याबरोबर मखदूम अलीनें आपलें तीन हजार घोडदळ पाण्यांत लोटलें व वेढा देऊन बसलेल्या मराठ्यांच्या चौक्याशीं मारामार करून त्यानें वाट फोडली आणि मुख्य रस्ता टाळून जंगलांतून व डोंगरांतून तो निघाला. तो मुलूख सर्व त्याच्या पूर्ण माहितीचा होता. त्याच्या तीन हजार शिपायांपैकीं लोकहि फारसे दगावले नव्हते. मखदूमअली हैदराचा नामांकित सेनापति. त्याची इभ्रत फार मोठी. तो येऊन सामील होतांच हैदरानें फौजफाटा वाढविण्यास सुरुवात केली आणि त्यानें मराठ्यांशीं गनिमी काव्यानेंच लढून त्यांस हैराण करण्यास सुरुवात केली.

मराठ्यांशीं त्याचें असें युद्ध चालू असतांच सन १७६० मध्यें पॉंडेचेरीच्या फ्रेंचांवर मोठें संकट आलें म्हणून लालीनें हैदराकडे कुमक मागितली. तेव्हां स्वतःची अडचण असतांहि हैदरानें सात हजार फौज बरोबर देऊन मखदूम अलीची तिकडे रवानगी केली. मखदूमनें वाटेंत थियागडचें ठाणें घेतलें. हें ठाणें सिऊर मेरिओल नामक किल्लेदाराच्या ताब्यांत होतें. पण लालीच्या

हुकुमावरून तें त्यानें हैदराच्या स्वाधीन केलें. किल्ल्यावर तीनशें फ्रेंच शिपाई आणि बाराशें देशी शिपाई होते. ते बरोबर घेऊन मखदूम पुढें पॉंडिचेरीस निघाला. वाटेंत एक नदी उतरत असतां इंग्रज सैन्यानें हल्ला चढविला. परंतु तो फोडून मखदूम पॉंडिचेरीच्या खंदकानजीक येऊन पोहोंचला. तेथें तो दोन महिने राहिला. त्या अवधींत त्यानें किल्ल्यांत पुष्कळ कुमक पोहोंचविली. दोन महिन्यांनीं मखदूम हैदराकडे परत आला. पण येतांना त्यानें सेऊस ॲलन आणि ह्यूजेल या फ्रेंच सेनापतींच्या हाताखालचीं घोडदळें आणि पॉंडिचेरींतील अनेक कसबी कारागीर आणले व त्यांना हैदरच्या नोकरींत घातले. या फ्रेंच कसबी कारागिरांमुळें सैन्याला लागणारे हुन्नरी लोक हैदरला प्राप्त झाले. वाटेंत परत येत असतां मगदूमनें थियागडांतील आपलें ठाणें हलवून तें पुनरपि फ्रेंचांच्या हवालीं केलें. मात्र तें हवालीं करतांना असा खोचदार निरोप त्यानें फ्रेंचांना पाठविला कीं, " तुमच्या पॉंडिचेरीला बसलेला वेढा उठविल्याबद्दल हें थियागडचें ठाणें बक्षिसादाखल आम्हांसच मिळाल्यासारखें होतें. परंतु करारानुसार तें तुम्हांस परत करणें रास्त असल्यामुळें हें तुमचें ठाणें तुमच्या हवालीं करण्यांत येत आहे. "

इकडे मखदूम असा गुंतला होता त्याच वेळीं तिकडे हैदराचा मराठ्यांशीं तह घडून आला. पुढें मखदूमअली परत आला तेव्हां वास्तविक हैदरानें त्याचें मनःपूर्वक आगतस्वागत करावयाचें. परंतु हैदरानें अगदींच अनपेक्षित असा प्रकार केला ! म्हणजे असें कीं हैदरानें मखदूमअलीचा सत्कार करावा, तें कांहींच न करतां त्यावर रोष आणि गैरमर्जी झाल्याचेंच दाखविलें. त्यानें त्यावर असा आरोप केला कीं, 'तुम्हांस पॉंडिचेरीचा वेढा उठविण्याच्या कामासाठीं पाठविलें असतां तें काम तुमच्या हातून झालें नाहीं, असें तुम्ही नादान!' असा आरोप करून मखदूमच्या खुलाशाचीहि वाट न पाहतां त्यानें त्याचा दरक काढून घेतल्याचें जाहीर करून त्यास एक साधा शिलेदार किंवा

बारगीर करून टाकलें ! लष्कराच्या साऱ्या अधिकाऱ्यांना दुःख झालें. कारण एकतर मखदूमअली हा साऱ्या शिपायांचा प्यारा होता आणि दुसरें म्हणजे वेळ्यांतील त्याची अविश्रान्त मेहनत त्यांनीं समक्ष पाहिलेली होती. पण हैदराजवळ रदबदली करावी ही प्राज्ञा कोणाची नव्हती. फ्रेंच अधिकाऱ्यांनीं हैदरास भारले असल्यामुळें त्यांनींच धाडस केलें तर निभणार. अखेर त्यांनीं तसें केलेंहि. पण हैदरानें आपली क्रुद्ध मुद्रा सोडली नाहीं. मात्र तो त्यांना म्हणाला, " ठीक आहे, तुमचें म्हणणें खरें असेल तर मी न्यायच करीन. " असें म्हणून हैदरानें लष्करचे सारे सरदार जमा केले आणि मखदूमच्या स्नेह्यांना पाँडिचेरीच्या वेढ्याची इत्थंभूत हकीकत सांगा म्हणून फर्माविलें. त्यांच्या हकीकती ऐकल्यानंतर जो तो मखदूमचे गुणानुवादच गाऊं लागला. ते संपतांच हैदरानें हुकूम केला कीं, "तात्बडतोब स्वारी सजवा. आपण सर्वजण मखदूमच्या घरीं जाऊं चला." घरीं पोंचण्याच्या आंत वाटेंत बाजारांतच मखदूम पायानें रखडत चाललेला दिसला. त्याला पाहतांच हैदरानें हत्तीवरून खालीं उडी टाकली आणि धांवत जाऊन मखदूमला कडकडून आलिंगन दिलें आणि म्हणाला, "तुझ्यावर भलतें तुफान घेऊन तुझी बेइज्जत मीं केली याचा मला पश्चात्ताप होतो. माझा गुन्हा माफ करून घ्यावा म्हणूनच तुझ्या घरीं निघालों होतों. खाजगी तऱ्हेनें तुझी माफी मागण्यापेक्षां साऱ्या जनविश्वासमक्ष ती मागितली जात आहे, यांत मला अधिकच आनंद होत आहे." नंतर हैदरानें त्यास स्वतःच्या हत्तीवर बसविलें व आपण स्वतः घोड्यावर बसून सर्व सरदारांसह त्या हत्तीपुढें चालूं लागला व त्यांनीं त्यास घरीं समारंभानें पावतें केलें.

हैदराच्या वरील वर्तनाचा उलगडा इतकाच कीं त्यानें कृतकरोषाचें नाटक मुद्दामच केलें होतें. त्याला सर्व लोकांस हेंच दाखवून द्यावयाचें होतें कीं, खुद्द जवळचा नातलग झाला तरी चाकरींत कसूर झाल्यास हैदर त्याची गय

करीत नसतो आणि उलट कोणी आपला हुकूम जिवाजानानिशीं बजावतो त्याला हैदर आपलें काळीजहि काढून देतो.

यानंतर हैदरानें आपल्या सैन्यांत भरती झालेल्या फ्रेंच कवायती शिपायांची जिकडेतिकडे जाहिरात करून दिली व आपण आतां श्रीरंगपट्टणावरच स्वारी करणार, खंडेरावाच्या तावडींतून राजांची मुक्तता करणार असें तो म्हणूं लागला. नंदराजाचा आणि हैदराचा गुप्त पत्रव्यवहार चालूच होता. नंदराज यानंतर लवकरच आपल्या गुप्त आश्रयस्थानांतून येऊन प्रकट झाला आणि हैदरास मिळाला. त्यानें आणखी मोठी सैन्यभरती करण्यासाठीं हैदरला भरपूर पैकाहि पुरविला.

तिकडे हैदराच्या हालचालीचें उद्दिष्ट काय आहे तें खंडेरावहि जाणून होता. आणि त्यानेंहि हैदराशीं टक्कर देण्याकारितां त्याच्यापेक्षांहि प्रचंड असें सैन्य जमविलें. श्रीरंगपट्टणांतून हैदर पळून गेला त्या वेळीं त्याचा विलायती गोलंदाजाकडून चालविला जाणारा तोफखाना तेथेंच राहिला होता.खंडेरावानें त्या तोफखान्याच्या साऱ्या अंमलदारास मोठमोठीं बक्षिसें व देणग्या देऊन त्यांचें इमान मजबूत करून घेतलें. म्हैसूरकराजवळ तोफांचा संच हैदरापेक्षां कितीतरी मोठा होता. आणि शिवाय तोफाहि नामी होत्या. असा जबरदस्त आराबा हाताशीं असल्यामुळें खंडेरावच श्रीरंगपट्टणाबाहेर हैदराचा मोहला घ्यावा म्हणून मोठ्या गुर्मीनें बाहेर पडला आणि श्रीरंगपट्टणापासून बऱ्याच दूर असलेल्या सेनापट्टम नांवाच्या एका मोकळ्या खेड्यांत त्यानें आपला तळ दिला. हैदराच्या सैन्याचा तळ येथून नऊ मैलावर पडलेला होता.

हैदराला आपल्या सैन्याचा पुरा विश्वास होताच. तथापि त्यानें शत्रुपक्षांत फितुरी पेरण्याचाहि उद्योग सुरू केलेला होता. श्रीरंगपट्टणांत एक देव्या नांवाची मातबर स्त्री होती. तिचा नवरा म्हैसूरच्या राजाचा आणि

नंदराजाचा भाऊच लागत होता व त्यानें पुष्कळ दिवसपर्यंत म्हैसूरच्या कारभारांत देव्यापणाचें म्हणजे 'रीजंट' चें काम केलें होतें, आणि त्यामुळेंच वर सांगितलेल्या बाईलाहि देव्या म्हणूनच ओळखत असत. तिचा नवरा रीजंट असतां या बाईनें जातीनें पुष्कळच राज्यकारभार केलेला होता. शिवाय नवऱ्यानें आपल्या कारकीर्दींत पैकाहि गडगंज मिळवून ठेवला होता. या बाईचा नवरा वारल्यावर तिचा दीर नंदराजा हा रीजंट किंवा दिवाण झाला. परंतु नंदराजानें या बाईला आदर न दाखवितां किंवा तिचा सल्ला न पुसतां मनमानेसा दिवाणगिरीचा कारभार हांकण्यास सुरुवात केली. यामुळें त्या महामायेनें मोठेंच वैषम्य मानलें, आणि नंदराजाच्या नाशाचीं कारस्थानें ती आंतून खेळवूं लागली. हैदर आणि त्याचा थोरला भाऊ इस्माईलसाहेब या दोघांवर पहिल्यापासून तिची फार मर्जी होती. किंबहुना लोकवदंता अशी कीं हैदर आणि इस्माईलसाहेब या दोघांचाहि तिच्याशीं गुप्त अनैतिक संबंधहि होता ! हैदरानें या वेळीं देव्याबाईशीं संधान पुन्हां पत्रद्वारें सुरू केलें. त्यांत त्यानें नंदराजाचें दिवाणगिरीवरून आपण कायमचें उच्चाटन करूं अशी तिची खातरजमा केली. यामुळें तिनेंहि सर्वतोपरी त्यास साहाय्य करण्याचें आश्वासन देऊन त्याच्या शाबितीसाठीं खूप पैकाहि गुप्तपणें हैदरास पोंचता केला. तसेंच खंडेरावाच्या सरदारासहि पत्रें पाठवून फितूर पेरून ठेवला. लढाईस तोंड लावण्याच्या आदल्या दिवशीं खंडेरावाच्या सैन्यांत बेदिली व गोंधळ उडवून देण्याचें ठरलेलें असल्यामुळें देव्याबाई संकेतानुसार हैदराकडून आलेलीं पत्रें घेऊन खंडेरावाच्या राहुटींत गेलीं आणि तिनें आपल्या सैन्यांत सर्वत्र कसा फितूर पेरला गेला आहे याचें भयानक वर्णन खंडेरावाला ऐकविलें, तेव्हां तो अगदीं घाबरून गेला व घाईघाईनें सैन्य तेथेंच सोडून एकटाच श्रीरंगपट्टणास दाखल झाला. जातांना सैन्याची सरदारी त्यानें पीरखानावर सोपविली.

दुर्दैव असें कीं, पीरखानच हैदराच्या फितुरांतील एक मात
असामी होती. खंडेरावाच्या लष्करांतील या भानगडींची माहि
आपणाला क्षणाक्षणाला मिळत राहावी, अशी हैदरानें हेराकरवीं तजवी
करून ठेवलीच होती. खंडेराव पळून गेला व हैदर आपणावर तुटून पडणा
सैन्यांत सारा फितूर कालविलेला, यामुळें जो तो दुसऱ्याविषयीं सं
आणि त्यांतच खंडेरावाच्या सैन्यापैकीं कांहीं सैन्य उघडपणें हैदराला जा
मिळालें. इतकें झालें तेव्हां हैदरानें सेनापट्टमावर चाल धरली होती
थांबविली व पीरखानाला निरोप पाठविला कीं, तुमचें आमचें वैर असण्या
कांहींच कारण नाहीं. तुम्ही जितके म्हैसूरच्या राजाचे एकनिष्ठ सेवक म्हणवि
तितकाच मीहि स्वतःस म्हणवितों. मला म्हैसूरच्या राजाचा नाश करावया
नाहीं, तर फक्त त्या हरामखोर खंडेरावाची तेवढी उचलबांगडी करा
याची आहे. तरी तुम्ही आम्ही एकत्र येण्यास प्रत्यवाय कसल
पीरखानाला ती गोष्ट अर्थातच मानवली आणि आपल्या सरदारांचा स
घेऊन त्यानें असें ठरविलें कीं, उभय सैन्यांसमक्ष हैदर आणि नंदराजा यां
बगलभेट व्हावी. त्याप्रमाणें पुढें भेटीचा समारंभहि झाला. हैदर वि
ठरला. दोन्ही सैन्यें एक होऊन त्याच्या हुकमतीखालीं आलीं. त्या दिव
हैदरानें प्रथम कोणती गोष्ट केली ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हैदर
जो तोफखाना त्यावरील युरोपियन अंमलदारासह श्रीरंगपट्टणास मागें राखि
होता व ज्यांना खंडेरावानें वश करून घेतलें म्हणून पूर्वी सांगितलें अ
तो जिनसी तोफखाना आतां हैदराच्याच हुकमतीखालीं पुन्हां आला. हैदर
सर्व सैन्यासमक्ष त्या युरोपियन अंमलदाराचा बेइमान म्हणून धिःकार के
त्यांना हत्यारें उतरवून ठेवण्यास फर्माविलें आणि नंतर बेइब्बत करून त्य
लष्करांतून हाकून दिलें.

यानंतर हैदरानें म्हैसूरच्या राजाकडे शिष्टमंडळ पाठविलें. परंतु र

म्हणजे केवळ बाहुलें. कर्तुमकर्तुम् सत्ता खंडेरावाची. खंडेरावानें शिष्टमंडळाला उत्तर दिलें कीं, 'तुम्ही सर्व फितुरी हरामखोर आहांत, तुमच्याशीं कसली बोलणीं करावयाचीं ? तुमचें यथास्थित पारिपत्यच करणार आहों. समजून राहा.' खंडेरावाला आतां इतकी मस्ती येण्याचें कारण त्यानें दरम्यानच्या काळांत मराठ्यांशीं सूत्र लावून मदतीचें अश्वासन मिळविलें होतें हेंच होय. खंडेरावाच्या उर्मट उत्तरानंतर हैदरानें ताबडतोब जलदी करून श्रीरंगपट्टणास येऊन वेढा बसविला.

श्रीरंगपट्टणाला वेढा बसवून दोनचार तोफांचे गोळे शहरावर पडले नाहींत तोंच शहरांत हाहा:कार उडाला. लोक खंडेरावाला शिव्या देऊं लागले. लोकांना घाबरविण्याचें आणि चिथावण्याचें काम देव्याबाईनें यथास्थित करून ठेवलें होतें. सहकारी लोकांचा कोलाहल उतास गेलासें पाहून देव्याबाई राजाकडे गेली. तिनें त्याची खूप कानउघडणी केली आणि हैदर म्हणतो त्याप्रमाणें खंडेराव त्याच्या हवालीं करून टाकण्यानेंच श्रीरंगपट्टणाचा नाश वांचेल असें त्यास समजाविलें. तिनें राजास आणखी असाहि सल्ला दिला कीं हैदरालाच नंदराजाऐवजीं देव्या म्हणजे दिवाण करून टाक. तरच तूं वांचशील. राजानें तें सर्व कबूल केलें आणि त्याप्रमाणें शेवटीं हैदराच्या सर्व अटी कबूल करून त्यानें त्यास दिवाणाचा दरक दिला. वास्तविक देव्याच्या पदावर आतां आपलीच नेमणूक होणार अशी नंदराजाची अपेक्षा आणि महत्त्वाकांक्षाहि होती. परंतु झालें सर्व उलटेंच आणि एकदां सेनापति आणि दिवाण हे दोन्ही दरक हैदराच्या हातीं गेल्यावर तो महत्त्वाकांक्षी नंदराजाचा कायमचा कांटा काढण्याचाच विचार करील अशी लोकांची समजूत झाली असल्यास ती वावगी नव्हती. परंतु हैदरानें अपेक्षेबाहेर प्रकार केला. त्यानें नंदराजाचा आदरसत्कार करून त्यापुढें आदबीच दाखविली. त्यानें पुष्कळशा मुलुखाची जहागीर नंदराजास दिली व लेखी आणि तोंडी, दरम्यान कुराण घेऊन खातरजमा केली कीं तूं जिवंत आहेस तोंपर्यंत तुला मी माझा

सख्खा भाऊ म्हणूनच वागवीन. तुझ्या जीवाला किंवा तुझ्या जहागिरीला कधींहि धोका आणणार नाहीं. नंदराजाचें असें समाधान केल्यानंतर हैदरानें खंडेरावाच्या जाहीर चौकशीचें नाटकहि उत्तम वठविलें. त्यानें शास्त्रीपंडितांची न्यायसभा भरवून खंडेरावाचा इन्साफ करविला व न्यायधीशाकडून धन्याशीं फितुरी करून, परराष्ट्राची स्वारी आपल्या राज्यावर आणली या आरोपाबद्दल खंडेरावाचा देहांत करावा असा निर्णयहि मिळविला. परंतु असा निर्णय मिळाला तरी हैदरानें ती शिक्षा अंमलांत येऊं दिली नाहीं. उलट आपल्या देव्याच्या अधिकारांत त्यानें त्यास जीवदान दिलें. लोकांना हें हैदराचें केवढें औदार्य असें भासलें! परंतु तें औदार्य खरोखर पाहतां देहान्ताच्या शिक्षेपेक्षांहि निष्ठुर होतें असेंच म्हणणें भाग आहे. त्यानें असा हुकूम दिला कीं, खंडेरावाला एका लोखंडी पिंजऱ्यांत घालून बंगलोर शहराच्या मुख्य हमरस्त्यावर ठेवून द्यावें. बिचारा खंडेराव त्या पिंजऱ्यांत अखेर तडफडून मेला व त्याचीं हाडें आजहि त्या पिंजऱ्यांत तशींच पडलीं आहेत. दोन वर्षेंपर्यंत खंडेराव त्या पिंजऱ्यांत जिवंत होता.

म्हैसूरचा कारभारी झाल्यानंतर हैदरनें प्रत्येक खात्याची कसून तपासणी केली. बिनचूक हिशेबझाडे तयार करविले. खजिन्याची आणि जडजवाहिराची टीप केली. त्या तपासांत असें निष्पन्न झालें कीं, सरकारचें जडजवाहीर वास्तविक सरकारी खजिन्यांत असावयाचें तें सावकाराच्याकडे गहाण पडलें आहे. पूर्वी बुसीला घेऊन सलाबतजंगानें श्रीरंगपट्टणावर स्वारी केली होती त्या वेळीं त्यांनीं बसविलेल्या खंडणीची भरपाई करतांना हें सरकारी जवाहीर एका सावकाराच्या घरीं गहाण पडलें होतें. हैदरानें सावकारास ठपका दिला कीं, ज्या राजाच्या नोकरींत तुम्ही एवढे थोर सावकार झालांत त्या तुम्ही राजावर संकट आलें असतां राजाला पैका पुरवितांना त्याचें जवाहीर तारण गहाण म्हणून तुम्हीं लावून घेतलें ही बहुत शरमेची गोष्ट झाली. हैदरानें

तेथल्या तेथेंच सरकारी जवाहीर आपल्या ताब्यांत घेतलें व सावकारानें कर्जाऊ रक्कम व्याजासुद्धां दाखविली ती सर्व त्याच्या पदरांत टाकली. परंतु त्याच बैठकीस त्यानें त्या सावकाराचे हिशेब तपासण्यासाठीं आपले हिशेबतपासनीस रवाना केले. चौकशींत सावकारानें राजाशीं प्रतारणा केली, खोटे हिशेब लिहिले असें निष्पन्न झालें. तेव्हां त्या सावकाराचें घरदार, चीजवस्त जप्त करून त्यास मरेपर्यंत बंदीखान्यांत पाठविण्यांत आलें. हा सावकार इतका धनत्तर होता कीं, त्याच्या घरच्या पोरांचे पाळणेसुद्धां सोन्याचे केलेले होते असें सांगतात.

यानंतर म्हैसूर राज्यांतील अंतस्थ घडी बसवून हैदरानें बाहेरच्या पुंड पाळेगारांना वठणीस आणलें व त्यांच्याकडून थकलेल्या खंडण्या वसूल केल्या. तसेंच मराठे आणि कर्नूल, कडप्पा व सावनूरचे पठाण संस्थानिक इत्यादिकांनीं म्हैसूर सरकारचा कांहीं मुलूख गिळला होता तोहि त्यानें त्यांजकडून हिसकावून घेतला. यासाठीं त्याला त्यांच्याशीं युद्धेंहि खेळावीं लागलीं. सावनूरच्या मैदानांत तिघा पठाण नबाबांचा हैदरानें जो धुव्वा उडविला त्यामुळें त्याची इभ्रत फारच वाढली. या युद्धांत ह्युगेल या फ्रेंच सरदाराच्या आधिपत्याखालीं कवायती फ्रेंच पायदळाची हैदरास फार मदत झाली. सावनूरच्या विजयाचा परिणाम इतका झाला कीं, अडोणीचा नबाब बसालतजंग म्हणून होता त्यालाहि हैदरशीं मैत्री जोडणें आवश्यक भासूं लागलें. हा नबाब म्हणजे दक्षिणचा सुभा निजाम अलिखान याचा भाऊच. बसालतजंगाची महत्त्वाकांक्षा अशी होती कीं, मराठ्यांचा पानपतांत पुरा मोड झाला आहे या संधीचा फायदा घ्यावा आणि त्यांनीं बळकावलेला शिऱ्याचा सुभा आपण परत जिंकून घ्यावा व सुभेदार म्हणवावें. परंतु हें कार्य साधण्यास सैन्याची पुरेशी सज्जता त्याचेजवळ नव्हती आणि म्हणून त्यानें हैदराकडे वकील पाठविला. हैदरासहि बसालतजंगाची मसलत मानवली. परंतु कार्यभागी होण्याच्या आधीं त्यानें स्वतःला फायदेशीर असा पक्का तह बसालतजंगा-

[stamp, partly legible] ... पुणे

कडून करून घेतला. तहाचीं कलमें अशीं होतीं : हैदरानें आपल्या सर्व सैन्या-
निशीं व तोफखान्यानिशीं शिऱ्याच्या स्वारींत दाखल व्हावें. दोघांनीं मिळ
वेढ्याचें काम चालवावें व शेवटीं ठाणें पडल्यावर दोन्ही सैन्यांनीं मिळेल
भाग ताब्यांत घ्यावा. तो त्यांच्या मालकीचा होईल. ठाण्यांत दारूगोळ
तोफा जें काय सांपडेल तें सर्व बसालतजंगास मिळावें. मात्र तो माल ऐ
जिनसी त्यास न मिळतां त्याची किंमत तेवढी त्यास मिळावी.

असा तह ठरल्यानंतर हैदर आपला युरोपियन गोलंदाजांचा भ
तोफखाना घेऊन आला व त्यानें असा कांहीं भडिमार शिऱ्यावर सुरू के
कीं विचारतां सोय नाहीं. देशी फौजांच्या रिवाजाप्रमाणें महिनोमहिने ठाण्यां
जखडबंदी करून बसावें आणि अन्नपाण्यावांचून कायल करून किल्लेकऱ्या
शरण आणावें; असला दीर्घसूत्री प्रकार न करतां भराभर सुरुंग लावून
पाडून हल्ल्यानें किल्ला घेण्याची युरोपियन पद्धति त्यानें अंमलांत आणल
त्याच्या दोन तीन सुरुंगांनींच काम झालें आणि किल्लेकरी त्यास शरण आ
अशा रीतीनें शिऱ्याचें ठाणें पडलें पण पुढें हैदरानें बसालतजंगाला गुंडा
ठेवून स्वतःच शिऱ्याचा सुभा म्हणून द्वाही फिरविली. येवढेंच नव्हे पुढें
दिल्लीच्या बादशहाकडून सुभेदारीचीं वस्त्रें, माहिमरातब खिलत पोषाख वि
पूर्वक मिळविले. शिऱ्याच्या सुभेदारीचीं वस्त्रें मिळवितांना हैदरानें मराठ्य
स्वारी करण्याचें कलम कबूल केलें होतें. त्याला अनुसरून थोड्याच वि
सांत त्यानें शिऱ्याच्या सुभ्यांतील मराठ्यांनीं बळकावलेलीं मडकशिरें व मु
हीं दोन ठाणीं हिसकावून परत घेतलीं व त्रिसनगर ऊर्फ बसवापट्ट
संस्थानाहि त्यानें सोडविलें.

हैदरचा हा उत्पात पाहतांच पेशव्यांनींहि त्याच्या उपमर्दासाठीं फ
लगेच रवाना केली. पेशव्यांच्या फौजेनें हैदरचा रेंच चांगलाच मोड
शिवाय त्याच्या दोस्तांत त्यांनीं यशस्वीपणें फितूरहि केला. या फितुरा

एकदां तर हैदरचा प्रत्यक्ष जीवच जाण्याचा मोका आला होता. एका चकमकींत त्याच्या डोईवर तरवारीचा मोठा घावहि बसला. हा प्रसंग आपल्या दोस्तांच्या फितुरीमुळें ओढवला असला पाहिजे, एरवीं मराठ्यांना स्वाशावर गर्दी करण्याची संधि सांपडती ना, अशी हैदरची खात्री झाली. त्या लढाईंत जरी कोणाचीच सरशी-निरशी झाली नाहीं तरी हें मराठ्यांचें शुक्र-काष्ट आतां आपणांस सोडीत नाहीं हें हैदर उमजला आणि शहाणपणानें नरमाई धरून त्यानें पेशव्यांशीं तह करून घेतला. तहांत असें ठरलें कीं सध्यां हैदरच्या ताब्यांत जो मुलूख आहे तो तसाच पेशव्यांनीं त्याच्याकडे राहूं द्यावा. आणि त्याच्या बदल्यांत मोठी थोरली खंडणी हैदरनें पेशव्यास द्यावी. तीन वर्षपर्यंत तहाचा अंमल चालावा.

हैदराची या युद्धांत थोडीशी नुकसानी झाली, पण त्याची भरपाई दुसरीकडे करून घेण्याची एक मोठी नामी संधि लगोलग त्यास प्राप्त झाली. तो प्रकार असा : वर मडकशिऱ्याबरोबर बिसनगरचें राज्य हैदरनें जिंकून घेतल्याचें सांगितलेंच आहे. त्या राज्याचे एक मांडलिक संस्थान बिदनूर नांवाचें होतें. तें शिऱ्याच्या सुभेदाराचें मांडलिक संस्थान म्हणून गणलें गेलेलें असल्यामुळें हैदराला त्यांत ढवळाढवळ करण्याचा अधिकार स्वयंभू प्राप्त झालाच होता. त्या संस्थानचा राजा कांहीं वर्षांपूर्वी मयत झाला होता. राज-पुत्र अल्पवयी म्हणून राणीच सारा कारभार राजासारखा पाहत होती. राणी बाईमाणूस असतांहि मोठी धाडसी, कारस्थानी, हुशार आणि महत्त्वाकांक्षी होती. आपल्या हातांतला अधिकार मुलगा वयांत आला तरी तिला सोडावासा वाटेना. तिनें अधिकारलालसेमुळें मुलाला जवळजवळ कैद केल्यासारखें केलें होतें. एवढेंच नव्हे तर, राजघराण्याच्या प्रथेला सोडून तिनें एका ब्राह्मण पुजाऱ्याशीं पुनर्विवाह केला होता. यामुळें सर्व लोकांत तिची अपकीर्ति झाली होती व तिच्या उच्चाटनासाठीं कारस्थानेंहि शिजू

लागलेलीं होतीं. अशाच कोणा कटवाल्याच्या मदतीनें एक दिवस तो राजपुत्र आईच्या कैदेंतून निसटून पळाला आणि बिसनगरला येऊन त्यानें हैदराचा आश्रय घेतला. हैदरानें अर्थातच राजपुत्रांचा मोठा सत्कार करून त्यास आपणाजवळ ठेवून घेतलें. आणि थोड्याच दिवसांत राणीला त्यानें हुकूम पाठविला कीं, अमुक अमुक दिवशीं सुभेदाराच्या भेटीस यावें. बिदनूरचें संस्थान मोगल सुभेदाराचें मांडलिक असलें तरी मध्यंतरींच्या अनेक वर्षांच्या मोंगळ मोंगल कारभारांत ते स्वतंत्र असल्यासारखेंच वर्तू लागले होते. राणी त्याच तोऱ्यांत होती. म्हणून हेदरच्या वाकिलाबरोबर तिनें असें साफ सांगून पाठविलें कीं, मी बिदनूरची राणी आहें. आम्ही कोणाचे मांडलिक लागून गेलों नाहीं कीं दुसऱ्याच्या हुकमानें कांहीं करावें !

असें कांहीं उत्तर येईल अशी हैदराची अपेक्षा होतीच आणि तें तसें येतांच त्याला बिदनूरच्या स्वारीची तयारी करणें प्राप्त झालें. वास्तविक या संस्थानावर स्वारी करणें तेथल्या अवघड जंगली व डोंगरी प्रदेशांमुळें अत्यंत दुर्घट होतें. संस्थानाची राजधानी राणेबिन्नूर एक अफाट शहर आहे. शहराचा घेरा नऊ मैलांचा होईल. शहरांतले मुख्य दोन हमरस्ते आहेत. त्यांची लांबी सहा सहा मैलांची आहे. शहरांत सरदार-दरकदारांचे वाडे, बागा, तळी भरपूर असून, दुतर्फा सर्व रस्त्यावर छायेचे वृक्ष लावलेले आहेत. हें शहर एका डोंगराच्या पायथ्याशीं वसलेलें असून खुद्द डोंगरावर किल्ला बांधलेला आहे. या गडाच्या व शहराच्या आसपास तीस चाळीस मैलांचें मैदान असून, तेथून मात्र सर्व बाजूंनीं टेकड्यांचें कडें आहे व त्यावर छोटे छोटे डोंगरी किल्ले आहेत. शिवाय जंगल तर इतकें दाट आहे कीं, त्यांतून सैन्य नेणें-आणणें मुष्कील. निरनिराळ्या ठिकाणीं घाट-खिंडी धरून अगदीं थोड्या लोकांनाहि वाटेल तेवढ्या सैन्याचा प्रतिकार करण्याची सोय. असलीं जंगलें तोडून सैन्याकरितां मार्ग काढणें मुष्कील. बरें जाळून जंगल नाहींसें

करावें तर तें सर्व बहुधा बांबूंचें. यामुळें जाळणेंहि अशक्य. इतक्या अड-चणी हैदरास होत्या. तथापि तो हिंमतीचा पुरुष असल्यामुळें त्यानें बिदनूरवर स्वारी केलीच. या स्वारींत त्यानें फक्त निवडक सहा हजार कवायती घोडदळ व माथळे हेटकन्यासारखे त्या प्रांतांतील कलरू लोकांचें पायदळ बरोबर घेतलें. पालपडताळ, डेरेराहुट्या लष्कराचा बाजार वगैरे अडगळ कांहीं न घेतां फक्त तांदूळ लादलेल्या बैलांचा मोठा थोरला पठारा मात्र त्यानें बरोबर घेतला. रातवा करून मोठमोठ्या मजली मारून तो गुप्तपणें बिदनूरापुढें दत्त म्हणून उभा राहिला. हैदर बिदनूरच्या मैदानांत येऊन पोहोंचल्याची बातमी राणीला फार उशिरां मिळाली. हैदराचें कवायती घोडदळ वाटेल त्या अवघड मुलखांतहि धांवावयास सरावलेलें. असलें शिस्तबद्ध घोडदळ बिदनूरच्या लोकांनीं पूर्वीं कधीं पाहिलेलेंच नाहीं. हैदरच्या सैन्याची कडक शिस्त, त्याच्या चपळ हालचाली पाहून बिदनूरची प्रजा थक्कच झाली आणि त्यांतच जेव्हां त्यांनीं बिदनूरचा खरा वारस राजपुत्रच स्वारी करून आलेला पाहिला, तेव्हां त्यांना या परचक्राच्या भीतीबरोबरच आनंद आणि समाधानहि वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. खास हैदराच्या सैन्यापुढें राणीचें सैन्य ठिकठिकाणीं वारापाशी होऊन गेलें.

शेवटीं राणीनें पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु हैदरच्या पथकांनीं तिची पाठ घेतली, आणि थोड्याच अवधींत तिला कैद करून हैदरासमोर आणून उभें केलें. हैदर जितका शूर, क्रूर आणि करारी होता, तितकाच महाधोरणी मुत्सद्दीहि होता. राणीला कायमचे कैदेंत ठेवून देणें त्याला अशक्य होतें. पण त्यानें उलट राजपुत्राचा आणि तिचा सलोखा करून दिला. एव-ढेंच नव्हे तर तिला मोठी थोरली जहागीर देऊन आपल्या पुनर्विवाहित पतीबरोबर बिलकूल शक अंदेशा न धरतां कालक्रमणा करावी अशीहि तरतूद करून दिली. राजपुत्राला अर्थात् त्यानें बिदनूरचें राजपद बहाल

केलें, त्यामुळें प्रजाहि संतुष्ट झाली. तथापि या कृत्याच्या बदल्यांत हैदरानें राजाकडून एक तह करवून घेतला होता. त्याअन्वयें मंगलोरचें बंदर आणि तेथून म्हैसूरच्या प्रदेशापर्यंत जोडणारी मुलखाची पट्टी हैदरला मिळावयाची होती. राजाला गादीनशीन करतांच हैदरानें प्रथम मंगलोरचा ताबा घेतला.

अशी बिदनूरच्या राजाची व्यवस्था हैदरानें लावून दिली. ती कांहीं दिवस नीट निभली. परंतु पुढें व्हावयाचें तेंच झालें. राणी मोठी महत्त्वाकांक्षी असल्यामुळें जहागिरदार होऊन दुसऱ्याच्या हुकमाचे ताबेदार बनणें तिला आवडेना व म्हणून हैदराचा नाश करण्याचें कारस्थान रचण्यास तिनें सुरुवात केली. यासाठीं तिनें राजावर मायेची मोहिनी घालून त्यास प्रथम मुठींत घेतलें. राजाहि शेणामेणाचाच होता. दाबावा तसा त्यानें आकार धारण करावा अशी स्वभावाची जात. स्वतःचें व्यक्तिमत्त्व, जोर किंवा शहाणपणा कांहीं नाहीं. राणीनें त्याच्या मनांत असें पूर्ण भरवून दिलें कीं, " गाढवा, माझ्या विरुद्ध या परधर्मी मुसलमानांचें साहाय्य घेऊन माझा काटा काढण्याचा प्रयत्न केलास पण तूं तरी आतां राजा म्हणून राहशील का ! हैदराला तूं काळजाचें मांस तोडून द्यावें त्याप्रमाणें राज्यांतील महत्त्वाचा किती मुलूख देऊन टाकलास बरें ! मुलखापरी मुलूख घालविलास आणि धर्मद्वेष्ट्या मुसलमानांचें संकट कायमचें उभें करून ठेवलेंस. " राणीच्या हितोपदेशानें अखेर राजाहि हैदराच्या नाशाच्या कटांत सामील झाला. हैदर राणेबिन्नूरास असतां राजवाड्यांतच मुक्कामास होता. मंगलोरचा ताबा घेतल्यानंतर तो परत बिदनुरास त्याच राजवाड्यांत यावयाचा होता. राजवाड्यांतून एक गुप्त भुयार होतें व तें नजीकच्या एका देवालयांत नेलेलें. त्याची माहिती फक्त राणीलाच व इतर फार थोड्यांना होती. राजवाड्यांतून गेलेल्या त्या भुयारांत सुरुंग व दारू भरून हैदराला उडवून देण्याचा कट राणीनें रचला. मंगलोराहून परत आल्यावर राजानें हैदराला त्याच्या सर्व सरदारांसह रात्रीं मोठी

मेजवानी द्यावयाची आणि त्यांत ते लोक गर्क असतां खालीं भुयारांतील दारूला बत्ती द्यावयाची आणि भडका उडतांच राजाच्या गुप्तपणें सज्ज ठेवलेल्या सैन्यानें संकेतानुरूप बाहेर पडून हैदराच्या सैन्यावर तुटून पडावयाचें. असा तो सारा बनाव होता.

परंतु "दैव तारी त्याला कोण मारी ?" कटाला वाचा फुटली. बिदनूर-नजीकच्या गांवांतील एका देवळाच्या पुजाऱ्याला कटाचा बनाव नक्की समजला होता. कोणी म्हणतात, प्रचलित धर्मशास्त्राविरुद्ध राणीनें एका देवळाच्या ब्राह्मणपुजाऱ्याशीं पाट लावला. त्यामुळें सर्व कर्मठ ब्रह्मवृंद राणीवर जळत होता. त्यापैकींच तो एक असल्यामुळें राणीचा सूड घेण्याची संधि त्यानें साधली. तो गुप्तपणें बिदनूरास येऊन हैदराची वाट पाहात बसला. हैदराचें बिदनूरांत आगमन झालें, तेव्हां त्याला आशीर्वाद देण्याच्या मिषानें ब्रह्म-वृंदाच्या घोळक्यांत तो राजवाड्यांत शिरला, आणि खुद्द राणीराजा समोर बसलेले असतांनाच त्यानें हैदरावर येणाऱ्या अरिष्टाची खडान्‌खडा माहिती ओरडून सांगितली. हैदरानें वरकरणीं कांहींच भय दाखविलें नाहीं. परंतु कटवाल्यांचीं तोंडें काळीं ठिक्कर पडलेलीं त्याच्या नजरेंतून सुटलीं नाहींत. त्यानें लगेच तेथील सर्व लोकांस गिरफदार करून तेथेंच चौकशी केली, आणि तत्काळ राणीला आणि तिच्या पाटाच्या नवऱ्याला ठार करविलें. राजाला त्यानें ठार मारलें नाहीं, परंतु त्याला कैद करून मुघेरीच्या किल्लयावर डांबलें आणि बिदनूरचें राज्य खालसा केल्याचें जाहीर केलें.

बिदनूरच्या संस्थानची हैदराच्या मुलखांत भर पडली. बिदनूर संस्थान अत्यंत सुपीक आणि समृद्ध, शिवाय बंदर किनारीचें. त्यांत किती तरी उत्तम बंदरें होतीं. भात, दालचिनी, मिरी, वेलदोडे, चंदन, पोवळी, हस्तिदंत यांची तेथें विपुलता. हिऱ्याच्या व सोन्याच्या खाणी त्या मुलखांत अनेक. हैदराला बिदनूरच्या राजवाड्यांत मोहरा व सोन्याच्या चिपा अगणित

मिळाल्या. हैदराच्या बरोबर जे फ्रेंच सेनापति होते, त्यांनींच या सुवर्णलाभाची हकीकत लिहून ठेवली आहे. इतकी विपुल लूट बिदनूरच्या खजिन्यांत भेटली कीं, धान्य मोजण्याच्या अधोल्या पायल्यांनीं मोत्यांचें माप घेत होते ! दागदागिन्यांच्या, सोन्यांच्या चिपांचे दोन एवढे प्रचंड ओटे झाले होते कीं, घोड्यावर बसलेल्या शिलेदाराच्या डोक्यापेक्षांहि ते उंच होते. या लक्ष्मीच्या कृपावर्षावांत हैदर आपल्या शिपायांना मात्र विसरला नाहीं. त्यानें प्रत्येक शिपायास अर्ध्याअर्ध्या वर्षाचा पगार बक्षीस देऊन टाकला, फक्त बिदनूरांतील सैन्यांतील शिपायांना नव्हे, तर जिकडे जिकडे म्हणून निरनिराळ्या प्रांतांतून त्याचीं सैन्यें होतीं तेथल्याहि प्रत्येक शिपायागणिक हें बक्षीस वांटण्यांत आलें. यानंतर हैदरानें राजधानीचें राणेबिन्नूर हें नांव रद्द करून ‘ हैदरनगर ’ असें नांव जाहीर केलें. तसेंच मंगलोर बंदराचेंहि नांव बदलून “ कोडियाळ ” असें केलें. यानंतर हैदरानें आपल्या बिरुदावलींत ‘ कानडा कुर्गाधिपति’ असाहि किताब दाखल केला.

यानंतर आपल्या राज्याला जोडलेल्या या नव्या राज्यांतील किल्लेकोट हैदर जातीनें पाहून आला. त्या वेळीं त्याला असें आढळून आलें कीं, मूळ बिदनूरच्या मालकीचा असलेला कांहीं भाग गोवेकरांनीं बळकावलेला आहे. म्हणून त्यानें तावडतोब गोवेकरांकडे त्या मुलखाची मागणी केली. परंतु गोवेकर व्हाइसरॉय तें ऐकेना. तेव्हां हैदरनें दिवसगत न लावतां लगोलग स्वारीच केली आणि कारवारचा सारा प्रदेश जिंकून घेतला. त्यांतच ओपीरचा बळकट किल्ला त्याला मिळाला. वास्तविक हा किल्ला सोंध्याच्या हद्दींत होता. परंतु तो मूळ बिदनूरकरांचाच असल्यामुळें हैदरानें जबरदस्ती करून तो घेतला. हा ओपीरचा किल्ला हातांत असला म्हणजे कारवारवर पोर्तुगीजांकडून स्वारी होण्याचें भय राहत नाहीं; तसेंच सांघेरी नदीच्या मुखाच्या खाडीवरहि चांगला शह ठेवतां येतो. सांघेरी नांवाचें शहर आहे तें नदीच्या मुखा-

पासून वर ९ मैलांवर आहे. सांवेरी हीच कारवारची राजधानी. तेथें कॅथॉलिक बिशपहि राहत असे.

यानंतर रामगड किल्ला जिंकण्याचाहि हैदरानें बेत सुरू केला. हा किल्ला एका भूशिरावर वसलेला आहे. तो किल्ला व तें भूशीर ताब्यांत आल्यावर गोवा प्रांतावर स्वाऱ्या करण्याची हैदराला मोठी नामी सोय होणार होती. परंतु या वेळीं मात्र त्याच्या विश्वासू फ्रेंच सरदारांनींच त्याला दगा दिला. त्यांचें ख्रिश्चन धर्मप्रेम किंवा स्वजात्याभिमान या वेळीं उतूं गेला. ते म्हणूं लागले रामगडांत ठाणें घालून आम्ही बसूं. पण आम्ही कांहीं पोर्तुगीजांशीं लढणार नाहीं. गोव्यावरील स्वारीच्या या प्रकरणांतच फ्रेंच सरदार हयूगेल याचें हैदराशीं बिनसलें आणि तो त्याच्या नोकरींतून बाहेर पडला. फ्रेंच सैन्याच्या मदतीशिवाय स्वतःच्या बळावर गोवेकरांशीं टक्कर देणें आपणांस परवडणार नाहीं. ही गोष्ट लक्षांत येतांच हैदरानें गोवेकरांशीं मिटतें घेऊन शांततेचा तह केला. त्यांत फायदा हैदरचाच झाला. कारण त्याला गोवेकरांनीं कारवारचा मुलूख बहाल केल्याचें कबूल केलें. गोवेकरांनीं पाहिलें हा एवढा प्रबळ शत्रु कारवार घेऊन शांत होतो आहे तर जिवावर आलेलें शेपटीवर निभावलें असें समजावें.एव्हांपासून एक धडा मात्र हैदर शिकला तो हा कीं फ्रेंच लोकहि शंभर टक्के विश्वास ठेवण्यास लायक नाहींत. युरोपियन सत्ताविरुद्ध झगडा करावयाचा असतां यांची मदत न अपेक्षितांचें झगड्याची तरतूद करून ठेवावयास हवी.

गोव्याकडील स्वारी संपवून हैदर मंगलोरला आला. तों दुसरें एक लाभदायक प्रकरण त्याची वाट पाहतच तिष्ठत बसलें होतें. "लभेत वा प्रार्थयिता न वा श्रियम् । श्रिया दुरापः कथमीप्सितो भवेत्" । म्हणजे लक्ष्मीच्या पाठीमागें लागणाऱ्याला ती प्राप्त होईलच अशी खात्री सांगतां येत नाहीं. परंतु स्वतः लक्ष्मीच ज्याच्या पाठीमागें लागेल तो तिला प्राप्त

कसा होणार नाहीं ! असाच सध्यां हैदरचा दैवयोग होता. म्हणजे असें कीं, मलबारांतील कानानूरचा संस्थानिक अलिराजा या वेळीं हैदरची भेट घेण्यास आला होता. हा अलिराजा मोपल्यांचा राजा किंवा पुढारी होता. कनानूरचें मूळ राजघराणें नायरांचें. या राजघराण्यांतील एका राजकन्येचा व अलिराजाचा तरुणपणीं कांहीं प्रेमसंबंध होता. वास्तविक नायर हिंदु आणि अलिराजा मोपला मुसलमान असें असतांहि नायरराजानें राजकन्येचा विवाह अलिराजाशीं लावून दिला. राजाला मूलबाळ नसल्यामुळें शेवटीं कानानूरचें राज्य मुसलमानांच्या घरांत गेलें.

येथेंच मलबारांतील नायरांची माहिती सांगितली पाहिजे. मलबार किनाऱ्यावर सर्वांत प्रतिष्ठित व संपन्न जमात नायरांचीच. त्या नायर लोकांत बहुपतित्वाची चाल रूढ आहे. म्हणजे कोणाहि नायर स्त्रीला लग्नाचे चार नवरे एकाच वेळीं करण्याची धर्मानें मुभा आहे. यावरून ही जमात पांडवांइतकीच पुरातन समजली जाते. आज तिबेटांतहि पांडवांच्या वेळेसारखीच बहुपतित्वाची चाल रूढ आहे. नायरघराला जितके दरवाजे असतील तितकी त्या घरांतील नायर स्त्रीच्या पतीची संख्या समजतात. एखादा पति घरीं आला म्हणजे प्रथम तो घराला प्रदक्षिणा घालतो आणि आपल्या कमरेची तरवार गुलमोहराच्या शेंगेसारखी वाजवितो. नंतर तो स्वतःसाठीं नेमलेला दरवाजा उघडून घरांत प्रवेश करतो. त्या वेळीं तो आपला पोषाख व हत्यारें आपल्या नोकराजवळ देऊन त्यास दरवाजांत राखणीस ठेवतो. दरम्यान इतर तीन पतींपैकीं कोणी आल्यास त्यानें त्यास सूचना द्यावयाची. पण दर आठवड्यांत एक दिवस मात्र एकाच वेळीं चारी नवऱ्यांचे दरवाजे खुले ठेवण्याची पद्धति आहे. त्या दिवशीं ते चारी पति आपल्या एका पत्नीसमवेत एका पंक्तीस भोजन करतात. कुटुंबपद्धति मातृसत्ताक असते. अर्थात् नायर पुरुषाला स्वतःची संतति नाहीं असेंच समजण्यांत

येतें आणि त्यामुळें त्या जातींत असा कायदाच रूढ आहे कीं कोठलाहि पाश नसल्यामुळें लढाईंत नायरांनीं केव्हांहि प्राणार्पणास तयार राहावें. नायर मुलाला बापाचें नांव सांगतां येत नाहीं. त्याला फक्त आईच्या पतींचीं किंवा आपल्या चुलत्यांचीं नांवें तेवढीं सांगतां येतात. मुलगे वयांत आले म्हणजे ते आपल्या चुलत्याचा शिपाईपेशा स्वीकारतात.

मोपले मूळ मस्कतकडील अरब हिंदुस्थानांत व्यापारनिमित्तानें येऊन स्थायिक झालेले. स्थायिक झाल्यावर मलबार किनाऱ्याचा सर्व व्यापार त्यांनीं आटोपिला. ते पैकेपूर सावकार बनले आणि त्याच्या जोरावर त्यांनीं मलबार किनाऱ्यावरील नायरासारख्या धनत्तर प्रतिष्ठित जमातींनाहि सावकरी पाशांत घालून दीन करून टाकलें. वास्तविक मुसलमानी धर्मांत व्याजबट्टा करणें निषिद्ध आहे. पण मोपल्यांचें तें तर मुख्य दैवत. तथापि मोपल्यांचा कडवा धर्माभिमान मात्र कधींहि नाहींसा झाला नाहीं. अफू खाऊन धुंद होऊन खिश्चन व अन्य धर्मीय काफिरांच्या कत्तली करण्यांत त्यांचा हात कोणी धरूं शकणार नाहीं. त्या धुंदींत स्वतः ठार पडेपर्यंत ते बेहोषपणें भेटेल त्याची कत्तल करीत सुटतात. हैदरासारखा मुसलमानधर्मीय शककर्ता पुरुष आपल्या मुलखांत अवतरला आहे. तेव्हां त्याची मदत घेऊन नायरांचा काटा कायमचा काढावा, असें मोपल्यांच्या मनांत घोळूं लागलें व म्हणूनच अलिराजा हैदरास भेटण्यास आला होता. हैदरानें त्याचा सत्कार करून त्यावर देणग्यांचा वर्षाव केला. मोपले हैदरचे मांडलिक बनले. हे मोपले उत्तम दर्यावर्दी. अलिराजाचें स्वतःचें उत्कृष्ट आरमार होतेंच. हैदरला मराठ्यांच्या आरमारापासून त्रास होतो, तो थांबविण्यासाठीं आरमार हवेंच होतें. अर्थात् हैदरनें अलिराजालाच आपल्या आरमाराचें सरखेल केलें व बंदर, गोद्या, बंदरी व्यापार व बंदरपट्टीच्या सर्व मुलखाचीं महसूलबाबीचीं कामें, अलिराजाचा भाऊ शेख अली याजकडे सुपूर्त केलीं. खेरीज नवीं गलबतें

बांधण्याकरितां व आयतीं विकत घेण्याकरितां त्यानें कोट्यावधि पैका अलिराजाच्या हवालीं केला.

हैदराला आतां एवढें अफाट साम्राज्य प्राप्त झालें होतें, तरी बिदनूर कानडाच्या मुलखाइतका दुसरा कुठलाच प्रदेश त्याला प्रिय नव्हता. ' हैदर-नगर' हीच आपल्या साऱ्या साम्राज्याची राजधानी करावी असें त्याला वाटत होतें. यासाठीं आपला कुटुंबकबिलाहि त्यानें तिकडेच नेला. फक्त आपली थोरली राणी किंवा ज्येष्ठ बेगम हिला त्यानें बंगलोरला ठेवलें. आणि याचेंहि कारण तिचा तसा विशेष हट्ट पडला म्हणून. ही बेगम म्हणजे पूर्वी सांगितलेल्या मखदूमअलीची बहीण. हिच्याच पोटीं टिपू जन्मला. आपली मुख्य हुजूर जहागीर कानडा प्रान्तांत करून त्यानें बाकीचे प्रांत आपल्या नातेवाइकांकडे सोंपविले. बंगलोर प्रांत चुलता इब्राहिमखानाला दिला. म्हैसूर राज्य मखदूम आलेखानाला दिलें. शिऱ्याचें राज्य मीररेजाच्या हवालीं केलें. आपल्या अमीनसाहेब नामक एका पुतण्याला बिसनगरचें राज्य देऊन टाकलें. अलिराज्याच्या हाताखालीं हैदरानें आपल्या स्वतंत्र आरमाराची उभारणी केल्याचें वर सांगितलेंच आहे. आलिराजानेंहि पहिल्याच वर्षी दिग्विजय करून दाखविला. कांहीं तरी कुरापत काढून त्यानें मालदीव बेटावर स्वारी केली. आणि तेथल्या सुलतानाला किंवा राजाला त्यानें कैद केलें. एवढेंच नव्हे तर मोपल्यांच्या क्रूरतेला शोभण्यासारखे अत्याचारहि त्यानें केले. सुलतानाला पकडतांच त्यानें त्याचे डोळे काढविले. अलिराजानें हैदराचें आरमार नेऊन व त्याचे झेंडे फडकावूनच ही स्वारी केली होती. त्यामुळें हैदरच्या आरमाराचा जिकडेतिकडे फार बोलबाला झाला.

अलिराजानें स्वारीहून परत आल्यावर कैद केलेल्या मालदीव सुलतानाला हैदरनगरास हैदरच्या पायावर नेऊन घातलें. सुलतानाची दुर्दशा पाहून हैदराला अतोनात संताप आला आणि त्यानें तत्क्षणींच अलिराजाला सर-खेल पदावरून बडतर्फ केलें व स्टॅनेट नामक इंग्रज इसमास त्या जागीं नेमलें.

हैदरानें मालदीवच्या सुलतानाची परोपरीनें क्षमा मागितली व त्याला आपल्या एका खास राजवाड्यांत मोठ्या इतमामानें ठेवून घेतलें. मालदीव बेटाच्या विजयाचा डंका दरबारच्या शाहिरांनीं पवाडा रचून वाजविला हें सांगणें नकोच. " औरंगजेब बादशहालाहि ज्यानें दाद दिली नाहीं त्या मालदीव बेटाला जिंकण्याचें अघोर कर्म हैदरशहानें करून दाखविलें. शिकंदरपेक्षांहि हैदर पराक्रमी आहे, " असा स्तुतिवाद त्यात केला होता.

यानंतर एक वर्षपर्यंत हैदर हैदरनगरास स्वस्थपणें राहिला. एवढी उसंत किंवा विश्रांति आजन्मांत त्यानें प्रथमच घेतली असेल. सुमारें वर्षभर स्वस्थ बसल्यानंतर हैदराला कंटाळा आला. तथापि त्याच्यासाठीं एक नवी कामगिरी तेवढ्यांत तयार होऊन राहिली होती.

हैदराचा आश्रय मिळाल्यानंतर मोपले निरंकुश झाल्यासारखे वागूं लागले व त्यांनीं हैदरालाहि न कळवितां नायरांना उपद्रव देण्यास सुरवात केली. त्यांचा उपद्रव इतका अनन्वित झाला कीं अखेर कालिकत येथें सर्व नाय-रांची एक गुप्त सभा होऊन त्यांत अमुक एका ठराविक दिवशीं नायरांनीं सर्वत्र उठाव करावयाचा व भेटेल त्या प्रत्येक मोपल्याची कत्तल करावयाची असें ठरलें. तथापि कटाची बातमी बाहेर थोडीशी फुटली होती, त्यामुळें संकेताच्या दिवशीं उठावणी होऊन मोपल्यांच्या कत्तलीला सुरवात झाली तेव्हां पुष्कळसे मोपले किनाऱ्याकिनाऱ्यानें त्यांच्या होड्या, पडाव, मचवे होतेच त्यांतून बसून निसटले. तरीसुद्धां ६,००० मोपले कापले गेले !

परागंदा झालेले मोपले कानानूरला आश्रयास आले. मोपल्यांनीं हैदराकडे दाद मागितली आणि 'तूं आमचा जातभाई नजीक असतां हा प्रसंग ओढ-वला तेव्हां आतां याचें प्रायश्चित्त तूं नायरांवर स्वारी नेऊन त्या काफरांच्या

रक्तानें ही भूमी धुशील तेव्हांच घेतलेसें होईल,' अशी त्याला चेतावणी दिली. हैदराला नवीन मुलूख संपादण्याची ही नवी संधि आली. ती तो कशी सोडणार ? त्यानें सूड घेण्याचें मोपल्यांना आश्वासन देऊन लगेच फौज जमविली. मात्र ही फौज अवघी बारा हजारच होती. त्यापैकीं चार हजार घोडेस्वारांची असून आठ हजार पायदळ होते. तोफखाना असा फारसा नव्हता. फक्त त्यांत चारच तोफा होत्या. अशी सडी स्वारी करून हैदर निघाला. त्यानें धान्यपुरवठ्याची वगैरे कांहींच तरतूद केली नाहीं. तो बंदर-किनाऱ्याशीं समांतर रस्त्यानें कूच करून चालला. त्याच्या मुलखांत ठिक-ठिकाणीं अनेक बंदरें होतीं. त्या त्या बंदरांतून सैन्याला लागणारी अन्नधान्य व इतर सामुग्री वरचेवर पोचविली जावी अशी व्यवस्था त्यानें केली. हैदर कानानूर नदीकांठीं जाऊन पोंचला. नंतर त्यानें शिष्टपणाचा आव आणण्या-साठीं नायरांचा पुढारी सामुद्रि याच्याकडे विद्वान् ब्राह्मणांचें शिष्टमंडळ पाठविलें व मोपल्यांना झालेल्या अन्यायाचें बऱ्या बोलानें परिमार्जन करा, असें फर्माविलें. नायरांनीं तें अर्थातच धुडकावून लावलें. तेव्हां उभयपक्षीं युद्धाची ठिणगी पडली. मलबार किनाऱ्यावर युरोपियन लोकांच्या वखारी होत्या. हैदरचा दरारा आतां इतका वाढला होता कीं या युरोपियन वखार-वाल्यांनीं त्याच्या सैन्याची झळ आपणास पोचूं नये यासाठीं त्याची मनधरणी आरंभिली. नदीच्या उभय तीरांवरून गोळागोळीला सुरवात झाली. नाय-रांचें सैन्य हैदरपेक्षां कितीतरी पटींनीं मोठें होतें. पण हैदराची मदार आपल्या खास घोडदळावर होती आणि त्यांतच त्याच्या योजकतेची परीक्षा होती. हा नायरांचा मलबारी मुलूख कोंकणासारखा. तेथें घोडे कोणी क्वचितच पाहिलेले असावयाचे. वर्षांतून सात महिने सारखा पाऊस असल्यामुळें त्या हवेला घोडे जगतच नसत. शत्रूनें जरी हजारोंहजार पायदळ सैन्य जमविलें असलें तरी आपलें कवायती घोडदळ त्यांत घालून त्याच्या टापाखालीं ते सारे तेव्हांच तुडवून काढूं अशी हैदराची खात्री होती. हैदरनें आपलें आरमार

खाडींतून बरेंच वर आणलें. नंतर त्यानें शत्रूच्या सामने आपल्या शिपायांची लांबच लांब माळका उभी केली आणि तो ओहोटाची वाट पाहात उभा राहिला. निखार ओहट होतांच त्यानें आपले ४,००० घोडेस्वार इतका वेळ लपवून ठेवले होते ते बरोबर घेतले व खाडींतून धांवून जाऊन लांबून नायर सैन्याला प्रदक्षिणा घालून मग एकदम त्यांच्या पिछाडीवर त्यानें हल्ला केला. नायर सैन्य समोर उभे असलेल्या हैदराच्या पायदळ सैन्याशीं निकरानें झुंजत असतांच पाठीमागून हैदरचें घोडदळ भरतीच्या लाटेसारखें अंगावर येऊन कोसळलें. अर्थात् त्यांच्या गोंधळाला आणि भीतीला पारावारच राहिला नाहीं आणि मग नुसता पळ झाला! त्या पळांत न भूतो अशी कत्तल हैदराच्या सैन्यानें केली. भोंवतालच्या बारा मैलांत छिन्नविच्छिन्न झालेलीं प्रेतें आणि तुटलेले अवयव पडलेले होते. हैदराच्या सैन्यानें हा प्रताप केला, मग त्याच्या-पाठीवरच्या पेंढाऱ्यांसारख्या मोपल्यांनीं किती जाळपोळ आणि अनन्वित कृत्यें केली असतील त्याची कल्पनाच करावी.

यानंतर हैदरानें कत्तल थांबविण्याचा हुकूम दिला व सामुद्रि ऊर्फ झामोरीन आणि इतर नायर संस्थानिकांना असा निरोप पाठविला कीं, "तहास या, सलोख्यानें तह उरकला जाईल. शक अंदेशा धरण्याचें कारण नाहीं." झामोरीन अतिवृद्ध असल्यामुळें तो हैदराला भेटण्यास जाऊं शकत नव्हता. म्हणून त्यानें हैदरास नम्रपणें विनंती सांगून पाठविली कीं 'आपणच माझी अगतिकता लक्षांत घेऊन माझ्याकडे चरणधूळ झाडण्याची कृपा करावी. आपल्या आश्वासनामुळें आम्हांस धीर आला आहे.' झामोरीनची व हैदरची भेट होण्याचें जाहीर झाल्याबरोबर रयतेला दिलासा आला व पळून गेलेले लोक आपापल्या गांवीं जाऊन राहूं लागले. तुरळक कांहीं नायरांचा जंगलांतून आणि डोंगरांतून गनिमी काव्यानें मोपल्यांना उपद्रव होत राहिला तितकाच. हैदर सैन्यासह कालिकताकडे कूच करून चालला. त्याच्या सैन्याला वाटेंत कोठेंहि हरकत झाली नाहीं. फक्त एका टेकडीवर एक गढीवजा देऊळ बांधलेलें होतें.

तें ठिकाण गडासारखें लढवितां येण्यासारखें होतें. तेथें झामोरीनचा पुतण्या, जो गादीचा भावी वारस होता तो, आश्रयास जाऊन राहिला होता. हैदरास त्याचा सुगावा लागतांच त्यानें टेकडीस वेढा बसविला. परंतु तो पुतण्या तेथून युक्तीनें निसटला. तो जातांच देवळाच्या पुजाऱ्यांनीं दरवाजे उघडून हैदरास आंत घेतलें. अशा रीतीनें त्या देवळाचा कबजा मिळाल्यावर हैदर पुन्हा कूच करीत चालला. कालिकतला पोंचतांच त्यानें इंग्रजांच्या वखारींत आपला मुक्काम ठोकला. त्याच सुमारास समुद्रमार्गानें हैदराचें आरमारहि कालिकत बंदरांत येऊन दाखल झालें. नंतर हैदरानें झामोरीनची चौकशी केली. तेव्हां त्याला कळलें कीं, झामोरीन अगदीं एकटा राजवाड्यांत बसला आहे. जवळ शिपायीप्यादा नाहीं. फार काय खाशाजवळ एखादा हुजऱ्या तरी असावा तोहि त्यानें ठेवलेला नाहीं. यांत झामोरीनचा हेतु असें दर्शविण्याचा होता कीं, मी सर्वस्वी शरण आलों आहें आणि आतां येऊन तारा नाहीं तर मारा. नायरांत पूर्वी प्रथम मोपल्यांची कत्तल करण्याची मसलत घाटली होती त्या वेळीं झामोरिननें त्याचा निषेधहि केला होता व असें कांहीं केल्यास त्याचे घोर परिणाम आपणास भोगावे लागतील असा हितोपदेश केला होता, यामुळें हैदर आपली मानखंडना करणार नाहीं असें झामोरीन घेऊन चालला होता व तें योग्यच होतें. थोडया वेळानंतर हैदर पालखींत बसून झामोरीनच्या भेटीस गेला. झामोरीननें त्यास साष्टांग दंडवतच घातलें.

हैदरानें त्यास अदबीनें उठविलें. नंतर झामोरीननें हिरेमाणकांनीं व सोन्याच्या चिपांनीं भरलेलीं दोन मोठीं सोन्याचीं घंगाळें त्यांस नजर केलीं. तसेंच दोन छोट्या सोन्याच्या तोफाहि त्यास दिल्या. त्या तोफांचे गाडेसुद्धां सोन्याचे होते. हैदरानें झामोरीनला आश्वासन दिलें कीं ' मी तुझा घेतलेला सर्व मुलूख परत तुझ्या हवालीं करणार आहे. फक्त नाममात्र दरसाल थोडीशी खंडणी तुला मला द्यावी लागेल. ' अशा रीतीनें ही भेट मोठ्या सौरस्यानें उरकली. पण दुसऱ्या दिवशीं तो राजवाडा जळूं लागल्याचें विचित्र

दृश्य लोकांना दिसलें ! हैदरानें आग विझविण्यासाठीं खूप धडपड केली, परंतु राजवाडा सारा लाकडी असल्यामुळें आग आटोक्यांत येणें अशक्य झालें आणि खासा झामोरीन त्याच्या साऱ्या कुटुंबपरिवारासह त्यांत जळून गेला !! झाला हा आगीचा प्रकार खुद्द झामोरीननेंच करविला असेंहि म्हणतात. हैदराला शरण गेल्याबद्दल त्याचा सूड उगविण्याचीं धमकीचीं पत्रें त्याच्या पुतण्यानें व त्रावणकोर-कोचीनच्या नायर राजांनीं त्याला पाठविलीं होतीं. त्यांत झामोरीनला धर्मघातकी, देशद्रोही ठरवून मुसलमानांना देश विकल्याचे आरोप त्यांत केले होते. हीं पत्रें घेऊन जो ब्राह्मण गेला होता त्यानें झामोरीनची निर्भर्त्सना केली व सर्व ब्राह्मण आणि नायर ज्ञातीनें तुला ज्ञातीबहिष्कृत केलें आहे असाहि जातगंगेचा निर्णय त्यास कळविला होता.

झामोरीनचा पुतण्या आणि त्रावणकोर कोचीनचे राजे यांनीं दरम्यानच्या काळांत पनीआनी नदीच्या कांठीं बरेंच मोठें सैन्य हैदराशीं लढण्याकरितां जमविलें. कांहीं पोर्तुगीज व युरोपियन गोलंदाजहि त्यांनीं तोफांसाठीं सैन्यांत भरती केले होते. परंतु हैदर त्या सैन्यावर चालून जातांच त्या सैन्याची दुर्दशा उडाली. त्यांचा पाठलाग करीत कोचीनच्या शिवेपर्यंत हैदर गेला. अखेर कोचीनच्या राजानें खंडणी देण्याचें कबूल करून हैदराचें मांडलिकत्व पत्करलें आणि कोचीनच्या राजाची ही दशा पाहिल्यावर मग बाकीच्या त्या प्रांतांतील लहानसहान संस्थानिकांनींहि तोच कित्ता गिरवला. असा दिग्विजय करून कालिकत व पनीआनी ठाण्यांत हैदरानें आपली कायमची शिबंदी ठेवून दिली आणि त्या मुलखाचें राज्य कोइमतूरच्या ब्राह्मण राजाला देऊन टाकलें. हें कोइमतूरचें राज्य म्हैसूरच्या मदतीवरच नेहमीं अवलंबून असल्यामुळें त्याच्याकडून पुढेंमागें फितुरी होण्याची धास्ती नाहीं, असें लक्षांत घेऊनच हैदरानें ही योजना केली होती. राजा जातीनें ब्राह्मण असल्यामुळें नायरहि त्याच्या अंमलाखालीं सुखानें वर्ततील अशी हैदराची अटकळ होती. यानंतर पावसाळा सुरू झाला. मलबार किनाऱ्यावरील पावसाळा म्हणजे संतत धारच म्हणून

तो कोइमतुरास जाऊन राहिला. तेथें पावसाळ्याचा उपद्रव फारसा नसतो. कोइमतुरानजीक मलबार सरहद्दीवर मिर्डीघेरी नांवाचा एक मोठा किल्ला आहे. त्यांत ठाणें घालून हैदरानें तेथें चंदासाहेबाचा मुलगा रेझासाहेब यास ३००० सैन्यासह ठेवून दिलें.

अशी व्यवस्था करून हैदर मनानें निभ्रांत झाला. आपल्या कत्तलीची दहशत या नायरांनीं पुरीच खाल्ली असली पाहिजे. शिवाय युद्धानंतर आपण जें उदार सामोपचाराचें धोरण ठेवलें त्यामुळें नायरांच्या मनांतील कटुता कमी होईल व आपण लादलेलें जूं तें मुकाट्यानें मानेवर घेतील अशी हैदराची कल्पना झाली असल्यास ती अस्वाभाविक नव्हती. परंतु नायरांचा मानी स्वभाव त्याला ओळखतां आला नाहीं हेंच खरें. हे नायर लोक अत्यंत मानी आणि दीर्घद्वेषी असतात. ते आपल्या प्रतिपक्षाचा काटा काढण्यासाठीं मनांत सारखे जळत राहतात व शत्रूचा सूड घेण्याच्या दुर्दम्य महत्त्वाकांक्षेपायीं आपल्या जीवजानाचीहि फिकीर करीत नाहींत. हैदराला याचा प्रत्यय लगो-लग आलाच. मे महिना संपला असेल नसेल तोंच सर्व मलबार किनाराभर नायरांच्या बंडाची पुन्हा धुमश्चक्री सुरू झाली. या बंडाची सुरवात पांडिचेरी शहरांतील लोकांनीं केलेल्या कत्तलीनें झाली. हें शहर एका किल्ल्यालगत वसलेलें होतें. किल्ल्यावर २०० शिपायांची शिबंदी होती. लोकांनीं किल्ल्या-वर अचानक हल्ला चढवून शिबंदीपैकीं एकुणएक शिपाई कापून टाकला. कत्तलीचा असा कांहीं खून त्यांना चढला कीं माहे येथून पळून आलेल्या पांच फ्रेंच सैनिकांनाहि त्यांनीं कंठस्नान घातलें. हे फ्रेंच शिपाई माहेच्या फ्रेंच सरकारची नोकरी सोडून हैदराच्या सैन्यांत भरती होण्याच्या आशेनें पळून आलेले होते. बंडखोरांनीं त्या शिपायांना मारलें, एवढेंच नव्हे तर, त्यांच्या-बरोबर दोन बाया होत्या त्यांचेहि त्यांनीं तुकडे करून टाकले.

नायरांच्या बंडाचा असा भडका उडण्याला त्रावणकोरच्या राजाची व झामो-रीनच्या पुतण्याची फूस होती हें खरें असलें तरी त्यांचे उठाव फक्त कांहीं विशिष्ट

ठिकाणींच होऊं शकले असते. पण सारा मलबार किनाराच वणवा लागल्याप्रमाणें जो पेटून उठला त्याचें कारण आलिराजा व त्याचा भाऊ शेखराजा यांनीं जो अमानुष छळ रयतेचा सुरू केला तेंच होय. मोपल्यांची पुनः वसाहत करून देण्याचें काम यांच्याकडे हैदरानें सोंपविलें होतें. पण तें करीत असतां किती अन्याय, छळ आणि अत्याचार नायरांवर करावे त्याला त्यांनीं मर्यादा ठेवली नाहीं. यामुळें जात्या नागासारखी तल्लख असणारी नायर जमात पुन्हा फूत्कार करून उठली. बंडाच्या उठावाला नायरांनीं ही पावसाळ्याची वेळ योजिली होती ती डोकेबाज होती खास. या मुलखांतला पाऊस असा अरिष्ट असतो कीं सांगतां पुरवत नाहीं. क्षुद्र नाले ओहोळहि फुगून नद्यांसारखे वाहूं लागतात आणि जिकडे तिकडे जळबंब होऊन जातें. नायर त्या हवेला कायमचे सरावलेले. असल्या मुसळधार पावसांत उघडेंनागडें अनवाणी वावरणें त्यांना कांहींच वाटत नाहीं. उलटपक्षीं हैदराच्या परक्या उपऱ्या लोकांना तें प्राणसंकट. अर्थात् पावसाळ्यांत उठाव केला म्हणजे हैदरला सैन्य पाठवितां येणें कठीण किंबहुना अशक्य होईल आणि त्याचाच फायदा आपण घ्यावा, कालिकत आणि पनीआनी हीं ठाणीं परत जिंकून घ्यावीं आणि मोपल्यांची सारी मुळी खांदून काढावी असा नायरांचा डाव होता. संकल्पाप्रमाणें कालिकत व पनीआनी या ठाण्यांना नायर सैन्याचे वेढे बसले.

वास्तविक या घटनांची वार्ता हैदरापर्यंत पोचणेंहि त्या पाऊसकाळांत शक्य नव्हतें. परंतु एका पोर्तुगीज खलाशामार्फत ती वार्ता हैदरास पोचली. पनीआनीच्या किल्लेदारानें मोठे थोरले बक्षीस देण्याचें कबूल करून त्या खलाशाला तयार केलें होतें. त्या खलाशाचें तें धाडस जीवावरचें होतें यांत शंका नाहीं. बांबूंनीं बनविलेल्या हाऱ्याला कातडें मढवितात आणि मग त्या हाऱ्याचा होडीसारखा एकट्यापुरता उपयोग करतां येतो. अशा एका हाऱ्यांतून तुफान पूर आलेल्या पनीआनी नदींतून प्रवाहाच्या उलट दिशेनें प्रवास करणें किती कष्टाचें व धोक्याचें असेल तें सांगणें नकोच. पण बक्षि-

साच्या लालचीनें त्या पोर्तुगीज खलाशानें तें काम पत्करलें होतें. त्याला दिवस टाळून रात्रीचा प्रवास करावा लागला. जवळ एका होकायंत्राखेरीज दिशा समजण्यास अंधारांत कांहीं साधन नाहीं. वाटेंत हिंस्र श्वापदांची, सुसरींची आणि सर्पांची सदा भीति. तरीहि त्यांतून निभावून तो खलाशी मडीघेरीला येऊन पोहोंचला आणि त्यानें रेझासाहेबाला हैदराच्या सैन्यावर आलेल्या अरिष्टाची वार्ता कळविली. रेझासाहेबानें क्षणहि न गमवितां, बरोबर बदरका देऊन त्या खलाशाची कोइमतुरास रवानगी करून दिली व स्वतः आपलें सैन्य घेऊन तो त्या मुसळधार पावसांतहि पनीआनीचा वेढा उठविण्यास मार्गस्थ झाला. रेझासाहेबाचें सैन्य प्रतिकारास आल्याची वार्ता नायरांना समजली तेव्हां तेहि चकितच झाले. तथापि रेझासाहेबाजवळच्या सैन्यांत 'फौज' म्हणजे घोडदळ बिलकूल नाहीं असें त्यांना समजलें तेव्हां त्यांना पुष्कळच धीर आला. त्यांनीं लगेच आपल्या पायदळ तुकड्या रेझासाहेबास प्रतिकार करण्याकरितां रवाना केल्या व त्या तुकड्यांनींहि नदीच्या प्रत्येक उतारावर रेझासाहेबाच्या सैन्यावर हल्ले चढवून हैराण केलें, व त्यास मारीत पिटीत पांडीचेरीजवळ दोन नद्यांचा संगम होतो तेथें एक बेट झाल्यासारखें आहे तेथें नेऊन त्यास कोंडून धरलें. दोन्ही अंगांस तुफान वाहून चाललेल्या नद्या, त्या उतरून जाण्याची कोठें शक्यता नाहीं. बरें, आल्या वाटेनें जबरदस्तीनें हल्ला करीत निघून जाणेंहि अशक्य. कारण त्या साऱ्या वाटा नायरांनीं झाडें तोडून बंद करून टाकलेल्या. असा मोठा पेच रेझाखानास पडला.

आतां इकडे हैदरानें काय केलें तें पाहूं. पोर्तुगीज खलाशानें आणलेलें वृत्त ऐकतांच त्यानें पहिली गोष्ट केली असेल तर ती ही कीं, कोइमतुराजवळ त्याच्या घोडदळाचें एक पथक मुक्कामास राहिलें होतें त्यास देखत हुकूम बोलावून घेतलें आणि म्हैसुराहूनहि मोठें सैन्य मागविलें. दरम्यान आपल्या पायदळांतील निवडक लोक काढून त्यांची एक पलटण उभी केली आणि कोणच्याहि क्षणीं

कूचास सिद्ध असावें असा तिला हुकूम देऊन ठेवला. रेझासाहेबांकडून कांहीं अनुकूल वृत्त येण्याची हैदर वाट पाहत होता. परंतु रेझासाहेबाची दुर्दशा झालेली त्यास समजली. त्याबरोबर हैदरानें ३००० घोडेस्वार आणि १०,००० ' तोफांची ' शिपायांचें पायदळ घेऊन एकदम कूच सुरू केलें. हैदर किती अनुभवी व कल्पक सेनापति होता, हें त्यानें आपल्या घोडदळाला व पायदळाला दिलेल्या हुकमावरून चांगलें दिसून येईल. घोडदळांत मग तो अधिकारी असो, नाहीं तर बारगीर असो, कोणीहि आपल्या घोड्यांवर जीन किंवा खोगीर घालावयाचें नाहीं, असा हुकूम त्यानें केला ! पावसाळ्यांत घोड्याच्या पाठीवर चामड्याचीं खोगीरें सतत राहिलीं म्हणजे घोड्यांच्या पाठी कुजतात आणि अर्थात् तीं घोडीं निकामी होतात हें लक्षांत घेऊन हैदरानें हा हुकूम काढला होता. तसेंच पायदळ शिपायांनीं सर्व पोषाख काढून टाकावयाचा, फक्त तुमान तेवढी ठेवावयाची असें त्यानें फर्माविलें. प्रत्येक पायदळ शिपायाला एकेक मेणकापडाचा तुकडा देण्यांत आला. तो त्यानें आपल्या पडशीवर गुंडाळावयाचा. ही झाली देशी शिपायांची तरतूद. त्यांच्या सैन्यांत पांडिचेरी व कोलंबो येथून भरती झालेले ३०० युरोपियन शिपायी होते. त्यांना ही देशी दिगंबरी वृत्ति मानवण्यासारखी नव्हती. तेव्हां त्यांच्यासाठीं मात्र त्यानें छत्र्या पुरविल्या. वास्तविक देश तसा वेष केव्हांहि सुखकर होतो. मलबारांतील हवेला वस्त्राची किंवा पोषाखाची गरजच नसते. किंबहुना निसर्गाविरुद्ध अट्टाहासानें तसें केले तर, प्रकृति उलट बिघडावयाचीच ! पण हें तत्त्वज्ञान त्या युरोपियनांना पटलें नाहीं आणि त्यांच्यावर जोरा चालवावा अशी हैदरालाहि हिंमत नव्हती. म्हणून त्यानें युरोपियनांची तशी तरतूद करून दिली. परंतु त्या युरोपियनांना त्यांच्या आडमुठेपणाचें प्रायश्चित्तहि भरपूर मिळालें. कारण पुढें त्या पाऊसकाळांत हैदराच्या सैन्यांत हगवणीची साथ सुरू झाली. त्या वेळीं ती सगळ्यांत जास्त बाधली या युरोपियन शिपायांनाच ! हैदरानें तयार केलेल्या या सड्या सैन्याबरोबर भारी

तोफखान्याचें लटांबरहि बाळगलें नव्हतें. त्यानें फक्त बारा हलक्या तोफा बरोबर घेतल्या होत्या व त्याहि हत्तीवर चढविल्या होत्या. नद्या तरावयाच्या असल्या तरी हत्ती त्या सहज पोहून जातात. अर्थात् ते तोफांचे गाडे, त्यांना जोडलेल्या शेंकडों बैलांच्या माळा, चिखलांत पावलापावलाला गाडें रुतून होणारा विलंब व गोंधळ, असली कांहींच कटकट या युक्तीमुळें उरली नाहीं.

मुसळधार पावसांत आणि असल्या अवघड जंगलगर्क मुलखांत हैदराच्या सैन्याचें सुरू झालेलें कूच हा खरोखरच मोठा चमत्कार होता. दोन तीन माणसांना खांद्याला खांदा भिडवून चालतां येणार नाहीं असल्या निरुंद वाटा. वरून अहोरात्र होणारी पर्जन्याची सतत वृष्टि. ती वृष्टीहि नुसती नव्हे तर मोठ्या वादळाप्रमाणें कीं ज्यांत सतत विजांचा गडगडाट आणि चमचमाट सुरू असलेली. क्वचित् केव्हां ऊन पडे पण तें इतकें प्रखर कीं त्यानें भाजूतच निघावें. अशा पंचमहाभूतांच्या थैमानालाहि आव्हान देत हैदराचें कूच सुरू होतें. इतक्या संकटांतून कोठें मुक्कामास सैन्य थांबावें तो आसपास सर्व उजाड झालेलें. चिटपांखरूंहि दिसेना. आपापलीं घरेंदारें जाळून लोक निघून गेलेले !

अशा रीतीनें नायरांच्या सर्व कल्पना फोल करून हैदराचें सैन्य मलबारांत घुसलेंच. तेव्हां नायरांनाहि विचार पडला; आतां फुटकळ हल्ले थांबवून सगळीकडचीं सैन्यें एकत्र करून हैदराच्या सैन्याशीं मुकाबला घेणें भाग आहे असें त्यांनीं ठरलें. पांडिआगढी येथें पहिला मुकाबला झाला. पांडिआगढीच्या डाव्या हातास एक पक्की तटबंद गढी होती. गढीभोंवतीं खोल खंदक असून, खंदकापुढें मोठा भक्कम असा मेढाहि घालून ठेवण्यांत आला होता. गढींत तोफा होत्या व गोलंदाजांनीं प्राण गेला तरी बेहत्तर, पण जागा सोडावयाची नाहीं, अशा प्रतिज्ञा केल्या होत्या. हैदरानें चार हजार शिपायांची एक तुकडी करून तिचें आधिपत्य एका पोर्तुगीज लेफ्टनंट

कर्नलकडे सोंपविलें व तिला त्या गढीवर हल्ला करण्यास सांगितलें. ही झाली हैदराच्या सैन्याची उजवी बगल. त्याच्या सैन्याची बी डावी बगल त्यानें केली, तिचें आधिपत्य एका इंग्लिश ऑफिसरकडे दिलें होतें. आणि मुख्य कमरगा हैदरानें स्वतः संभाळला होता. स्वतःच्या खाशा तुकडीच्या मागें फ्रेंच शिपायांच्या तुकड्या आणि हैदराच्या देशी बड्या अदमींची पथकें कुमकेस सज्ज राहिलीं होतीं. मात्र एक विशेष गोष्ट सांगण्यासारखी ही कीं, त्या सरदारदरकदारांच्या बड्या अदमींच्या पथकावर हुकमत मात्र युरोपियन फ्रेंच अंमलदारांची ठेवण्यांत आली होती!

नकाशाप्रमाणें सैन्याच्या उजव्या पायदळ तुकडीनें गढीवर चाल केली. खंदकापर्यंत तिचे लोक पोंचले, परंतु तिला पुढें जातां येईना, आणि गढींतून तर सारखा तोफांचा मारा सुरू होता. यामुळें त्या दोन तासांच्या आगीच्या पावसांत हैदराच्या पायदळांतील शिपाई पटापट मरून पडले. पोर्तुगीज सेनापतीच्या वर्तनाचा हैदराला अर्थच कळेना. आपले इतके शिपायी कांहीं काम न होतां फुकट मारले जावे यामुळें हैदर कावराबावरा होऊन गेला. इतक्यांत युरोपियन शिपायांचा एक फ्रेंच सेनानी होता तो हैदराजवळ आला व म्हणाला, "मला हुकूम द्या. मी गढी काबीज करून दाखवितों." हैदरानें त्यास अनुज्ञा देतांच त्या फ्रेंच सेनापतीनें खंदकांत उडी घेतली. त्याचें तें उदाहरण पाहतांच मागाहून इतरांनीं भराभर उड्या घातल्या आणि पोहून जाऊन, जीवाची तमा न बाळगतां, गढीला शिड्या लावल्या आणि अखेर त्यांनीं गढी जिंकलीहि !

गढी इतक्या लवकर अशी सर होईल अशी हैदराची कल्पना नव्हती आणि शत्रु इतका जिवावर उदार होऊन लढेल अशी किल्लेकऱ्यांचीहि कल्पना नव्हती. पण गोष्ट तशी प्रत्यक्षांत घडली खरी. त्याचा परिणाम हा झाला कीं नायरांचें सर्व धैर्य एकदम लयास गेलें. ओतणाऱ्या पावसांत शत्रु स्वारी करून

येतो हेंच त्यांना महदाश्चर्य झालें होतें. त्यांत आतां युरोपियन सेनापति, जें ठाणें घेण्याकरितां सहा सहा महिने देशी फौजांना लागावयाचें, तें ठाणें पाहतां पाहतांच बेजरब हल्ला करून जिंकतात, या दुसऱ्या आश्चर्याची त्यांत भर पडून त्यांची अगदीं गाळण उडून गेली. उलटपक्षीं या पहिल्याच एका लढाईनें हैदराची मोहिमेची सर्वच यातायात वाचली आणि त्याची कांहीं विलक्षण जरब जिकडे तिकडे बसली. हैदर मोठा शहाणा आणि गुणग्राही सेनापति होता. त्यानें तेथल्या तेथें त्या फ्रेंच सेनापतीला 'बहादूर' असा किताब देऊन त्याचा गौरव केला आणि सायंकाळीं दरबार करून त्यानें त्यास दहा हजार घोडेस्वारांची मनसब दिली व आपला सारा तोफखानाहि त्याच्या ताब्यांत केला ! अर्थात् हैदर आपल्या शिपायांना विसरेल हेंहि शक्यच नव्हतें. त्यानें हल्ल्यांत गेलेल्या प्रत्येक शिपायास रोख तीस–तीस रुपये आणि जखमी झालेल्या शिपायांना साठ–साठ रुपये वांटले. जखमींची संख्या फारच मोठी होती. तथापि ठार झालेल्यांची संख्या त्या मानानें पुष्कळच कमी म्हणावी लागते. त्याचें एक कारण असें कीं, नायरांच्या बंदुकांना संगिनी चढविलेल्या नव्हत्या किंवा ते भाल्यानें लढत नव्हते. त्यांच्या हातांत मुख्यत्वें तरवारी होत्या. यामुळें तरवारीच्या घावानें घायाळ झालेलेच बरेच शिपायी होते. संगिनी किंवा भाल्याची जखम अधिक प्राणांतिक असते. उलटपक्षीं तरवारीनें झालेल्या जखमा शिवतां येणें सोपें असतें.

हैदराच्या या युरोपियन शिपायांच्या शौर्याची आणि क्रौर्याची जिकडे तिकडे अशी दहशत बसून गेली कीं विचारतां सोय नाहीं. त्याचा आणखी एक फायदा हैदरानें घेतला. त्यानें जिकडे तिकडे असें उठवून दिलें, कीं हे युरोपियन शिपाई राक्षसासारखे अचाट शक्तिमान असतात. एवढेंच नव्हे तर, त्यांना नरमांसाचाहि खुराक रोज लागतो ! ! आतां सर्व मलबार प्रांतांत या राक्षसांना मोकाट सोडण्याचा आपला निश्चय झाला आहे. याचा परिणाम असा झाला कीं सारी प्रजा घरेंदारें सोडून दुर्गम अरण्यांत जाऊन लपून राहिली.

मग हैदरानें अभयाचा कौल दिल्याचें जाहीर करविलें व नायरांनीं कोणचाहि शक अंदेशा न धरतां आपापल्या वस्तीवर सुखानें येऊन राहावें, अशी खटपट केली; परंतु लोक बाहेर येईनात तेव्हां चिडून हैदरानें जंगलांत त्यांचा पाठलाग सुरू केला. दिसेल तो पुरुष ठार मारून टाकावा आणि बायकापोरें गुलाम करावीं असा तडाखा सुरू झाला. पण हा उद्योग हैदराला वर्षानुवर्षें करीत बसावा लागला असता. आलिराजा आणि मोपले यांनींहि असा विचार केला कीं हैदर जर सैन्यानिशीं या प्रांतांतून चालता झाला तरच कदाचित् नायर बाहेर येतील आणि पुन्हां मुलखाची लागण होईल- नायरांच्या दुःस्वासामुळें आपण हैदरला प्रथम आमंत्रण केलें खरें, परंतु हैदरानें येऊन आपल्या प्रांताची नुसती नासाडी करून टाकली. तेव्हां त्यांत आपण तरी काय मिळविलें ? हैदर किती केलें तरी उपरा. आपण दोघे नायर आणि मोपले किती हाडवैरी झालों तरी एकाच प्रांतांतले. आपण आपसांत कसें तें समजावून घेऊं. नायरांचा कांटा पुरा निघाला असल्यामुळें तेहि यापुढें आपणाशीं नरमाईनेंच वागतील. पण हें साधण्यास ही हैदराची ब्याद येथून निघाली पाहिजे. असा विचार करून आलिराजानें हैदरास कोइमतूरला निघून जाण्याचा सल्ला दिला. हैदरहि मनांतून कांहीं निमित्त शोधीत होताच. तेंहि आयतेंच त्याला मिळालें. म्हणजे असें कीं त्याच्या सैन्यांत पटकीची साथ निर्माण झाली. त्यानें माणसें भराभर मरूं मागलीं. तेव्हां आलिराजाचा सल्ला ऐकल्यासारखें करून हैदर मलबारांतून एकदांचा बाहेर पडला.

पण मलबारांतून बाहेर पडण्याआधीं त्यानें एक विचित्र फर्मान काढलें होतें. त्या फर्मानान्वयें नायरांचे सर्व हक्क हिरावून घेण्यांत आले होते व नायरांना अतिशूद्रापेक्षांहि अतिशूद्र लेखण्यांत यावें असा हुकूम देण्यांत आला होता. त्या प्रांतांतील नायर सर्वोच्च ब्राह्मण समजले जात. त्यांना इतरांनीं अदबीनें रामराम घालायचा असे. पण हैदरानें नायर ब्राह्मणांनाच अतिशूद्रांना दंडवत घालावयास लावून त्यांची जात अंत्यजाहूनहि नीच

ठरवून टाकली ! तसेंच कोणाहि नायरानें शस्त्र जवळ बाळगतांच कामा नये. जर कोणी तसा आढळला तर लगेच त्यास जागच्या जागीं ठार करावें असेंहि आणखी एक फर्मान त्यानें काढलें ! !

इतकें हैदरानें केलें तरी मानी नायर ब्राह्मणजमातीनें हैदराला दाद दिली नाहीं. काय वाटेल तें झालें तरी हैदराचें जूं स्वीकारावयाचें नाहीं, हा त्यांचा कृतनिश्चय ढळेना. तेव्हां अखेर जुलुमजबरदस्ती टाकून लाभालोभाच्या आमिषानें नायरांना शांत करण्याचें शहाणपण हैदराला सुचूं लागलें. हैदरानें त्यानंतर आणखी एक नवें फर्मान जाहीर केलें. त्याअन्वयें जे नायर मुसलमान धर्म स्वीकारतील त्यांचे हक्कसंबंध आणि मानपान पूर्वीसारखे सुरक्षित राखण्याचें अभिवचन देण्यांत आलें होतें. पण याचाहि नायरांवर म्हणण्यासारखा परिणाम झाला नाहीं. मुसलमान धर्म स्वीकारणारे नायर फारच थोडे निघाले. बहुतेक नायर देशत्याग करून त्रावणकोरच्या राज्यांत निघून गेले.

शेवटीं हैदराची अशी खात्री होऊन चुकली कीं, जोंपर्यंत या नायर संस्थानिकांचे आणि त्रावणकोरच्या मुलखाचें नीबूड होत नाहीं, तोंपर्यंत आपल्याला खरीखुरी निर्वेधता प्राप्त होणें शक्य नाहीं. म्हणून त्यानें त्रावणकोरवर स्वारी करण्याचें ठरविलें. त्रावणकोर संस्थानिकांनीं नायरांना आश्रय दिला एवढें खुसपट कुरापत म्हणून काढण्यास पुरेसें होतें. त्रावणकोर संस्थान फारसें मोठें नव्हतें. परंतु संपन्न व दाट वस्तीचें होतें. राजाचें नांव रामराजा होतें आणि तो शूर, धोरणी आणि हिकमती म्हणून विख्यात होता. त्या राजानें आपल्या पदरीं, पुष्कळ दिवसांपासून कवायती पायदळें तयार ठेवलीं होतीं. त्याचा तोफखानाहि सुसज्ज असून त्याचे गोलंदाज डेन्स, डच, आणि इंग्लिश असे युरोपियन होते. त्रावणकोरच्या सरहद्दी बिकट असून अवघड होत्या. घाटखिंडी ओलांडल्याखेरीज कोणाहि शत्रूला आंत प्रवेश मिळणें कठीण होतें आणि अशांत प्रत्येक घाटाच्या तोंडीं रामराजानें गडकोट बांधून ते मार्ग अभेद्य करून टाकण्याची दक्षता घेतली होती. इंग्रजांचा त्याच्या मुलखावर

फार डोळा होता व त्याचें राज्य घशांत घालावें म्हणून त्यांनीं मदुरा आणि मरावा येथें महमद अलीच्या मुलखांत मोठें थोरलें सैन्य जमवून ठेवलें होतें. वास्तविक रामराजा इंग्रजांबाबत फसलेलाच होता. प्रथम इंग्रजांना आपण साधे 'बेपारी' सौदागर आहोंत असें भासवून रामराजाकडून उनूर येथें वखार स्थापन करण्यासाठीं परवानगी मिळविली आणि नंतर तेथें आपलें सैन्य आणून ठेवलें. रामराजानें त्याचा जाब विचारला असतां, इंग्रजांनीं अशी संपादणी केली कीं, हें सैन्य तेथें जमविलें आहे तें, आमचा दोस्त महमद अली आहे त्याच्या मुलखाला कोणाचा उपद्रव न व्हावा एवढ्या-करतांच. नुकतेच महबूबखानाच्या करवीं निजाम अलिखानानें त्रावणकोरच्या राजास पोषाख व देणग्या पाठविल्या होत्या. या वेळीं दक्षिणचा सुभेदार निजाम आपल्या बंडखोर मांडलिक संस्थानांशीं लढ्यांत गुंतलेला होता, आणि निजामाच्या सैन्याबरोबर जनरल स्मिथ नांवाचा एक इंग्रज सेनापतीहि ससैन्य सामील होता. अर्थात् निजाम-इंग्रजांचें सख्य आहे, आणि निजाम आपणास देणग्या पाठवून आपली दोस्ती चहातो त्या अर्थीं इंग्रजांच्या पोटांत आपणाविषयीं कांहीं विष असेल असें रामराजास वाटलें नाहीं तर तेंहि स्वाभाविकच होतें.

त्रावणकोरवर स्वारी करण्याचा हैदराचा मनसुबा पक्का झाला. त्याबरोबर त्यानें आधीं मराठ्यांशीं म्हणजे पेशव्यांशीं तह करून टाकण्याची दक्षता घेतली. कारण हैदर त्रावणकोरच्या स्वारींत गुंतलेला पाहून त्याच्या मुलखावर मराठ्यांनीं स्वारी केली तर हैदराचा नष्टांशच व्हावयाचा ! थोड्याच दिवसां-पूर्वी पेशव्यास खंडणी देऊन हैदरानें मराठ्यांशीं शांततेचा तह उरकून घेतला होता. परंतु तहाच्या अटीप्रमाणें हैदर वेळच्या वेळीं खंडणी भरीतच नसे. प्रत्यक्ष स्वारी करावी तेव्हां खंडणी वसूल व्हावयाची. अर्थात् त्या थकलेल्या खंडणीसाठीं त्रावणकोर मोहीम सुरू असतांच मराठे आपल्या मुलखावर स्वारी करण्यास सोडणार नाहींत हें हैदरास ठाऊक होतें.; म्हणून त्यानें निर-

निराळ्या मराठे सरदारांस अंतस्थ पैका चारून तिकडून हालचाल न होण्याची तरतूद करून टाकली. हें काम शिऱ्याचा सुभेदार आणि हैदराचा मेहुणा मीर-रेझा अलिखान यानें उरकलें.

हैदरानें स्वारीसाठीं मोठें सैन्य जमविलें आणि त्यापैकीं एक मोठा विभाग कवाइती पायदळाचा केला. कवायत शिकविण्यासाठीं खास युरोपियन अमलदार नेमले. एवढेंच नव्हे तर, तो स्वतः जातीनिशीं आपला मुलगा टिपू आणि आपले सरदार बरोबर घेऊन कवाइतीचे वेळीं हजर राहूं लागला. युरोपियन सेनापतीच्या सल्ल्यानुसार त्यानें ५००० ग्रेनेडियराचें एक खास पथक तयार करविलें. त्यांत पांचशें शिपायांचे एकेक बटालियन अशी विभागणी केली. एकेक बटालियनांत चार चार कंपन्या असत व त्या प्रत्येक कंपनींत १२५ शिपाई असावयाचे. यापैकीं दोन बटालियन्स खास 'तोफाची' लोकांनीं जमविली होती व बाकीची देशी शिपायांची होती. मात्र बटालियनचा नाईक म्हणजे ऑफिसर युरोपियनच ठेवलेला होता. या प्रत्येक बटालिन-मधील माणूस उंची व अंगलोट पाहून स्वतः हैदरानें निवड करून भरती केले होते. ग्रेनेडियर पलटणींतील शिपायांना दरमहा १० रु. पगार व इतर शिपायांना ८ रुपये ठरवून देण्यांत आला होता. या पलटणींतील लोकांना छबिन्याच्या किंवा चौकीपहाऱ्याच्या कामाचीहि पूर्ण माफी दिलेली असून कोणत्याहि क्षणीं हुकूम येतांच त्यांनीं कूच करण्यास सिद्ध असलें पाहिजे एवढीच अपेक्षा होती.

हैदराच्या त्रावणकोर स्वारीची जाहिरात होतांच इंग्रजांना पोटांतून असें भय वाटूं लागलें कीं, त्रावणकोर जिंकल्यावर हैदर आपल्या राशीस बसल्या-खेरीज राहणार नाहीं. तेव्हां आगाऊच त्याच्याशीं सख्याचें संधान बांधावें. म्हणून इंग्रजांनीं कोइमतुरास वकील पाठविण्याचें निश्चित केलें. परंतु हैदर महाधूर्त होता. त्यानें उलट निरोप पाठविला कीं, "इंग्रजांनीं दाखविलेल्या स्नेहाबद्दल मी फार आभारी आहें. पण इंग्रज वकिलाची भेट कोइमतूर-

सारख्या हंगामी मुक्कामाच्या ठिकाणीं घेणें म्हणजे इंग्रजांच्या इभ्रतीला शोभण्यासारखें नाहीं. जेव्हां मी राजधानी श्रीरंगपट्टण येथें जाईन तेव्हां तुमचा वकील तेथें पाठवा. तेथें पोचतांच मी तुम्हांस तसें कळवीन."

इंग्रजांचा कावा ओळखून मोहिमेस यापुढें दिरंगाई लावणें धोक्याचें आहे असें हैदरानें ठरविलें व सैन्याला कुचाचा हुकूमहि त्यानें दिला. पण आकस्मिकपणें एक नवेंच गंडांतर त्याच्या वाटेंत येऊन उभें राहिलें.

हैदराच्या नव्या कवायती सैन्यांत एक टर्नर नांवाचा आयरिश अधिकारी होता, त्यानें दगा केला. हा ऑफिसर गव्हर्नर ब्रोशियरच्या शिफारशीवरून हैदरनें नोकरींत घेतला होता. तो खरोखरीच शूर, शहाणा व सेनापतीच्या कसबांत पूर्ण वाकबगार होता. आपल्या गुणानें त्यानें हैदराची मर्जी तेव्हांच संपादली होती. या टर्नरच्या आधिपत्याखालींच 'तोफाची' ग्रेनेडियरांचें ५००० शिपायांचे मुख्य पथक असून तत्त्वतः सरसेनापति असाच टर्नरला मान मिळालेला होता. वास्तविक इंग्रजांच्या भलावणीचा माणूस म्हणून हैदरानें त्यावर मुळांतच इतका विश्वास टाकावयास नको होता. परंतु आतांपर्यंतचें टर्नरचें चरित्र इतकें एकनिष्ठ झालेलें होतें कीं, हैदराला त्याविषयीं शंका काढणें मुद्धां पाप वाटलें असतें. आपल्या पराक्रमानें व एकनिष्ठ वर्तनानें हैदराचाच काय, परंतु त्याच्या सैन्याचाहि त्यानें लोभ संपादिला होता. पण आतां याच भरंवशाच्या म्हशीनें ऐन वेळीं हैदरास दगा दिला! दरमाहिन्याच्या शुक्ल पंचमीस सैन्याचा पगार वाटण्याचा शिरस्ता होता. टर्नरनें पंचमीपर्यंत वाट पाहिली व त्या दिवशीं आपला व आपल्या सैन्याचा पगार हातीं पडतांच त्यानें गुप्तपणें कोचीनकडील रस्त्यानें पळ काढला.

टर्नरच्या कंपूचा तळ कोइमतुराजवळ होता. त्याच्या पथकाचे अधिकारी त्याच्या राहुटींत पगार घेण्याकरितां जमले होते. पण त्यांना पगार देणारा

कारकून आज हजर झाला नाहीं. तुमचा पगार उद्यां करतों असें सांगून टर्नरनें त्यांना जाण्यास सांगितलें. नंतर संकेताप्रमाणें तो आणि त्याचा एक साथीदार स्वीडिश अधिकारी होता तो, असे दोघे पथकाचा सर्व पगाराचा पैका बांधून घेऊन स्वार होऊन पळून गेले. मात्र जातांना टर्नरनें तळावरील नोकराला असें सांगितलें कीं, कोइमतुरास मुख्य सेनापतीच्या घरीं जाफत किंवा मोठी मेजवानी आहे म्हणून तिकडे जात आहे. हिंदुस्थानांतील हवा इतकी उष्ण असते कीं दिवसा अंगाची भयंकर तलखी होते. रात्रीं मात्र फार मौज वाटते. दुपारीं उष्णतेमुळें डुकली किंवा झापड आल्याशिवाय राहत नाहीं. बडया लोकांचा सामान्यतः असाच शिरस्ता असतो कीं दुपारीं ३ वाजल्यापासून ६ वाजेपर्यंत झोंप घ्यावी आणि रात्रीं थंड वेळीं मात्र आराम घेत कामकाज किंवा मौजा करीत मध्यरात्रींपर्यंत बसावें.

मौज अशी झाली कीं त्याच्या अधिकाऱ्यांपैकीं कांहीं जणांना कोइमतुरास सरसेनापतीकडे जाफत वगैरे कांहीं नसल्याचें पक्कें ठाऊक होतें. तेव्हां त्यांना वाटलें कीं सरसेनापतीचें कोठें शिकारीस जाण्याचें ठरलें असावें आणि टर्नर हा शिकारीचा विशेष शोकी म्हणून तिकडे गेला असावा किंवा कदाचित् तिथें जुवा खेळायला जाणार असेल. तेव्हां आपण तेथें जाऊन त्यास चाकित करूं या. अशा कल्पनेनें ते अधिकारी कोइमतुरास सरसेनापतीच्या शिबिराकडे गेले. पण तेथले सर्व लोक गाढ झोंपीं गेल्याचें पाहून ते आश्चर्यचकित झाले. तेव्हां मात्र कांहीं जणांच्या डोक्यांत प्रकाश पडला व त्यांनीं सर सेनापतीलाच आपला संशय निवेदन केला. नंतर सरसेनापतीनें मिनर्व्हा नामक एका आयरिश कॅप्टनला ५० युरोपियन स्वार बरोबर देऊन पाठलागास पाठविलें. त्यांनीं १८ मैल दौड केली व कोचीन सरहद्दीजवळ ते थांबले. तेथें एके ठिकाणीं टर्नरचा घोडा दिसला. त्याबरोबर टर्नर आणि त्याचा साथीदार ज्या झोपडींत झोंपले होते तिला त्यांनीं वेढा दिला आणि थोडयाच

वेळांत त्यांच्या मुसक्या बांधून त्यांस घोड्यावर घालून त्यांनीं तळावर आणून दाखल केलें !

हैदराला हा प्रकार समजतांच त्यानें युरोपियन पद्धतीनें टर्नरची 'कोटमास' म्हणजे 'कोर्टमार्शल' करण्याचा हुकूम दिला. त्यांत दोघांनाहि फाशीची सजा देऊन त्यांचीं प्रेतें भर रस्त्यावर टांगून ठेवावींत, असा निकाल देण्यांत आला. त्याप्रमाणें टर्नरला फाशीं देण्यास नेलें. अखेरच्या क्षणीं टर्नरनें असा कबुलीजबाब दिला कीं, 'मी इंग्रज व निजामअलीखान यांच्या फितुरांत होतों. त्या दोघांनीं हैदरावर एकाच वेळीं स्वारी करण्याचें कारस्थान रचलें आहे, इंग्रजांनींच मला फितूर खेळविण्यासाठीं आपल्या नोकरींतून बडतर्फ केलें व तुम्हांकडे पाठविलें.'' ही महत्त्वाची हकीकत टर्नरच्या तोंडून समजल्यामुळें हैदरला त्याहि स्थितींत टर्नरविषयीं कांहीं कृतज्ञता वाटली असावी खास. म्हणून त्यानें टर्नरला चोर-गुन्हेगाराप्रमाणें अप्रतिष्ठा करून फाशीं न देतां लष्करी शिपायाप्रमाणें त्यास सन्मानानें गोळी घालून मारावें अशी रदबदल केली. कोर्टानें हैदरची विनंती अर्थातच मान्य केली. मरणापूर्वी टर्नरनें आपल्याजवळील सर्व पैका गोळ्या घालण्याचें काम दिलेल्या शिपायास वाटून दिला व ज्या मिनर्व्हा नामक अधिकाऱ्यानें त्यास पकडून नेलें होतें त्यास त्यानें आपली तरवार आणि घड्याळ बक्षीस देऊन टाकलें ! गोळ्या घातल्यावर मात्र कोर्टाच्या हुकुमाची पुरी तामिली करण्यासाठीं टर्नरचें प्रेत हम रस्त्यावर एका झाडास लटकावून देण्यांत आलें.

टर्नरच्या या रहस्यभेदामुळें हैदराचे डोळे उघडले. निजाम व इंग्रज यांचा कावा त्याला स्पष्ट दिसून आला व म्हणून त्यानें त्या वेळीं त्रावणकोरची स्वारीच तहकूब करून टाकली. मात्र त्यानें त्याच वेळीं महबूबखानाला हैदराबादेस रवाना करून दिलें. महबूबखानानें निजामाच्या पदरच्या लोकांत फोडाफोड करून, हैदरावरील ठरलेल्या स्वारीचा मनसुबा मोडून काढावयाचा अशी कामागिरी त्याजकडे सोपविण्यांत आली.

त्रावणकोरवरील लष्कराचें कूच हैदरानें थांबविलें तरी सैन्याच्या कवायतीचें काम दुप्पट उत्साहानें तसेंच सुरू ठेवलें. ६०,००० लष्कर व एक लाखाहून अधिक त्या लष्कराबरोबरचें लटांबर, इतक्या प्रचंड जमावाचा एकेच ठिकाणीं असा महिनोमहिने तळ पडलेला; यामुळें लष्कराच्या खाण्यापायीं, मुलूख फस्त होऊन जावयाचा; परंतु तो मुलूखच अत्यंत संपन्न, समृद्ध यामुळें रयतेला हैदराच्या छावणीचा उपद्रव असा केव्हांहि वाटला नाहीं. स्वस्ताई अशी कीं २ शिलिंग फेकले कीं एक बकरें नाहीं तर १२ कोंबडीं विकत घ्यावीं ! २ शिलिंगांस १२ मापें तांदूळ मिळे ! वास्तविक एकाच मापट्याचा तांदूळ एका माणसास दोन्ही वेळां पुरून उरे. कोइमतुरास आठवड्यांतून दोनदां बाजार भरण्याची पद्धाति होती. बाजाराच्या दिवशीं वीस हजार रेशमी कापडाच्या गठ्ठयांची विक्री सहज होई. कोइमतुराकडे रेशमी कापडाचा धंदा फार मोठा. कोइमतुराजवळ एक मैलावर झेवियर पालियम नांवाचे एक जेसूईट मिशन आहे त्या मिशनमध्येंच १०,००० खिश्चन विणकर आहेत, अशी माहिती त्या मिशनच्या मुख्यानें मला सांगितली होती. म्हैसूर व कारोमांडल किनाऱ्याचा व्यापारीवर्ग कोइमतूरचा असल्यामुळें हैदरला जकातीचें फारच मोठें उत्पन्न आहे. दरसाल तंबाखूनें लादलेल्या २०,००० बैलांची कोइमतूरहून जा-ये होते असें सांगतात. ती अतिशयोक्ति असेल असें वाटत नाहीं. कारण पॉंडी आगढी येथें तंबाखूच्या वखारीच वखारी लागून गेलेल्या आहेत. तंबाखूप्रमाणें हरतऱ्हेचें रेशीम, दालचिनी, लवंगा, वेलदोडे, हस्तिदंत इत्यादि दुर्मिळ पदार्थ मलबार किनाऱ्याकडून कोइमतुरांत मोठ्या प्रमाणांत येत असतात.

महबूबखान हैदराबादेस पोंचल्यावर त्याचीं जीं पत्रें हैदरास आलीं त्यांवरून टर्नरनें सांगितलेल्या निजाम-इंग्रजांच्या वार्तेंत खरोखरीच तथ्य होतें असें हैदरास कळून आलें. म्हैसूरवर इंग्रज व निजाम यांनीं स्वारी करण्याचें

कारस्थान दिवाण रुकनुद्दौला यानें पक्कें शिजविलें होतें. दिवाणाच्या सल्ल्यानुसार स्वारींचें सेनापतिपदहि निजामानें जनरल स्मिथ याजकडे देऊन टाकलें होतें, व स्मिथनेंहि मद्रासहून गोरी पलटणें व अनेक देशी शिपायांच्या तुकड्या हैदराबादेस आणून तयार ठेवल्या होत्या.

इतकी विश्वसनीय इत्थंभूत वार्ता मिळाल्यावर त्रावणकोरस्वारीचा बेत रहित करून श्रीरंगपट्टणासच जाण्याची हैदरानें तयारी केली. आतां किती तरी दिवसांनीं हैदर परत श्रीरंगपट्टणास जाणार होता. आपल्या कर्तबगारीनें तो आतां एक स्वतंत्र राजपुरुषच बनला होता. म्हणून म्हैसुरांत आपल्या सर्व वैभवानिशींच प्रवेश करून तेथील लोकांना दिपवून टाकावें असा त्यानें विचार केला. श्रीरंगपट्टणांत हैदरानें मोठ्या समारंभानें प्रवेश केला. त्या स्वारीचें वर्णन करण्याचा मोह मला आवरत नाहीं. ५०,००० पायदळ आणि २५,००० घोडदळ, ३०,००० कवाईत शिकविलेले देशी शिपायांचें पथक आणि एकरंगी पोषाख चढविलेला ४,००० तोफाची शिपायांचा कंपू बरोबर घेऊन हैदराची स्वारी कूचमुक्काम करीत श्रीरंगपट्टणाकडे मार्गस्थ झाली. कुचाच्या दिवशीं हैदराचें सारें घोडदळ लांबच लांब फरा धरून उजव्या हातास उभें असावयाचें आणि त्यांचे मुजरे घेत स्वारी चालूं लागावयाची; नंतर हुस्सार व ड्रगून पथकें स्वारीच्या आघाडीस येऊन चालूं लागत. त्या पथकामागें ५०० हरकाऱ्यांचा किंवा जासुदांचा जथा असे. त्याच्या मागून निशाणाचे हत्ती असत. निशाणें निळ्या रंगाचीं असून त्यांचे कांठ सोनेरी कशिद्यानें मढविलेले असतात. यापैकीं एक निशाण सूर्याचें, तर दुसरें चंद्र आणि ताऱ्यांचें प्रतीक मानलेलें आहे. निशाणाच्या हत्तीच्या पाठीमागून नगाऱ्याचे हत्ती चालत. या नगाऱ्यांचा आवाज भोंवतालीं तीन चार मैलां-पर्यंत चांगला ऐकूं जातो. हे नगारे वाजत असतां खरोखरीच कांहीं तरी भव्य व गंभीर वातावरणांत आपण विलीन होत आहोंत असें वाटल्याशिवाय राहत नाहीं.

सेनापतीचे हुकूम याच नगाऱ्यांनीं सर्व सैन्याला दिले जातात. या नगाऱ्याच्या हत्तीच्या मागें दुसरे चार हत्ती चालतात. त्यावर स्वारीचे सनई, शिंगे, तुताऱ्या यांचे ताफे असतात. त्यांची संख्या ३२ असते. नंतर त्यामागें पांच मस्त लढाऊ हत्ती झुलत असतात. त्यांच्या पाठीवर सोन्याच्या अंबाऱ्या रुप्याच्या साखळ्यांनीं आणि रेशमाच्या काढण्यांनीं कसून बांधलेल्या असतात. या अंबाऱ्यांतून प्रत्येकीं आपादमस्तक चिलखत चढविलेले सहा सहा योद्धे बसलेले असतात. त्यांच्या हातीं बंदुका असतात. या बंदुकांतून एकदम एकाच वेळीं फैरीस मूठ मूठ गोळ्या झाडतां येऊं शकतात. लढाईच्या वेळीं या हत्तींपैकीं एक हत्ती खाशा हैदराकरितां राखून ठेवण्यांत येत असतो. परंतु हैदर आजपर्यंत कधींहि हत्तीवर बसून लढलेला कोणी पाहिलेला नाहीं. हत्तीमागून काफरी किंवा हबशी स्वारांचीं दोन घोडदळें असतात. त्यांचीं हत्यारें लखलख करीत असतात. व त्यांच्या शिरस्त्राणांवर काळ्या शहामृगाच्या पिसांचे तुरे जोडलेले असतात. हे घोडेस्वार लांब लांब भाले बाळगतात. त्यांच्या घोड्यांचीं खोगिरें एकजात लाल रंगाचीं असतात व त्यांवर काळ्या रेशमाची वेलबुट्टी भरलेली असते. या हबशी घोडदळामागून कलरूसारख्या लोकांचें पायदळ पथक असतें. हे सर्व लोक बहुतेक उघडेच असतात. कमरेला कसलेला लंगोट किंवा मांडचोळणा आणि खांद्यावर रेशमी शेला एवढाच त्यांचा पोषाख असतो. त्यांच्या हातांत भाले असतात व त्यांना शहामृगाचीं पिसें व घुंगुर लावलेले असतात व ते त्यांच्या चालीबरोबर सारखे तालबद्ध रीतीनें खुळखुळत असतात. कलरूंच्या पथकामागून नाना तऱ्हेच्या निशाणदारांचा ताफा चालतो. वर जे कलरू भालाईत सांगितले ते नेहमीं हैदरच्या शिकारींत बरोबर घेण्यांत येतात. ते अत्यंत काटक व चपळ असतात. या कलरूंना इतर वेळीं दुसरींहि कांहीं कामें नेमून देण्यांत येत असतात. हैदराची स्वारी सुरू असतां, वाटेंत लाग-

णाऱ्या गांवखेड्यांत किंवा किल्ल्यांत या कलरू भालाइताला एकेक निशाण देऊन पाठविण्यांत येतें. तें निशाण तेथें पाहिलें म्हणजे लष्करांतील कोणाहि सोजिरानें त्या गांवखेड्यास किंवा किल्ल्यास कसलाहि उपद्रव द्यावयाचा नाहीं, असा संकेत आहे. मात्र गांवच्या पाटलानें गांवहद्दीवर येऊन सैनिकांना सर्व जिन्नस योग्य ती किंमत घेऊन विकावयाचा असतो.

या कलरू पायदळापाठोपाठ हैदराचे सर्व मातब्बर सरदार दरकदार चालतात. त्यांचा पोषाख, पेहराव, त्यांची उत्तमोत्तम देखणी घोडी आणि त्यांच्या हिरेजडित तरवारी. काय तें वैभव सांगावें ? प्रत्येक मानकऱ्याच्या डोक्यावर अब्दागीर धरलेली असते. अब्दागीर मिळण्याचा विशेष मान असतो. या सरदार मानकऱ्यांच्या मागून हैदराचे शिकारखान्याचे आठ मानकरी अत्युत्कृष्ट घोड्यावर बसून चाललेले असतात. त्यांच्या मागें बारा मोतद्दार असून, त्यांच्या हातांत हैदरच्या बारा कोतवाल घोड्यांच्या काढण्या असतात. हे बारा घोडे म्हणजे बारा रत्नेंच होत. त्यांपैकीं आघाडीचा घोडा तर केवळ अपूर्व अशीच एक चीज आहे. हा घोडा हैदराला मराठ्यांकडून भेटीदाखल मिळालेला आहे. काय त्या घोड्याची कांति आणि देखणेंपण वर्णन करावें ! त्याची आयाळ अगदीं मऊ पांढऱ्या रेशमासारखी व चांदीसारखी चमकते. शिवाय ती इतकी लांब आहे कीं ती सहज जमिनीपर्यंत पोंचेल, म्हणून त्या आयाळीच्या वेण्या घालून त्यांना फीत जोडतात. शेपूटहि आयाळीसारखेंच सुंदर व लांबलचक आहे. परंतु विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे रिकिबीपर्यंतच्या पोटाच्या आणि पाठीच्या भागावर असें कांहीं नैसर्गिक फूल दिसतें कीं लांबून पाहणारास घोड्यावर कशिदा काढलेली झूलच घातलेली आहे असा भास होत राहतो ! वास्तविक त्या घोड्याच्या अंगावर झूल वगैरे कांहीं नसतें. किंबहुना हा चमत्कार दाखविण्याकरितांच या अपूर्व अश्वरत्नाला कधींहि झूल चढवीत नाहींत. असो ! या कोतवाल

घोड्यामागोमाग हैदराचे जे धांवते पदाती असतात त्यांचा जथा चालतो. त्यांचे सोटे एकजात काळे असून त्यांच्या मुठी सोन्याच्या असतात. त्यामागोमाग सोन्यारुप्याच्या काठ्या घेतलेले चौकीदार घोड्यावरून असतात. मग खाजगी अधिकारी, हैदराचीं हत्यारें बाळगणारे हुद्देकरी व त्यानंतर परिजाद्याचा हिरवी झूल घातलेला हत्ती असतो आणि नंतर मग खाशा हैदरअल्लीचा हत्ती असतो. हैदराच्या स्वारीचा हा हत्ती श्वेतवर्णी आहे. तो कानडाच्या राणीजवळ होता. त्या पांढऱ्या हत्तीची तेथें देव म्हणून पूजा केली जात असे. परंतु त्यावरच आतां हैदरानें आपली अंबारी चढविली आहे ! ! पांढरा हत्ती ही अपूर्व चीज समजण्यांत येते. इतर हजार हत्ती एकीकडे व हा हत्ती एकीकडे अशीच त्याची अंगलोट व कांति आहे. या खास हत्तीवर पिवळी झूल असते व हैदराचा हौदा किंवा अंबारीसुद्धां पिवळीच असते. हत्तीच्या गंडस्थळावर सोन्याची शिरी चढविलेली असते. या स्वारींत हौदे चढविलेल्या दोनशें प्रचंड हत्तींची एक पलटणच पाहावयास मिळते. आणखी किती तरी सांगतां येईल. पण तो मोह मी आवरतों.

राजधानीस पोहोंचेपर्यंत हैदरचा न भूतो असा जयजयकार व सत्कार सुरू होता. श्रीरंगपट्टण दीड कोस उरलें. तेथें त्याचा मेव्हणा मखदूम अलिखान त्यास समारंभानें सामोरा आला व मग हैदर ससैन्य श्रीरंगपट्टणच्या बेटांत शिरला. पूर्वी याच श्रीरंगपट्टणच्या बेटांत हैदरवर व त्याच्या सैन्यावर खंडेरावाच्या कारवाईनें प्राणांताचा कसा बिकट प्रसंग ओढवला होता आणि आतां त्याच ठिकाणीं परत कोणच्या दिमाखानें म्हैसूरचा जणूं राजाच बनून हैदर कसा आला हें पाहिलें म्हणजे 'पुरुषस्य भाग्यम्' हेंच खरें असें म्हणावेंसें वाटेल. तथापि विजयकाल हाच अशुभ कालहि असतो या दुसऱ्या सुभाषिताचाहि प्रत्यय हैदरास लगोलग आला. म्हणजे असें कीं थोरल्या माधवराव पेशव्यांनीं हैदरवर स्वारी करण्याची तयारी केल्याची बातमी

हैदरास याच वेळीं मिळाली ! दीड लक्ष सैन्य घेऊन स्वतः माधवराव पेशव्यांनीं शिऱ्याच्या रोखानें चाल सुरू केली, अशी वार्ता कळल्यानंतर मात्र हैदर चकितच झाला. कारण शिऱ्याचा सुभा त्याचा मेव्हणा मीर रेजा अलीखानाकडे होता व या मीरावर हैदराचा पूर्ण भरंवसा. मीराचा वकीलहि पुण्यास पेशव्याच्या दरबारीं असे. असें असतां मीररेजाने हैदरास पेशव्यांच्या स्वारीची कांहींच दखल देऊं नये याचें हैदरास परम आश्चर्य वाटलें.

हैदरानें मीरावर सर्व विश्वास टाकला होता व त्याचा कारभार पाहण्यासाठीं स्वतः तर्फेचा एक दिवाण त्यानें त्यास दिला होता. हा दिवाणच महा कारस्थानी व घातकी ठरला. त्यानें मीररेजाला लवकरच आपल्या मुठींत आणलें. मीररेजा तसा तरुण, उमदा, उदार आणि कर्तबगार होता, परंतु मोठा विलासी असे. तें त्याचें वर्म या ब्राह्मण दिवाणानें बरोबर हेरलें व मीररेजास त्यानें पुरें व्यसनांध बनवून टाकलें. हैदरानें मराठ्यांच्या खंडणीचा तह उरकून टाकून त्यांची स्वारी थोपविण्याचें काम मीररेजावर सोपविलें होतें व मी स्वतः लवकरच शिऱ्यास येऊन संस्थानची व्यवस्था व शिल्लक तपासणार आहे असेंहि त्यानें लिहिलें होतें. संस्थानची सर्वतोपरी गैरव्यवस्था असल्यामुळें मीररेजा फार घाबरून गेला. तेव्हां हीच फितुरी पेरण्यास नामी संधि आहे असें पाहून त्या ब्राह्मण दिवाणानें मीररेजाला बदसल्ला देण्यास सुरुवात केली. तो म्हणाला, " तुमच्या अंगांत धैर्य असेल तर हैदरचें जूं झुगारून देऊन शिऱ्याचें राज्य निष्कंटक भोगण्याची तुम्हांस संधि आलेली आहे. तुम्ही मराठ्यांचे पदरीं कां पडत नाहीं ? ते तुम्हांस खुषीनें पदरीं घेतील व तुमच्याकडे शिऱ्याचें संस्थान ठेवतील. येवढेंच नव्हे तर दरसाल थोडीशी खंडणी पेशव्यास देण्याचें कबूल केलें म्हणजे हैदराविरुद्ध संरक्षण करण्याचें कामहि पेशवे स्वतः स्वीकारतील. हैदराचें बळ कमी करावें, शिऱ्याचा मुलूख स्वराज्यांतला असतां तो हैदरानें जबरदस्तीनें बळकावला आहे तो त्याच्या हातांतून

काढावा, इतकीच पेशव्यांना ईर्षा आहे. ते कांहीं स्वतः शिन्यास येऊन राज्य करणार नाहींत. पाहा! ही तुम्हांला मोठी संधि आहे. अनायासें हैद-रानेंच तुम्हांला पेशव्याकडे तहासाठीं मनुष्य पाठविण्यास लिहिलें आहे. मलाच त्या कामावर पाठवा म्हणजे झालें. मी सर्व करार तुम्हांस पाहिजे तसा पेशव्याकडून करून आणतों."

मीररेजाला दिवाणाचा सल्ला मानवला व त्यानें त्यास पेशव्याकडे रवाना केलें. पेशव्यानें दिवाणाचें स्वागतच केलें. याच वेळीं इंग्रजांचाहि एक वकील पुण्यास येऊन बसला होता व तो त्यास म्हणत होता कीं तुम्ही एकी-कडून आणि दुसरीकडून आम्ही व निजाम अशी दोहों अंगांनीं एकाच वेळीं हैदरावर स्वारी करूं या. यांतच शिन्याचें हें बोलणें आलेलें. तेव्हां स्वारीचा बेत पक्का ठरला. पण येथेंच त्या थोर पेशव्याचा गुणानुवादहि गाइल्याशिवाय मला राहवत नाहीं. माधवराव पेशवा अगदीं पोरसवदा असला तरी त्याचें शौर्य आणि महानुभावित्व हिमालयायेवढीं मोठीं होतीं. असें सांगतात कीं तो या दिवाणाला म्हणाला, "मला हैदरावर स्वारी करून त्याचीं हाडें जरूर मोडावयाचीं आहेत. परंतु तुमच्यासारख्या फितुरी लोकांशीं एक हात करून मी हैदरवर स्वारी करावी हें मला शोभणार नाहीं. हैदराकडून चौथाई वसूल करण्याचा आमचा हक्क आहे व ती त्यानें देण्याची नाकारली तर दुसऱ्या कोणाच्याहि मदतीशिवाय ती वसूल करण्याची हिंमत या माझ्या लष्करांत खचितच आहे." तथापि हा माधवरावाच्या व्यक्तिगत ईर्षेचा आणि मोठेपणाचा प्रकार झाला. राजकारण घाटतांना त्याला आपल्या कार-भारी मंडळाची सल्ला अखेर ऐकावीच लागत असे आणि त्या मंडळाचाच विजय होऊन हैदरावरील स्वारी मुक्रर झाली.

● ● ●

: ४ :

दुसऱ्या बाजीरावांचा शुक्रवारवाडा

शुक्रवारचा वाडा बाजीरावानें बांधावयाचें १७९९सालींच ठरविलें होतें. वाडा सगळाच्या सगळा नवा बांधण्यापेक्षां एखादा जुनाच वाडा विकत घेऊन त्यांत पाहिजे तशा दुरुस्त्या करून, तो स्वतःस राहण्यालायक करून घ्यावा अशी त्याची कल्पना होती. त्याप्रमाणें त्यानें त्या पेठेंतील एक जुना वाडा खरेदी केला व तो वाढवून, त्याच्यामागें एक नवा चौक बांधला. तें नवें काम उत्तमच झालें. परंतु त्याच्या तुलनेनें वाड्यापुढील दर्शनी भाग अगदींच विसंगत व मजीद दिसूं लागला, म्हणून वाड्यापुढील चौक पाडून टाकण्याचा त्यानें हुकूम दिला आणि नव्या बांधलेल्या मागच्या इमारतीबरहुकूम तो भाग बांधण्याचें ठरवून काम पुढें करण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणें काम तडका सुरू झालेंहि. परंतु पुढील दोनतीन वर्षांत राज्य-क्रांति होऊन बाजीरावाचे पाय तरी पुण्यांत टिकतात कीं नाहीं, अशी

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था

अवस्था प्राप्त झाली. शिंदेशाही जुलूम, सर्जेराव घाटग्याचे उत्पात, अंतस्थ कारस्थानें, होळकराचे दंगे व पुण्यावरील त्याची स्वारी व बाजीरावाचें वसईस पलायन वगैरे गोष्टी त्याच काळांतील होत. वसईचा तह होऊन अकुतोभय होऊन पुण्यास आल्यावर, सुरवातीचे कांहीं दिवस बाजीरावानें राज्यकारभार पाहण्याचें अजीबात सोडून दिलें होतें व तो सर्वस्वी नाचआरामांत आणि नाना तऱ्हेच्या विलासांत मग्न राहिला आणि त्याच वेळीं पुन्हा शुक्रवार वाड्याचें पडून राहिलेलें काम त्यानें सुरू करविलें. १८०३ सालच्या जुलई महिन्यांतील नोंद अशी आहे—'सरकारचा थोरला जुना तोफखान्याचा वाडा इमारतसुद्धां वसलीसाहेब इंग्रज यास राहावयास बाबासाहेबांनीं दिला. पुण्यांतील शुक्रवार पेठेंतील खासगत बाबासाहेब यांचें घर अर्धें तयार झालें आहे, बाकी अर्धें तयार करीत आहेत; तयार झालें म्हणजे खासा स्वारी त्या वाड्यांत जाणार.'

१८०३ च्या ऑगस्टअखेर वाडा जाऊन राहण्याइतपत तयार झाला तेव्हां तेथील निरनिराळ्या कामांचे जाबते बाजीरावानें बांधून दिले. वसई प्रकरणापासून खंडेराव रास्त्यांची बाजीरावाला कमालीची मदत झालेली होती. पडलेंपान सर्व तरतूद व व्यवस्था रास्ते पाहात. बाजीरावाचा या काळांत त्यांच्यावरच नितांत विश्वास बसला होता. नव्या शुक्रवार वाड्यांतील भोजनखर्चाची सर्व जबाबदारी त्यानें खंडेराव रास्त्याकडे दिली. तें काम एक वर्षापुरतें २१००० रुपयांस त्यानें बिनबोभाट पार पाडावें असा मक्ता त्यानें त्याला करून दिला. यानंतर चार महिन्यांत वाड्यांतील वास्तु शांत होऊन बाजीरावाचे श्रीसांबादि देव तेथें गेले आणि मागाहून बाजीरावहि खासा आपल्या बायकांसुद्धां शुक्रवार वाड्यांत कायमचा राहण्यास गेला. २६ डिसेंबर १८०३ च्या एका पत्रांत असें म्हटलें आहे कीं, 'थोरल्या वाड्यांत (म्हणजे शनिवारवाड्यांत) एखादे वेळेस श्रीमंतांची स्वारी जाऊन पुन्हां माघारी येते याप्रमाणें वर्तमान आहे.'

वाड्याची वास्तुशांत १९ डिसेंबर १८०३ रोजीं झाली. त्या वेळीं हुजूर पागेंत ब्राह्मण व बायका देकारासाठीं जमल्या, त्यांना दक्षिणा वाटण्यांत आली. त्याचा तपशील उपलब्ध झाला आहे तो असा:—असामी एकूण २२००. त्यांत ६१॥ रुपयांच्या २४६ थावल्या दर असामीस एक प्रमाणें वाटल्या व ३०५ रुपयांचा खुर्दा वाटला.

वाडा घेतल्यानंतर आसपासच्या सर्वच जागा व घरें हळूहळू बाजीरावानें विकत घेतलीं व स्वतःची खास अशी एक सलग छोटीशी पेठच त्यानें निर्माण केली म्हणाना. १८०४ च्या ऑगस्टांत शुक्रवारवाड्याच्या गल्लीपलीकडे आग्नेय कोनास कोणा फकीरचंदाचें घर होतें तें २५०० रुपयांस खरेदी केलें. शुक्रवारच्या नव्या वाड्यासमोरची जागा आपला प्रीतिपात्र रामचंद्र गोसावी गवई याला बक्षीस देऊन शिवाय ५०००० रुपये दिले व 'सरकारवाड्याच्या मुकाबल्याची हवेली याजकारणें बांधवून परस्पर झरोक्यांत बसून खुषीचीं भाषणें होत जावीं असें ठरलें; त्याप्रमाणें गोसावीबुवाच्या हवेलीचें काम सुरू झालें.'

पुढील सालीं १६ ऑक्टोबर रोजीं बाजीरावानें भवानी वल्लद आसारामवाणी पेठ शुक्रवार याचें घर ५०० रुपयांस खरेदी केलें.

त्याच्या पुढील सालीं (१८०६ मध्यें) शुक्रवार पेठेंत सगुणी कळवंतिणीचे घराचे पश्चिमेस बाळाजी रंगनाथ सुतवणे याचें घर होतें. तेंहि बाजीरावानें ५०० रुपयांस खरेदी केलें. त्या सालच्या दिनांक १४ ऑक्टोबरच्या बाजीरावाच्या खाजगी जमाखर्चांत पुढीलप्रमाणें एक महत्त्वाची नोंद आहे ती अशी—

"९५०० शुक्रवारचे वाड्यासमोर जागा घरें आम्हीं पूर्वी खरेदी केल्याच आहेत. त्या मोडून सगुणी कलवंतिणीचे घरचे दक्षिणेस व चंद्रीचे

घरचे दक्षिणेस व तालिमखाना नवा शुक्रवारचे वाड्यापुढें रस्ता मधीं टाकून बांधिला आहे, त्याचे मुकाबिल्यास पूर्व-पश्चिम लांबीचा रस्ता मधीं सोडून, आम्ही घर बांधून त्यांत कलवंतिणी बिऱ्हाडकरासारख्या ठेविल्या आहेत; त्या आमचे घरास साडेनऊ हजार रुपये लागले असत. लौकिकांत तें घर कलवंतिणीचे म्हणावितों परंतु तें घर आमचें, कलवंतिणीचें नाहीं. छ १ साबान."

शुक्रवार पेठेंतील नव्या नव्या जागा घेण्याचें वेड अखेरपर्यंत चालू होतें. १८०८ च्या ३० जानेवारीस जगु वल्लद पेमा कुंभाराची जागा ९५५ रुपयांस खरेदी केली. पुढील सालीं मे महिन्यांत २५ तारखेस मोर दीक्षित मराठ्यामार्फत त्या पेठेंतील जगन्नाथ सखाराम आठवले यांचें घर १०००० रुपयांस व तसेच पुढें आणखी पांच महिन्यांनीं श्रीनिवास व्यंकटेश तांबोळी यांचें घर १०००० रुपयांस अशीं खरेदी करण्यांत आलीं.

बाजीराव शुक्रवार वाड्यांत राहण्यास गेल्यानंतर साहजिकच सर्वांस त्या वाड्याचें वैभव पाहण्याची मोठी जिज्ञासा उत्पन्न झाली. मुख्य शनिवार-वाड्यांतील जुन्या आश्रित लोकांनीं याबाबत श्रीमंतास विनंती केली तेव्हां बाजीरावानेंहि मोठ्या खुशीनें त्यांची ती जिज्ञासा तृप्त करून त्यांना वर बक्षिसें देऊन संतुष्ट केलें. त्यासंबंधीं खऱ्यांच्या ६९३९ नंबरच्या पत्रांत पुढील मनोरंजक तपशील आहे तो असा——

'सरकारचें वाड्यांतील आश्रित वगैरे मंडळी यांणीं श्रीमंतास विनंती केली कीं, स्वामी नेहमीं जाऊन नव्या वाड्यांत राहिले. आम्हांस दर्शन होत नाहीं तेव्हां कसें करावें ? त्यावर सर्वत्र ब्राह्मण मंडळीस आज्ञा जाली कीं, तुम्हांस नवा वाडा नेऊन दाखवावयाचा आहे. इतकें बोलणें झालें त्याजवर आठचार दिवस झाले. भाद्रपद शुद्ध प्रतिपदा मंगळवारीं श्रीमंतांनीं शंभर

असामी नव्या वाड्यांत नेऊन वाडा दाखवून दर असामीस १०० रुपये प्रमाणें देऊन निरोप दिल्हा.'

शुक्रवार वाडा अखेरच्या स्वरूपांत शनिवारवाड्याप्रमाणेंच सहा मजली उंच होता. अर्थात् तें त्याचें अखेरचें स्वरूप होय. तेथपर्यंत त्यांत दुरुस्त्या, पाडापाडी नवीन बांधकामें जरूरीप्रमाणें सतत होत राहिलीं.

१८०४ च्या ऑगस्टांत कांहीं किरकोळ डागडुजीकरितां १००० रु. महादाजीपंत साठ्याला दिले होते; तसेंच वाड्यांतील पूर्वेकडील चौथ्या मजल्याचे दिवाणखान्याचे व गच्चीवरील दोन बंगल्यांचे तयारीबद्दल विठोजी नाईक गायकवाडास साठे सतरा हजार रुपये देण्यांत आले व 'पांच महिन्यांत बिलकूल काम करून देऊं' असा त्याचेकडून करार करून घेण्यांत आला. त्याचप्रमाणें वाड्यांतील उत्तरेकडील तिसरा व चौथा मजला दिवाणखाना १, सोपे २ व शेवटली गच्ची, पांच महिन्यांत तयार करून देण्याबद्दल महादाजीपंत साठ्यास ३००० रु. देऊन करार करून घेण्यांत आला.

१८०५ चे जानेवारींत वाड्यांतील उत्तरेकडील तिसऱ्या मजल्याचे व चौथ्या मजल्याचे दोन सोपे बांधण्याचें काम सुरू झालें. सबब तिसऱ्या मजल्याचे खालीं १२ गज लांबीच्या सलग तुळया १० लागत होत्या त्या खरेदी करण्यास महादजी काळभोराला ९०० रु. देऊन रवाना करण्यांत आलें. त्यानंतर पुढील दोन तीन नोंदी वाडाबांधणीबाबत आढळतात त्या अशा—

५–२–१८०५. '१६०० रु. शुक्रवार वाड्यांत इमारतीबद्दल भिकाजी पंत यांचे हवालीं केले.'

६–३–१८०५. '७५० रुपये शुक्रवारांतील वाड्याबाहेर रस्त्यांत आग्नेय कोणास एक दगडी हौद नवा केला.'

३०–१२–१८०८. '३५०० रु. शुक्रवारचे वाड्यांत पाश्चिमेच्या अंगें नवा सोपा व पडवी व हौद सुमंताचे विद्यमानें करविले.'

३८९३९ रु. इमारत खर्च वाडा शुक्रवार शहर पुणें याचे लगत उत्तरेच्या अंगें पूर्वेस नाची दिवाणखाना चापेखण सुद्धां १३ खणी उत्तर-दाक्षिण लांबी ३३ गज व रुंदी ८ गज व पूर्वेच्या अंगचे नाची दिवाणखान्याचे ओळीनें उत्तराभिमुख दुघई पूर्व-पश्चिम करावयाचा, त्याचे चापेखण चार याप्रमाणें इमारत एक मजला पूर्वेकडील लांबी दक्षिण-उत्तर गज ४१ व रुंदी पूर्वपश्चिम इमारत गज ८ येणेंप्रमाणें इमारतीचे कामाचा मक्ता जीवनरावांनीं करार केला त्याप्रमाणें रुपये.

३२६५० रु. पूर्वेकडील नाची दिवाणखाना खांब लगाव तातेरे व गलथा व उथळ्या पाटणीस सोट व तक्ते घालून लांबी दक्षिण-उत्तर गज ३३ मधला खण ११ दर खणी लांबी गज २। याप्राो एकूण गज २४।।। व चापेखण २ दाक्षिण उत्तर दर चापेखण गज ४८३ प्राो गज ८। एकूण लांबी गज ३३ चापेखण सुद्धां खण १३ पूर्वेचे रस्त्याचे अंगें वाडयास जोतें माठीव आहे, त्या मासल्याचें व कारेचें काम पश्चिमेचे अंगे जोते २ गलथे व पेटीसुद्धा उंची गज ।।ः व पाटथरा व खुर्च्या पूर्वेस व रस्त्याचे अंगें जोत्यावरील सुद्धां ६२८९ उत्तराभिमुख दुघई लांबी. वगैरे.

शुक्रवारवाडयाजवळ जो तालीमखाना म्हणून बाजीरावानें बांधला होता त्याची बांधणी फारच मोहक होती. तो एक स्वतंत्र छोटासा सुंदर राजवाडाच होता व तेथें दरबार—समारंभादिहि उरकल्याचें आढळतें. उदाहरणार्थ १८०४ च्या जूनमध्यें नरसिंह खंडेराव विंचुरकर यांची, स्वारीस रवानगी झाली, त्या वेळीं त्यांना ७६५ रुपये किंमतीचा पोषाख देऊन निरोप देण्यांत आला; तो समारंभ तेथेंच झाला होता. तसेंच १८०८ च्या नोव्हेंबरांत गंगाधरराव गोविंद पटवर्धन मिरजकर यांस सरदारीचीं वस्त्रें महादाजी परशराम पटवर्धना-बरोबर पेशव्यांनीं पाठविलीं, तींहि याच शुक्रवार वाडयांतील तालीमखान्यां-

तून. तालीमखान्यासंबंधीं आणखी एक नोंद सांपडते, ती अशी:—२७–१–१८०९. '६९ रुपये तावदानें खरेदी करून शुक्रवारचे वाड्यांत व तालीमखान्यांत लाविलीं.'

तालीमखान्याच्या पलीकडे कळवंतिणीच्या घरासंबंधीं वर मजकूर आला आहे त्यांत कळवंतिणीच्या नांवाचा उल्लेख नाहीं; परंतु शोधांतीं तिचें नांव व त्या घराच्या जागेची निश्चिती आतां करितां येऊं शकते.

पुणें नगर–संशोधनाच्या चौथ्या खंडांत कै. य. रा. गुते यांनीं जें शोधटिप्पण प्रसिद्ध केलें आहे त्यावरून असें स्पष्ट ठरतें कीं, श्रीयुत मनसुखलाल प्रतापसिंह शहा यांनीं इ. स. १८६४ त घर नं. ६६४ चा शुक्रवारांतील जो परभीण नायकिणीचा म्हणून वाडा खरेदी केला तोच बाजीरावानें उल्लेखिलेला कळवंतिणीचा वाडा होय. या कळवंतिणीचें नांवहि आम्हांला आतां उपलब्ध झालें आहे. बाजीरावाच्या नाटकशाळांचीं जीं अनेक नांवें त्यांच्या जातीचा उल्लेख करून लिहिलेलीं, बाजीरावाच्या खाजगी जमाखर्चांत आलेलीं आहेत, त्यांत प्रभु ज्ञातीची एकच लक्ष्मी परभीण नांवाची होती. तिला दरमहा ३०० रु. बाजीराव देत असे.

शुक्रवारवाड्याच्या दुरुस्तीचें व वाढीचें काम नेहमीं कांहींना कांहीं तरी चालू असे. १८१० च्या नोव्हेंबरांत शुक्रवारवाड्याचे तयारीबद्दल दाजीबा व बाबाजी सुमंत यांना १०००० रुपये दिले. १८१३ सालीं दक्षिणेकडील चौसोपीच्या गच्च्या पर्जन्यकाळीं गळावयास लागल्या, त्या 'इस्तकाबिल ज्येष्ठ मास श्रीमुख संवत्सर तागायत सुभानु वैशाख अखेर पावेतों १० वर्षें अगदीं गळूं नयेत. गळाल्यास स्वखर्चानें न गळत अशा पुन्हा दुरुस्त करून द्याव्या, असा करार कुलमक्ता आबा बाम, बापू गोडबोले व भिकाजीपंत वाघ यांनीं केला, सबब त्यांना ३७५ रुपये देण्यांत आले. १८१४ च्या डिसेंबरांत 'वाडा शुक्रवार येथील नवे इमारतीबद्दल माजघरचे शेजारीं

उत्तरेकडील चौकाचे, पश्चिम व उत्तरेकडील तिसरे मजल्याचें कौलार तयार करावयाकारितां यज्ञेश्वर ऋषि याला १००० रुपये दिले आहेत.

पुण्यांतले सरदार नगरकर नारो बाबाजीचे वंशज हे तर पूर्वीपासूनच पेशव्यांचे वाडे बांधणारे एक कंत्राटदार किंवा इंजिनियर होते. शनिवारवाड्याचे बांधणीचे वेळीं ठाणें कोळवणांतून इमारती लाकडें आणण्याच्या कामावर नारो बाबाजी गेला असतां त्याला जिवधनकर नबाबानें पकडून कैद केल्याचें वृत्त इतिहासज्ञांस परिचित आहे. “मला कांहीं दिवस पुण्याचे हवेलीस लाकडाचें काम सांगितलें ते वेळेस जिवधनीस मोंगलानें धरून नेलें ते रावांनीं सोडविले” (ऐ. सं. सा. खं. ३ लेखांक १२०). दुसऱ्या बाजीरावींत या घराण्यानें बाजीरावाचा लोभ संपादन केला, तेव्हां घरबांधणीचीं कांहीं कांहीं कामें नगरकरांकडे सोपविलीं जाऊं लागलीं. पुणें नगर–संशोधनाच्या पहिल्या खंडांत आम्ही तत्संबंधींचीं नगरकर दफ्तरांतील कांहीं पत्रेंहि प्रसिद्ध केलीं होतीं, त्यावरून पुढील माहिती कळते—शुक्रवार वाड्याच्या गच्चीच्या बांधकामाकरितां खंगरी विटांचा मक्ता वेताळ पेठेंतील दगडू कुंभाराकडे दिला. विटेचा नमुना लांबी रु. ६ रुंदी रु. ४ व जाडी १ रु. असा होता. (रु. म्हणजे कोणतें परिमाण तें कळत नाहीं.) गच्चीसाठीं लागणाऱ्या चुन्याचें कंत्राट शुक्रवारांतच राहणाऱ्या टिकाराम देवीदास गवंड्यांनीं घेतलें होतें. त्यांनीं सोनोरीनजीक दिवे येथून खाणीचा चुना भाजून २५ रु. खंडीप्रो। ६०० रुपये आकार घेतला.

यानंतर वाडयासंबंधीं अवांतर, किरकोळ परंतु कुतूहलजनक व उपयुक्त अशा कांहीं बाबींची नोंद करतों:—शुक्रवारवाडयाजवळ श्री रामचंद्रजी देव होता, त्यापुढें वाजवावयाकरितां कांशाचा एक तास १८०४ च्या मेंत देण्यांत आला. खुद्द शुक्रवारचे वाडयांत राधाकृष्णाचें एक देऊळ असावेंसें दिसतें. मग तें जुनें होतें कीं बाजीरावानें नवें बांधिलें तें कळत नाहीं.

१८११ सालची, सप्टेंबरांत ६ तारखेस अशी नोंद आहे–' ५२५ रु. शुक्रवारचे वाडयांतील मुरलीधर व लक्ष्मी राधिका यांस सनगे खरेदी करून दिली.' नंतर १८१२ सालच्या नोव्हेंबर ८ ची एक नोंद अशी—'१२० रु. एक घडयाळ विकत घेऊन शुक्रवारचे वाडयाजवळ वाजवावयास ठेवून त्रिंबकजीचे तसलमातीस ठेविले रु. १२०.'

शुक्रवारवाडयाच्या तालीमखान्याचा वर उल्लेख केला आहेच. १८०८ च्या जूनांत बाजीरावानें ' ३६०० रुपये किंमतींत तालीमखान्यांत लाल माती आणून उत्तम तयार करवून घातली (२४–६–१८०८).

वाडयासंबंधीं अशा निरनिराळ्या नोंदी एकत्र केल्या तरी ड्रॉइंग काढि-ल्यासारखा वाडयाचा नकाशा डोळ्यांसमोर उभा राहात नाहीं. वाडा पांच मजली होता आणि पांचव्या मजल्यावर चौकोपऱ्यांवर ४ बंगले होते, एव-ढीच स्थूल कल्पना येते. तपशीलवार वर्णनात्मक असें एकहि पत्र उपलब्ध नाहीं. तद्भावीं तुरळक सांपडणाऱ्या कांहीं कांहीं नोंदींवरूनच त्यांतल्या दालनांचें आणि तेथल्या वैभवाचें अनुमान करावें लागतें.

१३–८–१८०४. '११८ रु. गोखातील चोपाळ्यावर मखमली गादी १ व उशी १ व मांडतक्के २ व गिरद्या ४ केल्या त्याचा खर्च.'

१–४–१८०५. '४७६० रु. शुक्रवार वाडयांत बिछायती पडदे वगैरे नवे केले.'

१२–११–१८०६. '२०० रु. बळवंतराव नागनाथ यांची अंगठी शुक्रवारचे वाड्यांत गहाळली ती एका पहारेकऱ्यास सांपडली. त्यानें इमानें-इतबारें आणून दिली सबब त्यास बक्षीस.'

वाडयांत भोजनाची व्यवस्था ठेवण्याचे मक्ते देण्याची पद्धत होती, हें सुरवातीस एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. १८०७ सालीं सदाशिव भास्कर ओगल्याला मक्ता दिला होता तो असा–" शुक्रवारवाडयांतील देवांचे

नैवेद्य पंक्तीचे भोजनास एक वेळ २०० पात्रें प्रमाणें दोन वेळचीं पात्रें ४०० दररोज, व याखेरीज प्रयोजनसंबंधें वगैरे ज्या वेळेस जशीं पात्रें होतील त्यासुद्धां एक सालचा मक्ता ६०००० रु.

१७–१२–१८०८. ' २२६ रुपये शुक्रवारचे वाडयांत चौकांतील १६ खणांत पांढरे १६ पडदे नवे केले.'

१–११–१८१०. ' २८० रु. शुक्रवारचे वाडयांत पांचवे मजल्यास ४ बंगले मिळोन खारवी पडदे केले.'

३०–१–१८१६. ' १००० शुक्रवारचे वाडयांतील भुया व मेदग्या करावयाबद्दल.'

[मेदगी=नव्या गिलावा केलेल्या भिंती सारवण्याकरितां बकऱ्यामेंढ्यांच्या लेंडयांमध्यें मातीमसाला घालून पाण्यानें भिजवून व दगडावर चांगलें मळून तयार केलेलें मिश्रण. अशा मिश्रणानें भिंत इत्यादि सारवण्याची क्रिया.]

आणखी एक नोंद—६७५ रुपये शुक्रवारांतील वाडयांत १०० समया आवळ्याच्या एक मासला पंक्तीकडे नव्या करविल्या शुद्ध पितळ थातूच्या, त्यास मजुरीखर्च.

वरील नोंदींवरून वाडयांतील भोजनाचा थाट कसा काय असेल तें अजमावतां येईलच. सुदैवानें या भोजनाच्या प्रत्यक्ष वर्णनाचें एक मनोरंजक पत्र उपलब्ध आहे. आणि तें दुसऱ्या तिसऱ्या कोणाचें नसून खुद्द गंगाधर शास्त्री पटवर्धनाचेंच आहे. (बडोद्याच्या शास्त्री दफ्तरांतील वेंचे या ग्रंथांत ७७ नंबरास तें छापलें आहे.) तें २–४–१८१५ चें आहे. त्यांतील भाग असा:—

प्रहर दिवसां भाऊंनीं (दिवाण सदाशिव माणकेश्वर) शुक्रवारचे वाडयांत श्रीमंतांकडे जाऊन तेथें श्रुत करोन आम्हांस बोलावूं पाठविलें. आम्ही गेलों. वाडयांत जाऊन खालचे मजल्यास तावदानाजवळ बसलों. वरचे मजल्याचे

खोलींत श्रीमंत होते. डेंगळे मला बोलावूं आले. जाऊन श्रीमंतास नमस्कार केला. भाऊंनीं खडी ताजीम दिली. श्रीमंतास पोषाख भाऊचे हातून देविले. पागोटें बांधोन नेले ते श्रीमंतांचे डोईस घातलें. फार जड म्हणोन श्रीमंत बोलले कीं सांगाल तर काढतों. तेव्हां विनंती केली कीं काढावें. दुसरें पागोटें घालून श्रीमंतांनीं दुपट्टा अंगावर घेतला. बराच वेळ बोलणें झाल्यावर बयाजीनें (बाजीरावाचा एक निकटचा आवडता हुजऱ्या) इशारा केला, ' महाराजांची मर्जी आहे कीं आज रात्रो तुम्ही भोजनास यावें. त्यास तुम्हीच विनंती करावी. ' त्यावरोन महाराजाची मर्जी प्रसन्न ठेवावी असें समजोन मी विनंती केली कीं आज पंक्तीचे लाभाची इच्छा आहे. त्यावर श्रीमंत बोलले, " उत्तम आहे. भोजन किंवा धान्यफराळ कसा संप्रदाय आहे ? त्यांत आज रविवार आहे." आम्हीं उत्तर केलें कीं, " महाराज भोजन कीं फराळ करतील तोच लाभ आम्ही घेऊं. रविवारचा अटकाव या सांप्रदायाकरितां अधिक नाहीं." नंतर श्रीमंतांनीं म्हणाले आतां संध्येस जावें, सूचना पाठवीन. असें आज्ञापून विडे दिल्हे.

सायंकाळीं वाडयांत आलों. पांच घटका रात्रीं कारकून बोलावूं आल्यावरोन आम्ही उभयतां शुक्रवारचे वाडयांत गेलों. भाऊहि आले. नंतर भोजनशालेंत समारंभ पाहतां कोठवर लिहावें ? दोन पंक्ती खांबाबरोबर पाट मांडोन पाठीमागें दर दालन शिष्ये, शागिर्द उभे राहावयास. पंक्तींत त्यांचा संपर्क नाहीं. येक वाढण्यास मात्र फिरावें. रांगोळ्या मुकेस घालोन रंगाबिरंग पात्राचे दोन्ही बाजूंस खांब सुरुदार रंगवल्लयांचे. दर खणास एक पात्र याप्रमाणें सुरेख रांगोळ्या घालोन दोन केळीचीं पानें मोठमोठीं, त्याजवर ताट गुजराथी गजाचे गर्भ्यांची. नऊ नऊ वाट्या. त्यांत पदार्थ. बारा चौदा शाखा, पंचवीसपर्यंत कोशिंबिरी, दोन भात, दोन पक्वान्नें. समया दर पात्रीं दोन, पाऊण हात उंच. तरतूद होऊन उत्तरेचे पंगतीस

दक्षिणाभिमुख श्रीमंत बसले. डावे बाजूस भाऊ व उजवे बाजूस गंगाधरपंत मराठे, समोर दक्षणचे पंक्तीस उत्तराभिमुख श्रीमंतासन्मुख आम्ही. आमचे डावे बाजूस गंगाधर पंत मराठे यांचे सन्मुख वे. शा. संपन्न बाळशास्त्रीबोवा टोकेकर. उजवे बाजूस बापू भाऊ सन्मुख, याप्रो बसोन भोजन होतां श्रीमंतांनीं स्वमुखें प्रत्येक प्रत्येक 'सावकाश' आज्ञा केली. नंतर गुजराथ प्रांतीं महानद्या कोणत्या? कोठें कोठें आहेत? तापी, नर्मदा, मही हे सविस्तर विनंति केली. नंतर अमदाबादेस नदी कोणती? साबरमती. हिचा उगम व कशी आली? हें बोलणें झाल्यावर श्रीमंतांनीं आज्ञा केली, "काय पाहिजे?" आम्ही विनंति केली, "सर्व पदार्थप्राप्तीचा लाभ झाला. मागण्याची इच्छा आहे ती प्रसंगीं विनंती करीन." भोजन झाल्यावर दिवाणखान्यांत जाऊन बसलो. श्रीमंतही आले. नंतर विडे दिल्हेवर पोषाख आणविले. ते स्वहस्तें प्रथम भाऊस पैठणी दुपटा पागोटे दिल्हें, तदोत्तर आम्हांस दुपटा पागोटे हिरवे पैठणी ऐसी, नारली, गजभर पक्का दुपटा व बलंपेची पागोटें दिल्हेवर चिंत्रकजीस दुपटा पागोटें पैठणी दिल्हे. नंतर बापूस हिरवे पैठणी दुपटा पागोटें देऊन हार, गजरे तुरे मोठे मोठे दिल्हे. नंतर अत्तर, गुलाब, लवंग, वेलदोडे, जायफळ पत्रीची खिचडी मूठभर दिल्हेवर निरोप दिल्हा. नमस्कार करोन आज्ञा घेऊन अकरा घटका रात्रीं वाडयांत आलों.'

बाजीरावाच्या कारकीर्दीच्या सुरवातीस, बहुतेक सर्व राज्यकारभार शनिवार-वाड्यांतील फडांत चाले. पुढें डेंगळा मुख्य प्रधान झाल्यावर सारें काम आणि सारीं कूटकारस्थानें शुक्रवार वाड्यांतच होऊं लागलीं.

या वाड्याबाबत उल्लेखण्यासारखी एक विशेष गोष्ट म्हणजे बाजीरावानें या वाड्यांत नव्यानेंच व्यंकटेश बालाजीचा उत्सव सुरू केला. उत्सव गणपतीउत्सवा-सारखाच मोठ्या प्रमाणावर होत असे. अशाच एका उत्सवप्रसंगीं सुप्रसिद्ध रामजोशाची कथा वाड्यांत झाली असतां त्यानें बाजीरावाला खूष कर-

ण्यासाठीं शुक्रवार वाड्यावर एक कवन किंवा पवाडा रचला. वाड्याचें सौंदर्य आणि वैभव त्यावरून चांगलें प्रतीत होईल. कवन छोटेंसेंच असून फार सुंदर असल्यामुळें तें उद्धृत करणें आवश्यक आहे, तें असे—

कृष्णजन्म आनंद वाटतो गोकुळ अज हें पुणें ॥ श्रीमंताचें मंदिर कांहीं वसुदेवाहुनि उणें ॥धृ.॥ अद्भुत कविचा वार पहा हो कृत मंदिरचातुरी ॥ काय कल्पना अचाट शोभा, बाहेर तशि भीतरीं ॥ १ ॥ जिकडे तिकडे रंग कटाडी खिडक्या जाळ्यावरी ॥ ज्याणें जेथें बसुन पहावें तेथें सुख अंतरीं ॥ २ ॥ ठायीं ठायीं हवुद जलाचे अमृतरसाचे परी ॥ स्नानें करिती संध्या जपतप किति विप्रांच्या हरी ॥ ३ ॥ जेथें नरनारायण पूज्या सांबासह आदरी ॥ प्रभुच्या हस्तें विप्रभोजनें भोजन ऐका तरी ॥४॥ साग्र कर्दळी दळें तयावर षड्रस साखरपुरी ॥ भात केसरी भक्षुनि वाद्यें सवें वरपिती खिरी॥५॥ पक्वदळाचे विडे सुपसनें ज्या त्यावरि भर्जरी ॥ हार गळ्यामधि तुरें लटकती ज्याच्या त्याच्या शिरीं ॥ ६ ॥ गीतकलानर्तनें दिवानिशि सदैव रसमाधुरी ॥ राजसु जाला एक वेळ हा नित्योत्सव मंदिरीं ॥ ७ ॥ ज्या ज्या रुतुचे असे यथोचित विलास नानापरी ॥ भागवतांचे थवे नवे किति कीर्तनरस या घरीं ॥ ८ ॥ तळीं धरुनिया शिरो मंदिरा पर्यंकहि येकसरी ॥ पडदे कुल रेशमी बिछोने जरबाबी झालरी ॥ ९ ॥ कविनें मंदिर कमळ म्हणावें जर ही सरसी पुरी ॥ पंकज मंदिर खरें न कमला राती कमलोदरी ॥ १० ॥ या सदनामधें निरंतर श्री दिवाराति साजिरी ॥ संधेपासुनि निशांत शोभा दीप तिमिर संहरी ॥ ११॥ फाणस कंदिल पोत दुशाखा हिलाल समया तरीं॥ समया अगणित मोमबात्तिचा प्रकाश अंतःपुरीं ॥ १२ ॥ सायंकाळीं सुवास लक्ष्मीसमा फिरति सुंदरी ॥ दांत मंचकीं किती कितिक त्या डोले वरि नागरी ॥ १३ ॥ ज्याच्या दामल मुक्ता सत्कुच कंदुक शोभति उरी ॥ आनंदें क्रीडती नारि किति न कळत या किन्नरी ॥ १४ ॥ सुभोंवत्या अप्सरा पहा

हो चिन्ह भासतें कसें ॥ सूक्ष्म दृष्टिनें पाहिल त्याला सत्याचि सर्वहि दिसे ॥ १५ ॥ यास्तव या घरिं कृष्णजन्म हें सत्याचि लटकें नसे ॥ टाळ विणे किती रबाब भेरी वाद्यें वाजाति रसे ॥ १६ ॥ दानधर्म आनंद पहा हो किति निशिदिनिं होतसे ॥ जेथें नरनारायण बसले स्वयें भक्तिच्या गुणें ॥ ते मंदिर कविराय वर्णितो नको म्हणावें कुणे ॥ १७ ॥

१८१८ सालीं पेशवाई गेल्यावर हा वाडा १८२० सालीं आगीच्या भक्ष्यस्थानीं पडला व त्यांतला बराचसा भाग जळून गेला. त्यानंतर बाकी शिल्लक राहिलेला भागहि पुढें इंग्रज सरकारनें पाडून टाकून त्याचा मालमसाला विकला. आतां वाड्याचीं फक्त कांहीं भिंताडेंच तेवढीं दृष्टीस पडूं शकतात. हा राजवाडा दोन चौकी दुमजली होता अशी माहिती पूना गॅझेटीयरमध्यें दिली आहे. परंतु ती बरोबर नाहीं, हें वर आलेल्या वाड्याच्या समकालीन वर्णनावरून दिसून येईलच. तथापि वाडयाच्या आगीची व त्याच्या मालमसाल्याच्या विक्रीची हकीकत मात्र बरोबर आहे, कारण ४ मार्च १८२६ सालीं पुण्याहून सरदार पुरंदऱ्यांच्या कारकुनानें त्यांना जें पत्र पाठविलें आहे त्यांत असें म्हटलें आहे ' शुक्रवारचा वाडा पाडावयासी काम लाविलें आहे. व्यंकटेशाचा चौक दरोबस्त पाडिला. पुढें सेज चालविली आहे. शनिवारचेंहि वाडयांतील हजारी कारंजांकडील वगैरे इमारत पाडून लाकडें गारपिरावर नेत आहेत. (पराग मासिक फेब्रुवारी १९४८, पृ. २२–३३).

लोकहितवादीच्या ऐतिहासिक गोष्टी भाग ३ मध्यें (पृष्ठ ९) म्हटलें आहे कीं ' पुण्यांत लोकांस इंग्रजी विद्या शिकवावी असें ठरल्यावर स्टिव्हन्सन पाद्री यांनीं शुक्रवारच्या वाडयाच्या तालिमखान्यांत पहिल्यानें १८३० सालीं शाळा स्थापिली. याच ठिकाणीं पुढें बाबा गोखल्यांची शाळा होती. विष्णु-

शास्त्री चिपळूणकर कांहीं दिवस येथें शिक्षक म्हणून काम करीत होते. १८८५ सालीं त्या तालिमखान्यांत पुणें म्युनिसिपालिटीची कचेरी व दवाखाना होता. आतां त्या जागीं धर्मार्थ मिशनचा दवाखाना आहे.

१९२२–२३ सालीं वाडयाचा शिल्लक कांहीं भाग उरला होता तोहि एका कंत्राटदारानें विकत घेतला. त्यापैकींच एक मोठी लाकडी जाळी उपाशी विठोबाचे व्यवस्थापक यांनीं विकत घेऊन आपल्या देवळाच्या नव्या बांधकामांत उपयोगांत आणिली आहे.

• • •

: ५ :

नावजी बलकवडे :

एक अज्ञात मराठावीर

नावजी बलकवड्याचें नांव नावजी लखमाजी बलकवडे (अन्यत्र तें नावजी होनाजी बलकवडे असें सांपडतें). नावजी व हिरोजी हे दोघे सख्खे भाऊ प्रथम मौजें कुरवडें येथें एकत्र राहात होते. नावजी हा कर्तव्र-गार, शूर आणि उपद्यापी. तो काळ संभाजीच्या वधानंतरचा. मोगलांच्या फौजा सर्वत्र पसरून मराठ्यांचे किल्ले एकामागून एक घेत होत्या, उलटपक्षीं रामचंद्र पंत अमात्य, परशुराम त्र्यंबक प्रतिनिधि व शंकराजी पंडित सचिव यांच्या मार्गदर्शकत्वाखालीं मोगलांनीं घेतलेलीं ठाणीं परत हिसकावून घेण्याचा उद्योग, सारखा सुरू होता. संभाजी राजा मारला गेला; येसूबाई, शाहू, सारे राजकुटुंब, कैदेंत पडले. राजाराम जिंजीकडे गेला. अशा स्थितींत शेंकडों मराठे सरदार मोगलांस मिळाले; तेव्हां वतनाची, बक्षिसाची, इनामाची लालूच दाखवून मिळतील ते धाडसी लोक मिळवून त्यांची सरफराजी करून

त्यांच्या करवीं कामें करवून घेण्याचा वक्त आला. असे राजीविराजीचे प्रसंग धाडसी लोकांच्या उदयाला नेहमींच कारण होतात; त्याप्रमाणें याहि काळांत अनेक वीरांचा नव्यानें उदय झाला. अशा लोकांपैकींच नावजी बलकवडे होय.

वर सांगितलेंच आहे कीं, त्या घालमेलीच्या अस्थिर वातावरणाचा फायदा घेऊन, नावजी पुंडावे करूं लागला. पुंडावा करणें म्हणजे लोक जमवून लुटालूट करणें, गांवावर खंडण्या बसवणें, किंवा किल्ले ठाणीं, जिंकून आपल्या कबजांत घेणें. हेच लोक पुढें यशस्वी ठरले आणि स्थिरपद झाले म्हणजे त्यांना कालांतरानें पुंडपाळेगार अशी छोट्या संस्थानिकांशीं समानार्थक अशी पदवी सहज प्राप्त होई.

नावजी हा कोणाच्या नांवानें पुंडाई करीत असे तें स्पष्ट नाहीं; तथापि ज्या वेळीं जो पक्ष प्रबळ असेल, त्याच्या नांवानें तो आपलें कार्य करीत असला पाहिजे. या त्याच्या उद्योगामुळें त्याच्या भावाला चिंता लागली आणि तो त्यास म्हणूं लागला कीं, " तुम्ही असे पुंडावे करतां यांत एखाद वेळेस गोत्यांत येऊन सगळ्याच कुटुंबाला धोका होणार. तुमच्या उत्पातामुळें तुम्ही केव्हां कैद झालांत, तर आमचीं मुलेंमाणसें मात्र टोणकास वांटाल. " असा दोघा भावांचा बेबनाव झाला तेव्हां नावजी निराळा होऊन आपल्या कुटुंबासुद्धां मौजें वाळेण येथें जाऊन राहिला.

तेथें राहून नावजीनें गाढवटेकच्या डोंगरांत जमीयत धरली व आसपासच्या ठाण्याठुण्यांना तो दगा देऊं लागला.

आणि याच वेळीं रामचंद्रपंतादि मंडळींनीं मावळांतील घाटसरीचे किल्ले परत जिंकून घेऊन, रायगड राजधानी शत्रूच्या ताब्यांत गेली होती, ती सोडविण्याचा आराखडा आंखला. वरघाटचे सिंहगड, पुरंधर, लोहगड हे किल्ले मोंगलांच्या ताब्यांत गेल्यामुळें, पहाडांतून रायगडाला कुमक निर्वेधपणें

शत्रूला पोचते, ती बंद करण्यासाठीं वरीलपैकीं किल्ले आधीं कसेंहि करून जिंकले पाहिजेत, म्हणून त्या कामागिरीवर सुरनिस शंकाजी पंतांचा मुतालिक त्र्यंबकपंत नांवाचा होता तो तिकडे गेला. कोरीगड मराठ्यांनीं जिंकलाच होता, तेथून स्वारी करून त्रिंबकपंत राजमाचीस आला व त्यानें तेथें दबा धरला. त्यांचा विचार लोहगड काबीज करण्याचा होता. त्यांच्या बरोबर विठोजी कार्के, पदातीपंचसहस्री म्हणून मावळ्यांचा जमातदार होता, त्यांनें जाऊन किल्ल्यांतील हव घेतली, म्हणजे किल्ल्यावर कोठून कसा हल्ला करतां येईल वगैरे माहिती आणली.

त्र्यंबकपंत मुतालिकाच्या जमावांत नावजी बलकवडे या वेळीं आपल्या जमावानिशीं सामील झाला होता. लोहगड मारण्याचा निश्चय पक्का झाल्या-नंतर धारकरी लोकांची निवड करण्याचा प्रसंग आला. तेव्हां ती धार, नावजी बलकवड्यानें कबूल केली, म्हणजे लोहगडावर जाणाऱ्या सैन्याचें आधिपत्य स्वीकारलें. मग पुन्हा एकदां विठोजी कार्क्यांबरोबर नावजी, लोह-गडास जाऊन किल्ल्याचा लागभाग समक्ष पाहून आला. तेव्हां लोहगड जिंकणें सामान्य कर्म नाहीं, असें त्यास स्पष्ट कळून आलें, राजमाचीस त्या-बाबत त्रिंबकपंत मुतालिकाशीं वाटाघाट झाली तेव्हां नावजी म्हणाला:—
'सध्यां शत्रु सर्वच किल्ल्यावर विशेष जागृतीनें आहे. गतवर्षी सिंहगड काबीज करण्याकरतां तुम्ही स्वारी पाठविली होतीत, परंतु शत्रूची खबरदारी पाहिल्यावर तटाला शिड्या लाविल्या असतांहि तें काम सोडून द्यावें लागलें. त्या वेळेपासून अलीकडे तर शत्रु फारच सावध आहे. 'नाजूक जागांची बेहबुदी बहुत भांतेनें करून शत्रु खबरदार आहे, बिलंद जागे आदि करून पहारे चौकस बसवून, चारी प्रहर रात्रीं गस्तीवर गस्ती चालतात. किल्लेदार तरवारीचा जोम धरून मोठ्या जमावानिसी गतवर्षापेक्षां राहात आहे. सारांश, किल्ल्यास दगा द्यावा ऐसा जागा कोठेंहि राहिला नाहीं.' काल आम्ही

लोहगडची हवी पाहून आलों. ती चढण्याची जागा पहाऱ्यांच्या पोटीं आहे, कस्तेनें जोरावारीनेंच दगा द्यावा लागतो. हा प्राणावरचा खेळ आहे. तानाजी मालुसऱ्यानें जीव देऊनच किल्ला संपादिला. तोच या लोहगडावर माझा प्रकार होणार. मी धार कबूल केली आहे, त्याप्रमाणें कार्यास जातों, आणि लोहगड जिंकतों, पण 'आपण जिवावरी निदान केल्यासारखें स्वामींनीं आपणास मौजें सावरगांव तर्फ पौनमावळ हा गांव इनाम करून दिला पाहिजे.' त्रिंबक-पंत मुतालिकानें नावजीचें म्हणणें तत्काळ कबूल केलें हें सांगणें नकोच.

त्यानंतर २५ जून १६९३ रोजीं राजमाचीहून निघून घाटमाथा चढोन मजल दरमजल लोहगडानजीक येऊन, रानांत दबा धरला व ३० जून रोजीं धारकऱ्यांची निवड करून लोहगडाच्या कडयाखालीं जाऊन, माळा लावल्या. नावजी जातीनें प्रथम धारेस चढला. तटापाशीं गेल्यावर शत्रूच्या गस्तीमुळें शिडया लावण्यास अवकाश फावला नाहीं, म्हणून उजाडेपर्यंत ते थांबले. अरुणोदयीं पहारे संपल्यावर नावजीनें शिडया लावल्या, गुप्तपणें तटावर चढोन आंत उडया टाकल्या, पहारे चोपून काढले, आणि आषाढ शु. ८ स म्हणजे १ जुलै १६९३ रोजीं लोहगड जिंकला.

आश्वासनाप्रमाणें मौजे सावरगांव नावजीला इनाम देण्यांत आला.

यानंतर थोडयाच दिवसांत नावजी बलकवडयानें सिंहगड किल्लाहि लोह-गडाप्रमाणें मोठ्या शर्थीनें सर केला. तो कार्यभाग बहुधा १६९४ च्या फेब्रुवारीच्या मध्यास उरकण्यांत आला असावा. कारण त्या कामगिरीबद्दल नावजी बलकवडयाला, राजाराम छत्रपतीचें जें शाबासकीचें पत्र गेलें तें ३ एप्रिल १६९४ चें आहे. त्यांत म्हटलें आहे– ' तुम्ही सिंहगडचें कार्यसिद्धि समयीं धारेस चढोन तरवारीची शर्थ केली वगैरे वर्तमान शंकराजी पंडित सचिवांनीं कळविलें, तरी उत्तम आहे. असेच पंतांच्या आज्ञेप्रमाणें सेवा करावी. तुमचा सरंजाम पंतांनीं केला असेल व इनाम दिला असेल तो आम्ही चालवूं. निःशंक असावें. '

नावजीला पदातसप्तसहस्रीचा किताब यापूर्वीच देण्यांत आला होता. वास्तविक हे पोकळ सन्मान होते. ७००० पायदळ पदवीधारकांनीं पदरीं बाळगलेंच पाहिजे, अशी सक्ति नव्हती. पंचहजारी, सप्तहजारी, हे दिल्लीच्या मोगल बादशाहींतील पद्धतीचें अनुकरण होतें. आयर्विननें आपल्या ' आर्मी ऑफ् दि इंडियन मोगल्स ' या ग्रंथांत, तिकडेहि या पदव्या कशा पोकळ होत्या ते पुराव्यानिशीं दाखवून दिलें आहे. या वेळीं महाराष्ट्रांत तर अशी स्थिति होती कीं, सरकार जाग्यावर नाहीं, पदरीं पैका नाहीं, तेव्हां मोगलां-विरुद्ध जनतेला उद्युक्त करण्यासाठीं तेव्हांच्या अमात्यादिकांनीं अशी योजना केली कीं, या काळांत जो कोणी ईर्षेनें पुढें येऊन मोगलांनीं गिळलेला जो मुलखाचा भाग सोडवूं इच्छील त्याला ती कामगिरी सांगावी. सोडविलेला मुलूख किंवा मातबर इनामें त्याला द्यावीं, आणि मोठमोठे किताब द्यावे.

याला अनुसरूनच नावजीला 'पदातसप्तसहस्री'चा किताब बहाल करण्यांत आला असला पाहिजे.

नावजीचे पराक्रम पुढेंहि अप्रतिहत सुरूच राहिले. यानंतर दोनच वर्षांनीं त्यानें कोरीगड जिंकून घेतला, त्याचा प्रकार असा—

सन १६९६ सालीं जुन्नरकर बेगानें दग्यानें कोरीगड जिंकला, तेव्हां तो परत हिसकावून घेण्याची कामगिरी नावजीवर पडली. त्यानें हशमांचा जमाव करून किल्ल्याभोंवतीं घिरट्या घालून शत्रूला किल्ल्यावर कसलीहि रसद पोंचूं दिली नाहीं, यामुळें किल्ला डावाडोल झाला. कोरीगडचें हें वर्तमान जुन्नरास समजलें तेव्हां बलकवडयाचा निःपात करून गडाला साहित्यसामानाचा पुरवठा करण्यासाठीं तोफची बेग निघाला. त्याचे बरोबर मन्सूरखानाचा लेक पुष्कळ फौज व साहित्य होतें. तोफची बेग आपणावर येतोसें कळतांच नावजीनें गनिमी कावा केला व जांभुळणें तर्फ पौड खोरें या मुक्कामीं तोफची बेगावर अकस्मात छापा घातला. त्या वेळीं मोठीच कचाकची झाली, परंतु

नावजीनें शत्रूची दाणादाण करून त्याचे अनेक लोक ठार करून, शेंकडों घोडीं पाडाव करून घेतलीं. या कामगिरीबद्दल त्याला मौजें मुलखेड हा गांव इनाम मिळाला.

पुन: पुढल्या वर्षी, नावजीनें, आणखी एक साहेबकाम करून दाखविलें (१६९७). या वेळीं हबशांनीं कोरीगडच्या पेठेवर अकस्मात् चालून येऊन पेठ लुटून फन्ना केली, बंद धरले, आणि लूट संभाळून तो सावाघाटानें परत जाऊं लागला. पेठेवरील या छाप्याची वार्ता त्रिंबक शिवदेव मुतालिक दिम्मत सुरनीस यास कळली, तेव्हां हबशाला ताबडतोब नतीजा पावविणें प्राप्तच होतें. सुरनिसाजवळ नावजी नाईक होता, त्यालाच तें काम सांगण्यांत आलें. नावजीनेंहि लगेच जमाव घेऊन कुरडा घाटानें उतरून, हबशाशीं गांठ घातली, बंद सोडविले 'आणि शत्रूचे किले विधीव केलें' म्हणजे शत्रूचें 'केलें, विहीन केलें.' म्हणजेच शत्रूचा भारंभार बदला घेतला ! हा नावजीचा नवा नांव घेण्यासारखा पराक्रम, तेव्हां त्याची भरपाई कांहीं इनामानें करणें ओघासच आलें. पण या वेळीं एखादा स्वतंत्र गांव इनाम देण्यांत आला नाहीं. गतवर्षी मुलखेड गांव दिला होता, पण तो लहान होता, सबब नावजीच्या दुहेरी कामगिरीबद्दल मुलखेड गांव रद्द करून त्याऐवजीं मौजें दारवली हा मोठा गांव, त्याला इनाम करून देण्यांत आला. असो.

सावरगांव व दारवली हे दोन्ही गांव इनाम मिळाले तरी त्या गांवाचा भोगवटा झाला नाहीं. कारण तत्कालीन अस्थिर धामधुमीची परिस्थिति. म्हणून १६ डिसेंबर १७०० रोजीं पुन्हा एकदां सदरहू दोन्ही गांव इनाम म्हणून चालविण्याबद्दल, नावजीनें केसो त्रिमल याचें आज्ञापत्र, महादाजी सामराज सुभेदार व कारकून प्रांत मावळ तर्फ लोहगड यांचे नांवें आणविलें.

येथपर्यंत नावजी राजारामाच्या सरकाराशीं एकनिष्ठ होता यांत शंका नाहीं. दरम्यानच्या काळांत ताराबाईस राज्यलोभ सुटला. राजाराम वारल्या-

वर त्याच्या दोन बायका राजसबाई व ताराबाई उरल्या. राजसबाईचा पुत्र संभाजी तीनच वर्षांचा होता, उलट धाकटी बायको ताराबाई इचा पुत्र शिवाजी दहा वर्षांचा होता. ताराबाईचें म्हणणें माझा मुलगा वडील आहे, त्यासच राज्याभिषेक करा. त्या वेळीं रामचंद्रपंतांनीं सांगितलें कीं, शाहू महाराजांच्या सुटकेची खटपट सुरू आहे, राजाराम महाराजांनीं मृत्यूच्या आधीं तसा मोठा प्रयत्न केलाहि होता. करितां तूर्त कोणासच राज्याभिषेक नको. शाहू महाराज लौकरच येतील. हें बोलणें ताराबाईला रुचलें नाहीं, व तिनें रामचंद्रपंतास बडतर्फ करून परशराम त्र्यंबकास हातीं धरलें व आपल्या सवतीला म्हणजे राजसबाईला कैदेंत टाकिलें. तिचें म्हणणें ' शाहू महाराज ते धनी आणि हे चोर असा अर्थ नाहीं. ' तिनें जबरदस्तीनें १७०१ सालीं आपल्या मुलाला (शिवाजीला) राज्याभिषेक केला.

या भानगडी आणि राजाराम महाराजांनीं पूर्वी शाहूला सोडविण्यासाठीं केलेले निष्फळ प्रयत्न, यांमुळें शाहूचे तोतये निर्माण होण्यास संधि सांपडली. तसे तोतये निर्माण झालेहि आणि त्यांपैकीं एकाला पकडून चौकशी करून ठारहि मारून टाकण्यांत आलें होतें. पुढें प्रत्यक्ष शाहू महाराज सुटून आल्यावरहि ताराबाईनें ठरविलें कीं पूर्वी एक वेळ तोतया शाहू आला होता त्यास धरून मारलें, तसें या शाहूवरहि फौज पाठवून पारिपत्य करून त्यास तोतया म्हणून ठार मारावें. यासंबंधीं तिनें लिहिलेल्या पत्रांतहि उल्लेख आहेत.

असो. सांगण्याचा मुद्दा हा कीं, नावजी बलकवड्याला हा शाहूचा तोतयाच भोंवला. म्हणजे असें कीं, मावळांत कोणी शाहू म्हणून तोतया निर्माण झाला आणि नावजी बलकवडे त्याला मिळाला. राजघराण्यांत यादवी सुरू झाली असतां आदल्या क्षणीं एकनिष्ठ भासणारे सरदार दुसऱ्या-क्षणीं विरुद्ध बाजूस गेल्याचा चमत्कार अनेक वेळां दिसून येतो, तसेंच येथें झालें. नावजी, तोतया शाहूचा मिलाफी होऊन मुलूख मारूं लागला, तेव्हां

पौड खोऱ्याचा देशमुख राघोजी राऊतराव ढमाले यानें त्याच्यावर स्वारी घालून त्यास दग्यानें ठार करून टाकिलें.

सन १८०० सालीं दिलेल्या वतनवादांतील बलकवड्यांच्या करीण्यांत मात्र तोतयाचें कारण दिलेलें नाहीं. तर ढमाले देशमुखाचें व नावजीचें कांहीं कारणामुळें द्वैत पडलें होतें, त्यामुळें ढमाल्यानें त्यास दग्यानें गांठून मारलें असें म्हटलें आहे. पण तें कसेंहि असो. नावजीचा मृत्यु कसा ओढ-वला व त्याचा भयंकर सूड पुढें कसा उगविण्यांत आला वगैरेंची तपशीलवार माहिती त्या करीण्यांत असल्यामुळें त्याचें महत्त्व विशेष आहे; शिवाय वाङ्मय-दृष्टयाहि तें वर्णन सरस आहे, म्हणून जवळ जवळ त्याच शब्दांनीं तें देतों.

कोरीगड हस्तगत केला. मग तेथून महाराजांचा अम्मल बसवून राज-माचीस महाराजाजवळ आले. तैसाच सिंहगडहि सर केला. पुढें दारवली गांव इनाम मिळाला. त्या वेळेस गांवीं यावें ते न आले. गांवीं येऊन सनदा घेऊन भोगवटाहि केला नाहीं. तसेच परभारा पहिले स्थळीं म्हणजे वाळणांत आले. तेथें शिकारीस गेले होते. त्या वेळेस मौजें पिंपरीचे वाडीस मित्र होता तो वाटेंत भेटला. त्यानें मोठा आग्रह केला कीं, 'आमचे घरीं जेवावयासी आज येणें.' तेव्हां नावजी बोलले कीं, 'मी रानांत आलों आहे. रात्र बहुत झाली आणि गांवांत आमचे दुस्मान ढमाले आहेत. त्याजपासी जमीयतहि आहे. मी जेवावयासी येत नाहीं,' असें सांगितलें. परंतु आग्रहामुळें मित्राचे घरीं रात्रीं जेवावयास गेले. तो मित्र वाणी याजकडे तूप व गूळ घ्यावयास गेला. तेथें ढमाले याचा कारकून दुकानांत होता, तो त्यास माहितगार नाहीं. तेव्हां वाणी पुसों लागला कीं, 'इतके रात्रीस तूपगूळ कशास हवा? पाहुणा कोण आला तें सांग.' तेव्हां तो न सांगे. नंतर वाणियानें दाण्याची शपथ केली, तेव्हां त्यानें नावजीचें नांव सांगितलें! ढमाले याचे कारकुनानें हें वर्तमान ऐकिलें आणि तो तसाच रुमाल बांधून ढमाले याजपाशीं गेला आणि

सांगितलें कीं 'तुमचा वादी बलकवडा गांवांत जेवावयासी आला आहे !' मग कांयें! ढमाल्यानें साडेतीनशे माणूस घेऊन नावजीस त्या मित्राच्या घरांतच कोंडलें ! पण नावजीहि इरेचा माणूस; तो बोलला कीं, 'मी बलकवडा जेवल्या खेरीज उठावयाचा नाहीं;' जेवण उरकून तो व त्याचा खिदमतगार व कुत्रा असे कुडावर लाथ मारून बाहेर निघाले व बाहेरच्या लोकांवर पडून दहा-पांच मुडदे करून फळी फोडून अस्वला वालकोंडीवर धावले. पाठीवर ढमाल्याचे लोक पाठलागास धावतच होते. नावजीनें मधेंच त्यास झुकांडी दिली व चोरवाटेनें वर निघून गेले आणि वागजईचे जवळच डोंगर चढूं लागले. रात्रीचा गडद अंधार. डोंगर चढतांना कारवीचा धस तोंडीचा पायांत भरला, तो पोटरींत निघाला ! तेव्हां तेथेंच भोंवळबुटी येऊन नावजी खालीं कोसळला. तेव्हां बरोबर खिदमतगार होता तो नावजीला पाठीशीं घालून गोळी टाकूं लागला. पण इतक्या लोकांपुढें एकटा काय करणार ? त्यालाहि गोळ्या घुसून तो पडला. इमानी कुत्रा होता तो मात्र तसाच दोन्ही मुडद्यां-जवळ खडा राहिला व कुणासहि जवळ येऊं देईना. पण त्यालाहि मारिलें आणि ढमाल्यानें नावजीचें डोसकें कापलें आणि ते जयघोष करीत निघून गेले.

नावजीचा असा अंत झाला. नावजीमागें त्याची बायको आणि दहा वर्षांचा मुलगा होनाजी एवढे राहिले. नावजीची बायको त्याच्यासारखीच इरेची होती. होनाजीला घेऊन ती लोहगडास कान्होजी आंग्रे होते त्याजकडे जाऊन म्हणूं लागली, 'माझा दादल्या ढमाले यांनीं मारिला. शीर कापून घेऊन गेले ! त्याचा सूड घ्यावा, नाहींतर तुम्हांजवळ आपला प्राण देईन.' तेव्हां कान्होजीनें लोहगडाहून ७०० लोकांची स्वारी पाठवून ढमाल्यास पकडून आणिलें. आणि मग त्याचे हालहाल किती केले तें काय सांगावें ! जरबांत (जेरबंदांत) सुया घालून चुन्याचें पाणी शिंपून मार दिला आणि शेवटीं नावजीच्या मुलाच्या म्हणजे होनाजीच्याच हातीं मेखसू देऊन ढमाल्याचें डोकें फोडविलें !

हा करीणा कान्होजी राणोजी बलकवडे यानें म्हणजे नावजीच्या पणतवानें १८०० सालीं, संताजी बलकवडे यांनीं भाऊबंदकीच्या वादांत गांव जत्त करविला त्या वेळीं दिलेला आहे.

या करीण्यांत नावजीच्या मृत्यूचें कारण खासगी अदावत असें सांगितलेलें असलें तरी तें खरें नव्हे. खरें कारण नावजीची सरकाराविरुद्ध बंडखोरी हेंच होतें. कारण राघोजी राऊतराव ढमाल्याला नावजीवर स्वारी करून ठार केले या मुर्दुमकीचें बक्षीस म्हणून १७०१ च्या ऑगस्टांत छत्रपतींनीं जमीन इनाम दिलेली आहे, त्याबाबतचे बाहिरो मोरेश्वर प्रधानाचे महादाजी शामराज नामजाद व कारकून प्रांत मावळ तर्फ लोहगड यास पत्र आहे तें असें:—

ता. १८–८–१७०१
२४ रबिलावल इसन्नेमया
अलफचें पत्र

राघोजी राऊतराव ढमाले देशमुख तर्फ पौड खोरे येही हुजूर येऊन विनंती केली कीं आपण स्वामीच्या राज्यांत बहुतच कष्ट मेहनत केली. सालगुदस्ता नावजी बलकवडा यानें हरामखोरीचे ढंग करून, किल्ले सुधागडचा आसरा करून तोतयाचा बहाणा केला, आणि लोक जमाव करून, मुलखांत स्वारी घालून गांव मारून नेऊं लागला. त्यास नतीजा त्याचे कर्तव्यानुरूप झाला. पुढेंहि स्वामीचे सेवेशीं एकनिष्ठपणें सेवा करून आहों. ऐसीयास स्वामींनीं कृपाळू होऊन, नूतन इनाम देविलिया वतनावरी राहून सेवा करूं म्हणून विनंती. ऐसियास देशमुख मजकूर हे पूर्वीपासून राजश्री छत्रपती स्वामीच्या पायाशीं निष्ठेनें वर्तताती. गतवर्षीं नावजी बलकवडा यास लोकांचा जमाव करून सजा दिल्ही. पुढेंहि स्वामीच्या पायाशीं एकचित्तें वर्तावें या निमित्त त्यास नूतन इनाम मौजे वडवाथर पैकीं थलमलई खालिसा जमीन रकम ढेपी केली ८=॥ अडीच मण ही भूमि दिधली असे. सदरहू इनाम

खेरीज इनामदार व हक्कदार, वतनदार खेरीजकरून दिल्हे असे. यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवीत जाणें या पत्राची तालीक लिहून घेऊन मुख्य पत्र देशमुखास भोगवटियास देणें. दरहरसाल नूतन पत्राची अपेक्षा न करणें जाणिजे. छ २४ रबिलावल, आज्ञा प्रमाण.

नावजीचा मुलगा होनाजी बलकवडे. हाहि बापाप्रमाणेंच फार शूर निपजला. थोरल्या बाजीरावांच्या कारकीर्दींत त्यानें अनेक लष्करी कामगिऱ्या बजावल्या. वसई मोहिमेंत त्याचा शेंकडों वेळा उल्लेख आलेला आहे. तो केव्हां मेला तें समजत नाहीं. पुढें त्याचा मुलगा राणोजी हाहि पेशव्यांच्या सैन्यांतील मावळ्यांचा जमातदार म्हणून अनेक कामगिऱ्यांवर होता. १७७७ सालीं तो उंदेरीचा किल्लेदार होता. त्या सालीं बारभाईंनीं तोतयास पकडून देण्याचें बक्षीस म्हणून राघोजी आंगऱ्याला उंदेरीचा किल्ला देण्यास काढला, तेव्हां " किल्ला तुम्ही आंगऱ्यास द्याल तर पुढें तुमचें पारिपत्य होईल " असें धमकीचें पत्र रघुनाथराव पेशव्यानें त्याला लिहिल्याचें नमूद आहे (शि. च. सा. खंड ५, पृ.१९२)

• • •

: ६ :

सप्तर्षि

सातारा शहर हें ‘ शाहूनगर, ’ ‘ सातारा ’ आणि ‘ सप्तऋषी ’ या तीन नांवांनीं ओळखलें जातें. त्याचप्रमाणें साताऱ्याचा किल्ला हा ‘ अजिंक्यतारा, ’ ‘ आजिमतारा ’ आणि ‘ ऋषीपर्वत ’ अशा तीन नांवांनीं ओळखला जातो. यापैकीं ‘ सातारा ’ हें नांव रूढ आणि सर्वमान्य असल्यामुळें त्याची चिकित्सा करण्याचें मनांत कधीं येत नाहीं. तसेंच ‘ शाहूनगर ’ हें शाहूनें वसविलेलें नगर हा अर्थ उघडच असल्यामुळें त्याबद्दलहि कांहीं शंका मनास शिवत नाहीं. परंतु ‘ सप्तऋषी ’ नांव उच्चारतांच हें नांव कसें व कां पडलें असेल असा विचार तत्काळ मनांत उद्भवतो.

सातारा किल्ल्याचीहि तशीच स्थिति आहे. राजारामाच्या कारकीर्दीत औरंगजेबानें जातीनें इरेस पडून, किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला व आपला मुलगा शहाजादा आजिमशहा याच्या मार्फत सूत्र लावून अखेरचा एलगार

(एलगार = हल्ला) करावा न लागतां तो त्यानें जिंकला; अशी माहिती चिटणिसांच्या बखरींत दिली आहे. तींत किल्ल्याचें नांव बदलल्याची माहिती नाहीं. परंतु किल्ला जिंकल्यावर औरंगजेबानें किल्ल्याला आपल्या मुलाचें नांव दिलें म्हणून तेव्हांपासून तो ' अजिमतारा ' या नांवानें ओळखण्यांत येऊं लागला, अशी माहिती काफीखानानें दिली आहे ! ' अजिमतारा ' याचेंच लोकबोलींत ' अजिंकतारा ' असें रूप होऊन नंतर तो ' अजिंक्यतारा ' झाला. सारांश, किल्ल्याच्या या दोन नांवांचा उलगडा अशा रीतीनें होऊं शकतो. परंतु त्याचें जें तिसरें ' ऋषीपर्वत ' हें नांव त्याचा उलगडा होण्याचें शिल्लक राहतेंच !

पेशवाईतील प्रत्यक्ष पत्रादि साधनें वाचणाऱ्या लोकांना आणि इतिहास-संशोधकांना ' सप्तऋषी ' म्हणजे ' सातारा राजधानी ' आणि ' ऋषीपर्वत ' म्हणजे ' साताऱ्चा डोंगरी किल्ला, ' हें पाठच असतें. पण मौज मात्र अशी आहे कीं, आजवर त्या नांवांची समाधानकारक उपपत्ति कोणीहि लावून दाखविण्याचा प्रयत्न केलेला नाहीं.

' सप्तऋषी ' म्हणजे सातारा असें कागदपत्रांतून हजारों वेळां आल्यामुळें सर्वांना तें पाठ. परंतु त्याच्या उपपत्तीच्या चर्चेत पडण्याचें कोणाला तादृश महत्त्वहि वाटलें नाहीं.

माझ्या मनांत फार दिवसांपासून या शब्दाच्या उपपत्तीचें गूढ घर करून बसलें होतें. परंतु त्याच्या पाठीमागें लागून कांहीं तरी निकाल करून घेण्याची संधि मलाहि प्राप्त होऊं शकली नाहीं. अलीकडे कांहीं दिवसांपासून मी पेशवेदप्तरांत माझ्या कांहीं खास संशोधनाकरितां जाऊं लागलों. तेव्हां तेथें येत असलेल्या श्री. मा. वि. गुजर यांच्याशीं माझा कांहीं कारणानें याच विषयावर वाद झाला. माझें म्हणणें असें कीं, ' पर्वताई ' देवीवरून जसें त्या टेकडीला ' पर्वती ' नांव प्राप्त झालें किंवा कौंडिण्य ऋषीच्या कोंडणेश्वर

महादेव या पेशवाईंत व प्रत्यक्ष आजहि अस्तित्वांत असलेल्या देवावरून जसें सिंहगडाचें कोंडाणें हें नांव पडलें, तसाच 'सप्तऋषी' बाबत प्रकार असला पाहिजे. त्या डोंगरावर त्या नांवाची कांहीं तरी स्थानिक देवता म्हणून प्राचीन काळापासून असण्याचा संभव आहे व त्यावरूनच सप्तऋषी हें नांव पडलें असण्याची शक्यता जास्त." यावर गुजर म्हणाले, "मी तर प्रत्यक्ष छत्रपतीकुळाचा आप्तसंबंधी आणि साताऱ्याचा पिढीजाद रहिवासी. मी सांगतों कीं, तुम्ही म्हणतां तसा प्रकार साताऱ्यांत कोणालाहि माहीत नाहीं. किल्ल्यावर देवता आहे ती मंगलाईच तेवढी. ऋषींविषी कोणी नाहीं!!"

हा आमचा वाद पेशवे दप्तरांत झाला आणि माझ्या शंकेचें निरसन करणाऱ्या साधनांचा समुद्रहि तेथेंच. यामुळें पुढें कांहीं दिवस मी त्या दृष्टीनें संशोधन सुरू केलें व आनंद वाटतो कीं, अखेर माझ्या प्रतिपादनाला निःसंदिग्ध असा पुरावाहि मला तेथें मिळाला.

सभासदकृत शिवाजीच्या बखरींत त्याच्या गडकोटांची तपशीलवार यादी 'ऊर्फ' नांवांसह दिली आहे. त्यांत 'परळीगड' ऊर्फ सज्जनगड' असें नांव दिलें आहे. परंतु त्याच्या वरच्याच ओळींत 'सातारगड' एवढेंच नांव दिलें आहे. 'सप्तऋषी' अगर 'अजिमतारा' असें कांहींच ऊर्फ नांव नाहीं.

भोसल्यांच्या शेडगांवकर बखरींत असें सांगितलें आहे कीं, "शके १५८० श्रावण शु. ५ रोज शनिवारीं सातारा किल्ला शिवाजी राजे यांणीं घेतला. त्या किल्ल्याचें नांव पूर्वी पादशाही अमलांत "हुकेब्रयान" असें होतें तें नांव मोडून 'सातारा' असें किल्ल्याचें नांव ठेविलें."

चिटणीसकृत बखरींत सर्वत्र 'सातारा' असाच फक्त उल्लेख सांपडतो. राजाराममहाराजांच्या वेळची साताऱ्च्या वेढ्याची रोमांचकारी हकीकत त्या बखरींत दिलेली आहे, त्यांत एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, "औरंग-

जेव्हां बादशहानें करंज्याचें (साताऱ्याजवळील खेडें) नांव "पादशाहापूर" असें ठेविलें. तसेंच "परळी" च्या तळाचें नांव 'शहापूर' ठेविलें. याखेरीज किल्ल्यावरील स्थानिक ठिकाणांचेहि उल्लेख आहेत, त्यांत किल्ल्याच्या ईशान्य कोनाच्या मंगळाईच्या बुरुजाचाहि निर्देश सांपडतो. पण किल्ल्याचा मात्र जो उल्लेख येतो तो "सातारा" असाच केवळ. "सप्तऋषी" असा कोठेंच नाहीं.

आतां निवळ कल्पनेनें विद्वानांनीं अनेक तर्क वेळोवेळीं केले आहेत ते सांगतो. कोणी म्हणतो 'शेडगांवकर बखर' ग्राह्य धरून शिवाजीनें 'सातारा' असें किल्ल्याचें नवीनच नामकरण केलें, असें गृहीत धरावें. सप्तऋषी किंवा ऋषीपर्वत हे पुढील पर्याय अलंकारिक संस्कृतिकरणाचीं उदाहरणें समजावींत. पन्हाळ्याचें 'पर्णाल पर्वत' नेवाशाचें 'निधिवास', पंढरीचें 'प्रेमपुरी,', जुन्नरचें 'जीर्णनगर,' 'बारशीचें 'द्वादशनगरी,' त्यासारखेंच साताऱ्याचें सप्तऋषी झालें असावें; पण यावर दुसरा म्हणतो कीं, 'शिवाजीनें किल्ल्याचें नवें नांव ठेवलें असतें तर तें सार्थच ठेवलें असतें. त्यानें नवीन नांवें गडांना ठेवलीं तीं तपासून पाहिलीं असतां हें सहज दिसून येईल. सातारा या शब्दाचा अर्थ काय होतो ? अर्थात् कांहीं नाहीं. तेव्हां 'दुर्के-बयान' या मुसलमानी नांवाच्या आधीं 'सप्ततारा' असें कांहींतरी प्राचीन नांव असावें आणि मग त्याचें सातारा असें अपभ्रष्ट रूप रूढ झालें असावें. सप्तताऱ्याची किंवा सात ताऱ्यांची कल्पना सप्तर्षि नक्षत्रावरून सुचली असणें अशक्य नाहीं. किंबहुना औरंगजेबाच्या कारकीर्दींत त्यानें 'आजिम-तारा' हें जें नवें नांव किल्ल्याला ठेवलें तेंहि ती ताऱ्याची कल्पना गृहीत धरूनच. 'सितारा' म्हणजेहि ताराच व तो शब्द साताऱ्याला जुळताच आहे. 'अजिम' याचे दोन अर्थ आहेत. एक शहाजाद्याचें नांव आणि दुसरा 'फार बडा' किंवा 'विशाल' असा आहे.

आजिमशहाच्या सद्‌भाग्यानें हस्तगत झालेला गड किंवा तेजस्वी, विशाल नक्षत्रासारखा गड असे दोन्ही अर्थ ज्यांत बसतील असें श्लेषात्मक नामकरण करण्यांत आलें असावें. पण आणखी कोणी असें म्हणणारे आहेत कीं, सप्तऋषी नांवाला पुराणांत आधार सांपडेल. शापामुळें कोणी सात देव पाषाण पर्वत झाले. साताऱ्याजवळ सात डोंगर आहेतहि. तेव्हां त्या भौगोलिक खुणेवरून प्राचीन काळापासून त्या ठिकाणाला सप्तऋषि नांव पडलें असेल. आणि कालान्तरानें त्यांपैकीं एकावर देवस्थान केलें गेलें असेल किंवा किल्ला बांधला गेला असेल, आणि म्हणून तेवढ्याच पर्वताला ऋषीपर्वत किंवा सप्तऋषी म्हणून ओळखण्यांत येऊं लागलें.

शिलालेखादिकांत किंवा मुसलमानपूर्व काळांत सप्तऋषी असा उल्लेख सांपडतो कीं काय यावर कोणी प्रकाश टाकल्यास बरें होईल.

असो ! आतां शेवटीं मी मला सांपडलेला पुरावा सादर करतों. त्या नोंदी अशा—

पेशवे दप्तरांतील दुसऱ्या बाजीरावाच्या खाजगी जमाखर्चाच्या रुमालांत खमस अशर मयातेन शके १७३६ भाव संवत्सर माहे रमजान छ. ३० रमजान तेरखेस [सन १८१४–१५] अशी नोंद आहे—

“५०० रुपये सातारियास श्रीविठोबा, मंगलाई व सप्तऋषी प्रभृती देवदेवतांस नैवेद्यपूजा वगैरेबद्दल इ॥ सन खमस अशर अव्वलसाल तागाईत अखेर सालपावेतों मलमास सुद्धां बेगमीचे खर्चाबद्दल त्रिंबकजीचे हवाली केले.”

याखेरीज या सप्तऋषी स्थानाचा स्पष्ट उल्लेख केलेली अन्य दप्तरांतील नोंद अशी—

सलास अशरमयातेन जमादिलावल वैशाख १७३४. (सन १८१४।१५).

२७ जमादिलावल–बद्दल किले सातारा येथील शाकारणीबद्दल रुपये.

किल्लेमजकूर येथील देवालयें, राजमंदिरें व सुभ्याचा वाडा व कारखाने व पहारेबंदीचीं वगैरे शाकारणी व दागदोजी.

७ देवस्थानें:-१ श्रीमंगलाई, १ श्रीरामेश्वर, १ श्रीविठोबा, १ श्रीनरसोबा, १ श्रीहनुमंत, १ श्रीम्हसोबा, १ श्रीजननी = ७.

२ पिराच्या मशिदी :- १ शेखसला, १ साकडे सुलतान = २.

११ दिम्मत हुजरात—(त्याच्या पोटांतील तपशील)

२ राजमंदिरें:-१ राजवाडा पहिला, देखील मुदबख व गोशाळा व सलबतखाना व अबदारखाना व दिवाणखाना व जामदारखाना व बंगले वगैरे. कारखानासुद्धां. १ राजवाडा नवा, देखील मुदबख व सलबतखाना व जामदारखाना व तालीमखाना वगैरे सुद्धां.

१ पागा वाड्यानजीकची, १ नगारखाना, १ बंगला नवे बागेंतील, १ सोपा केळीचे बागेंतील, १ अनुष्ठानाचें घर, १ गंगाधरशास्त्री यांचें घर, १ गोपाळशास्त्री यांचें घर, १ छपरबंदीकडे भिंतीवर तीन हात रुंदीच्या छपऱ्या व झड्या बंगल्यासुद्धां, १ जुन्या वाडयाचे सोप्यावर सज्जास तट्टे बांधावयाचे. एकूण = ११.

१ वाडा सुभ्याचा देखील पुढील सदर व दप्तरखाना व बागेंतील बंगलासुद्धां, १ अलगा सुभ्याचे वाड्याजवळच्या, १ तोफखाना, ४ कोठ्या, १ दास्तानची थोर, १ चिरेबंदी, १ पिंपळाजवळची, १

दरवाजावरील ५८ पहारे.

२६ तटबंदीवरील, १ मंगळाईजवळचा, १ मंगळाईचे पूर्वेस, १ दारुखान्याचा, १ निम्मोणीजवळचा, १ हनुमंत बुरजाचा, १ चाफ्याचे झाडाजवळ, १ दिंडीचा, १ दिंडीनजीक, १ कळकीचे झाडाजवळ, १ जांभळीजवळचा, १ सतऋषीचा, १ तोफखान्याचे पिछाडीस, १ हनुमंताचे दक्षिणेस, १ शेखसल्लानजीक, १ ढालेचे बुरजानजीक, १ खडकाचा, १

परवानगीचा, १ वर्दीचा, १ खडकाचे दरवाजानजीक, १ दुस्मान चेपट्याचे तोफेनजीक, १ शाहूसागर, १ बिनीचा, १ छपरबंदीचा, १ रामेश्वराजवळील, १ डाळिंबीचा, १ वेताळाचा. एकूण २६.

८ राजवाड्याचे गिर्दीचे, १ बकुळीचा, १ रत्नशाळेनजीक, १ चिंचेचा, १ दोही राजवाड्यांमधील, १ अंजिरीचा, १ खुटाचा, १ वरदीचा समोर नजीक, १ बुधल्याचा. एकूण ८.

२४ खालील पहारे घेऱ्याचे. २० घेऱ्याचे, १ दरवाजापुढील, १ दरवाजानजीक, १ जननीचा, १ वरदीचा, १ डका बुरजाचा, १ शेवरीचा, मोंगल बुरूज, १ पिंपळाचा, १ वालवायाचा, १ धोंडीवरचा, १ पिंपळाचा, १ सूर्यफळाचा, १ दिंडीचा, १ वाघटीचा, घंबीचा, १ घसरणीचा, १ टोकाचा, १ चाव्याचा, १ ढालेचे बुरजाखालील, १ भोकरीचा = २०.

१ बिनी पहाऱ्याखालील, १ बाजारपेठा, १ बिनीचा, १ श्रीगणपतीनजीक पहारा आहे तो = २४ = ५८.

यावरून सप्तऋषी हें साताऱ्याचें संस्कृतिकरण नसून तेंच खरें पुरातन नांव आहे हें सिद्ध झालें.

वरील नोंदीचें एक विशेष वैशिष्ट्य असें कीं, आजघटकेस साताऱ्च्या किल्ल्यावर सर्व ओसाडच आहे. परंतु पेशवाईत या छत्रपतींच्या राहिवासाच्या किल्ल्यावर किती राजमंदिरें, देवालयें, सुभ्याचे वाडे, कारखाने, बंगले, बागा, तलाव वगैरे होते याची सर्वस्वी नवी व विश्वसनीय अशी माहिती या कागदानें नव्यानेंच उपलब्ध होत आहे!

• • •

728

728

किंमत-रुपये चार

ऐतिहासिक बालकथा

शहाजीची कथा ....
शिवाजीची कथा ....
संभाजीची कथा ....
राजारामाची कथा ....
शाहूची कथा ....
बाळाजी विश्वनाथाची कथा ....
थोरल्या बाजीरावाची कथा ....
बाळाजी बाजीरावाची कथा ....
थोरल्या माधवराव पेशव्याची कथा ....
सवाई माधवराव पेशव्याची कथा ....
झांशीच्या राणीची कथा ....
राणा प्रताप ....
दिल्लीचे मोंगल बादशहा ....
आगरकरांची कथा ....
लोकमान्य टिळकांची कथा ....
बाल इतिहास भाग १ ....
,, भाग २ ....
,, भाग ३ ....
नरवीर महादजी शिंदे ....

चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे–